# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १९-०४-१९८९ ते दिनांक १६-०४-१९९०**

**विषय क्र. २२२ पासून विषय क्र. ८९ पर्यंत**

**रजिष्टर क्र. ०२**

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत**

**बुधवार दिनांक १९ एप्रिल, १९८९ रोजी दुपारी १.०० वाजता मा. महापौर डॉ. शांताराम काळे यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभूवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वधारण सभेस सुरुवात झाली. सर्वसाधारण सभेमध्ये निम्ननिर्दिष्ट सन्मानीय सभासद कार्यालयीन अधिकाऱ्यांसह उपस्थित होते.**

१) मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंत
२) मा. श्री. तकी हसन खान कासिम खाँ
३) मा. श्री. यादव अशोक सायन्ना
४) मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
५) मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
६) मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग
७) मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
८) मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
९) मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ
१०) मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन
११) मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
१२) मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव
१३) मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण
१४) मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी
१५) मा. श्री. मुजीब आलमशा खान
१६) मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव
१७) मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१८) मा. श्री. जावेद हसन खाँ कासीम खान
१९) मा. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन
२०) मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
२१) मा. श्री. ओक जयवंत केशव
२२) मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग
२३) मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
२४) मा. श्री. अ. रशीदखाँ अ. हमीद खान
२५) श्रीमती दलाल लता श्रिनिवास
२६) मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२७) मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२८) मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन
२९) मा. श्री. छापरवाल रमेश नारायण
३०) मा. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
३१) मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
३२) मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल
३३) मा. श्री. म. इस्माईल अ. करीम

३४) मा. श्री. फैय्याजखान अहमदखान
३५) मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग
३६) मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद
३७) मा. श्री. स. हुसेन स. अहमद
३८) मा. श्री. मगर शंकर जिजाराम
३९) मा. श्री. मानकापे नामदेव शामराव
४०) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
४१) मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलॉन
४२) मा. श्री. अलफ खान हुसेन खान
४३) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
४४) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव
४५) मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान
४६) मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ
४७) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४८) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
४९) मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
५०) मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन
५१) मा. श्री. गोडसे आनंद जगदिश
५२) मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार
५३) मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
५४) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम
५५) मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव
५६) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
५७) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५८) मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल --//--
५९) मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान --//--

सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने झाली.

थोर स्वातंत्र्य सेनानी आणि समाजवादी पक्षाचे संस्थापक एस. एम. जोशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी परभणी येथे झालेल्या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या मुलांना आणि माजी नगर परिषद सदस्य गुलाम अहेमद खान यांचे निधनानिमित्त सभागृहाने ०.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

**विषय** - दि. १८ मार्च, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधरण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद** - विषय क्र. १८४ सभागृहाने मंजूर केला होता. तशा नोंदीचा स्पष्ट उल्लेख करावा, अशी सूचना स. सदस्य श्री. रतनकुमार पंडागळे यांनी केली. हे स्मारक महानगरपालिकेच्या विद्यामाने व्हावे अशी आमची इच्छा आहे. त्यासाठी आवश्यक तसा ठराव घेण्यात यावा.

महापालिकेतर्फे सिकंदर अली वज्द ट्रस्ट यांच्याशी या विषयी चर्चा करून पुढील दिशा ठरविता येईल. या ट्रस्टसाठी महापालिकातर्फे अनुदान देण्यात कोणताही अडथळा येणार नाही असे मा. महापौर यांनी सुचविले.

सिकंदर अली वज्द ट्रस्टने महापालिकेस आर्थिक मदत करण्याची विनंती केली होती, त्या अनुषंगाने महापालिकेने आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले आहे. असे मा. महापौर यांनी सुचविले.

सिकंदर अली वज्द ट्रस्टसाठी महापालिकेने आर्थिक मदतीची तरतूद केली आहे पण ट्रस्टकडे पैसा नसल्याने काम सुरू करू शकत नाही. व महापालिकेने केलेली आर्थिक तरतुदीची रक्कम खर्च करू शकत नाही. तेंव्हा सिकंदर अली वज्द ट्रस्टचे काम महापालिकेतर्फे करावे अशी स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे यांचा आग्रह असल्याचा खुलासा स. सभासद श्री. यादव अशोक सायन्ना यांनी केला.

सिकंदर अली वज्द ट्रस्टविषयी विशेष माहिती नसतांना विनाकारण चर्चा करणे योग्य होणार नाही. या स्मारकाबाबत ट्रस्टच्या सभासदांमध्ये विचार विनिमय होवून या स्मारकाचे बांधकाम शहराच्य बाहेर करण्याऐवजी शहरात असावे अशी भूमिका कायम करण्यासत आली आहे. त्यादृष्टीने मिलिंद कॉलेज आणि  मल्टीपर्पज हायस्कूल परिसर या ठिकाणी स्मारकासाठी जागा उपलब्ध करण्याबाबत वाघाघाटी चालू आहेत. या स्मारकासाठी महापालिके प्रमाणेच अन्य संस्थाकडूनही आर्थिक मदत मिळणार आहे. तेंव्हा महापालिकेतर्फे देऊ केलेली रक्कम परत घेणे योग्य होणार नाही असे स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी सुचविले.

सिकंदर अली वज्द स्मारकासाठी गेल्या पांच वर्षापासून महापालिकेने रक्कम राखनू ठेवली आहे. ती रक्कम आपण खर्च करू शकत नाही. याबाबत संबंधीत ट्रस्टला पत्र पाठविण्यात यावे या बाबत संबंधीताचा खुलासा प्राप्त झाल्यावर विचार करण्यात येईल असे मा. महापौरं यांनी सुचविले.

या स्मारकाकासाठी स्थापन करण्यात आलेल्या ट्रस्टची आवश्यकता नाही ही ट्रस्ट रद्द करून स्मारक उभारण्याचा प्रस्ताव महापालिकेकडे घेण्यात यावा असे स. सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी सुचविले.

स्मारक उभारणेसाठी महापालिकेने देऊ केलेल्या रक्कम रुपये पाच लाख आर्थिक मदतीची ट्रस्टला आवश्यकता आहे किंवा नाही याबाबत लेखी विचारणा करण्यात यावी यावर संबंधीत ट्रस्टच्या प्राप्त होणाऱ्या खुलाशावर पुढील निर्णय घेण्यात येईल असे. मा. आयुक्त यांनी सुचविले.

मा. आयुक्त यांनी सुचविल्याप्रमाणे ट्रस्टकडून खुलासा प्राप्त झाल्यावर कार्यवाही करण्यात येईल असे मा. महापौर यांनी घोषित केले.

विषय क्र. २२० मध्ये विकास खर्च जुन्या दराने स्विकारण्याची मुदत दि. १ मे, ८९ पर्यंत दर्शविली आहे. ती ३१ मे. ८९ अशी मंजूर झालेली आहे. त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी असे स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे यांनी सुचविले.

यावर खुलासा करतांना मे अखेरपर्यंत घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार ३१ मे, ८९ पर्यंत जुन्या दराने विकास निधी घेण्यात येईल. अशी दुरुस्त नोंद घेण्यात यावी.

ठराव क्र. १८७ आणि २०९ अन्वये एकाच कामासाठी दोन वेळा मंजुरी घेण्यात आली आहे. तेंव्हा २०९ ठराव योग्य असल्यामुळे तो कायम करून ठराव १८७ रद्द करण्यात यावा. अशी सूचना स. सभासद श्री. अलफखॉ हुसने खान यांनी केली. एकाच

कामासाठी दोन ठराव झाले त्यामुळे क्र. १८७ रद्द करण्यात यावी असे मा. महापौरांनी सुचविले.

ठराव क्र. १८५ अन्वये महापालिकेच्या निव्वळ उत्पन्नाच्या १५% रकमेचा सवलतीचा फायदा कमकुवत घटकांप्रमाणेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि घोषित स्लम विभागाला मिळावा. अशी दुरुस्ती स. सभासद श्री. गंगाधर गाढे व अजिजउल्ला बेग यांनी सुचविले. सन्माननीय सभासदांच्या सुचनेप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी असे मा. महापौरांनी सुचविले.

ठराव क्र. २१५ च्या निर्णयानुसार मा. आयुक्तांकडून मला अद्याप माहिती मिळाली नाही, ती मिळावी अशी मागणी स. सदस्या सौ. लता दलाल यांनी केली.

या प्रकरणी सहा. संचालक नगर रचना यांना पत्र देण्यात आले आहे. या प्रकरणातील तीन चार संचिका वेगळ्या प्रकारच्या आहेत त्यांची रितसर चौकशी करण्यात येत आहे. या प्रकारणी चौकशी पूर्ण होताच मा. महापौर यांचेकडे माहिती दिली जाईल असे मा. आयुक्त यांनी सुचविले.

ठराव क्र. १८० अन्वये गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी भागात प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यास मान्यता मिळालेली आहे. त्या कामाचे काय झाले व काम केंव्हा सुरू होणार याबाबत खुलासा करण्याची मागणी स. सभासद श्री. मुजीब आलमशा खान यांनी केली.

शहरात आवश्यक त्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याबाबत पहाणी करण्याचे कामाबरोबर या भागाचा विचार करण्यात येइ्रल असे मा. महापौर यांनी सुचविले.

सभागृहामध्ये ठराव पारित होतात पण प्रशासन तयावर काही कारवाई करत नाही अशी तक्रार स. सभासद श्री. अजीजउल्ला बेग यांनी केली.

प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर रितसर शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात येतो आणि शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर कार्यवाही करण्यात येते असे मा. आयुक्तांनी सुचविले.

स. सदस्या सौ. लता दलाल, स. सभासद श्री. मुजीब आलमशा खान आणि माझा एकाच प्रकारचा प्रश्न आहे. प्रत्येक सभेच्या वेळी पुढील मिटींगमध्ये उत्तर देण्यात येईल असे ठरते. पण प्रत्यक्ष माहिती मिळत नाही. मग प्रशासन काय कार्यवाही करते याचा खुलासा करण्याची मागणी स. सभासद डॉ. चेनकरण संचेती यांनी केली.

सभागृहामध्ये मंजूर झालेल्या ठरावाची प्रत प्रत्येक विभागाकडे पाठविली जाते का? आणि जात असेल तर त्या त्या विभागाचे ठरावाबाबत विभागवार विभागणी करून पाठविले जातात काय? अशी विचारणा स. सभासद श्री. अब्दुल रशिद खान (मामू) यांनी केली.

स. सभासदांच्या सूचना योग्य आहेत. शक्य तितक्या लवकर स. सभासदांना माहिती देण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी सूचना मा. महापौर यांनी केली.

प्रशासकीय पातळीवरील प्रस्तावाची प्रशासनातर्फे योग्य ती दखल घेवून आवश्यक ती कार्यवाही कररण्यात येते असा खुलासा मा. आयुक्त ह्यांनी केला.

ठराव क्र. २०१ अन्वये निमर्गमन शुल्क ४ रुपयांवरून १० रुपये करण्याबाबत विचार झाला होता. भाजीपाला ही जिवनावश्यक बाब असल्यामुळे या निर्गमन शुल्कामधून भाजीपाला वगळण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. विठ्ठल पेरकर यांनी मांडली.

सदर प्रकरण स्थायी समितीचे अखत्यारित असेल तर ते संबंधित विभागाकडे पाठविण्यात यावे असे मा. महापौर यांनी सुचविले.

विषय क्र. १७६ मधील चर्चेनुसार प्रशासनातर्फे पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेबाबत पर्यायी उपाययोजना केली जात आहे. याबद्दल आम्ही प्रशासनाचे अभिनंदन करतो. त्याच संदर्भात नेहमी नेहमी खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठ्याबाबत कार्यालयातर्फे पर्यायी व्यवस्था करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली याचा अहवाल सभागृहाला देण्याची मागणी स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी केली.

शहराचे पाणी पुरवठ्यामध्ये सुधारण होण्याचे दृष्टीने आवश्यक असलेल्या वीज पुरवठ्याबाबत अधिक्षक अभियंता परिसर अभियांत्रिकी मंडळ व अधिक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ याचेंशी चर्चा केली असून वीज पुरवठ्यामध्ये सुधारणा करण्याचे दृष्टीने कामासाठी आवश्यक असणारी रक्कम अधिक्षक अीीयंता म.पा.पु व जलनिस:रण मंडळ यांचेकडे जमा केलेली आहे. सध्या सदरील काम सुरू असून नक्षत्रवाडी व ढोरकिन येथील कामे जवळपास पूर्ण होत आलेली आहेत व उर्वरित काम जून ८९ पर्यंत पूर्ण होईल असे अधिक्षक अभियंता म. रा. वि. मं. यांनी आश्वासन दिले आहे. असा खुलासा कार्यकारी अभियंता (पा. पु.) यांनी केला.

एम. आय. डी. सी. करिता घेण्यात येणारी स्वंतत्र पाईपलाईन बाबत एका शेतकऱ्याने हरकत घेतल्यामुळे स्वंतत्र पाईपलाईन टाकण्याचे काम अडनू पडले आहे. तेंव्हा सदर प्रकरणी प्रशासनाने खंबीर भूमिका घेऊन अडून पडलेले काम पूर्ववत चालू होण्याचे दृष्टीने तडजोड करावी अशी सूचना स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी केली.

सिडको भागात बरेच वॉर्ड आहेत. त्यापैकी एका वार्डातील पाणी पुरवठ्याबाबत पर्यायी व्यवस्थेचे काम झाले त्यास एक महिण्याचा कालावधी लागला. तेंव्हा एका वार्डातील पाणी पुरवठ्याच्या कामासाठी अशा प्रकारे एक एक महिण्याचा कालावधी लागला तर इतर वार्डातील नागरिकांचे उन्हाळ्यात काम होणार? या बाबीचा विचार करून हातपंप बसविणे व विहिरीचा गाळ काढणेच्या कामास गती द्यावी अशी सूचना स. सभासद श्री. केशव सोनवणे यांनी केली.

वार्ड क्र. ५० मध्ये पाणी पुरवठा पाईपलाईन करिता एक महिण्यापूर्वी खोदकाम झालेले आहे. कार्यालयात पाईपही उपलब्ध आहेत. पण लाईन टाकली जात नाही. याचा अर्थ काय? खोदकाम करून एक एक महिना लाईन टाकली न गेल्यामूळे या वार्डातील नागरिकांच्या पाण्याबाबतच्या तक्रारी दिवसेंबदिवस वाढत आहेत. तसेच या वार्डातील पाणी पुरवठ्याच्या वेळा निश्चित नसल्यामुळे नागरिकांचे हाल होत आहे. अशी तक्रार स. सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी केली. स. सभासद श्री. केशव सोनवणे व श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांचे सुचनेप्रमाणे काम लवकर करून घेण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता यांनी करावी अशी सूचना मा. महापौरांनी केली.

वार्ड क्र. १३ मध्ये दोन तीन विहिरी आहेत त्या विहिरीची दुरुस्ती व गाळ उपसण्याचे काम पूर्ण केल्यास वार्डातील नागरिकांना पाण्याची व्यवस्था होईल अशी सूचना स. सभासद श्री. मुजीब आलमशा खान यांनी केली.

शिवशंकर कॉलनी येथे रोड क्रॉसिंगवर टाकण्यात आलेला सिमेंट पाईन क्रॅक झाल्यामुळे पाणी वाया जात असून या भागातील नागरिकांना अपुरा पाणी पुरवठा होत आहे, असे स. सभासद श्री. अविनाश कुमावत यांनी सुचविले.

मागील सभेमध्ये मी विचारलेल्या काही प्रश्नांची उत्तरे देण्यात आली पण त्याची नोंद इतिवृत्तांत घेण्यात आली नाही अशी तक्रार स. सभासद श्री. अजिजउल्ला बेग यांनी केली.

स. सभादांनी विचारलेल्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांची नोंद इतिवृत्तांत घेण्यात यावी असे मा. महापौरांनी सुचविले.

स. सदस्य श्री. अजिजउल्ला बेग ह्यांनी विचारलेल्या १) निवन नळ कनेक्शन घेणाऱ्यांना महापालिका किती वर्षापासून मीटर न देता मीटरभाडे रु. १००/- का वसूल करीत आहे? आणि सांस्कृतिक कार्यक्रम विभागातर्फे १९८७/८८ सालात आयोजित बाल आनंद मेळाव्याकरिता १९८७/८८ च्या दुरुस्ती अंदाजपत्रकानुसार केवढी आणि कशी रक्कम खर्च करण्यात आली? ह्या प्रश्नांस संबंधीत विभाग प्रमुख अनुक्रमे कार्यकारी अभियंता श्री. धारूरकर ह्यांनी जानेवारी १९८६ पासून मीटर उपलबध नसल्यामुहे मीटर देणे स्थगित केले आहे. मात्र मीटर अनामत पोटी व रु.१००/- घेतली जाते. तसेच सांस्कृतिक अधिकारी श्रीमती ज्ञानंदा कुलकर्णी ह्यांनी देखील १९८७/८८ चे सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे झालेल्या खर्चाचा सविस्तर खुलासा केला.

विषय क्र. १९४ अन्वये ओरंगाबाद शहराचा वाढता व्याप लक्षात घेता सफाई कामगाराचे भरतीबाबत मा. आयुक्त यांनी विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे ठरले होते. त्या भरतीचे काय झाले याचा खुलासा करण्यात यावा अशी मागणी स. सभासद श्री. बंडू प्रधान व श्री. किशोर थोरात यांनी केली.

सफाई कामगार भरतीचा प्रस्ताव शासनाचे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे. या प्रकरणी शासनाची मंजुरी मिळेपर्यंत कामगारांची तात्पुरती नेमणूक करण्यात येईल असे मा. आयुक्त यांनी सुचविले.

नगर परिषद काळात रजेवर जाणाऱ्या सफाई कामगारांचे जागी मुन्सरमवर हंगामी मजुरांची व्यवस्था केली जात होते. शहराच्या विस्तारात वाढ झाल्यामुळे नगर परिषद काळातील पध्दतीप्रमाणे रजेवर जाणाऱ्या सफाई कामगाराचे रजेच्या काळात मुन्सरमवर कामगार देण्याची पध्दत पुन्हा सुरू केल्यास स्वच्छतेच्या कामात प्रगती निर्माण होईल अशी सूचना स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे यांनी केली.

वैद्यकीय अधिकारी यांचे राजीनामा प्रकरणी मागील सभेत आठ दिवसांच्याआंत अहवाल देण्यात येईल असे सांगण्यात आले होते. त्याबाबत खुलासा करण्यात यावा असे स. सभासद श्री. चेणकरन संचेती यांनी सुचविले.

वैद्यकीय अधिकारी श्रीमती बऱ्हाळे यांचे राजीनामा प्रकरणी स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झालेली आहे. तेंव्हा या प्रकरणांकडे डोळेझाक करून चालणार नाही. तेंव्हा प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता योग्य कार्यवाही करण्यात यावी अशी सूचना स. सभासद श्री. गंगाधर गाढे यांनी केली.

संबंधीत वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या निवेदनाप्रमाणे चौकशी होईल. वृत्तपत्रतील मजकुराप्रमाणे चौकशी करणे योग्य नाही असा खुलासा मा. आयुक्त यांनी केला.

विषय क्र. २१६ चे प्रकरणी मा. आयुक्त यांनी मागील सभेत केलेल्या खुलाशाची नोंद इतिवृत्तामध्ये नोंदविण्यात आलेली नाही. त्याप्रमाणे वाढ करण्यात यावी अशी सुचना मा. महापौर यांनी केली.

शहर विकास योजनेच्या सुधारित आराखडा मंजुरीचे वेळी नारळी बागेतील आरक्षणबाबतचा विचार करण्यात येईल असा खुलासा मा. आयुक्त यांनी केला.

**ठराव** - दि. १८ मार्च, १९८९ रोजी संपन्न झालेलया सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तातील,

१) ठराव क्र. २२० मध्ये विकास खर्च जुन्या दराने स्विकारण्याची मुदत दि. १ मे, १९८९ पर्यंत दर्शविली आहे. ती ३१ मे, १९८९ अशी मंजूर झालेली आहे. त्याप्रमाणे अशी दुरुस्ती करण्यात येते.

२) ठराव क्र. १८७ आणि २०९ अन्वये एकाच कामास दोन वेहा मंजुरी देण्यात आलेली आहे. तेंव्हा २०९ ठराव योगय असल्यामुळे तो कायम करून ठराव क्र. १८७ रद्द करण्यात येतो.

३) ठराव क्र. २१६ मध्ये शहर विकास योजनेचा सुधारित आराखडा मंजुरीचे वेळी नारळी बागेतील आरक्षणाबाबतचा विचार करण्यात येईल.

अनु क्र. १ व २ मधील दुरुस्ती व अनु. क्र. ३ मधील वाढ यासह दिनांक १८/०३/१९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

# ***पुरवणी विषय पत्रिका***

**दिनांक : १५/०४/८९**

**विषय क्र. २२२ -** वार्ड क्र. २० मधील मिलकॉर्नरच्या चौरस्त्यावर छत्रपती संभाजी राजे भासले यांचा पूर्णाकृती पुतळा बसवून तया भोवती छोटेसे उद्यान, लायटींग व रंगीत कारंजे बसवावेत, कारण हे शहरातील मध्यवर्ती किठाण असून पूर्वेस शहराची मुख्य बाजारपेठ, पश्चिमेस छावणी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कॉलेजचा परिसर तसेच जवळच घाटी दवाखाना, पानचककी व बीबीचा मकबरा आहे. ज्युबली पार्क याला ऐतिहासिक महत्व आहे व या इतिहासाचा व संभाजी राजांचा अनोखा संबंध आहे. करिता हे होणे आवश्यक आहे.

सुचक - श्री. जयवंत ओक.
अनुमोदक - श्री. प्रदिप जैस्वाल.
दिनांक - १४/०३/१९८९.

**ठराव क्र. २२२ -** शहरातील चौकांमध्ये महापुरुषांचे पुतळे उभारणे आणि शहरातील रस्त्यांना महापुरुषांची नांवे देणे या संदर्भात कायम करण्यात आलेलया उपसमिती मध्ये प्रस्तावित प्रकरणी विचार करणे उचित होईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २२३ -** मराठी माणसांचे मानबिंदू महाराष्ट्राचे लाडके नेते, सकार महर्ष्री, माजी मुख्यंमंत्री, माजी राज्यपाल, कै. मा. वसंतदादा पाटील यांचा पूर्णाकृती भव्य पुतळा महानगरपालिकेतर्फे महानगरपालिका कार्यालयासमोर अथवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अथवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील चौकात शहरातील अन्य मुख्य चौकांमध्ये उभारणे बाबत जेणेकरून त्यांनी केलेल्या अविरत महान कार्याची आपणास सतत आठवण राहील.

सुचक - श्री. गिरजाराम हाळनोर.
अनुमोदक - श्री. नारायण फत्तेलष्कर.
दिनांक - १४/०३/१९८९.

**<u>संवाद</u> -** राष्ट्र पुरुषांचे पुतळे उभे करणे व रस्तयांना नावे देणे बाबत उपसमिती कायम करून बरेच दिवस झालेले आहेत कायम करण्यात आलेल्या प्रकरणी उपसमितीने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तेंव्हा यापुढे उपसमिती कायम करतांना अशा उपसमितीला विशिष्ट मुदतीत अहवाल पूर्ण करण्याचे बंधन असावे अशी उप सूचना स. सभासद श्री. केशव सोनवणे यांनी मांडली.

**<u>ठराव क्र.</u> २२३ -** शहरातील चौकांमध्ये महापुरुषांचे पुतळे उभारणे आणि शहरातील रस्त्यांना महापुरुषांची नांवे देणे या प्रकरणी कायम करण्यात आलेल्या उपसमितीमध्ये सदर प्रकरणी विचार करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> २२४ -** औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयात आपल्या विविध कामानिमित्त शहरातील व बाहेरील नागरिक नेहमीच येतात. कार्यालयात बहुसंख्य कर्मचारी काम करतात. येथे एकही अद्यायावत व सुसज्ज असे उपहारगृह उपलब्ध नाही.

औरंगाबाद मध्ये मराठवाडा विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालय, आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालय आदी प्रमाणे ओरंगाबाद महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे ईमारती शेजारी इतर महानगरपालिका प्रमाणे एक भव्य, सुसज्ज व अद्ययावत उपहारगृह बांधून त्वरित सुरू करण्यात यावे. जेणेकरून कर्मचारी व शहरातील नागरिकांना या उपहारगृहात स्वस्त दरात उत्कृष्ट दर्जाचे खाद्य पदार्थ व थंड पेय, चहा, कॉफी, दूध इत्यादी उपलब्ध होतील.

सुचक - श्री. गिरजाराम हाळनोर.
अनुमोदक - १) श्री. नारायण फत्तेलष्कर.
२) श्री. केशव सोनवणे.
दिनांक - १४/०३/१९८९.

**<u>ठराव क्र.</u> २२४ -** नियोजित प्रशासकीय ईमारती मध्ये स्वतंत्र्य उपहार गृहाची तरतूद करण्यात आलेली आहे. त्या दृष्टीने शहर अभियंता यांनी अद्ययावत व सुसज्ज उपहारगृहाबद्दल योग्य ती कार्यवाही करावी असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय क्र.</u> २२५ -** सर्व समाजातील जनतेची रोकडिया हनुमान स्मशान भूमी खूप वाईट परिस्थितीत आहे. घाण खूप असते, त्या ठिकाणी गुरे, जनावरे नेहमी चरत असतात. कुठल्याही प्रकारची बसण्याची सोय, पाण्याची सोसय तेथे नाही, निवाऱ्याची सोय नाही, कंपाऊंड वॉल नाही या सर्व बाबींची व्यवस्था स्मशानभूमीत करणे, पुण्याच्या वैकुंठ स्मशानभूमी, नगरची स्मशान भूमी अशा प्रकारच्या अद्ययावत पध्दतीची स्मशान भूमी करणे व त्या स्मशानभूमीची जागा जरूर न्यायप्रविष्ट असेल तर प्रतिस्पर्धा पक्षाशी तसेच मोंढा भागातील व्यापारी संस्थांशी बोलणी करून लवकरात लवकर खटले बंद करून पारंपारिक पध्दतीची जुनी स्मशान भूमी महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीच्या जागेवर करून घेणे आवश्यक आहे. त्या स्मशान भूमीच्या जागे मधून संजयनगरला जाणारा मार्ग सुध्दा बाजूने किंवा बाहेरून घेणे आवश्यक आहे.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे.

अनुमोदक - १) श्री. पी. बी. पैठणकर.
२) श्री. नामदेव मानकापे.
दिनांक - १४/०३/१९८९.

**<u>संवाद</u> -** माझ्या माहितीप्रमाणे या स्मशान भूमीच्या जागेच्या वादाचे प्रकरण न्यायालयात असल्याचे समजते, या प्रकरणी विधी विभागाने काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा असे विचार स. स. डॉ. चेनकरण संचेती यांनी मांडले.

शहराची लोकसंख्या विचारात घेता पुणे-नगर येथील स्मशान भूमी प्रमाणे ही स्मशानभूमी विकसित करून सर्व सोयी उपलब्ध करून देणे जरुरीचे आहे असे मत स. सदस्या सौ. लता दलाल यांनी मांडले.

महानगरपालिका हद्दित ज्या-ज्या ठिकाणी समशानभूमी अस्तित्वात असतील त्या-त्या ठिकाणी बोअरवेल्सची व्यवस्था केली जाईल असे मा. आयुक्त यांनी सुचविले.

**<u>ठराव क्र.</u> २२५ -** रोकडीया हनुमान स्मशान भूमी संबंधीचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने सदरचे प्रकरणी विधी सल्लागार यांनी आगामी सभेत सविस्तर अहवाल सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

# <u>*विषयपत्रिका*</u>

**<u>विषय क्र.</u> २२६ -** दिनांक १७/०९/१९८८ च्या सर्वसाधारण सभेच्या ठरावात (ठराव क्र. ४२) मध्ये सधां मस्जिद शहाबाजार ते रोशनगेट पर्यंतच्या रस्त्याची रुंदी ५० फुट ऐवजी ४० फुट रुंद अशी उल्लेखिली गेली आहे.

सदरील रस्ता शासन मंजूर विकास योजना मध्ये ५० फुट रुंद आहे. करिता प्रकरणी ४० फुट (१२ मिटर) रुंद रस्त्याऐवजी ५० फुट (१५ मिटर) रुंदीप्रमाणे संपादन करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्र.</u> २२६ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चंपा मस्जिद शहाबाजार ते रोशनगेट पर्यंतच्या रस्त्याच्या रुंदीस ठराव क्र. ४२/ दिनांक १७/०९/१९८८ अन्वये ४० फुट रुंद रस्ता अशी मंजुरी देण्यात आली आहे. त्या ऐवजी मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर रस्त्याची रुंदी ४० फुट ऐवजी ५० फुट रुंदी प्रमाणे जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> २२७ -** ठराव क्र. १६१ दिनांक २० फेब्रुवारी, १९८९ रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या निर्णयाप्रमाणे निम्ननिर्दिष्ट प्रस्ताव पुर्ननिर्णयार्थ सादर.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४ व ४५७ चे पोट कलम (३) पोट भाग (अ) अन्वये भरावयाच्या वैधानिक जागांवर नेमणूका व गुणवत्ता बाबत महानगरपालिका ठराव क्र. ५८८ दि. ०६/११/१९८७ अन्वये इंग्रजी प्रारुप नियम मंजूर केले असून त्याबाबत स्थानिक वर्तमानपत्रात व शासकीय राजपत्रात प्रकाशित केलेले होते. दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत वा सूचना महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.

मंजुर केलेले प्रारुप नियम इंग्रजीत असल्यामुहे त्याचा मराठी अनुवाद करून सदरील प्रारुप नियम अंतिमतः मंजुरीस्तव सादर.

औरंगाबाद महानगरपालिकेने मुंबई, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४ व ४५७ व पोट कलम (३) पोटभाग (अ) अन्वये महानगरपालिकेस ज्या जागांवर नेमणूक करण्याचे अधिकार प्राप्त आहेत त्या जागांची वेतनश्रेणी आणि पात्रता ठरविण्याबाबतचे प्रारुप नियम :-

**संवाद** - तयार करण्यात आलेल्या इंग्रजी उपविधीचे रुपांतर मराठीत केल्यानंतर मराठीतील उपविधींना स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देणे आवश्यक आहे. सदर मराठी भोषेतील उपविधी प्रतीस वृत्तपत्रात प्रसिध्दी दिल्यानंतर यावर विचार करण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी केली.

**ठराव क्र. २२७ -** प्रारुप उपविधीचे मराठी प्रतीस वृत्तपत्रात प्रसिध्दी दिल्यानंतर यावर विचार करण्यात येईल असे मा. महापौर यांनी घोषित केले.

## १. संक्षिप्त नाव व प्रारंभ :-

ह्या नियमांना "महानगरपालिकेच्या" जागांवर नेमणुका करावयाचे अधिकार प्राप्त आहेत त्या जागांची वेतनश्रेणी पात्रता ठरविण्याबाबतचे औरंगाबाद महानगरपालिकेचे नियम" असे संबोधण्यात येईल व ते शासनाचे राजपत्रात अंतिमतः प्रसिध्द झालेचे तारखेपासून अंमलात येतील.

## २. व्याख्या :-

विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसल्यास.

अ ] "अधिनियम" म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९

ब ] "कलम" म्हणजे त्या अधिनियमाचे कलम.

क] ह्या मध्ये वापरण्यात आलेले शब्द व शब्द समुह यांची व्याख्या दिली नसेल तर अधिनियमा मध्ये जो अर्थ असेल तोच अर्थ त्या शब्दांच्या किंवा शब्द समूहाचा समाजावा.

## ३. पात्रता व वेतनश्रेणी

महानगरपालिकेस ज्या जागांवर नेमणूक करण्याचे अधिकार प्राप्त होतात अशा जागांची आवश्यक ती पात्रता व वेतनश्रेणी आणि भत्ते खालीलप्रमाणे राहतील.

उप आयुक्त, शहरअभियंता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, सहाय्यक आयुक्त आणि महापालिका सचिव ह्या जागेसाठी नमूद केलेली पात्रता नसेल तर महापालिका अशा व्यक्तीस त्या, जागेवर नियुक्त करणार नाही.

[अ] उप आयुक्त :-

१. वेतनश्रेणी :- रु. ६८०-४०-१००० इबी - १२५०-५०-१५०० अधिक इतर मान्य
टिप्पणी :- खालील पोट भाग २[क] प्रमाणे नेमलेल्या उमेदवारांची वेतनश्रेणी प्रतिनियुक्तीचे शर्ती व अटीप्रमाणे राहील.

२. पात्रता :- [अ] सध्या असलेल्या पैकी उमेदवारांचे नामनिर्देशनाने की,

१) जे सध्या महापालिकेचे सेवेत नसतील तर ३५ वर्षाहून अधिक वयाचे नाही.

२) कला, विज्ञान किंवा वाणिज्य अथवा विधी पदवीधारक आहेत.

३) किंवा आणि ज्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेत किंवा शासकीय खात्यात अधिकारी म्हणून किमान १० वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव आहे.

**अ थ वा**

[ब] सध्या महापालिकेतील अधिकाऱ्यांना बढती देवून कि,

१) जे कला, विज्ञान अथवा वाणिज्य किंवा विधी पदवीधारक आणि

२) ज्यांना अधिकारी म्हणून ७ वर्षाचा अनुभव असेल ज्यां व्यक्तींनी स्थानिक स्वराज्य संस्थेचा डिप्लोमा. धारण केलेला असेल किंवा ज्यांनी भारतीय लोक प्रशासन सेवा ह्या संस्थेचे प्रशिक्षण घेतलेले आहे अशांना प्राधान्य दिले जाईल.

अ थ वा

[क] शासनाच्या महसूल विभागातील उप जिल्हाधिकारी याचे पदाचे संवर्गातील अनुभवी अधिकाऱ्यास प्रतिनियुक्तीवर घेवून

[ब] महापालिका सहाय्यक आयुक्त :-

१) वेतणश्रेणी - रु. ६००-३०-७५०-इबी-४०-११५० अधिक इतर मान्य भत्ते-

टिप - पोट कलम पोट भाग (क) अन्वये प्रतिनियुक्तीवर नेमलेल्या उमेदवारास पगार व भत्ते प्रतिनियुक्तीच्या शर्ती व अटीप्रमाणे राहतील.

२) पात्रता उमेदवाराची नेमणूक खालीलप्रमाणे केली जाईल.

अ] सध्या असलेल्या उमेदवारांपैकी नामनिर्देशनाने की, जे,

१) सध्या महापालिकेच्या सेवेत नसतील तर ३५ वर्षाहुन अधिक वयाचे नाहीत.

२) कला, वाणिज्य अथवा शास्त्र अथवा विधी शाखेची पदवी धारण करतात.

३) शासकीय खात्यात अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेत अधिकारी म्हणून किमान १०(दहा) वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव असणारा.

ब] सध्या असलेल्या म.न.पा. सेवतील उमेदवारास बढती देवून जे,

१) कला, वाणिज्य अथवा शास्त्र सेवेतील पदवीधारक अथवा कायदा शाखेतील पदवीधारक.

२) जे अधिकाऱ्यांच्या जागेवर सलग सात (७) वर्षाहून कमी नाही इतकी वर्षे काम करतात.

३) जे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पदविधारक अथवा ज्यांनी भारतीय लोकसेवा प्रशासनात प्रशिक्षण घेतलेले आहे अशा व्यक्तींना प्राधान्य दिले जाईल.

क] शासनाच्या महसूल विभागाच्या तहसिलदार किंवा तत्सम योग्य अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेवून,

[क] आरोग्य वैद्यकीय अधिकारी :-

१) वेतनश्रेणी - १०००-५०-१५००.

टिप :- पोट कलम पोट भाग २(क) अन्वये नेमलेल्या उमेदवारांची वेतन श्रेणी प्रतिनियुक्तीच्या शर्ती व अटी अन्वये राहील.

पात्रता :- नेमणूक खालीलप्रमाणे केली जाईल.

अ) सध्या असलेल्यापेकी उमेदवारांच्या नामनिर्देशनाने की, जे.

१. महापालिकेच्या सेवेत नसतील तर ३५ वर्षाहून अधिक वयाचे नाहीत.
२. एम.बी.बी.एस.पद्वी आणि डिप्लोमा पब्लीक हेल्थ धारण करणारा परंतू डिप्लोमा इन पब्लीक हेल्थ धारण करणारा मिळत नसेल तर एम.बी.बी.एस.पद्वी धारण करणारा उमेदवारापैकी योग्य त्या उमेदवारास सदरचा डिप्लोमा नेमणूक तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत पूर्ण केला पाहिजे या अटीवर त्याची नेमणूक करता येईल.असे करण्यास तो असमर्थ ठरल्यास तो नोकरी वरून काढून टाकण्यास पात्र राहील.
३. ज्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेत अथवा सरकारी इस्पीतळ किंवा नावाजलेल्या इस्पीतळामध्ये किमान ५ (पाच) वर्षाचा वैद्यकीय अधिकारी म्हणून कामाचा अनुभव असावा.

अ) सध्या महानगरपालिकेत सेवेत असलेल्या उमेदवारांना बढती देवून ते एम.बी.बी.एस. ची पदवी धारण करतात.

ब) जे डिप्लोमा इन पब्लीक हेल्थ या परिक्षेचा डिप्लोमा बढतीच्या तारखेपासून ३ वर्षाच्या आत पूर्ण करतील .

क) जे वैद्यकीय अधिकारी म्हणून सलग ५ पाच वर्षाहून कमी नाहीत इतके वर्ष काम करातात किंवा.

ड) शहरअभियंता शासनाकडून आरोग्य सेवेतील पात्र उमेदवार प्रतिनियुक्तीवर घेवून .

वेतनश्रेणी : १०००-५०-१५००

टीप: पोटकलम २(क) अन्वये उमेदवारांची वेतनश्रेणी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती प्रमाणेच राहील.

२) पात्रता : या पदावर नेमणूकीस पात्र असणारा उमेदवार हा स्थापत्य शास्त्रातील बी.ई. (सिव्हील) ही पदवी धारण करणारा आणि सरकारी अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेत अथवा नावाजलेल्या स्थापत्यशास्त्र संस्थेत किमान उपअभियंता दर्जाच्या समान जागेवर किमान १०(दहा) वर्षाच्या कामाचा अनुभव असणारा.

अथवा

शासनाकडून योग्य तो अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेवून

[इ] नगरसचिव

१ वेतनश्रेणी: ६००-२०-७५० - इबी -४०-११५० अधिक इतर मान्य भत्ते
टिप : पोटकलम २ (क) अन्वये नेमलेल्या उमेदवारांची वेतनश्रेणी त्याच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती प्रमाणे राहतील.

२) पात्रता : नेमणूक खालीलप्रमाणे केली जाईल.

१) सध्या असलेल्या पैकी उमेदवारांच्या नामनिर्देशनाने जे,

२) सध्या महापालिकेच्या सेवेत नसतील तर तीस वर्षाहून अधिक वयाचे नाहीत.

३) कला अथवा वाणिज्य अथवा या शाखेतील पदवी धारण करणारा.

४) विधी शाखेतील पदवीधर.

५) ज्यास स्थानिक स्वराज्य संस्था ,निमशासकीय अथवा शासकीय खात्यातील जबाबदारीच्या जागेचा कमीत कमी १० वर्षाचा अनुभव असावा.

अथवा

ब] सध्या महापालिकेत नोकरीला असलेल्या उमेदवारास बढती देवून जे ,

१ कला अथवा शास्त्र अथवा वाणिज्य अथवा विधी शाखेची मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करतात.

२ अधिक दर्जाच्या हुद्याच्या जागेवर किंवा तत्सम नोकरीचा १० वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव .

[क] शासकीय सेवेतील योग्य तो अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेवून.

[फ] महापालिका मुख्य लेखा परिक्षक :

अ) वेतनश्रेणी : १०००-५०-१५०० अधिक इतर मान्य भत्ते.
टिप : पोटकलम पोट भाग -२ (क) अन्वये नेमलेल्या पदाची वेतनश्रेणी प्रितिनियुक्तीच्या अटी व शर्ती प्रमाणे केली जाईल.

ब) पात्रता : नेमणूक खालील प्रमाणे केली जाईल.

अ) सध्या असलेल्या उमेदवारापैकी नामनिर्देशनाने कीजे,

१ सध्या महापालिकेच्या सेवेत नसतील तर ३५ वर्षाहून अधिक वयाचे नाहीत.

२ कला अथवा वाणिज्य अथवा शास्त्र या शाखेची पदवी धारण करणारे.
अर्थशास्त्र अथवा गणित शास्त्र विषय घेवून पास झालेले कला पदवीधर.
आणि शास्त्र पदवीधर गणित विषय घेवून फक्त या पदासाठी पात्र असतील.
अकौंटन्सी व ऑडीटींग हे मुख्य विषय घेऊन पास झालेल्या वाणिज्य पदवीधारकांना प्राधान्य दिले जाईल. विधी शाखेची पदवी जादा पात्रता समजली जाईल.

३ ज्यांना कोणतेही सहकारी अथवा स्थानिक स्वराज्य संस्था अथवा खाजगी नावाजलेल्या फर्म मध्ये जवाबदारीच्या जागेवर लेखाधिकारी म्हणून काम केल्याचा ७ (सात) वष्र्चा अनुभव असेल.

किंवा

सध्या महापालिका सेवते असलेल्या कर्मचाऱ्यांना बढती देऊन जे.

१. गणित शास्त्र अथवा अर्थशास्त्रासह कला अथवा गणित शास्त्रासह शास्त्र अथ्वा वाणिज्य पदवीधारक आहेत.

२. जे लेखाधिकारी म्हणून सलग सात वर्षाहून कमी अनुभव नसलेल्या व ज्यांना लेख अंकेक्षणाचा अनुभव आहे असे.

क] शासनाकडील योगय तो अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेवून ४- नियम कलम ३ मध्ये काहीही सांगितले तरी अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त

जाती, भटक्या जमाती यापैकी आवश्यक अनुभव उच्च मुलभूत शैक्षणिक पात्रता असणारे पुरेसे उमेदवार त्यांच्या करिता राखून ठेवलेल्या जागा भरण्यासाठी उपलब्ध होण्याची शक्यता नाही असे निवडीच्या वेळी कोणतेही घटकेस नेमणूक करणाऱ्या अखत्यारीचे मत असेल तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या बाबतचे अनुभव उच्च मूलभूत शैक्षणिक पात्रता नेमणूक करणाऱ्या अखत्यारीच्या इच्छे नुसार शिथील करण्यात येतील. तसेच महापालिका सेवेतील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नोकरीचा कालावधी व अनुभव सहा महिन्यासाठी शिथील करण्यात येईल.

**<u>विषय क्र.</u> २२८ -** महानगरपालिकेचे ठराव क्र. ७७४/दिनांक ३१/०३/१९८७ अन्वये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना गणवेश द्यावयाचे विनियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये मंजूर केले आहेत. सदरील विनियम क्र. ३ तक्ता "अ" कॉलम ६ मध्ये गणवेश मान्य असलेल्या सेवकांना व चतुर्थ श्रेणी स्त्री व पुरुष सेवकांना गणेवशासाठी लागणारा खर्च रु. २५०/- असा दर्शविलेला आहे.

तथापि स्थायी समितीच्या विषय क्र. ७५०, ७५४/६ दि. ०५/०१/८९ च्या चर्चेद्वारे सदरील गणवेशासाठी प्रत्यक्षात लागणारा खर्च विनियमात दाखविलेल्या खर्चापेक्षा जास्त असल्यामुळे सदरील खर्च रु. २५०/- ऐवजी रक्कम रु. ५००/- अशी विनियमामध्ये दुरुस्ती करण्यास मंजुरी दिली आहे.

गणेवेश मान्य असलेल्या व चतुर्थ श्रेणी सेवकांना द्यावयाचा गणवेश खर्च रु. २५०/- ऐवजी रु. ५००/- असा विनियम क्र. ३ तक्ता "अ" कॉलम ६ मध्ये बदल करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> २२८ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये महापालिकेच्या गणवेश मान्य असलेल्या सेवकांना व चतुर्थ श्रेणी स्त्री व पुरुष सेवकांना गणवेश वाटपासाठी मंजूर झालेल्या विनियमातील विनियम क्र. ३ तक्ता "अ" कॉलम ६ मध्ये गणवेशासाठी लागणारा खर्च रु. २५०/- ऐवजी रु. ५००/- अशी विनियमामध्ये दुरुस्ती करण्यास दि. ०५/०१/८९ च्या स्थायी समितीने मंजुरी दिल्यानुसार महापालिकेतील गणवेश मान्य असलेल्या व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना द्यावयाचा गणवेश खर्च रु. २५०/- ऐवजी रु. ५००/- असा विनियम क्र. ३ तक्ता "अ" कॉलम ६ मध्ये फेरबदल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> २२९ -** मा. आयुक्त यांच्या सुचनेनुसार महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या कार्य क्षेत्रात वाढ झाल्यामुळे शिक्षण विभागाचे काम एकट्या शिक्षणाधिकाऱ्याकडून सांभाळणे अशक्य होत आहे त्यामुळे शाळांची तपासणी करणे, शासकीय पत्र व्यवहारावर लक्ष ठेवण, अनुदान इत्यादी बाबत कामे वेळेवर पूर्ण करण्याकरिता शिक्षण विभागाच्या अस्थापनेवर उपशिक्षणाधिकारी हे एक पद रक्कम रु. ५००-९०० या वेतनश्रेणीतील निर्माण करण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद</u> -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे निर्माण करण्यात येणारे उप शिक्षणाधिकाऱ्याचे पद अस्तित्वात असलेल्या शिक्षकातून ज्येष्ठता आणि रितसर बाबींचा विचार करून भरण्यात यावे अशी उपसूचना स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी मांडली.

**ठराव क्र. २२९ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शाळांची तपासणी करणे, शासकीय पत्रव्यवहारावर लक्ष ठेवणे, अनुदान आणि तत्संबंधीची अन्य कामे वेळेवर पूर्ण करण्याकरिता शिक्षण विभागाच्या अस्थापनेवर रु. ५०० ते ९०० या वेतनश्रेणीत उपशिक्षणाधिकाऱ्याचे पद निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी व सदरील ठराव शासनास पाठविण्यात यावा.

**विषय क्र. २३० -** महानगरपालिकेच्या तांत्रिक विभागातील कामाचा व्याप लक्षात घेऊन (४) उप अभियंता पदे निर्माण करण्याकरिता शासनाने पत्रक क्र. शासन निर्णय क्रमांक अेएमसी-१३८५/१४१५/सिआर-२०५/८५/नवि-२०/दि. २० डिसेंबर, १९८५ अन्वये मंजुरी दिली होती.

शासन निर्णय क्र. एएमसी-१३८५/१४१५/सिआर-८८/युडी-२१/मंत्रालय, मुंबई, दिनांक १६ सप्टेंबर, १९८७ अन्वये (४) उपअभियंता पदाची मंजुरी रद्द करण्यात आली.

[अ] मा. आयुक्तांनी प्रस्ताव सादर केला की,

सन -१९८८-१९८९ च्या महापालिकेच्या अंदाजपत्रकातील पाणीपुरवठा, जलनिसःरण व बांधकाम विभागने पूर्ण केलेल्या ८ कोटी रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकानुसार तसेच परिक्षण आणि दुरुस्ती, शहरातील विकासाचा वाढता व्याप लक्षात घेता सध्या अस्तित्वात असलेला तांत्रिक वर्ग उप अभियंता, बांधकाम १ व २ व उप अभियंता पाणी पुरवठा व उप अभियंता, ड्रेनेज (जलनिसःरण) ही चार उपअभियंतांची पदे कामाच्या व्याप्तीमुळे अंदाजपत्रकाच्या रक्कमे नुसार अजून नविन उपअभियंतांची पाच पदे निर्माण करणे आवश्यक असल्यामुळे खालील दर्शविलेल्या प्रमाणे पाच उप अभियंता पदाची वेतनश्रेणी रु. ६०० ते ११५० निर्माण करणे आवश्यक आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | पाणीपुरवठा विभाग पदसंख्या | - | १ (एक) |
| २) | जलनिःसारण विभाग पदसंख्या | - | १ (एक) |
| ३) | शहर अभियंता विभाग पदसंख्या | - | १ (एक) |
| ४) | गलिच्छ वस्ती पदसंख्या<br>सुधारणा विभाग | - | १ (एक) |
| ५) | विद्युत उप अभियंता पदसंख्या | - | १ (एक) |

शहरातील वाढती लोकसंख्या व नविन कॉलनी मध्ये नविन विकासाच्या दृष्टीकोनातून उप अभियंता विद्युत हे पद निर्माण करणे आवश्यक आहे. विद्युत विभागाचे काम अतिरिक्त पहावे लागत असल्यामुळे उप अभियंता विद्युत विभागाकरिता अत्यंत आवश्य आहे.

[ब] वरील प्रमाणे दर्शविलेली उप अभियंतांची पदे निर्माण करण्यास शासनाची मंजुरी मिळेल या अपेंक्षेवर.

१) श्री. एम. डी. सोनवणे, उप अभियंता स्लम (गलिच्छ वस्ती सुधारणा)
२) श्री. टी. डी. राजपुत, उप अभियंता जलनिःसारण
३) श्री. सिकंदर अली, उप अभियंता शहर अभियंता उप विभाग

या पदावर अनुक्रमे दि. १०/०८/८८ व १७/१०/८८ पासून तात्पुरती पदोन्नती देण्यात आली आहे. सदरील पदांना शासनाची मंजुरी मिळेल ह्या अटीवर वरील

तीन कर्मचाऱ्यांना तात्पुरती पदोन्नती देण्यात आली आहे. तरी सदरील नेमणुकीस तात्पुरती मुदत वाढ देण्यात यावी.

प्रस्ताव अ व ब विचारार्थ सादर.

**<u>संवाद</u> -** प्रस्तावात दर्शविललेली उप अभियंता यांची पदे निर्माण करण्यास "अ" प्रमाणे मंजूर नाहीत असे दिसते. तेंव्हा "ब" नुसार करण्यात आलेल्या नेमणूका योग्य वाटत नाहीत. त्यासाठी आवश्यक असलेली उप अभियंताची पदे मंजूर करून घेण्यात यावीत आणि नंतर त्या पदावर नियमाप्रमाणे नेमणुका करण्यात याव्यात असे स. सभासद, श्री. मोरेश्वर सावे यांनी सुचविले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये स्थायी समितीची मंजुरी घेऊन सहा महिन्याकरिता तात्पुरती नेमणूक करता येते. असे मा. आयुक्तांनी खुलासा केला.

स्लम उप अभियंता यांचे पद हे पूर्वीपासून मंजूर असल्यामुंळे या पदावर नेमणूक केलेले कर्मचारी, श्री. एम. डी. सोनवणे यांचा या प्रस्तावात उल्लेख करणे योग्य होणार नाही अस स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे यांनी सुचविले.

सदर प्रस्तावावर स. सदस्य श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी आपले लेखी निवेदन मा. महापौर यांना दिले.

कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना नियमाप्रमाणे रोस्टरचा विचार करणे आवश्यक आहे. या प्रकरणी स्थायी समिती मध्ये सुध्दा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. परंतु त्या प्रमाणे अंमलबजावणी न झाल्यामुहे कर्मचाऱ्यांचे नुकसान झाले आहे. तेंव्हा या बाबीची पुनरावृत्ती होऊ नये या दृष्टीने याचा संपूर्ण विचार करण्यातयावा असे . सभासद, श्री. मोरेश्वर सावे यांनी सुचविले.

स्लम विभागासाठी निर्माण करण्यात आलेले उप अभियंताचे पद नियमाप्रमाणे मागासवर्गीय कर्मचाऱ्यासाठी निर्माण केलेले आहे. तेंव्हा नविन निर्माण होणारे उपअभियंताचे पद आणि उप अभियंता (स्लम) पदावर नेमणूक झालेली श्री. ए. डी. सोनवणे या जागेचा संबंध जोडता येणार नाही. असे स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे यांनी सुचविले.

उप अभियंता, (स्लम) या पदाकरिता शासनाची मंजुरी नाही. माजी प्रशासकांनी हे पद निर्माण करून त्यावर नेमणूक केली आहे. आणि शासनाकडे त्या विषयीची मंजुरी मागितली, त्या संबंधीचा पत्रव्यवहार चालू आहे असे मा. उप आयुक्त यांनी सुचविले.

मागील सभेमध्ये शासन तर्फे नियुक्तीवर असलेले नगर रचनाकार यांना त्यांच्या मूळ विभागाकडे परत पाठवून ती जागा म.न.पा. कर्मचाऱ्यांतून भरण्यात यावी असे ठरले होते. त्याबाबत प्रशासनाने काय निर्णय घेतला याचा खुलासा व्हावा असे स. सभासद श्री. अजिजउलला बेग यांनी सुचविले.

महाराष्ट्रातील म. न. पा. मध्ये त्यांच्या कर्मचाऱ्यांमधून नगर रचनाकार हे पद भरण्यात आलेले आहे. नगररचना विभागात नगर रचनाकार या पदावर शासनातर्फे नियुक्तीवर भरती करण्यात आली आहे. नियुक्तीवर भरती केलेल्या कर्मचाऱ्याची मुदत संपल्यानंतर संबंधित कर्मचारी यांना त्यांच्या विभागाकडे परत होतील त्या नंतर रिक्त झालेल्या पदावर महानगरपालिका कर्मचाऱ्यामधून भरती करण्यात येईल. असे मा. आयुक्त यांनी सुचविले.

या प्रस्तावात काही त्रुटी आहेत असे वाटत असल्यास पूर्ण अभ्यास करून ठराव ठेवण्यात यावा असे स. सभासद श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी सुचविले.

उप अभियंता (विद्युत) या पदाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचेकडून कर्मचाऱ्याची मागणी केली होती, परंतु अद्याप त्याची पूर्तता झालेली नाही असा खुलासा मा. आयुक्त यांनी केला.

उप अभियंता या पदाची पदौननती कायम स्वरुपी आहे किंवा तात्पुरत्या स्वरुपाची आहे अशी विचारणा स. सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांनी केली.

सभागृहाने उप अभियंताची पदे निर्माण करण्यास मंजुरी दिल्यानंतर यासाठी शासनाची मंजुरी घेतली जाईल असा खुलासा मा. आयुक्त यांनी केला.

**ठराव क्र. २३० -** प्रस्तावात चर्चा केल्याप्रमाणे (स्लम) उप अभियंता हे पद धरून एकूण पाच उप अभियंतांची पदे निर्माण करण्यासाठी ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे आणि जे तील उपभियंतांची पदे भरले आहेत त्याला सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाल्यामुळे पुढचे कालावधी करिता मंजुरी देण्यात येत आहे.

## *पुरवणी विषय पत्रिका*

दिनांक : १५/०४/८९

**विषय क्र. २३१ -** मोहल्ला बुढीलेन येथील साईट नंबर ७ शैक्षणिक झोन वगळण्यात यावे.

सुचक - श्री. मिर्झा अन्वर बेग
अनुमोदक - श्री. धनंजय गंगाखेडकर.
दिनांक - ०१/०४/८९.

**संवाद -** मो. बुढीलेन येथील साईट क्र. ७ शैक्षणिक झोनमध्ये आरक्षित केलेली जागा वगळण्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा लागेल. तत्पूर्वी या भागाची पाहणी करून योगय ती चौकशी करावी लागेल असा खुलासा मा. आयुक्तांनी केला.

आरक्षित शैक्षणिक झोनमध्ये बरीच घरे बांधून झालेली आहेत. या भागातील नागरिकांना बांधकाम परवानगीच्या हद्दीपर्यंत तरी मोकळीक देण्यात यावी अशी सूचना स. सभासद श्री. अलफखाँ हुसेन खाँ यांनी केली.

शहर विकास योजना आराखडाचे काम चालू आहे. यावेही पूर्वीच्या आराखड्यात राखीव केलेल्या जागांची पाहणी करण्यात येत आहे. त्यानुसार या भागची आवश्यकता लक्षात घेवून विचार करण्यात येईल. शहर विकास आराखडा तयार करण्यास साधारणतः दोन/तीन महिन्याचा कालावधी लागेल त्यानंतर विकास आराखडा मंजुरीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येईल. असा खुलासा सहा. संचालक नगररचना यांनी केला.

मा. महापौर, सन्माननीय सभासद आणि प्रशासन यांच्या एकत्रितरित्या चर्चा करून अशा प्रकरणावर निर्णय घेण्यात येईल असा खुलासा मा. आयुक्त यांनी केला.

महापालिकेने शहरात ज्या-ज्या ठिकाणी जागा संपादन केल्या आहेत त्या जागेवर पुन्हा अतिक्रमणे करून बांधकाम करीत आहेत. सर्व्हे करतांना संबंधीत वार्डाच्या नगरसेवकांचा सल्ला घेण्यात यावा.

शहर विकास आराखड्याबाबत संपूर्ण माहिती सभागृहाला देण्यात येत नाही. तोपर्यंत आरक्षण वगळण्याचा एकही ठराव ठेवण्यात येऊ नये. अशी सूचना स. सभासद श्री. नरेंद्र पाटील यांनी मांडली.

महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमणे होत आहेत. अतिक्रमणे काढली जातात परंतु पुन्हा अतिक्रमणे होतात. उदाहरणच दाखवायचे झाले तर मोंढा, फायर ब्रिगेडचे कार्यालय या ठिकाणची अतिक्रमणे उठविण्यात आल्यानंतर त्यावर पुन्हा अतिक्रमणे झाली आहेत. असे विचार स. सदस्या सौ. लता दालाल यांनी मांडले.

झोन नं. ३ मध्ये फारच अतिक्रमणे होत आहेत. त्या ठिकाणी निव्वळ मनमानी चालू आहे. असे विचार स. सभासद श्री. मुजीब आलमशा खान यांनी मांडले.

शहरातील अतिक्रमणे प्रशासनातर्फे हटविण्यात येतील, पण त्यासाठी नगरसेवकांनीही सहकार्य द्यायला हवे, असे मा. आयुक्त यांनी सुचविले.

**<u>ठराव क्र.</u> २३१ -** प्रस्तावात दर्शविलेले प्रकरण नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> २३२ -** माझ्या वार्डमध्ये (वार्ड क्र. ६) मध्ये येणाऱ्या सि. टी. एस. नंबर व सर्व्हे नंबर ११४८९, १४४९०, ११४८५, ११४९६ व तसेच सर्व्हे नंबर ११६, ११५, ११० वरील जमीन ही अविकसित क्षेत्र म्हणून दर्शविलेली आहे. माझ्या वार्डमध्ये रहिवाशी क्षेत्र अजिबात नसल्यामुहे सदरील जमीन ही अविकसित क्षेत्रातून वगळून रहिवाशी क्षेत्र करणे अत्यंत आवश्यक आहे, सदरील जमीनीवर अनेक घरे सुध्दा बांधली गेली आहेत. तरी ठराव मंजूर करून शासनास योग्य त्या कार्यवाहीस पाठवावे.

सुचक - श्री. गंगाखेडकर धनंजय
अनुमोदक - श्री. फय्याजखन अहमदखान
दिनांक - ०७/०४/८९.

**<u>ठराव क्र.</u> २३२ -** प्रस्तावात दर्शविलेले प्रकरण नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> २३३ -** धावणी ईदगाह व उस्मानपुरा इदगाह येथे नमाजसाठी ओटे बांधणे बाबत.

तसेच बोरींगा (हपसे) बसविणेबाबत जसे बीड नगरपरिषदेने बीडमध्ये बांधून दिले.

सुचक - श्री. रशिदखान (मामू)
अनुमोदक - श्री. अजिजउल्ला बेग
दिनांक - १०/०४/८९

**संवाद** - प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ओटे बांधणे व हापसे बसविण्याची व्यवस्था शहरातील मंदिरात करण्यात यावी अशी उपसूचना स. सभासद श्री. अविनाश कुमावत यांनी केली.

**ठराव क्र. २३३ -** सदर प्रस्ताव स्थायी समितीकडे वर्ग करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २३४ -** औरंगाबाद विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ६४ व ६५ हे प्रस्ताव महानगरपालिकेतर्फे जमीन संपादनासाठी जिल्हाधिकारी औरंगाबाद ह्यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. सदरील जमिनीचा नगर भूमापन क्रमांक १७६८४ स. नं. ८६ असा आहे ही जमीन म.न.पा, संपादन करून पुढील विकास करणे म.न.पा. स अत्यंत कठिण होईल कारण आ. क्र. ६४ वर संपूर्ण क्षेत्र हे कब्रस्थान आहे आणि आ.क्र.६५ वर संपूर्ण क्षेत्रात वस्ती (झोपड्या) झालेली आहे. म्हणून म.न.पा. ने सदरील जमीन संपादनातून वगळून जमीन संपादनाचा प्रस्ताव रद्द करणे योग्य वाटते व सदर जमीन संपादनातून वगळून रहिवाशी क्षेत्रात समाविष्ट करणेसाठी प्रस्ताव.

सुचक - श्री. धनंजय गंगाखेडकर.
अनुमोदक - श्री. अजिजउल्ला बेग
दिनांक - १२/०४/८९.

**ठराव क्र. २३४ -** सदरचे प्रकरण नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २३५ -** फाजीलपुरा येथील रिमांडहोम कार्यालयाचे जवळील जमीवर महानगरपालिका ने ले-आऊअ मंजूर केलेला आहे. सदरील ले-आऊट श्री. राधेशाम अग्रवाल ह्यांचे नावाने मंजूर केलेला आहे. त्यांनी नियमानुसार सोडावी लागणारी जमीन सोडून महानगरपालिकेस ताब्यात दिलेली आहे. रस्तेही नियमानुसार सोडलेले आहेत. तरीपण ले-आऊट मधील प्लॉट नं. ७ हा महानगरपालिका ने ताब्यात घेतलेला आहे. ही बाब नियमास धरून नाही. जमीन मालकाने सदर प्लॉट परत मिळण्यासंबंधी विनंती केली आहे. हा प्लॉट ४०X ५० फुट असा आहे. एवढ्या लहान प्लॉटचा म.न.पा. स कोणताही उपयोग नाही. तरी अर्जदाराच्या विनंतीस मान देऊन सदर प्लॉट त्या वापस देण्यास प्रस्ताव.

सुचक - श्री. धनंजय गंगाखेडकर.
अनुमोदक - श्री. अजिजउल्ला बेग.
दिनांक - १२/०४/८९.

**ठराव क्र. २३५ -** सदरचे प्रकरण नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्र. २३६ -** औरंगाबाद या ऐतिहासिक शहरात प्रवासी वाहतुक वाढली आहे. त्यामुळे डायरेक्टर ऑफ टुरिझम, महाराष्ट्र राज्य यांनी बऱ्याचशा लॉजिंग बोर्डिंगना मान्यता दिली आहे. त्यातले पाच-सहा हॉटेल्स नेहरू प्लेस, मध्यवर्ती बस स्थानकासमोर आहे. त्यातले काही चालू झाले आहे व काही होणार आहेत. तरी प्रवाशांना लॉजिंग मध्ये जाण्यास व समार्थनगर, सुंदरनगर व नागेश्वरवाडी येथील रहिवाशांना वापरण्यास सीटी

सर्व्हे नं. २०६६६ मधून ५० फुट जोड रस्ता स्टेशन रोड ते नेहरू प्लेस मध्ये होणे आवश्यक आहे. तरी वरील रस्ता सोबतच्या प्लॅन प्रमाणे करणे बद्दल ठराव पास व्हावा.

सुचक - श्री. ॲड इकबालसिंग गिल.
अनुमोदक - श्री. मनमोहनसिंग ओबेराय.

**<u>ठराव क्र.</u> २३६ -** सदरील प्रकरण नगर रचना विभागाकडे पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> २३७ -** औरंगाबाद शहर विकास योजना नकाशामध्ये आरक्षण क्र. २२३ "गार्डन" ने बाधीत होणारा भाग आरक्षणातून वगळून निवास उपयोगी क्षेत्रात समाविष्ट करण्यात यावा.

सुचक - श्री. अजितकुमार शेळके.
अनुमोदक - श्री. ॲड. इकबालसिंग गिल.
दिनांक - १२/०४/८९.

**<u>ठराव क्र.</u> २३७ -** सदरील प्रकरण नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> २३८ -** मो. गणेश कॉलनी, आलमगिर कॉलनी, रशीद कॉलनी, उमराव कॉलनी, मजनुहिल, मकबूल कॉलनी, युनुस कॉलनी, करीम कॉलनी, मुजीब कॉलनी, एस. टी. कॉलनी, व प्रभाग क्र. १३ मधील सव्र इतर मोहल्ले या भागात राहणारे रहिवाशी अत्यंत गरीब असून या भागात औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत अल्प स्वरुपाच्या सोयी व सवलती नागरीकांना पुरविल्या आहेत.

या भागात गरीब तसेच मध्यमवर्गीय नागरीकांचा भरणा जास्त असल्यामुळे शहरातील इतर घोषित झोपडपट्ट्याप्रमाणे या भागातील नारीकांचे तसेच रहिवाशांचे दैनंदिन रहाणीमान सुधारणे अत्यंत आवश्यक आहे. हा भाग महानगरपालिने घोषित झोपडपट्ट्यी तथा गलिच्छ वस्ती म्हणून घोषित केल्यास येथील नागरीकांना विविध सोयी व सवलतींचा लाभ मिळेल तसेच येथे राहणाऱ्या बहुसंख्य गरीब तथा मध्यमवर्गीय जनतेचे रहाणीमान सुधारेल.

शासनाच्या २० कलमी कार्यक्रमानुसार वरील परिसर गलिच्छ वस्ती झोपडपट्टी विभाग म्हणून जाहीर केल्यास या भागात राहणाऱ्या मध्यमवर्गीय तथा गरीब नागरिकांना शासकीय सेवा व सवलतींचा देखील लाभ मिळू शकेल. येथील बहुसंख्य नागरीकांच्या तसेच रहिवाशांच्या मागणी नुसार हा भाग गलिच्छ वस्ती तथा झोपडपट्टी विभाग म्हणून घोषित करावा व यासाठी शासनास शिफारस करण्यात यावी.

तरी येथील सुमस्त नागरिकांचे मागणी बाबत सहानुभूतीपूर्वक योग्य विचार करून प्रभाक क्र. (१३) मधील वरील सर्व मोहल्ल्यातील भाग औरंगाबाद महानगरपालिके मार्फत गलिच्छ वस्ती झोपडपट्टी विभाग म्हणून घोषित करावा व तशी शासनास शिफारस करण्यात यावी.

सुचक - श्री. मुजिब आलमशा खान.

अनुमोदक - श्री. मिर्झा अलिम बेग.
दिनांक - १५/०४/८९.

**<u>ठराव क्र.</u> २३८ -** सदरील प्रकरण नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> २३९ -** स. नं. ३०, १०, ९ व ४ मो. हत्तेसिंगपुरा मधून कटकट दरवाजाकडे जाणारा एकही रस्ता सध्या अस्तित्वात नाही. कटकट दरवाजा जवळ औरंगाबाद महानगरपालिके मार्फत पिण्याचे पाण्याची टाकी तयार करणेचे काम सध्या चालू आहे. या पाण्याच्या टाकीकडे येण्या-जाण्यासाठी विकास आराखड्याप्रमाणे रस्ता तयार करण्यात यावा. तसेच सध्या हत्तेसिंगपुरा येथे राहणाऱ्या नागरिकांसाठी एकही रोड अस्तित्वात नसलेमुळे स. नं. ३०, ९, १० व ४ या परिसरातील रिकामी जागा ८० फुट रोड तयार करण्यासाठी तवरित संपादन करून हा रस्ता विकास आराखड्याप्रमाणे ८० फुट तयार करण्यात यावा. जेणेकरून सिडको ते कटकट दरवाजा या सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यास हा नविन रस्ता जोडला जाऊन या भागातील नागरिकांची रस्त्याची अडचण दूर होईल.

सुचक - श्री. मुजीब आलमशा खान.
अनुमोदक - श्री. रतनकुमार पंडागळे.
दिनांक - १५/०४/१९८९.

**<u>ठराव क्र.</u> २३९ -** सदरील प्रकरण नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

## <u>*प्रश्नोत्तरे*</u>

**स.स.श्री. रशीद खान (मामू)** : मागील सर्वसाधारण सभेमध्ये सभासदांना उर्दू भाषेंतून विषयपत्रिका वाटप करण्याचा ठराव सभेत झालेला आहे. त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**मा. महापौर** : ज्या सभासदांना मराठी भाषा समजत नाही अशा सभासदांना उर्दू भाषेतून विषयपत्रिका देण्यात येईल.

**स.स.श्री. आनंद गोडसे** : मा. आयुक्तांनी स. नगरसेवक श्री. जयंत ओक यांचे संदर्भात मा. महापौर, मा. विरोधी पक्षनेता यांना पत्र देऊन त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात यावे ही शिफारस केली आहे त्यात अन्य काही नगरसेवका बाबतही अशा प्रकारची कार्यवाही करावी लागेल असा उल्लेख आहे. तेंव्हा एकट्या स. स. श्री. ओक यांचे संदर्भात सभासदत्व रद्द करण्याची शिफारस का करण्यात आली आणि ते अन्य नगरसेवक कोण आहेत याबाबत खुलासा करण्यात यावा.

**स.स.श्री. विठ्ठल पेरकर** : मा. आयुक्तांनी दिलेले कार्यालयीन पत्र वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झाले. याचा खुलासा व्हावा.

| | | |
|---|---|---|
| **स.स.श्री. मोतीराम घडामोडे** | : | मा. आयुक्त यांनी स.स.श्री. जयवंत ओक यांचे बाबतीतचे सदरचे पत्र मागे घ्यावे व या प्रकरणावर पडदा टाकावा. |
| **स.स.श्री. मोरेश्वर सावे** | : | नारळीबाग ही वसाहत गेल्या पंधरा-वीस वर्षापासून अस्तित्वात आहे. स. सभासद हे तेथील लोकप्रतिनिधी असल्यामुळे तेथील सद्य परिस्थितीची व अडचणींची त्यांना जाण आहे. तेंव्हा या भागाची पाहणी करून त्यानंतरच मा. आयुक्तांनी विचारपूर्वक पत्र द्यावयास हवे होते. मा. आयुक्तांनी टोकाची भूमिका न घेता योग्य ती चौकशी करावयास पाहिजे होती. लोकप्रतिनिधींचे सदस्यत्व रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना कोठपर्यंत आहेत याचा सदोष विचार करावा. |
| **स.स.सौ. लता दलाल.** | : | स. सभासदांबाबत केलेल्या गंभीर आरोपांची तात्काळ चौकशी करण्यात यावी. |
| **मा. महापौर** | : | सदर प्रकरणी मा. आयुक्त आणि स. सभासद श्री. जयवंत ओक यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून उद्या निर्णय देण्यात येईल. |
| **स.स.सौ. लता दलाल** | : | मा. महापौर हे पक्षपाती धोरण अवलंबित आहेत. सदर प्रकरणी आजच निर्णय देण्यात यावा. |

राष्ट्रगीत झाल्यानंतर मा. महापौरांनी सभा संपल्याचे घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १५/०६/१९८९ रोजी दुपारी १.०० वाजता मा. महापौर डॉ. शांताराम काळे यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभूवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वधारण सभेस सुरुवात झाली. सर्वसाधारण सभेस निम्ननिर्दिष्ट सन्मानीय सभासद कार्यालयीन अधिकाऱ्यांसह उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. तकी हसन खान कासिम खाँ | उपमहापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ७) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ८) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| ९) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| १०) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| ११) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १२) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १३) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १४) | मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव | --//-- |
| १५) | मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | --//-- |
| १६) | मा. श्री. जावेद हसनखान कासीमखान | --//-- |
| १७) | मा. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| १८) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| १९) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| २०) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २१) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २२) | मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ.हमीद खान | --//-- |
| २३) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २४) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २५) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २६) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २७) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| २८) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| २९) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३०) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३१) | मा. श्री. फैय्याजखान अहमदखान | --//-- |
| ३२) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३३) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३४) | मा. श्री. स. हुसेन स. अहमद | --//-- |
| ३५) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३६) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |

३७) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी --//--
३८) मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलॉन --//--
३९) मा. श्री. अलफ खान हुसेन खान --//--
४०) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी --//--
४१) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव --//--
४२) मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान --//--
४३) मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ --//--
४४) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव --//--
४५) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. --//--
४६) मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग --//--
५७) मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार --//--
५८) मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम --//--
५९) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम --//--
५०) मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव --//--
५१) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव --//--
५२) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव --//--
५३) मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल --//--
५४) मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान --//--

सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने झाली.

**<u>विषय क्र.</u> २४० -** दिनांक १९ एप्रिल, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद</u> -**

श्री. चंद्रकांत खैरे : महापौर निवडणूक निकालासंबंधी प्रकरण न्या प्रविष्ठ असल्याने सभेतील विषय क्र. १ पुढील बैठकीत ठेवण्यात यावा फक्त प्रशासकीय विषयांवर निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : महापौर निवडणूक प्रकरण न्यायप्रविष्ठ असले तरी न्यायालयाने निवडणूक प्रकरण निकाली निघेपर्यंत सभा घेऊ नये असा हुकूम दिलेला नाही.

श्री. मोरेश्वर सावे : महापौर निवडणूक प्रकरण न्यायाप्रविष्ठ असल्याने आजच्या सभेच्या विषयांमधील फक्त प्रशासकीय विषय घेण्यात यावेत.

मा. महापौर : प्रशासकीय विषय घेण्यास हरकत नाही.

श्री. रतनकुमार पंडागळे: महापौर निवड प्रकरण न्यायप्रविष्ठ असले तरी आजच्या विषयपत्रिके वरील सर्वच विषय सभेत चर्चेसाठी घेण्यात यावे.

श्री. अलफखाँ हुसेनखाँ: नूतन महापौर कार्यान्वित होईपर्यंत वर्तमान महापौरच सभेचे कामकाज चालवतील.

श्री. अशोक सायन्ना विषय पत्रिकेत विरोधी नेत्यांचेही प्रस्ताव निर्णयाधीन असल्याने सर्वच विषय घेण्यास विचार व्हावा.

**<u>ठराव क्र.</u> २४० -** दिनांक १९ एप्रिल, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> २४१ -** रेल्वेस्टेशन रोड , पद्मपूरा येथे असलेले अग्निशामक दलाचे कार्यालयासाठी सध्या असलेली जागा अपुरी पडत आहे. करीता जास्त जागा उपलब्ध करून देण्यासाठी अग्निशामक दलाचे कार्यालया लगत दक्षिणेस असलेली जमिन नं.भु.क्र. १९६४५ संपादन करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहराचा वाढता व्याप लोकसंख्या, औद्योगिाकरण इत्यादी बाबींचा विचार केला तर अग्निशामक दलाच्या कार्यालयाकरीता व आगीचे बंब ,कवायत ग्राऊंड इत्यादी तत्सम वापराकरीता जागेची आवश्यकता मोठया प्रमाणावर लागेल. करीता सध्या अपुरी पडत असलेली जागा, जास्त वाढूवून देणेसाठी न.भु.क्र. १९६४५ भूसंपादन करणे आवश्यक आहे. तसेच वाढीव भूसंपादनाची प्रस्तावित जागा ही खुलीच असल्याने फक्त (Land Compensaion) द्यावे लागेल. (Structural Value) द्यावी लागणार नाही. तेंव्हा सदरचे भू-संपादन करण्यासाठी ठराव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. तसेच सदर न. भु. क्र. १९६४५ ची जागा संपादन केल्यास एकूण अग्निशामक दलाच्या मुख्यालयास दोन बाजूने रस्ते उपलब्ध होऊन एकंदर (Workking) सोयीचे होणार आहे.

**<u>संवाद</u> -**

श्री. मोरेश्वर सावे : या विषयाबाबत आमचा कसलाही विरोध नाही. परंतु अगोदरमास्टर प्लॅन तयार करावा मगच जागा संपादन करणे योग्य होईल. तेंव्हा संपादित करावयाच्या जागे बाबतचा प्लॅन आहे का? याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त : मी संबंधित अधिकाऱ्यांशी या बाबतीत काही चौकशी केलेली असता या बाबतीत असा काही प्रस्ताव नाही असे सांगण्यात आले. तथापि पुढील सभेत या बाबतचा खुलासा करण्यात येईल.

श्री. मोरेश्वर सावे : मा. उप आयुक्त यांनी जो केलेला खुलासा बरोबर नाही.

मा. महापौर : उप आयुक्तांनी मास्टर प्लॅन विषयी जो खुलासा केला आहे तो त्यांना माहिती नाही. कारण ते या ठिकाणी नवीन उप आयुक्त म्हणून आल्याने त्यांनी माहिती घेऊनच खुलासा करावा. तरीही आपल्या सूचनेनुसार मी संबंधीतांशी चर्चा करून हा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्याची व्यवस्था करतो.

मा. आयुक्त : प्रस्तावित प्रस्तावा बाबत संबंधीत अधिकाऱ्यांशी चर्चा करून आगामी सभेत सभागृहास माहिती देण्यात येईल.

**<u>ठराव क्र.</u> २४१ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन रोड, पदमपुरा येथे असलेले अग्निशामक दलाचे कार्यालयालगत दक्षिणेस असलेली जमीन न.भु.क्र. १९६४५ संपादन करण्यास, सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> २४२ -** पुर्नरचित वितरण व्यवस्था झोन क्र. १ ओरंगाबाद या योजनेस शासनाचे पत्रक क्र. डब्ल्यु. यु.एस. एस./८९७७/५२८/युडी-२/दिनांक २४/०२/७८ अन्वये रु. ५७,३४,३०० ढोबळ किंमतीस मंजुरी दिली आहे. या योजनेच्या खर्चाच्या १०% लोकवर्गणी रक्कम रु. ५,७३,८७५/- ही रक्कम लोकवर्गणी म्हणून महानगरपालिकेने परिसर अभियांत्रिकी मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे जमा केली आहे.

योजनेचा प्रत्यक्ष खर्च विचारात घेवून योजनेची सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम तयार केली असता योजनेची सुधारित रक्कम रु. ९१,६४,३००/- ढोबळ किंमती आली आहे. या सुधारित खर्चाच्या १०% लोकवर्गणी प्रित्यर्थ रु. ९,१६,४३०/- एवढी लोकवर्गणी आपणास भरावयाची आहे.

सुधारित अंदाजपत्रकाच्या दराप्रमाणे लोकवर्गणी रु. ९,१६,४३०/- एवढी होते. त्यापैकी महानगरपालिकेने रु. ५,७३,८९५/- योजनेचे काम सुरू करते वेळेस भरले आहे. सदरील रक्कम रु. ३,४३,५३५/- लोकवर्गणी प्रित्यर्थ भरावयाची आहे. प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

**<u>संवाद</u> -**

श्री. चंद्रकांत खैरे : ही योजना झोन क्र. १ लाच का राबविण्यात आली? ही योजना कुठली आहे याची सभागृहास माहिती द्यावी.

श्री. अलफखाँ हुसेनखाँ: नगरपरिषद काळात विद्यापीठ, भावसिंगपुरा, नंदनवन कॉलनी भागातील नागरिकांनी पाणी पुरवठा करणे सुकर व्हाव या दृष्टीने परिसर अभियांत्रिकी विभागाने विद्यापीठ भागात सन १९७८ मध्ये जलकुंभ बांधण्याचा प्रस्ताव सादर केला होता. शासनाचे नियमाप्रमाणे या जलकुंभाचे बांधकामासाठी नगरपालिकेला लोकवर्गणीची रक्कम भरावी लागते. या योजनेत झोनबाबत जो उल्लेख करण्यात आला आहे तो परिसार अभियांत्रिकी विभागाने ठरविलेल्या झोन बाबत आहे.

उप अभियंता, (पापु) : शहर पाणी पुरवठ्यात वाढ होण्याच्या दृष्टीने सन १९७८ मध्ये योजना तयार करण्यात आली होती. परंतु निम्ननिर्दिष्ठ कारणांमुळे योजना राबविण्यास विलंब झाल्याने या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ झाली. त्या वाढीव रक्कमेप्रमाणे लोकवर्गणीच्या रकमेतही वाढ झली आहे.

१) मंजूर झालेल्या योजनेस जिल्हा नियोजन व विकास मंडळातर्फे सन १९७८-७९ व १९७९-८० मध्ये रक्कम उपलब्ध होऊ शकली नाही.
२) जलकुंभासाठी आवश्यक जागा लवकर निश्चित होऊ शकली नाही.
३) जलकुंभास पाणी पुरवठा करण्यासाठी लागणारे पंप आणि पंपाची जागा लवकर उपलब्ध होऊ शकली नाही.
४) या योजनेचे रेखांकन सन १९८२ मध्ये मंजुर झाले.

श्री. मोतीराम घडामोडे : वरील कारणांमुळे लोकवर्गणी प्रित्यर्थ भरावयाचे ३.५० लाख रुपयाचे आर्थिक नुकसान कोणामुळे झाले? याचा खुलासा करण्यात यावा.

**ठराव क्र. २४२ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुर्नरचित वितरण व्यवस्था झोन क्र. १ औरंगाबाद या योजनेची सुधारित अंदाजपत्रकीय, रक्कम रु. ९१,६४,३००/- एवढी आल्यामुळे सुधारित खर्चाच्या १०% लोकवर्गणी प्रित्यर्थ र. रु. ९,१६,४३०/- भरावी लागणार आहे. त्यापैकी म.न.पा. ने पूर्वी भरलेली रक्कम रु. ५,७३,८९५/- वजा जाता उर्वरित रक्कम रु. ३,४२,५३५/- परिसर अभियांत्रिकी मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४३ -** मा. आयुक्त यांनी प्रसताव दिला आहे की, पंचायत समिती ते कैलास गॅरेज, जालना रोड हा विकास योजना अंतर्गत १००' रुंद रस्ता तयार करण्यासाठी सर्वसाधारण सभा दिनांक २० फेब्रुवारी, ८९ ठराव क्र. १६८ प्रमाणे मान्यता झालेली आहे. या रस्त्याचे जागे मध्ये शहाबाजार (अशोकनगर झोपडपट्टी) येथील १७१ घरे बाधित होत आहेत या रस्त्याचे काम होती घेण्यापूर्वी बाधित होणाऱ्या कुटुंबांचे पुनर्वसन मजनुहिलच्या दक्षिणेला (पायथ्या जवळ) असलेल्या म.न.पा. च्या जागेत करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

**संवाद** -

श्री. मोतीराम घडामोडे : फक्त १७१ लोकांचीच घरे बाधित होत आहेत काय? महापालिका त्यांना जर पर्यायाी व्यवस्था करीत असेल तर बाकीच्याही लोकांची व्यवस्था तशाच प्रकारे करावयास पाहिजे.

श्री. एकबालसिंग गिल : अशाच प्रकारची पर्यायी व्यवस्था भडकल गेट वॉर्डातील म्हणजे भडकलगेट व्हाया काझीवाडा पर्यंतच्या ज्या लोकांची घरे बाधित होत असतील अशा नागरिकांची पर्यायी व्यवस्था करावी.

श्री. नामदेव मानकापे : वॉर्ड क्र. ३८ मधील जवळजवळ १४१० लोकांची घरे या सुधारित आराखडा कैलासनगर ते पंचायत समिती या रोड मधील योजनेत बाधित होत आहेत. मग त्या लोकांची सुध्दा व्यवस्था अशाच प्रकारे व्हावयास पाहिजे.

श्री. अजिज जहागिरदार : शहाबाजार ते कैसर कॉलनी या रोडवरील लोकांची घरे या योजनेत बाधित होतात तेंव्हा या लोकांना काय उपाययोजना करण्यात येणार आहे.

श्री. मुजीब अलमशाखाँ : जी जागा देण्यात येणार आहे त्या जागेचा ले-आऊट तयार केला आहे काय? त्यात कोणत्या आकाराची जागा देण्यांत येणार आहे याचा खुलासा व्हावा.

श्री.बंडु प्रधान : वॉर्ड क्र.१४ येथील सुमारे १७१ लोकांची घरे बाधित होत आहेत. तेव्हा अशी माहिती मिळाली आहे की, दोन कुटुंबांना मिळून ४०० स्क्वेअर फुट जागा देण्यात येणार आहे. मा.आयुक्तांना अशी विनंती करतो की, या ठिकाणी झोपडपटटी श्रेणी योजना लागू करावी व किमान प्रत्येक कुटुंबाकरीता ६०० स्क्वेअर फुट जागा देण्यात यावी.

श्री.गंगाधर गाडे : शहाबाजार येथील लोकांची पर्यायी व्यवस्थे बरोबर शहाबाजार ते कैलासनगर या ठिकाणचे लोकांसाठी पर्यायाी व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच संबंधितांची घरे पाडण्यापूर्वी त्यांना पर्यायी जागेच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे देण्यात यावीत.

श्री. मनमोहनसिंग ओबेराय : कैलासनगर ते गुलशन महल पंचायत समिती रोड अंतगर्त १०० फुटाचा रस्ता तयार करणेसाठी यापूर्वीच सभागृहात ठराव मंजूर झालेला आहे. तेंव्हा या बाबतचा योग्य निर्णय घेण्यात यावा.

मा. उप महापौर : कैलासनगर ते शहाबाजार येथील लोकांची जी घरे बाधित होत असतील त्या सर्वांना पर्यायाी जागा देण्यात येईल. तेथील १७१ लोकांचा घराचा प्रश्न नसून त्या रोडमध्ये ज्या नागरिकांची घरे बाधित होत असतील अशा सर्व नागरिकांचे पुनर्वसन करण्यात येईल.

श्री. मोरेश्वर सावे : सभागृहाची अशी मागणी दिसते की, फक्त १७१ लोकांच्या घराचा विचार करण्यापेक्षा या रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या मालमत्ता धारकांचा विचार करण्यात यावा.

श्री. नरेंद्र पाटील : या प्रश्नावर संबंधित अधिकारी गप्प दिसत आहेत त्यांनी या बाबतीत सभागृहास माहिती द्यावी.

मा. आयुक्त : ज्या नागरिकांची स्वत:ची घरे आहेत व ती रोडमध्ये बाधित होत असतील अशा सर्व नागरिकांना सहकार्य केले जाईल. परंतु झोपडपट्टी श्रेणीवाढ योजना ज्या झ ाोपडपट्टीतील नागरिकांना देण्यात येत आहे व तसे लागू आहे त्या प्रमाणात त्यांना ४०० स्क्वे. फुट प्रमाणे जागा देण्यात येईल व त्या ठिकाणी नागरी सुखसोयी देण्यात येतील.

श्री. मोतीराम घडामोडे : १७१ लोकांना घरे देऊन पुनर्वसन करणेस आमचा विरोध नाही. पण ज्यांची घरे बाधित होत आहेत त्या नागरिकांना पर्यायी जागेचे प्लॅनिंग तयार करून संबंधितास १ महिन्याची नोटीस देण्यात यावी व संबंधितास ॲलॉट करण्यात येणाऱ्या जागेची माहिती दिल्यास नागरिक स्वत:हून तेथे जातील.

मा. महापौर : आपल्या सर्वांच्या सूचनेप्रमाणे ज्या लोकांची घरे कैलासनगर ते शहाबाजार रस्ता रुंदीकरणात बाधित होतात त्या लोकांसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात येईल.

श्री. रशिदखान (मामू) : टी. बी. दवाखान्याच्या पाठीमागे ज्या नागरिकांची जागा संपादन करण्यात आलेली आहे त्यांनारही अशाच प्रकारची पर्यायाी व्यवस्था करण्यात यावी. त्याचा विचार करू असे आश्वासन द्या.

**<u>ठराव क्र.</u> २४३ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचायत समिती ते कैलास मोटार्स, जालना रोड हा विकास योजने अंतर्गत १०० फुट रुंद रस्ता तयार करण्यासाठी रस्त्यामध्ये शहाबाजार (अशेकनगर झोपडपट्टी) येथील बाधित होत असलेल्या कुटुंबांचे (१७१ घरे)

पुनर्वसन मजनु हिलच्या दक्षिणेला (पायथ्या जवळ) असलेल्या महानगरपालिकेच्या जागेत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४४ -** सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आह की, प्रकल्प विभागात उर्दू माध्यमाचे शिवणकला शिक्षिका हे पद असणे अत्यंत जरुरीचे असल्यामुळे शिवणकला शिक्षिका (उर्दू माध्यम) हे एक पद वेतनश्रेणी (रुपये २९०-५४०) वर निर्माण करण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद -**

श्री. मोतीराम घडामोडे : महानगरपालिकेत एकूण २२० शिक्षकांच्या जागारिक्त आहेत. या रिक्त जागा भरण्याबाबत सविस्तर मांडणी करून सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी देण्यात यावा.

श्री. अजिज जहागिरदार : बन्सीलाल नगर, प्रा. शाळेतील इयत्ता ४ थील उर्दू वर्गाचे शिक्षक नसल्याने तेथील वर्ग बंद पडण्याचे मार्गावर आहेत. यासाठी लवकरात लवकर इयत्ता ४ थी उर्दू माध्यमाच्या शिक्षकाची अडचण दूर होईल याची दक्षता घ्यावी.

श्री. अलफखाँ हुसेनखाँ : जो प्रस्ताव या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे तो प्रकल्प विभागातील शिवणकलेच्या शिक्षिका (उर्दू) विषयाचे बाबतीत आहे यामुळे इतर बाबतीत चर्चा करणे गैर आहे.

श्री. चंद्रकांत खैरे : महापालिकेच्या प्रकल्प विभागात शिवणकला शिक्षिकांच्या उर्दू व मराठी माध्यमातील शिक्षकांची संख्या किती आहे? याची माहिती पुरवावी.

शिक्षणाधिकारी : हा प्रस्ताव प्रकल्प विभागाचा असून प्रकल्प विभागामार्फत ही योजना शहरातील गरीब व झोपडपट्टीतील लोकांना विशेषतः स्त्रियांना शिवणकलेचे ज्ञान मिळावे म्हणून राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने शहरातील सर्वच झोपडपट्ट्या मधून याचे शिक्षण देण्याची व्यवस्था क्रमाक्रमाने केली जात आहे. यासाठी एकूण शिवणकला शिक्षिकांच्या चार जागा होत्या त्यापैकी एक जागा ही उर्दू माध्यम शिक्षिकेची आहे. त्याकरिता नेमणूक होणेसाठी हा प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री. अजिजउल्ला बेग : शिवणकेलचा गरीब लोकांना लाभ होण्याच्या दृष्टीने नियमाप्रमाणे दोन जागा ह्या उर्दू शिक्षिकांसाठी निर्माण करण्यात याव्यात.

**ठराव क्र. २४४ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रकल्प विभागात शिवणकला शिक्षिका (उर्दू माध्यम) हे एक पद वेतनश्रेणी रुपये २९०-५४० वर निर्माण करण्याकरिता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्र गीतारनंतर मा. महापौर यांनी सभा संपल्याचे घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०५/०७/१९८९ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत**

**शुक्रवार दि. ०५/०७/८९ रोजी दुपारी १.०० वाजता "नगरभवन" येथे मा. महापौर, श्री. मोरेश्वर सावे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा पार पडली. सदरील सभेस खालील स. सदस्य तसेच महानगरपालिका अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. तकी हसनखाँ कासीमखाँ, | उपमहापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ७) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ८) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ९) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| १०) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| ११) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १२) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १३) | मा. श्री. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १४) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १५) | मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव | --//-- |
| १६) | मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | --//-- |
| १७) | मा. श्री. जावेद हसनखान कासिमखान | --//-- |
| १८) | मा. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| १९) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| २०) | मा. श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |
| २१) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २२) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २३) | मा. श्री. अ. रशीदखान अ. हमीदखान | --//-- |
| २४) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २५) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २६) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २७) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २८) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २९) | मा. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल | --//-- |
| ३०) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३१) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३२) | मा. श्री. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३३) | मा. श्री. फैयाजखान अहमदखान | --//-- |
| ३४) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३५) | मा. श्री. बी. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३६) | मा. श्री. हुसेन स. अहमद | --//-- |
| ३७) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३८) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३९) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ४०) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | --//-- |
| ४१) | मा. श्री. अलफखाँ हुसैन खाँ | --//-- |
| ४२) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४३) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४४) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ४५) | मा. श्री. अजीमखॉ दादामिया अ. रहेमान | --//-- |
| ४६) | मा. श्री. शिंदे मधूकरराव माणिकराव | --//-- |
| ४७) | मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंत | --//-- |
| ४८) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस | --//-- |
| ४९) | मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ५०) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ५१) | मा. श्री. गोडसे आनंद जगदिश | --//-- |
| ५२) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार | --//-- |
| ५३) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ५४) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ५५) | मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५६) | मा. श्री. हाळनारे गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५७) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५८) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५९) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

सभेची सुरुवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

**<u>विषय क्र.</u> १ -** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) अन्वये मा. उप. महापौर यांची निवड करणे.

मा. महापौर यांनी सभेचा विषय वाचनू दाखविला. त्यानंतर मा. महापौर यांनी मतदानाविषयी काही सूचना उपआयुक्त देतील असे सांगितले. उप आयुक्त यांनी मत पत्रिका व तिच्या घडीबाबत योग्य सूचना स. सदस्यांना दिल्या. यावेही स. सदस्य डॉ. काळे यांनी एखाद्या सदस्याने मत पत्रिका सभागृहात उघडी करून दाखविल्यास तो वाद करणार काय? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर सदरील मतदान हे गुप्त पध्दतीने असल्याने मा. महापौर यांनी सांगितले. तसेच मा. महापौर यांनी सदस्यांनी प्रश्न/ सूचना या अधिकाऱ्यांना न विचारता सभापतीकडे सूचना / प्रश्न मांडावेतमा. महापौरांनी उप महापौर पदांसाठी उभे असलेले उमेदवार श्री. मनमोहनसिंग ओबेराय व श्री. महादेव सुर्यवंशी यांना विनंती केली की, त्यांनी आपापल्या प्रतिनिधीचे नांवे सुचवावे. स. सदस्य डॉ. काळे यांनी उप महापौर पदासाठी आलेले अर्ज मागे घेतले आहेत काय, नसता मागलि सभेत जो वेळ खर्च झाला तसे आता होवू नये असे सांगितले. यावर उप आयुक्तांनी खुलासा केला की, उप महापोर पदासाठी आलेल्या अर्ज मागे घेण्याचे व इतर बाबी मागिल सभेत पूर्ण झालेल्या

आहेत. मा. महापौर यांनी उप महापौर पदासाठी उभे असलेल्या दोन उमेदवारांची नावे जाहीर केली ती खालीलप्रमाणे.

१) श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग.

२) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक.

स. सदस्य श्री. अलफखान यांनी सूचना केली की, मतपेटी ही मतदान अधिकारी यांचे जवळ ठेवावी जेणेकरून ती मतपेटी सहज दिसून येईल. मा. महापौरांनी त्यांच्या विनंतीला मान देवून मतपेटी मतदान अधिकारी यांचेजवळ ठेवण्यात येत आहे असे सांगितले. त्यानंतर मतपेटी पूर्णत: रिकामी असल्याचे सभागृहातील स. सदस्यांना दाखविण्यात आले व मतपेटी सिलबंद करण्यात आली. नगर सचिव यांनी घोषित केले की, वॉर्डवाईजप्रमाणे स. सदस्यांचे नांव पुकारण्यात येतील. त्याप्रमाणे त्यांनी मतदान करावे.

नंतर मा. महापौर यांनी घोषित केले की, श्री. ओबेरॉय यांचे प्रतिनिधी म्हणून सर्वरी रतनकुमार पंडागळे व अशोक सायन्ना तसेच श्री. सुर्यवंशी यांचे प्रतिनिधी म्हणून सर्वश्री मोतीराम घडामोडे व चंद्रकांत खैरे हे आहेत. तसेच मतदान प्रक्रिया ठिक १.१५ वाजता सुरू होईल. उप-आयुक्तांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे मतदान करावे व सभागृहात शांतता ठेवावी. ज्यांचे नाव पुकारण्यात येतील. त्यांनीच जागेवरून उठून मतदान करावे. मतदान हे २.१५ पर्यंत राहील स. सदस्य डॉ. संचेती यांनी मागील निवडणूकीच्या वेळेस दोन बुथ होते, परंतु आता तसे नाही आणि जर वेळ कमी पडता तर वेळ वाढवून देणार काय अशी पृच्छा केली. यावेळी स. सदस्य, डॉ. काळे यांनीही असेच मत व्यक्त केले. यावर मा. महापौर यांनी खुलासा केला की, तशी जर गरज भासली तर वेह वाढवून देण्यात येईल. परंतु मतदान वेळेवर व व्यवस्थित पार पडेल याची काळजी घेतली जाईल.

दुपारी ठिक १.१५ वाजता मतदानास सुरुवात झाली. मतदान अधिकारी यांनी वॉर्डवाईज प्रमाणे स. सदस्यांची नावे पुकारली. मतदान प्रक्रिया चालू असतांना मा. महापौर यांच्या असे निदर्शनास आले की, स. सदस्य, श्री. मानकापे यांनी मतदान अधिकारी यांचेकडून मतपत्रिका घेऊन मतदान बुथच्या बाहेर उभे आहेत. यावर त्यांनी श्री. मानकापे यांना सूचना केली की, त्यांनी मतदान बुथमध्ये जाऊन मतपत्रिकेची घडी करावी. त्यावर श्री. मानकापे यांनी सांगितले की, मत पत्रिका ही खराब झाली आहे, ती दुसरी देण्यात यावी. त्यावर मा. महापौर यांनी मतपत्रिका दुसरी देण्याची सूचना मतदान अधिकारी यांना दिली. याचवेळी स. सदस्य श्री. ओबेराय यांनी दुसरी मतदान पत्रिका देण्यावर आक्षेप घेतला. परंतु मा. महापौर यांनी दुसरी मत पत्रिका देण्याचे पूर्ण अधिकार सभापतीस कामकाज नियमावली प्रमाणे आहेत असे सांगून त्यांचा आक्षेप फेटाळून लावला. त्याचवेळी स. सदस्य श्री. गाढे यांनी असा आक्षेप घेतला की मत पत्रिका खराब झाली म्हणजे नेमके काय झाले? व मत पत्रिका अशा परिस्थितीत बदलून देता येते काय? यावर उपमहापौर यांनी सांगितले की, मत पत्रिकावर सदस्याने निशाणी मारण्याच्या अगोदर की नंतर दिली ते पाहिले पाहिजे व नंतरच मत पत्रिका बदलून देता येते. स. सदस्य, श्री. गाढे यांनी दुसरी मतपत्रिका बदलून देण्यावर मा. महापौर यांचेकडे एक लेखी अर्ज दिला. नंतर त्यांनी सांगितले की, मी मा. महापौर यांचेशी चर्चा करित असतांना श्री. मानकापे यांना दुसरी मतपत्रिका देण्यात आली यावर मा. महापौर यांनी स्पष्ट केले की, मतदान अधिकारी यांनी याबाबत हरकत घ्यावी. मी योग्य तो निर्णय दिलेला आहेच यावर श्री. गाडे आपण असे हेतुपुरस्स्कर करित आहात आरोप केला व डॉ. काळे यांनी असा प्रश्न केला की, आपण कोणत्या कायद्याने मत पत्रिका रद्द केली, स. सदस्य श्री. गाडे यांच्या आरोपाबाबत

मा. महापौर यांनी सांगितले की, आपण वेळेवर अर्ज न दिल्यामुळे आपला अर्ज फेटाळण्यात येत आहे.

मा. महापौर यांनी २.१५ वाजता मतदान संपले असे जाहीर केले. स. सदस्य श्री. गाडे यांनी जर मतदान अधिकारी हरकत घेत असतील तर आम्ही घेतो. याबाबत मी आपणाकडे अर्ज दिलेला आहे. तेंव्हा मा. महापौर यांनी श्री. गाडे यांना सांगितले की, आपण दिलेल्या अर्जाचे योग्य ते उत्तर देण्यात येईल. त्यानंतर २.१५ वाजता मा. महापौर यांनी घोषित केले की, सभा कामकाज नियमावलीचे कलम ४५ (जी) नुसार मतदानाची वेह संपलेली आहे. स. सदस्य श्री. गाडे यांनी विचारणा केली की, २.१५ वाजता मतदान संपले असे म्हणता तेंव्हा मी दिलेला आक्षेप अर्ज वेळेवर दिलेला नाही असे कसे म्हणता येईल? याचवेळी स. सदस्य, श्री. अलफखान यांनी निदर्शनास आणून दिले की, मत पत्रिका ही अजून मतदान अधिकारी यांचेकडेच आहे, ती नाश करावयास पाहिजे. श्री. गाडे यांना मा. महापौर यांनी सांगितले की, मतदान पेटीत मतपत्रिका टाकली त्यामुळे आक्षेप घेत येत नाही.

यानंतर मा. महापौर यांनी खुलासा केला की, कामकाज नियमावलीचे कलम ४५ (आय) या कायद्याचा संदर्भ पहावा. त्यानुसार दुसरी मतपत्रिका देता येते. स. सदस्य, डॉ. काळे यांनी ते मान्य करून याबाबतीत संबंधित अधिकाऱ्यांकडून तशी खात्री केली आहे काय? यावर मा. महापौर यांनी कायद्यामध्ये तशी काही तरतूद नाही, सभापतीस अधिकार आहे असे स्पष्ट केले. या चर्चेच्या वेळी स. सभासद, श्री. घडामोडे यांनी मा. महापौर यांच्या निदर्शनास आणून दिले की, सभागृहाचा वेळ वाया जात आहे. कृपया वेळ वाया जाऊ नये अशा प्रकारची दक्षता घ्यावी. त्यानंतर मा. महापौर यांनी मतदान अधिकारी यांना आदेश दिला की, खराब झालेली मतपत्रिका माझ्या समोर नाश करावी, यावर श्री. गाडे यांनी मागणी केली की, मतपत्रिका नेमकी कुठे खराब झाली ते दाखववावे. मा. महापौर यांनी सांगितले की तसे दाखविण्याची आवश्यकता भासत नाही. यावर स. सदस्य, श्री. गंगाखेडकर यांनी सभागृहाचा अपमान होत आहे असे सांगितले तर स. सदस्य, श्री. घडामोडे यांनी अशा प्रकारची मागणी करून अधिकाऱ्यांचा अपमान होत आहे असे प्रतिपादन केले. त्यानंतर मा. महापौर यांचे समोर खराब झालेली मतपत्रिका नाश करण्यात आली.

त्यानंतर मा. महापौर यांनी स. सदस्य, श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांना विनंती केली की, त्यांनी त्यांचे दोन प्रतिनिधीचे नांवे सुचविले आहेत. पैकी कोणत्याही एका प्रतिनिधीने येथे पाठवावे तसेच स. सदस्य, श्री. सुर्यवंशी यांनाही आपल्या अर्जामध्ये तशी दुरुस्ती करावी.

त्यानंतर मा. महापौर यांनी सर्वाच्या संमतीने मतदान पेटी उघडली जात असल्याचे सांगितले. नगर सचिव यांनी मतदान पेटीतून मत पत्रिका बाहेर काढल्या व मतदान पेटी रिकामी असल्याचे दाखविले. नंतर मत पत्रिकेच्या मागील बाजूस मा. महापौर यांनी स्वाक्षरी केली. परिनिरीक्षक यांनी सर्व मत पत्रिकांची छा ाननी केली. नंतर मा. महापौर यांनी उप महापौर पदाचे निवडणूकीचा निकाल जाहीर केला तो खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| एकूण मतदान | - | ६० |
| झालेले मतदान | - | ६० |
| वैद्य मते | - | ६० |
| अवैद्य मते | - | ०० |
| मनमोहनसिंग ओबेराय | - | ३२ |
| महादेव सुर्यवंशी | - | २८ |

उप महापौर पदी श्री. मनमोहनसिंग ओबेराय हे ३२ मतांनी विजयी झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले. नंतर मा. महापौर यांनी श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांचे हार्दिक अभिनंदन केले.

नंतर मा. महापौर, या. नवनिर्वाचित उपमहापौर श्री. मनमोहनसिंग ओबेराय. स. श्री. चंद्रकांत खैरे, स्थायी समितीचे सभापती, श्री. गंगाधर गाडे, स. सदस्य, श्री. मोतीराम घडामोडे, मावळते उपमहापौर, श्री. तकी हसन खान, माजी महापौर, डॉ. शांताराम काळे, स. सदस्या सौ. लता दलाल, स. सदस्य, श्री. रतनकुमार पंडागळे तसेच मा. आयुक्त, श्री. मुन्शीलाल गौतम यांची समयोचित भाषणे झाली.

दुपारी ३.०० वाजता जन गण मन या राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**बुधवार दिनांक १९ जुलै, १९८९ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**बुधवार दिनांक १९ जुलै, १९८९ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे, यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभवन" येथे महानगरपालिकेच्या सर्वधारण सभेस सुरुवात झाली. या सर्वसाधारण सभेस निम्ननिर्दिष्ट सन्मानीय सभासद कार्यालयीन अधिकाऱ्यांसह उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ | महापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मण | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ७) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ८) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| ९) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| १०) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| ११) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १२) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १३) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १४) | मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | --//-- |
| १५) | मा. श्री. जावेद हसनखान कासीमखान | --//-- |
| १६) | मा. श्री. तकी हसनखाँन कासिमखाँन | --//-- |
| १७) | मा. श्री. स. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दन | --//-- |
| १८) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| १९) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| २०) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २१) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २२) | मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ.हमीद खान | --//-- |
| २३) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २४) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २५) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २६) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २७) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २८) | मा. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल | --//-- |
| २९) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३०) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३१) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३२) | मा. श्री. फैय्याजखान अहमदखान | --//-- |
| ३३) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३४) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३५) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३६) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३७) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ३८) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलॉन | --//-- |
| ३९) | मा. श्री. अलफखाँन हुसेनखाँन | --//-- |
| ४०) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४१) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४२) | मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान | --//-- |
| ४३) | मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव | --//-- |
| ४४) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. | --//-- |
| ४५) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन | --//-- |
| ४६) | मा. श्री. गोडसे आनंद जगदीश | --//-- |
| ४७) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार | --//-- |
| ४८) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण शीवराम | --//-- |
| ४९) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ५०) | मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५१) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५२) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५३) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५४) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

मा. महापौर : गणपूर्ती अभावी आजची सभा ००.१५ मिनिटांसाठी तहकुब करण्यात येत आहे. तहकुब करण्यात आलेली सभा ११.१५ वाजता पुन्हा याच ठिकाणी सुरू करण्यात येईल.

"वंदे मातरम्" या गीताने सभेची सुरुवात झाली.

**<u>विषय क्र.</u> १/१ -** दिनांक १५ जून, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद</u> -**

डॉ. चेनकरण संचेती : इतिवृत कायम करण्यापूर्वी प्रश्नोत्तराचा तास सुरू करण्यात यावा.

महापौर : सभा कामकाज नियमावलीचे पान ५ वर खुलासा केल्याप्रमाणे आजच्या सभेत विचारण्यात येणारे प्रश्न नियमाप्रमाणे (७) सांत दिवस अगोदर नगर सचिव यांचेकडे लेखी दाखल करणे आवश्यक होते. सभा कामकाज नियमावलीनुसार कोणतेही लेखी प्रश्न आजच्या सभेपुढे विचाराधीन नसल्यामुळे स. सभासदाचे मागणीचा विचार करता येत नाही.

डॉ. चेनकरण संचेती : गेल्या दोन महिण्यापूर्वी काही लेखी प्रश्न नगर सचिवांकडे दिले होते त्या संदर्भाने मागील सभेमध्ये याबाबत चर्चा झालेली आहे. झालेली चर्चा अपूर्ण राहिल्यामुळे त्या अनिर्णीत प्रश्नांबाबत प्रश्नोत्तराच्या तासात विचार होणे आवश्यक वाटते.

मा. महापौर : स. सभासदाचे काही अनिर्णीत प्रश्न विचारात घेण्यास योग्य असतील तर त्याबाबत पुढे योग्य तो विचार करण्यात येईल.

अजिजउल्ला बेग : स. सभासदांनी दाखल केलेले प्रश्न सभा कामकाज नियमावीप्रमाणे योग्य असून उक्त नियमावलीच्या कलम ९७ प्रमाणे प्रश्न विचारण्यात परवानगी देण्यात यावी.

श्री. गंगाधर गाडे : स. सभासद डॉ. संचेती चेनकरण यांनी उपस्थित केलेला प्रश्न नविन स्वरुपाचा नाही. संबंधिताचे काही प्रश्नपूर्वीपासून अनिर्णित आहेत. त्या अनिर्णित प्रश्नांबाबत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा करण्यात यावी अशी स. सभासद यांची मागणी आहे.

मा. महापौर : सभा कामकाज नियमावलीचे नियमानुसार स. सभासद श्री. अजिजउल्ला बेग यांचा शिक्षकांची रिक्त पदे भरणे बाबतचा लेखी प्रश्न सभागृहासमोर विचारधीन आहे.

प्रभारी शिक्षणाधिकारी : शिक्षकांची १२ रिक्त पदे भरण्यासाठी एस. एस. सी. डी. एड. पात्रता प्राप्त शिक्षकांची यादी सेवायोजन कार्यालय समाज कल्याण खाते अशा संस्थाकडून मागविण्यात आली होती. दरम्यानचे काळात शिक्षकांची आणखी १४ पदे (पूर्वीची १२ अधिक नविन १४) असे एकूण २६ पदे निर्माण झाली. या २६ पदांकरिता नियमाप्रमाणे सेवायोजन कार्यालय, समाज कल्याण विभाग अशा संस्थाकडून सदस्य उमेदवारांची यादी प्राप्त झाल्यानंतर रितसर मुलाखती घेतल्या जातील.

श्री. अजिजउल्ला बेग : शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी याद्या प्राप्त झाल्यानंतर नेमणूका करण्यासाठी किती कालावधी लागेल? आणि याद्या पाठवणेबाबत कार्यालयाने संबंधीत विभागाशी पत्रव्यवहार कोणत्या तारखेला केला? याची माहिती देण्यात यावी.

मा. उपआयुक्त : शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांच्या याद्या सेवायोजन कार्यालय, समाज कल्याण विभाग आदी संस्थांकडून मागविण्यात आल्या आहेत. सदर याद्या प्राप्त झाल्यानंतर किमान दिड महिण्याचे कालावधीत यासंबंधीची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

मा. महापौर : शिक्षणाधिकारी आणि उपआयुक्त यांनी कालबध्द कार्यक्रम ठरवून शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करावी. शिक्षकांच्या रिक्त पदाबाबत सभासदांना आवश्यक ती माहिती पुरवावी. महापालिकेतील शिक्षण अधिकारी पदाचे काम अतिरिक्त कार्यभार सोपवून चालू आहे. तेव्हा शिक्षणाधिकाऱ्याचे पद भरण्याची रितसर कार्यवाही १ महिण्याचे आत व्हावी.

श्री. एकबालसिंग गिल : शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी सभागृहाने सुचविलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागण्यास काय कार्यवाही करण्यात येईल याचा खुलासा करण्यात यावा. रिक्त असलेली शिक्षकांची पदे नियमाप्रमाणे भरण्यात येऊ नयेत असे प्रयत्न होत आहेत. तेव्हा याबाबत चौकशी करण्यात यावी.

मा. महापौर : स. सभासदाने केलेल्या सूचनेप्रमाणे त्यांच्या सूचनेची नोंद घेतली

आहे. तरीही संबंधित अधिकाऱ्याशी चर्चा करून आपणास माहिती देण्याची व्यवस्था करीन.

श्री.अजिज जहागिरदार : दैनिक मराठवाडा या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमी प्रमाणे मा. महापौर यांनी जालना येथे महानगरपालिकेतील आघाडीचे सर्व नगरसेवक पात्र नाहीत हे आव्हान आम्ही स्विकारले आहे. तेव्हा याबाबत खुलासा करण्यात यावा.

मा. महापौर : वृत्तपत्रात कोणत्या प्रकारची बातमी प्रसिध्द झाली याची मला काहीच कल्पना नाही. तेव्हा ते वृत्त वाचल्यानंतरच शहानिशा करता येईल. याबाबत जनसंपर्क अधिकारी उपस्थित नसल्यामुळे त्यांनी याबाबत खुलासा करावा.

श्री. गंगाधर गाडे : जालना येथील कार्यक्रमास जनसंपर्क अधिकारी उपस्थित नसल्यामुळे त्यांनी याबाबत खुलासा करणे योग्य होणार नाही.

मा. महापौर : स. सभासदांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार आहे. परंतु प्रश्न आजच्या सभेच्या विषयाला अनुसरून असले पाहिजेत आणि हा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो आजच्या विषय पत्रिकेवर नाही. करिता सभासदांनी असा प्रश्न उपस्थित करणे अप्रस्तुत आहे.

श्री. अ. रशिदखॉ (मामू)<br>
श्री. तकी हसन<br>
श्री. गंगाधर गाडे<br>
श्री. अजीज जहागिरदार } महापौरांचे जालना येथील कार्यक्रमाचे संदर्भान प्रसिध्द झालेल्या बातमीबाबत सभागृहात खुलासा करण्यात यावा.

मा. महापौर : स. सभासदांच्या सूचनेनुसार मी खुलासा करणेस तयार आहे. परंतु वर्तमानपत्राची बातमी व सोबत लेखी अर्ज द्यावा. त्यानंतर बातमीनुसार संबंधितांशी चर्चा करून खुलासा करण्यात येईल.

श्री. तकी हसन : मा. महापौर यांच्या दालनावर "महापौर" महानगरपालिका, संभाजीनगर [औरंगाबाद] अशा प्रकारचा नामफलक लावण्यात आलेला आहे. याविषयी मा. आयुक्त यांचेकडून लेखी पत्रही देण्यात आलेले आहे. तरीही सदर फलकावरील संभाजीनगर नांव बदललेले दिसत नाही एखाद्या शहराचे नामांतर करावयाचे असेल तर प्रथम तशा प्रकारचा ठराव सभागृहात मांडून त्यास सर्वानुमते मंजुरी मिळाल्यानंतरच तसा नामफलक करणे श्रेयस्कर वाटते. परंतु महापौरांच्या दालनावर लावण्यात आलेल्या नामफलक हा नियमबाह्य असल्यामुळे संभाजीनगर नावाचा नामफलक कोणत्या अधिकारात लावला याचा खुलासा व्हावा.

श्री. अ. रशीदखाँ (मामू): शहराच्या नामांतराचा कुठलाही ठराव पास झालेला नसतांना मा. महापौरांनी त्यांचे मर्जीनुसार संभाजीनगर नावाचा नामफलक लावण गैर आहे. शहरातील पद्मपुरा विभागात अस्तीत्वात असलेल्या नामफलकांवर शिवसेना, खडकी असा उल्लेख आढळतो आणि महापौरांच्या दालनावर संभाजीनगर असा उल्लेख आढळतो. तेंव्हा रितसर ठराव मंजूर झाल्यानंतरच अशा प्रकारे नामफलक लावणे योग्य होईल.

मा. महापौर : सभा कामकाज नियमावली नियम क्र. ५(१) (अ) नुसार स. सभासद हा प्रश्न याठिकाणी विचारू शकत नाही.

मा. महापौर यांच्यावरील निर्णयाच्या निषेधार्थ आघाडीच्या सर्व सभासदांनी ११.५५ वाजता सभात्याग केला.

**<u>ठराव क्र.</u> १/१ -** दिनांक १५ जून, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> २ -** श्री. मुन्शीलाल गौतम, आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद यांच्या प्रतिनियुक्तीवरील अटी व शर्ती शासनाचे पत्रक क्र. एएमई/२८८/७९८/सीआर-८२/युडी-२४ दि. २२ नोव्हे. १९८८ च्या परिशिष्टानुसार विचारार्थ सादर (परिशिष्ट सोबत जोडले आहे.)

**<u>ठराव क्र.</u> २ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. मुन्शीलाल गौतम, आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद यांच्या प्रतिनियुक्तीवरील अटी व शर्तीस शासनाचे पत्रक क्र. एएमई/२८८/७९८/सीआर-८२/युडी-२४ दि. २२ नोव्हे. १९८८ च्या परिशिष्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> ३ -** श्री. एम. बी. फडतरे, माजी आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या दिनांक ०६/०५/१९८८ ते ३१/०७/१९८८ पर्यंतच्या प्रतिनियुक्तीवरील अटी व शती शासनाचे पत्रक क्र. अेएमसी/१२८८/३९८/सीआर-५७/नवि-२४ दिनांक १५ जून १९८९ च्या परिशिष्टानुसार विचारार्थ सादर. [परिशिष्ट सोबत जोडले आहे.]

**<u>ठराव क्र.</u> ३ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. एम. बी. फडतरे, माजी आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या दिनांक ०६/०५/१९८८ ते ३१/०७/१९८८ पर्यंतच्या प्रतिनियुक्तीवरील अटी व शती शासनाचे पत्रक क्र. अेएमसी/१२८८/३९८/सीआर-५७/नवि-२४ दिनांक १५ जून १९८९ च्या परिशिष्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**सुमारे १२.०० वाजता आघडीच्या सर्व सभासदांनी सभागृहात प्रवेश केला.**

**<u>विषय क्र.</u> ४ -** मालमत्ता अधिकारी महानगरपालिका यांनी मा. आयुक्त यांचे दिनांक ०८/०४/१९८९ चे मंजुरीनुसार प्रस्ताव सादर केला आहे की, कार्यालयाने श्री. सतीश प्रकाश लाहोर व श्री. रुपचंद अहीर यांना कार्यालयाच्या मालकीचे शहागंज भाजी मार्केटमधील नगर भुमापन क्र. १०२१४, क्षेत्रफळ १०२.०० चौ. मी. आकाराची जास्त नोंदणीकृत भाडेपट्टा क्र. ५४० दि. १९/०१/१९८८ आधारे ३० वर्षाच्या मुदतीसाठी हॉटेल व्यवसाय चालविण्याकरिता दिलेली आहे.

या जागेवर मच्छिमार्केट बांधण्याची कार्यालयाची योजना असल्यामुळे सदरचा भाडेपट्टा रद्द करून या दोन्ही इसमांस दुसरी जागा भाडेपट्ट्याने द्यावयाची आहे. याआधी सदर इसमांना सादिया टॉकिजच्या पूर्वेकडील नगर भुमापन क्र. १३९१६ पैकी १०८ चौ. मी. आकाराची पर्यायी जागा भाडेपट्ट्याने देणेबाबत सर्वसाधारण सभेत विषय क्र. १६४/४ चर्चिला गेला आहे. या जागेवर भव्य व सुशोभित शॉपिंग सेंटर बांधण्यास

सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे व या इसमांना दुसरीकडे पर्यायी जागा देण्याबाबत सुचित केले आहे.

आता श्री. लाहोट व श्री. अहिर यांनी उस्मानुपरा येथील जागेची मागणी केली आहे. बी. ॲन्ड सी क्वॅार्टर लगत (पूर्वेकडील रस्ता व बी ॲण्ड सी क्वॅार्टर मधील) कार्यालयाच्या मालकीची मोकळी जागा आहे. या जागेपैकी अर्जदार यांना १०२ चौ. मी. जागा शहागंज येथील जागा ज्या अटीवर भाडेपट्ट्याने देण्यात आली होती. त्याच अटीवर उपरोक्त जागा ३० वर्षाच्या मुदतीसाठी भाडेपट्ट्याने देण्याबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी सादर.

<u>**संवाद**</u> -

डॉ. अविनाश कुमावत : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेची जागा ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने देता येते काय? याबाबत अहवाल देणे आवश्यक आहे.

श्री. चंद्रकांत खैरे : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जागा भाडेपट्ट्याने देण्यास विरोध नाही परंतु ३० वर्षाचे कालावधीत भाडेपट्ट्याने दिलेल्या जागेचे भाडे नेहमीप्रमाणे वसूल होईल याची दक्षता घेण्यात यावी.

श्री. यादव अशोक सायन्ना: मागील सभेमध्ये सादिया टॉकीज मागील म.न.पा. मालकीच्या जागेत अद्ययावत शॅपिंग सेंटर तयार करण्यात येईल असा ठराव पारित झालेला आहे. तेंव्हा शॉपिंग सेंटरच्या बाबतीत काय कार्यवाही झाली याचा खुलासा करण्यात यावा.

मा. शहर अभियंता : सादिया टॉकीजच्या पूर्वेकडील न. भू. क्रमांक १३९१६ येथे विषय क्र. १६४ नुसार सुशोभित शॉपिंग सेंटर बांधण्यास सर्वसाधारण सभेत मंजुरी दिलेली आहे. त्याप्रमाणे मंत्रालय, नगरविकास विभाग, यांचेकडे सदर ठिकाणी भूमिगत दुकाने बांधता येतील किंवा कसे याविषयी बोलणी चालू आहे. त्याप्रमाणे भूमिगत (अंडर ग्राउंड प्लॉटस्) योजना आखण्यात आली आहे.

श्री. एकबालसिंग गिल : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका कार्यालयात काम करणाऱ्या वर्ग ३ आणि ४ च्या कर्मचाऱ्याचे निवाससाठी जागा देण्याचा विचार करणे आवश्यक आहे.

श्री. गंगाधर गाडे व
श्री. अजिजउल्ला बेग : महापालिकेत काम करणाऱ्या काही वाहन चालकांनी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भाडेपट्ट्याने जागा मिळणेबाबत कार्यालयाकडे अर्ज केलेले आहेत अशी माहिती मिळाली. या प्रस्तावाबरोबर कार्यालयाकडे आलेल्या अर्जाचा विचार केल्यास कर्मचाऱ्यांच्या निवासाचा प्रश्न सुटेल. आवश्ययकता भासल्यास त्यासाठी कर्मचाऱ्यांची गृहनिर्माण संस्था किंवा समुह करून जागा भाडेपट्ट्याने देण्याचा विचार व्हावा.

मा. महापौर : स. सभासदांची सूचना योग्य आहे. महाराष्ट्र शासनाचे नियमाप्रमाणे अशा प्रकारची योजना राबविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

मालमत्ता अधिकारी : जागा भाडेपट्ट्याने मिळणेबाबत चालकांनी केलेले अर्ज निश्चित जागेचे स्थळ दर्शविणारे नाहीत. त्यामुळे त्या अर्जाचा विचार याठिकाणी करण्यात आलेला नाही. संबंधीताकडून स्थळदर्शक जागेची सूचना प्राप्त झाल्यानंतर त्यावर यथोचित विचार करण्यात येईल.

श्री. अलफखाँ हुसेनखाँ : नगर परिषद काळात कटकट दरवाजा जवळ महापालिका कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी जागा संपादन करून मंजुरी दिलेली आहे. त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची निवास्थान बांधण्याचा विचार व्हावा.

<u>**ठराव क्र.**</u> **४ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अर्जदार श्री. सतीश प्रकराश लाहोट व श्री. रुपचंद अहिर यांना उस्मानपुरा येथील बी. ॲण्ड सी क्वॉर्टर लगत (पूर्वेकडील रस्ता व बी ॲण्ड सी क्वावॉर्टरमधील) महानगरपालिका मालकीच्या मोकळ्या जागेपैकी १०२ चौ. मी. जागा शहागंज येथील जागा ज्या अटीवर भाडेपट्ट्याने देण्यात आली होती. त्यास अटीवर उपरोक्त जागा ३० वर्षाच्या मुदतीसाठी भाडेपट्ट्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

<u>**विषय क्र.**</u> **५ -** औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार दिल्लीगेट, गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी येथील जागा सरकारी निमसरकारी वापरासाठी आणि नगर भूमापन क्र. १०३५/१ मधील सुमारे १७५०.८ चौ. मी. जागा आरक्षण क्र. २३० "कम्युनिटी सेंटर" साठी राखीव आहे. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ७४/१०, १०८/१४ दि. १९/११/८८ अन्वये अनुक्रमे वरिल प्रस्तावात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फरबदलाची कार्यवाही करून खालील प्रमाणे बदल करण्याचे ठरविले आहे. व त्या दि. १७/१२/८८ ला स्विकृती मिळाली आहे.

१) दिल्लीगेट येथील गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी या भागाच्या नकाशात हिरव्या किनारीने दर्शविलेल्या "अ" व "ब" हा सार्वजनिक व निम सार्वजनिक वापर बदलून सदर जमिनी निवास क्षेत्रात समाविष्ट करणे.

२) नगर भूमापन क्र. १०३५/१ (भाग) पैकी क्षेत्र १७५०.८ चौ. मी. आरक्षण क्र. २३० "कम्युनिटी सेंटर" मधून वगळून प्राथमिक शाळेसाठी राखीव ठेवणे.

याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, औरंगाबाद विभाग पुरवणी १ अ च्या पृष्ठांक १२५,१२६ दिनाक ०६/०४/८९ रोजी आणि स्थानिक वृत्तपत्र दैनिक अजिंठा व आलमगीर टाईम्स मध्ये प्रसिध्द णाले आहे. त्यामध्ये तुमची हरकत आदि नाही. तसेच मुख्याध्यापक, ज्ञानेश्वर शिक्षण संस्था यांनी लेखी संमती दर्शविली आहे. याशिवाय इतर कोणत्याही सूचना आल्या नाही. अशा रितीने महानगरपालिकेने मु. प्रा. व. र. अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये आवश्यक ती कार्यवाही पूर्ण केली असून आता सदर प्रकरणी वरिल फेरबदलास शासनाची अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेच्या ठरावासाठी सादर करण्यात येत आहे.

<u>**ठराव क्र.**</u> **५ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्रात प्रादेशिक व नगररचना अधिनिमय १९६६ चे कलम ३७ अन्वये आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झाल्यामुळे आरागाबाद मंजूर विकास योजनेनुसार दिल्लीगेट, गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी येथील जागा सरकारी निमसरकारी वापरासाठी आणि नगर भूमापन क्र. १०३५/१ मधील सुमारे मधील

सुमारे १७५०.८ चौ. मीटरची जागा आरक्षण क्र. २३० "कम्युनिटी सेंटर" साठी राखीव असलेल्या जागेचे आरक्षणात

१) दिल्लीगेट येथील गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी या भागाच्या नकाशात हिरव्या किनारीने दर्शविलेल्या "अ" व "ब" हा सार्वजनिक व निम सार्वजनिक वापर बदलून सदर जमिनी निवास क्षेत्रात समाविष्ट करणे.

२) नगर भूमापन क्र. १०३५/१ (भाग) पैकी क्षेत्र १७५०.८ चौ. मी. आरक्षण क्र. २३० "कम्युनिटी सेंटर" मधून वगळून प्राथमिक शाळेसाठी राखीव ठेवणे.

प्रमाणे फेरबदल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६** - जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दित आयात होणाऱ्या वाणिज्य (Commerce)बी - बियाण्यावर सध्या २% जकात अकारणी कार्यरत आहे. मुं. प्रा. महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत आयात होणाऱ्या वाणिज्य बी बियाण्यावर तसेच शेती विषयक किटकनाशकावर जकात माफींची तरतुद नाही. परंतु शेतकऱ्याचे हित व शेती उद्योगाला प्रोत्साहन या दृष्टीकोनातून वाणिज्य श्री बियाण्यावर २% ऐवजी १% जकात आकारणी व किटकनाशकावर पूर्णतः जकात आकारणी माफ करावी तद्अनुषंगाने ठराव पास करून जकात नियमावली १९८५ अंतर्गत तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत बदल करणे संबंधी महाराष्ट्र शासनास शिफारस करावी लागेल.

उपलब्ध माहितीनुसार निम्ननिर्दीष्ट महानगरपालिका क्षेत्रात आयातीत होणाऱ्या वाणिज्य बी बीयाणे व शेती विषयक टिकनाशकावर निम्ननिर्दीष्ट दरात जकात माफी अथवा

| अ.क्र. | वसुली कार्यरत आहे. | बी-बियाणे | शेती विषयक किटकनाशके |
|---|---|---|---|
| १. | पुणे महानगरपालिका | २% | २% |
| २. | नागपुर महानगरपालिका | माफ | २.५% |
| ३. | सोलापुर महानगरपालिका | माफ | २.५% |
| ४. | कल्याण महानगरपालिका | १.५% | माफ |
| ५. | अमरावती महानगरपालिका | १.५% | माफ |
| ६. | बृहन्मुंबई महानगरपालिका | माफ | माफ |
| ७. | ठाणे महानगरपालिका | - | जकातीचे स्वतंत्र्य नियम केलेले नाहीत. |
| ८. | प्रिंपी चिंचवड महानगरपालिका | माफ | माफ |
| ९. | नाशिक महानगरपालिका | माफ | १.६०% |

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद** -

श्री. यादव अशोक सायन्ना : नागपुर, सोलापुर व अन्य महानगरपालिकेप्रमाणे बी-बीयाणे व किटकनाशके यावर आकारण्यात येणारा जकात कर माफ करण्यात यावा.

श्री एकबालसिंग गिल : शहरातील व्यापाऱ्यांनी संगनमत करून बी-बीयाने व

किटकनाशके यावरिल जकात कर माफीची मागणी केली आहे. जकात कर माफ केल्यामुळे शेतकऱ्यांना यापासून कोणताही फायदा होणार नाही. त्यामुळे सभागृहापुढे असलेला जकात माफीचा प्रस्ताव मंजूर करू नये.

श्री. नरेंद्र पाटील : महापालिकेची आर्थिक बाजू कमकूवत असल्यामुहे बी-बियाणे व किटकनाशकावरिल जकात माफ करू नये.

श्री. केशव सोनवणे : शासन शेतकऱ्यांचे हितासाठी अनेक योजना राबवित आहे. या बाबीचा विचार करून बी-बियाणेव किटक नाशकावर जकात माफी करण्यात यावी.

श्री. धनंजय गंगाखेडकर: बी-बियाणेव किटकनाशके यांचा वापर फक्त ग्रामीण भागातच होत आहे. माझे माहितीनुसार बी-बियाणे व किटकनाशकापासून महापालिकेला अंदाजे २५ ते ३० हजार रुपये उत्पन्न मिळत असेल तेंव्हा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन बी-बियाणे व किटकनाशके यावरिल जकात माफीचा ठराव मंजूर करण्यात यावा.

मा. महापौर : प्राप्त माहितीनुसार औषधी व किटकनाशकापासून महापालिकेस फक्त १०,०००/- रुपयाचे उत्पन्न मिळते. ही बाब लक्षात घेऊन ठराव मंजुर करण्यात यावा.

श्री. अजीज जहागिरदार : जकात माफ झाल्यानंतर बियाणांची किंमत कमी होणार असेल तर प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव क्र. ६</u>** - प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शेतकऱ्यांचे हित व शेती उद्योगाला प्रोत्साहन देण्याचे दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिका हद्दित आयात होणारे वाणिज्य बी-बियाणे २% ऐवजी १% जकात कर आकारणी करण्यास आणि किटकनाशकावर संपूर्णतः जकात माफ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १६ ऑगस्ट, १९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत**

**बुधवार दिनांक १६ ऑगस्ट, १९८९ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे, यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभूवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग | सदस्य |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | --//-- |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मण | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार | --//-- |
| ६) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ७) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ८) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| ९) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| १०) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| ११) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १२) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १३) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १४) | मा. श्री. प्रधान बंडू गोविंदराव | --//-- |
| १५) | मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | --//-- |
| १६) | मा. श्री. तकी हसनखाँन कासिमखाँन | --//-- |
| १७) | मा. श्री. अ. स. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दन | --//-- |
| १८) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| १९) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| २०) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २१) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २२) | मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ.हमीद खान | --//-- |
| २३) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २४) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २५) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २६) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २७) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २८) | मा. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल | --//-- |
| २९) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३०) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३१) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३२) | मा. श्री. फैय्याजखान अहमदखान | --//-- |
| ३३) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३४) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३५) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३६) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३७) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ३८) | मा. श्री. अलफखाँन हुसेनखाँन | --//-- |
| ३९) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४०) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४१) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ४२) | मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान | --//-- |
| ४३) | मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव | --//-- |
| ४४) | मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव | --//-- |
| ४५) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. | --//-- |
| ४६) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन | --//-- |
| ४७) | मा. श्री. गोडसे आनंद जगदीश | --//-- |
| ४८) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार | --//-- |
| ४९) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ५०) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ५१) | मा. श्री. गाडे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५२) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५३) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५४) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५५) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

"वंदे मातरम्" या गीताने सभेची सुरुवात झाली.

बीड, परभणी, नांदेड आणि महाराष्ट्रातील अन्य जिल्हात पुरामुळे मृत पावलेले नागरिक, स. सभासद श्री. मिर्झा अन्वर बेग यांचे वडिल पै. मिर्झा हबीब बेग, माजी नगरसेवक परिषद सदस्य व इंदिरा काँग्रेसचे माजी शहर अध्यक्ष कै. पी. व्ही जोशी, सामाजिक कार्यकर्ते व इंदिरा काँग्रेसचे क्रियाशील सदस्य कै. दिनकर जोशी यांना सभागृहातर्फे ०.२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**<u>संवाद</u>** :-

श्री. गंगाधर गाडे : बीड, परभणी व नांदेड येथील पूरग्रस्ताच्या मदतीसाठी अनेक स्तरातून आर्थिक मदतीचा ओघ सुरू आहे. तेंव्हा महानगरपालिकेतर्फे पूरग्रसतांसाठी मदत देता येईल काय याचा विचार व्हावा.

मा. उपआयुक्त : महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांतर्फे पूर ग्रस्तांसाठी रु. ५१,०००/- चा धनादेश मुख्यमंत्री निधीस पाठविलेला आहे.

श्री. गंगाधर गाडे : महापालिकेच्या बजेटमध्ये पूरग्रस्तांसाठी आर्थिक मदत करण्याची तरतूद आहे काय?

श्री. प्रकाश जावळे : महापालिकेतर्फे पूरग्रस्तांना मदत देण्याच्या दृष्टीने आमच्या सभेत विशेष ठराव घेऊन आर्थिक मदत देण्यात यावी.

मा. उपायुक्त : महापालिका अर्थसंकल्पामध्ये आर्थिक मदत देण्याची तरतूद नाही. तथापी घडलेली घटना विचारात घेता अशी मदत करता येईल का याची तपासणी करून खुलासा करण्यात येईल.

श्री. प्रकाश जावळे : महापालिका सभासदांना प्रभागासाठी प्रत्येकी जो २५,०००/- रु. चा निधी ठेवलेला आहे. त्या रकमेतून पूरग्रस्तांसाठी मदत करता येईल का याबाबत विचार व्हावा.

मा. महापौर : महापालिका अर्थसंकल्पात सभासदांना त्यांचे प्रभागातील विकास कामासाठी रु. २५,०००/- (प्रत्येकी) तरतूद करण्यात आली आहे. ही रक्कम विकास कामाव्यतिरिक्त अन्य कामावर खर्च करता येणार नाही. तथापि उपायुक्त यांनी सुचविल्याप्रमाणे यथास्थिती विचार करण्यात येईल.

श्री. चंद्रकांत खैरे : यापूर्वीच्या सर्वसाधारण सभा कार्यक्रमपत्रिकेवर "महापालिका अधिनियम १(क)" अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मा. महापौरांनी औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बोलाविली आहे. असा उल्लेख करण्यात आलेला असतांना कार्यक्रम पत्रिकेवर मा. महापौरांनी सर्वसाधारण सभा बोलावली असे उल्लेख नाही. तेंव्हा त्याबाबत खुलासा व्हावा.

सचिव : स. सभासदांनी सुचवल्याप्रमाणे वाक्य रचना टाईप मिस्टेकमुळे झालेली आहे. याबाब यापुढे दक्षता घेण्यात येईल.

श्री. सुभाष परदेशी : यापूर्वीच्या सर्वसाधारण सभेमध्ये कार्यक्रमपत्रिकेबाबत काटेकोरपणे दक्षता घेण्यात येईल असे आश्वासन सचिवांनी दिलेले आहे. आश्वासन देवूनही पुन्हा आजच्या विषय पत्रिकेवर स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे उल्लेख आलेला नाही. तेंव्हा सचिवांनी यापुढे आश्वासनांची पूर्तता झाल्याचे पहावे.

**<u>विषय क्र.</u> ७ -** दिनांक १९ जुलै, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद</u> :-**

श्री. यादव अशोक सायन्नाः मागील सभेमध्ये किटक नाशकाप्रमाणेच आयात होणाऱ्या बी-बियाण्यावरीही संपूर्णतः जकात माफी देण्यास सभागृहाने मंजुरी दिली आहे. परंतु ठरावामध्ये तशा प्रकारची नोंद नाही. तेंव्हा आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. अजिज जहागिरदार : आजच्या सर्वसाधारण सभेत एकूण प्रश्न किती आहेत?

मा. महापौर : आजच्या सर्वसाधारण सभेत एकूण ६ प्रश्न विचाराधीन आहेत.

श्री. रतनकुमार पंडागळे: आजच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेसोबत पुरवणी पत्रिकेचा विचार होणार की नाही यांचा खुलासा व्हावा [पुरवणी विषयक पत्रिका हाताने दाखवून]

मा. महापौर : प्राप्त झालेल्या विषयपत्रिकेवरिल विषयांवरील चर्चेनंतर स. सभासदांच्या संमतीने पुरवणी विषयकपत्रिकेतील विषयांबाबत विचार केला जाईल.

श्री. अजिज जहागिरदार: आजच्या सभेत सर्व स. सदस्यांना वाटलेल्या विषयपत्रिकेतील ही

पुरवणी विषपत्रिका जोडलेली दिसत नाही.

मा. महापौर : याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी सुधारणा करून तीपुरवणी विषयपत्रिकेसाबत लावेली आहे किंवा नाही हे तपासून पहावे. तद्नंतर स. सदस्यांना वाटण्यात याव्यात.

सचिव : ही पुरवणी विषयपत्रिका दोन महिण्यापूर्वी स. सभासदांना वाटप करण्यात आलेली आहे. तेंव्हा यावेळी ही पुरवणी विषयपत्रिकासोबत जोडलेली नाही.

मा. महापौर : सचिवांनी दिलेला खुलासा हा समर्पक नाही. दोन महिण्याच्या पुरवणी विषयपत्रिका अजेंड्यासोबत जोडली असली तरी आजच्या अजेंड्यासोबत पुरवणी विषयपत्रिका जोडणे आवश्यक होते.

**<u>ठराव क्र.</u> ७ -** विषय क्र. ७ मध्ये "औरंगाबाद महापालिका हद्दित आयात होणाऱ्या वाणिज्य बी-बियाणांवर २% ऐवजी १% जकात कर आकारणी करण्यास" याऐवजी महापालिका हद्दित आयात होणाऱ्या बी-बियाणांवर आणि किटक नाशकांवर संपूर्णत: जकात माफ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या दुरुस्तीसह दिनांक १९ जुर्ल, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> ८ -** औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ११ "खुली जागा" व त्यालगत असलेली २० फुट रुंद रस्ते वगळण्याबाबत अर्जदार श्री. के. एस. पटेल व इतर यांनी विनंती केली आहे. त्याबद्दल अर्जदार सामाईकरित्या ५०% जागा विना मोबदला महानगरपालिकेस देण्यास तयार आहेत. याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असता शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. टीपीएस/३०८५/१७२४/(सी.आर.१७३/८५) नवि-१२ दि. ०६/१२/८८ अन्वये औरंगाबाद विकास आराखड्यातील स्थानांक क्रमांक ११ व त्याभोवतालचे २० फुटी रस्ते अनावश्यक असल्याने वगळण्यात येऊन आरक्षणाचे आखणीत बदल करावा या प्रस्तावाशी शासन सहमत असल्याचे व महाराष्ट्र प्रोदशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरुाराचा वैधानिक प्रस्ताव संचालक नगर रचना महाराष्ट्र शासन पुणे यांचेमार्फत शासनास सादर करण्यास कळविले आहे.

तरी आरक्षण क्र. ११ "खुली जागा" पैकी ५०% म्हणजेच ६५१.०० चौ. मी. खुली जागा महानगरपालिकेस विना मोबदला मिळेल. या अटीवर राहिलेली जागा व त्या सभोवतालचे २० फुट रुंदीचे रस्ते रद्द करून निवास क्षेत्रात सामील करण्यास वरील प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाचे कार्यवाही करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**<u>संवाद</u> :-**

श्री. अविनाश कुमावत : प्रस्तावामध्ये आरक्षण क्र. ११ "खुली जागा" असा उल्लेख केला असल्यामुळ आरक्षण क्र. ११ ही जागा शहरातील कोणत्या भागातील आहे याचा पूर्ण बोध होत नाही.

श्री. शांताराम काळे : प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणाबाबत शासनाचे पत्र आले

| | | |
|---|---|---|
| | | किंवा नाही, रस्ते आणि इतर जागा मिळून किती जागा सोडण्यात येणार आहे, आरक्षण क्र. ११ चे एकूण क्षेत्र किती इ. बाबत सविस्तर खुलासा व्हावा आणि त्यानंतर एकूण आरक्षित क्षेत्राच्या ५०% क्षेत्र वगळण्यात येते काय याचा विचार व्हावा. |
| नगर रचनाकार | : | आरक्षण क्र.११ "खुली जागा" जुनाबाजार येथील मस्जिदीजवळ ही जागा विकास योजनेत आरक्षित केलेली आहे. |
| मा. महापौर | : | नगर रचना विभागातील विषय सभागृहापुढे मांडतांना संबंधित जागेचा स्थळदर्शक नकाशा देण्याची व्यवस्था करावी. |
| नगर रचनाकार | : | याबाबत मनपाकडील पत्र क्र.मनपा/नगररचना/३०६९/८६ दिनांक २४/०४/८९ व २८/०८/८५ द्वारे नगर विकास मंत्रालय, मुंबई यांचेकडे पत्र पाठवून आरक्षण क्र. ११, जुनबाजार येथील जागेबाबत सविस्तर अहवाल पाठविण्यात आलेला आहे. त्या संदर्भात कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई, नगर विकास विभागाकडून दि. ०६/१२/८८ चे पत्राने प्रस्ताव विचाराधीन असल्याची माहिती या कार्यालयास मिळाली आहे. |
| डॉ. चेनकरण संचेती | : | प्रस्तावात आवश्यक त्या सुधारणा करून सुधारित प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा. |
| श्री. धनंजय गंगाखेडकर | : | या ठरावाच्या प्रस्तावाप्रमाणे अजूनही आरक्षणाच्या बाबतीत अनेक प्रश्न आहेत. तेंव्हा या सर्व प्रश्नांचा एकत्रिकरित्या विचार व्हावा. |
| मा. महापौर | : | सदर प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुढील सभेत ठेवण्यात यावा. |
| मा. उप महापौर | : | विकास योजनेच्या आराखड्यात आरिक्षत करण्यात आलेल्या जागेसंबंधी फेरबदल करण्याबाबतचे अनेक प्रस्ताव सभासदांनी मांडलेले आहेत. त्या सर्व प्रस्तावांचा संपूर्ण अभ्यास करून सभासदांनी फेरबदलाबाबत दाखल केलेले सर्व प्रस्ताव एकाच वेळी सभागृहापुढे ठेवण्यात यावे. |
| श्री. यादव अशोक सायन्ना | : | शहरातील अशा काही अनावश्यक आरक्षित जागांच्या बाबतीत आपल्याकडे प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणेचा अहवाल एकत्र संकलितरित्या सभागृहासमोर ठेवावा. |
| श्री. तुळशीराम भगुरे | : | ५०% जागा आरक्षित करणार असला तर या आरक्षित केलेल्या ५०%जागेचा नीयोगासंबंधी खुलासा व्हावा. |

**<u>ठराव क्र. ८</u>** - आगामी बैठकीत हा प्रस्ताव सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. ९</u>** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५८(३०) अन्वये हातगाड्यांना परवाने देणे व परवाने न घेता फिरणाऱ्या हातगाड्यांना ताब्यात घेण्याविषयीचे उपविधी मंजुरीस्तव सादर. [उपविधीची प्रत सोबत जोडली आहे.]

**<u>संवाद</u>** :-

| | | |
|---|---|---|
| श्री. अजिजउल्ला बेग | : | उपविधीमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या हातगाड्या व्यतिरिक्त |

काही व्यवसाय एकाच ठिकाणी असलेल्या हातगाड्यावर केले जातात. तेंव्हा या उपविधीमध्ये हातगाड्यांची व्याख्या स्पष्ट करून त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

मा. महापौर : शहरात काही व्यवसायीक एका विशिष्ट ठिकाणी हातगाड्या उभ्या करून व्यवसाय करतात अशा हातगाड्यांबाबतीत काय धोरण असेल याचा खुलासा उपायुक्तांनी करावा.

उपायुक्त : हातगाड्यांना परवाने देणेबाबत तयार करण्यात आलेल्या उपविधीचे कलम ४ प्रमाणे अशा व्यावसायिकांना परवाना देण्याचा विचार करता येईल.

श्री. अलफखाँ हुसेनखाँ : शहरात अनेक व्यवसायिक छोटे छोटे खोके उभारून (उदा. घड्याळ दुरुस्ती) व्यवसाय करतात अशा व्यावसायिकांबाबत काय धोरण अवलंबविण्यात येणार याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : तयार करण्यात आलेल्या उपविधीप्रमाणे अशा व्यावसायिकांना परवानगी देण्यात येईल.

श्री. अजिजउल्ला बेग : या उपविधीनुसार एकाच ठिकाणी बसून लहान लहान व्यवसाय करणाऱ्या धंदेवाईकांना त्यातून सुट देण्यात यावी.

मा. महापौर : उपविधीनुसार हातगाड्यांवर धंदा करणाऱ्या व्यावसायिकांना ठराविक विभागाचे किंवा ठराविक वस्तु विकण्याचे बंधन ठेवता कामा नये. त्यादृष्टीने तयार करण्यात आलेल्या उपविधीमध्ये सुधारणा वरून प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

डॉ. शांताराम काळे : उपविधी मंजुरीचा विचार करतांना हातगाड्यामुळे शहरातील वाहतुकीस व्यत्यय येणार नाही. याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**ठराव क्र. ९** - हातगाड्यांना परवाने देणे व परवाने न घेता फिरणाऱ्या हातगाड्या ताब्यात घेणे विषयी तयार करण्यात आलेल्या उपविधीबाबत सभासदांनी आवश्यक त्या सूचना लेखी स्वरुपात येत्या १० दिवसाचे आंत मा. आयुक्त ह्यांचेकडे दाखल कराव्यात. म्हणजे त्यावर सर्वकश विचार केला जाईल. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १०** - औरंगाबाद महानगरपालिकेच्या जुन्या नगर परिषदेच्या हद्दिसाठी शासनाने दि. ०६/०१/१९७५ ला मंजूर केलेल्या विकास योजनेस सुधारित करण्यासाठी व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २३ अन्वये कार्यवाही करण्यास दिनांक १८/०६/८८ रोजी झालेल्या सर्व साधारण सभेचा विषय क्रमांक ५ ठराव क्र. ७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी वर नमूद केलेल्या क्षेत्राचे सर्वेक्षण करणे, जमीनीचा विद्यमान जमीनीचा वापर नकाश तयार करणे, विकास योजनेचा प्रस्ताव तयार करणे इत्यादी सर्व कामे करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगर रचना अधिकारी यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. तरी वरील कामांसाठीऔरंगाबाद महानगरपालिकेकडे कार्यरत असलेले सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांची विकास योजना औरंगाबाद सुधारित करणेसाठी नगर रचना अधिकारी म्हणून नेमूणक करण्याबाबत मा.

उपसंचालक, नगर रचना औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांची मंजुरी घेण्यास व यासंबंधी वैधानिक कार्यवाही करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**<u>ठराव क्र.</u> १० -** प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १३ अन्वये आणि शासनाने दिनांक ०६/०१/७५ ला मंजूर केलेल्या विकास योजनेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या जुन्या नगर परिषदेच्या हद्दिसाठी सुधारित विकास योजना तयार करणेकरिता क्षेत्राचे सर्व्हेक्षण करणे, विद्यमान जमीनीचा वापर नकाशा तयार करणे, विकास योजनेचे प्रस्ताव तयार करणे इ. सर्व कामासाठी औरंगाबाद महानगर पालिकाकेकेडे कार्यरत असलेले सहाय्यक संचालक, नगर रचना यांची औरंगाबाद शहराची सुधारित विकास योजना करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगर रचना अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> ११ -** माजी प्रशासकांनी दि. ३१/१२/८७ व २१/०१/८८ ला सन १९८८-८९ च्या फेर आकारणीसाठी सर्व प्रभागातील इमारतीचे अ, ब, क, ड प्रतवारीनुसार अपेक्षित भाड्याचे दर कायम करून फेर आकारणीचे काम पूर्ण करून घरमालकास नोटीसा वाटण्याचे काम सुरू केले होते. सदरील फेर आकारणीचा अंमल दि. ०१/०४/८८ पासून लागू होणार होता.

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने १९८८-८९ च्या फेर आकारणीच्या कामास दि. १६/०७/८८ ला स्थगिती दिली. त्यामुळे फेर आकारणीचे काम पूर्ण होवू शकले नाही. पर्यायाने मालमत्ता कराची वसुली पूर्वीच्याच दराने करावी लागली.

सन १९८९-९० च्या अर्थसंकल्पात १९८८-८९ ची फेर कर आकारणी मंजूर होईल, असे गृहित धरून अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे.

तसेच सन १९८८-८९ चे फेर आकारणीचे अपेक्षित भाड्याचे दर हे सन १९८६-८७ च्या पहाणीमधील तत्कालीन भाड्यावर आधारित आहेत व आताचे दर त्यापेक्षा जास्त असल्याने सन १९८८-८९ च्या फेर आकारणीस्तव ठरविलेल्या दरानेच सन १९८९-९० ची फेर आकारणी अंतिम ठरविण्यास अथवा त्यात योग्य ते फेरबदल करून फेर आकारणीसाठी अंतीम दर ठरविण्यास प्रस्ताव विचारास्तव सादर.

**<u>संवाद</u> :-**

श्री. चंद्रकांत खैरे : शहराच्या विकासाच्या दृष्टीने मालमत्ता कर फेरआकारणी बाबत विचार होणे आवश्यक आहे. हा विचार करत असताना प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन पध्दतीचा अवलंब न करता सर्व शहरासाठी एकच दर पध्दत अवलंबीने श्रेयस्कर राहील.

श्री. तुळशीराम भगुरे : मालमत्ता कर फेर आकारणीबाबत विषयासोबत दिलेल्या तक्त्यामध्ये

एखाद्या घरमालकाने भाड्याने दिलेल्या घराबाबत करण्यात येणाऱ्या फेर आकारणीचा स्पष्ट खुलासा दिलेला नाही तेंव्हा याबाबत विचार व्हावा.

मा. उपायुक्त : ज्या मालमत्ता भाड्याने दिल्या असतील अश मालमत्ता धारकांना त्यापासून मिळणाऱ्या एकत्रित उत्पन्नावर आधारित फेर आकारणी करण्यात येते.

श्री. अजिजउल्ला बेग : मालमत्ता कराच्या फेर आकारणीबाबत सोबत जोडलेल्या तक्त्यातील अ, ब, क, ड. प्रतवारीमध्ये "क" मध्ये सिमेंट पत्र्यासोबत लोखंडी पत्र्यांच्या घराचाही समावेश करून (जी. आय. शीटस्) फेर आकारणी करण्यात यावी.

मा. उपायुक्त : स. सभासदांच्या सूचनेची नोंद घेण्यात येईल.

श्री. यादव अशोक सायन्ना: मालमत्ता कर फेर आकरणीसंबंधी सभागृहापुढे विचाराधीन असलेल्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे-

अ. प्रतवारीचे घरासाठी ०.५३ ऐवजी ०.४५
ब. प्रतवारीचे घरासाठी ०.३८ ऐवजी ०.३५
क. प्रतवारीचे घरासाठी ०.३० ऐवजी ०.२५
ड. प्रतवारीचे घरासाठी ०.२५ ऐवजी ०.१८
या दराने फेर आकारणी करण्यात यावी.

श्री. अ. रशीदखाँ मामू : मालमत्ता कराची फेर आकारणी करण्यासाठी शहरातील नागरिकांना कोणकोणत्या सवलती देण्यात येतात याचा विचार होणे आवश्यक आहे सध्या महापालिकेतर्फे शहरात अत्यंत कमी प्रस्तावात सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्यामुळे मालमत्ता कराची फेरआकारणी करण्यात येऊ नये असे माझे मत आहे व हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

श्री. गंगाधर गाडे : स. सभासद श्री. यादव अशोक सायन्ना यांनी मांडलेल्या सुचनेस माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : मालमत्ता कराची फेर आकारणी दर पाच वर्षांनी होणे आवश्यक आहे. गेल्या आठ वर्षापासून मालमत्ता कराची फेरआकारणी प्रलंबित आहे. प्रतिनिधी निवडून आल्यानंतर प्रशासनाने फेर आकारणीचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवला असात सभागृहाने त्यास स्थगिती दिली होती. त्यामुळे मालमत्त कराच्या वसुलीवर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर परिणाम होत आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीने फेर आकारणीच्या ठरावावर चर्चा होणे आवश्यक आहे.

डॉ. चंनकरण संचेती : गेल्या आठ वर्षापासून लोकांच्या अपेक्षा वाढत आहेत. ज्या सुखसुविधा पाहिजेत त्या मिळत नाहीत.

श्री. अशोक सायन्ना : गेल्या आठ वर्षापासून मालमत्ता कराची फेरआकारणी झाली नाही याला जबाबदार कोण? याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : या प्रकरणी योग्य ती चौकशी करण्यात येईल.

श्री. एकबालसिंग गिल : मालमत्त कराच्या फेर आकारणीसाठी सभागृहापुढे विचारार्थ ठेवेलेल तक्त्यातील दर कमी करून त्याप्रमाणे मालमत्ता कराची फरे आकारणी करावी अशी बहुतांशी सभासदांची मागणी आहे. याचा विचार करून फेर आकारणी करण्यात यावी.

श्री. तकी हसन खाँ : मालमत्त कराच्या फेर आकारणीबाबत स्थायी समिती सदस्य आणि मा. आयुक्त यांच्यामध्ये फेर आकारणीबाबत झालेल्या चर्चेत कोणते दर निश्चित करण्यात आलेले आहेत याचा खुलासा सभागृहाला व्हावा. त्या फेरआकारणी बाबत चर्चा करता येईल.

श्री. अलफखाँ हुसेनखाँ : माजी प्रशासकांनी २८/०८/८६ रोजी कायम केलेल्या दरानुसार ०१/०४/८६ ते ३१/०३/८८ पर्यंत अस्तित्वात असलेल्या मालमत्तांना कराची फेरआकरणी करतांना अ,ब,क,ड बांधकामाचे प्रतवारी करता अनुक्रमे ०.४०, ०.२५, ०.२० व ०.१५ पैसे या दराने फेर आकारणी करण्यात यावी आणि ०१/०४/८८ नंतरच्या मालमत्तांना (इमारतींना) फेर आकारणी करतांना अ,ब,क,ड प्रतवारीनुसार रकाना ४ मध्ये दर्शविलेल्या दराऐवजी अनुक्रमे ०.२५, ०.३५, ०.३०, व ०.१८ पैसे या दराने फेर आकारणी करण्यात यावी.

डॉ. शांताराम काळे : मालमत्ता कराची फेरआकारणी नि: पक्षपाती पध्दतीने व्हावी यादृष्टीने नागरिकांना परवडेल अशा प्रकारे आणि प्रशासनाचे आर्थिक नुकसान होणर नाही या पध्दतीने मालमत्ता कराची फेर आकारणी व्हावी. तसेच फेर आकारणी करण्यापूर्वी लावण्यात आलेली कर आकारणी योग्य पध्दतीची आहे काय? याची तपासणी करणे आवश्यक आहे. माजी महापौर, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. स्थायी सिमती सभापती किंवा स. सभासद यांच्या शहरात असलेल्या मालमत्तांना ज्या पध्दतीने कर आकारणी करण्यात आलेली आहे त्यातच पध्दतीने स. सभासदांचे प्रतवारीमध्ये असलेल्या सामान्य नागरिकांचे घरांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली आहे किंवा नाही यांचा शोध घेणे आवश्यक आहे.

मा. महापौर : स. सभासदांची सूचना योग्य आहे. पूर्वी करण्यात आलेल्या फेर आकारणीमध्ये अशा प्रकारे कमी अधिक प्रमाणात कर आकारणी केलेल्या घरांची माहिती लेखी स्वरुपात सभासदांनी कळविल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री. रशिदखाँ (मामू) : मालमत्ता कर फेर आकारणीचा सर्व्हे करतांना जी घरे बंद आहेत अशा घरांना जास्त प्रमाणात टॅक्स लावण्यात येतो.

श्री. नरेंद्र पाटील : मालमत्ता कराची फेर आकारणी करतांना औद्योगिक भागातील वसाहतीकरिता लावण्यात आलेल्या टॅक्समध्ये १००% वाढ करण्यात आली आहे. ती वाढ जास्त वाटते. तेंव्हा या बाबीचा विचार करून औद्योगिक भागाच्या वसाहतीसाठी पूर्वीच्या दरापेक्षा ५०% जास्त याप्रमाणे वाढ करून मालमत्ता कराची फेर आकारणी करण्याचा विचार करण्यात यावा.

मा. महापौर : स. सभासदांची सूचना मान्य करण्यात येते.

श्री. सुभाष परदेशी : मुकूंदवाडी भागातील काही घरांना मालमत्ता कर आकारणी करण्यात आलेली आहे व काही घरांना आकारणी करण्यात आलेली नाही.

श्री. रतनकुमार पंडागळे: मालमत्ता कर फेर आकारणीबाबत सर्व्हे केव्हा झाला याचा खुलासा व्हावा. सर्व्हे झाल्यानंतर बऱ्याच भागातील घरांमध्ये वाढ झलेली आहे. तेव्हा अशा घरांना कर आकारणी कशा प्रकारे करणार याचा खुलासा व्हावा.

मा. उपआयुक्त : ज्या मालमत्तामध्ये जादा बांधकाम झाल्याची सूचना मिळेल अशा

जादा बांधकाम झालेल्या घरांचा पुन्हा सर्व्हे करून त्यावर मालमत्ता कराची फेर आकारणी करण्यात येईल.

श्री. मुजीब खाँ : वार्ड क्र. १३ मधील घरांना टॅक्स लावण्याबाबतच्या अनेक संचिका प्रलंबित आहेत. तेव्हा या भागातील घरांना टॅक्स लावण्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : निवासी क्षेत्रामध्ये विना परवानगीने बांधण्यात आलेल्या घरांना दंड आकारून ादर बांधकामे नियमित करण्यात येतील. त्यानंतर अशा घरांना कर आकारण्ी करण्यात येईल.

मा. महापौर : आरक्षित जागेवर बांधकाम करण्यात आलेल्या घरांना कर आकारणी करतांना वार्ड क्र. १३ येथील घरांना कर आकारणी करण्याचा विचार करण्यात येईल.

श्री. मोतीराम घडामोडे : मालमत्ता कर फेर आकारणीमध्ये "अ" वर्ग प्रतवारीमध्ये आर. सी. सी. स्लॅबच्या घरांचा समावेश करण्यात आलेला आहे. सिडको भागातील घरे बॉक्स टाईप तयार स्लॅबने उभाररण्यात आलेली आहेत. या घरांना तळमजल्यावर पहिल्या मजला बांधण्याची परवानगी नाही. आर. सी. सी. स्लॅब असलेल्या घरांवर तळमजल्या व्यतिरिक्त एक, दोन, तीन अशा प्रकारे मजल्याचे बांधकाम करण्यात येते. सिडको भागातील घरांना कर आकारणी करण्याचा प्रश्न आज तरी विचारधीन नसला तरी भविष्य काळात अशा घरांना कर आकारणी करतांना बांधकाम प्रतवारीचा प्रश्न उभा राहिल. तेंव्हा सिडको भागातील घरांना तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कोणत्या बांधकाम प्रकारान्वये कर आकारणी करण्यात येईल याचा विचार व्हावा.

मा. महापौर : स. सभासदांचे सुचनेचा विचार करण्यात येईल. मालमत्ता कराची फेर आकारणी करतांना ३१/०३/८८ पूर्वी अस्तित्वात असलेल्या घरांना दि. २८/०८/८६ रोजी कायम करण्यात आलेल्या दरानुसार अ, ब, क, ड बांधकामाची प्रतवारी असलेल्या घरांना अनुक्रमे ०.४०, ०.२५, ०.२०, ०.१५ पैसे या दराने आणि दि. ०१/०४/८८ नंतर अस्तित्वात आलेल्या घरांना अ,ब,क,ड बांधकामाचे प्रतवारीनुसार अनुक्रमे ०.४५, ०.३५, ०.२५, ०.१५ या दराने मालमत्ता कराची फेर आकारणी करण्यात यावी अशी विनंती करतो.

श्री. गंगाधर गाडे : स. सभासद श्री. घडामोडे यांच्या मुद्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सिडको भागातील घरांवर पहिला मजला बांधण्याची परवानगी नाही. तेव्हा स. सभासदांच्या मुद्दाचा विचार करण्यात यावा सौ. लता दलाल.

शहरातील काही घरांची गेल्या आठ-दहा वर्षापासून कर आकारणी झालेली नाही. त्यामुळे महापालिकेचे अगणित आर्थिक नुकसान झालेले आहे. तेंव्हा मालमत्ता कर आकारणी जबाबदारी टाळणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी. या शिवाय मालमत्ता कर फेर आकारणी संबंधी सर्व्हे करतांना महापालिका कर्मचारी भ्रष्टाचार करून कमी दराने फेर आकारणी करतात

अशी माहिती मिळोलली आहे. तेंव्हा याबाबत चौकशी व्हावी

मा. महापौर.

स. सभासदांची सूचना योग्य असली तरी लेखी स्वरुपात विशिष्ट उदाहरण वजा सूचना दाखल केल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

मा. आयुक्त : मालमत्ता कर फेर आकारणीमध्ये भ्रष्टाचाराची प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यास त्याचा गांभीर्याने विचार करण्यात येईल.

**<u>ठराव क्र.</u> ११ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मालमत्ता कराची सन १९८९-९० करिता फेर आकारणी करतांना ३१/०३/८८ पूर्वी अस्तित्वात असलेल्या घरांना दि. २८/०८/८६ रोजी कायम करण्यात आलेल्या दरानुसार म्हणजेच अ, ब, क, ड बांधकामासाठी प्रतवारी असलेल्या घरांना अनुक्रमे रु. ०.४०, ०.२५, ०.२० आणि ०.१५ पैसे या दराने तसेच दि. ०१/०४/८८ नंतर अस्तित्वात आलेल्या घरांना अ, ब, क, ड बांधकामाचे प्रतवारीनुसार अनुक्रमे ०.४५, ०.३५, ०.२५ व ०.१५ पैसे तसेच औद्योगिक वसाहतीत असलेल्या मालमत्तांची फेर आकारणी करतांना दि. ०१/०४/८३ रोजी फेर आकारणी करिता विविध पकारच्या बांधकामासाठी निश्चित केलेल्या त्या त्या बांधकामाचे (मालमत्तचे) प्रतवारीच्या दरापेक्षा ५०% प्रमाणे वाढ करून मालमत्ता कराची फेर आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे.

बांधकामाची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

१) बांधकाम प्रकार "अ"

छत - आर. सी. सी. स्लॅब, जैक, आर्च,

भिंत - सिमेंट किंवा चुन्यामध्ये.

तळ - रफ शहबादी, पॉलीशड, शहाबादी, मोझाईक टाईल्सचे, उच्च प्रतीचे मोर्झाइक टाईल्सचे

२) बांधकाम प्रकार "ब"

छत - गोल पटावाचे, लाकडी लोखंडी पत्रासहीत

भिंत - चुना किंवा मातीमध्ये विटकाम प्लॅस्टरसहीत.

तळ - मोझाईक टाईल्सचे, पॉलीशड स्टोन किंवा शहाबादी स्टोन

३) बांधकाम प्रकार "ड "

छत - लोखंडी सिमेंट पत्रे किंवा मंगलोर अथवा दुसऱ्या प्रकारच्या टाईल्सचे.

भिंत - प्लॅस्टरमध्ये, मातीकाम, विटकाम.

तळ - रफ शहाबादी, सिमेंट किंवा माती.

४) बांधकाम प्रकार "क"

छत - सिमेंट पत्रे किंवा धातूची पत्रे किंवा हॅचड् रुकींग
(बांबूचे लट्टर)
टाईल्सचे.

भिंत - मातीमध्ये विटकाम किंवा कच्च्या विटाचे मातीमध्ये बांधकाम प्लास्टर विरहीत.

तळ - माती, रफ स्टोनचा तुकड्याचे.

**फेर आकारणी दरपत्रक तक्ता.**

(दि. ३१/०३/८८ पर्यंत अस्तित्वात असलेल्या घरांसाठी)

| बांधकामाचा वर्ग | निवासी | | | | निवासेत्तर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्वत: वापरात | | रिकामे | | स्वत: वापरात | | रिकामे | |
| | प्र. चौ. फुट | प्र. चौ. मि. | प्र. चौ. फुट | प्र. चौ. मि. | प्र. चौ. फुट | प्र. चौ. मि. | प्र. चौ. फुट | प्र. चौ. मि. |
| अ | ०.४० | ४.३० | ०.८० | ८.६० | १.०० | १०.७६ | १.५० | १६.१४ |
| ब | ०.२५ | २.६९ | ०.५० | ५.३८ | ०.८० | ८.६० | १.२० | १२.९१ |
| क | ०.२० | २.१५ | ०.४० | ४.३० | ०.५० | ५.३८ | ०.८० | ८.६० |
| ड | ०.१५ | १.६१ | ०.३० | ३.१२ | ०.४० | ४.३० | ०.५० | ५.३८ |

**फेर आकारणी दर तक्ता.**

(दि. ३१/०३/८८ पर्यंत अस्तित्वात असलेल्या घरांसाठी)

| बांधकामाचा वर्ग | निवासी | | | | निवासेत्तर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्वत: वापरात | | रिकामे | | स्वत: वापरात | | रिकामे | |
| | प्र. चौ. फुट | प्र. चौ. मि. | प्र. चौ. फुट | प्र. चौ. मि. | प्र. चौ. फुट | प्र. चौ. मि. | प्र. चौ. फुट | प्र. चौ. मि. |
| अ | ०.४५ | ४.८४ | १.३० | १३.९९ | १.०५ | ११.३० | २.५० | २६.९० |
| ब | ०.३५ | ३.७६ | ०.९५ | १०.२२ | ०.८५ | ९.१४ | १.८५ | १९.९१ |
| क | ०.३० | ३.२२ | ०.७५ | ८.०७ | ०.६० | ६.४५ | १.५० | १६.१४ |
| ड | ०.२५ | १.६१ | ०.६५ | ६.९९ | ०.४५ | ४.८४ | १.२० | १२.९१ |

**चिकलठाणा व रेल्वेस्टशन या औद्योगिक क्षेत्राचे फेर आकारणी**

१९८९-९० चा दर तक्ता

(०१/०४/८३ च्या मंजूर दरात ५०% वाढ करून)

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन १९८९-९० च्या फेर आकारणीत निश्चित केलेला दर. | |
|---|---|---|---|
| १. | कारखाना कार्यालय (आर. सी. सी.) | ०.६८ | ७.३२ |
| २. | पक्के बांधकाम (ए.सी. सी. सीटस्) | ०.४८ | ५.१६ |
| ३. | कारखाना कार्यशाळा (आर. सी. सी.)<br>पक्के बांधकाम (ए.सी. सी. सीटस्) | ०.५४<br>०.४२ | ५.८१<br>४.५२ |
| ४. | हॉटेल्स | | |
| | लक्झरी हॉटेल्स | ०.७५ | ८.०७ |
| | इतर हॉटेल्स | ०.५३ | ५.७० |
| | हॉटेल परिसरातील घरे | ०.३० | ३.२२ |
| ५. | गोदाम - (आर.सी.सी.) | ०.४५ | ४.८४ |
| | पक्के बांधकाम (ए.सी.सी. सीटस्) | ०.३० | ३.२२ |
| | अर्ध पक्के | ०.२७ | २.९१ |
| | कच्चे आणि विना छताचे | ०.१५ | १.६१ |
| ६. | शेड | ०.१२ | १.१९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | सायकल स्टॅन्ड | ०.१८ | १.९३ |
| ८. | मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.) | ०.५३ | ५.७० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. सीटस्) | ०.४१ | ४.४१ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ०.३३ | ३.५५ |
| | कच्चे बांधकाम | ०.१४ | १.५० |
| ९. | निवासी क्षेत्र (आर.सी.सी.) | ०.७५ | ८.०७ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. सीटस्) | ०.६० | ६.४३ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ०.५३ | ५.७० |
| | कच्चे बांधकाम | ०.३० | ३.२२ |
| १०. | सहन जागा | | |
| | कारखाना वापर | ०.५६ | ६.०२ |
| | रिकामे | ०.८४ | ९.०३ |

११. औरंगाबाद शहर प्रभागातील व औद्योगिक परिसरातील मोकळ्यासहन जागेवर मुळे खरेदी खताचे किंमतीवर तसेच शासनाने ठरविलेल्या दरावर किंमत काढून त्या किंमतीच्या ५% कर योग्य मुल्यावर स. मा. कर नियमाप्रमाणे, सदरील फेर आकारणी दि. ०१/०४/८९ पासून अंमलात येईल. वैधाकनिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १२ -** औरंगाबाद शहराचे महान कवी श्री. वज्द यांच्या स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या वास्तुसाठी (वज्द मेमोरियल) वज्द मेमोरियल ट्रस्ट यांनी नगर भुमापन क्रमांक २३८४ (भाग) पैकी ५६२.२६ चौ. मी. जागा खरेदी केली आहे.

सदरची जागा औरंगाबाद मंजूर विकास योजनेत आरक्षण क्रमांक २७७ "पार्क" मध्ये आहे. सदरची जागा शहराच्या मध्यभागी असून मुख्य रस्त्यावर येते. आरक्षणाचे एकूण क्षेत्र सुमारे ११५००.०० चौ. मी. आहे. सदर जागा आरक्षणातून वगळण्याबाबत शासनास विनंती करण्यात येईल असे त्यावेळी महानगरपालिकेने ठरविले होते.

आता वज्द मेमोरियल साठी जागा उपलब्ध झाली असल्याने व ही वास्तू उभारण्यासाठी सदर जागेचा वापर बदलणे आवश्यक असल्याने आरक्षण क्र. २७७ "पार्क" मधून क्षेत्र ५६२.२६ चौ. मी. जमीन निवास क्षेत्रात सामील करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम ११६६ चे कलम ५० अन्वये कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**<u>ठराव क्र.</u> १२ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर भुमापन क्र. २३८४ (भाग) पैकी ५६२.२६ चौ. मीटरची जागा वज्द मेमोरीयल ट्रस्टने श्री. वज्द यांचे स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या वज्द मेमोरीयल वास्तूसाठी खरेदी केलेली सदर जागा औरंगाबाद मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. २७७ "पार्कसाठी" आरक्षित असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५० अन्वये औरंगाबाद मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. २७७ "पार्क" च्या (भाग) पैकी फक्त ५३२.२६ चौरस मीटर क्षेत्र निवास क्षेत्रात सामील करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# प्रश्नोत्तरे

**प्रश्न १ -** - डॉ. संचेती -

सांस्कृतिक विभागाकडून मनपा ने सरकारकडे कोणती मदत आर्थिक स्वरुपात मागितली आहे काय? मागीतली असल्यास किती व केंव्हा अशा प्रकारासाठी मागितली? मागीतली नाही तर त्यांचे कारण काय? सांस्कृतिक अधिकारी यांचे पदांबाबत महाराष्ट्र सरकारकडे मागणी केली काय?

**मा. उप आयुक्त-** सांस्कृतिक विभागाडून महानगरपालिकेने सरकारकडे कोणत्याही स्वरुपाची मागणी केलेली नाही. आर्थिक मागणी संबंधी अशी काही तरतूद दिसून येत नाही. आणि महानगरपालिकेने दिनांक २०/०३/८८ चे ठरावानुसार सांस्कृतिक अधिकारी या पदाची निर्मिती केली आहे.

**प्रश्न क्र. २ -** क्रीडा विभागासाठी सरकारकडे मदत मागितली काय? मागितली असेल तर किती? आपल्या क्रीडा अधिकारी यांचे पदांसाठी सरकारकडे मागणी केली काय?

**मा. उप आयुक्त** : क्रीडा विभागासाठी मनपाने सरकारकडे मदत मागितली नाही. या मागणी संबंधी अशी काही तरतूद दिसून येत नाही. तसेच क्रीडा अधिकारी या पदांसाठी दि. १६/०३/८४ चे ठरावानुसार निर्मिती करण्यात आलेली आहे.

**मा. महापौर** : आपल्या प्रश्नाविषयी सहानुभूतीपूर्वक विचार करून मी मा. आयुक्तांना विनंती करतो की, त्यांनी सन्माननीय सभासदांनी विचारलेल्या प्रश्नाचे अनुषंगाने संबंधीत विभागातर्फे अशा प्रकारच्या आर्थिक मागणीसंबंधी सरकारकडे पाठपुरावा करावा.

**मा. अशोक सायन्ना** : क्रीडा विभागासाठी आतापर्यंत महानगरपालिकेकडून काहीच केलेले दिसून येत नाही. तेंव्हा क्रीडा विषयक साहित्य वा आर्थिक तरतूदीविषयी सरकारकडे मागणी करणे योग्य राहील.

**प्रश्न क्र. ३ -** मनपामध्ये उपसंचालक, आरोग्य सेवा यांचे पद निर्माण करणेसाठी शासनाकडे प्रयत्न केले काय? जर केले असतील तर काय झाले? नाही केले तर का नाही केले?

**मा. महापौर** : महानगरपालिकेमध्ये उपसंचालक, आरोग्य सेवा यांचे पद निर्माण करणेत येत नाही. याबाबतीत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५ अन्वये मेडीकल ऑफिसर ऑफ हेल्थ या पदाची नेमणूकांची तरतूद आहे.

**प्रश्न क्र. १ -** मा. श्री. गिरजाराम हाळनोर -

सि. टी पारिख पेट्रोल पंप, मोंढा रोड येथे १० "पंपींग लाईनवर नळाचे कनेक्शन कोणत्या नियमाप्रमाणे देण्यांत आले आहे?

कारण १०" पंपींग लाईनवर वैयक्तिक नळ कनेक्शन देता येत नाहीत असे ऐकवित आहे. तरी कृपया सभागृहात खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभि.(पा.पु.वि) :** सदरील नळ कनेक्शन या कार्यालयाकडून मंजूर झालेले नाही. तरी चौकशी अंती हे नळ कनेक्शन अनाधिकृत असल्याने ते नळ डिस्कनेक्ट करण्याचे आदेश दिलेले आहेत.

**मा. श्री. प्रदिप जैस्वाल :** या विभागात दिलेल्या नळ कनेक्शनच्या बाबतीत जबाबदार कोण आहेत?

**मा. श्री. प्रकाश जावळे :** यासंबंधी आपण संबंधित अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करणार आहात याचा खुलासा व्हावा.

**मा. आयुक्त :** अनाधिकृत नळ कनेक्शनसंबंधी संबंधितास नोटीस देवून अशा प्रकारचे नळ कनेक्शन कट करण्यात येईल व त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. श्री. गंगाधर गाडे :** अशा प्रकारचे अनाधिकृत नळ कनेक्शन घेणे अयोग्य आहे. तेंव्हा या बाबतीत कार्यवाही व्हावी.

**मा.श्री.मोतीराम घडामोडे :** या विभागात बेकायदेशीर नळ कनेक्शन घेणे संपूर्ण औरंगाबाद व सिडको, हडको भागातही चालू आहेत. तेंव्हा संबंधित प्लंबर व अधिकारी यासाठी जबाबदार आहेत काय याची चौकशी व्हावी.

**मा.श्री.पांडूरंग पैठणकर :** गेल्या बऱ्याच दिवसांपासून सिटी पारिख पेट्रोल पंप मोंढा रोड येथील नागरिकांच्या अनेक तक्रारी आहेत, परंतु अजून पर्यंतही यावर काहीच कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

**मा. महापौर :** याबाबतची चौकशी मा. आयुक्त करतील.

**मा.श्री.अजिज जहागिरदार:** वार्ड क्र. ५३ मध्येही अशा प्रकारचे अनाधिकृत नळ कनेक्शन घेतलेले आहेत तेंव्हा या भागातील अनाधिकृत नळाची चौकशी व्हावी.

**मा. श्री. रशिद मामू :** बेकायदेशीर नळ कनेक्शन का घेतले जाता याची चौकशी व्हावी.

**मा. श्री. केशव सोनवणे :** सिडको हडको भागात पी.व्ही.सी. पाईप लाईन असल्याने या भागात व्यवस्थित पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे बऱ्याचशा लोकांनी अशा प्रकारचे अनाधिकृत कनेक्शन घेतलेले आहेत ते काढून टाकण्यात यावेत.

**<u>प्रश्न क्र.</u> २ -** मा. श्री. गिरजाराम हाळनोर

वार्ड क्र. ५७ गुरुकृतपा हौसिंग सोसायटी, वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, तृतीय श्रेणी कर्मचारी गृहनिर्माण संस्था, शिवराज हौसिंग सोसायटी यांनी

महानगरपालिकेस १००% विकास निधी १९८५-८६ पूवरी भरलेले असून देखील अद्याप पर्यंत त्यांना कुठल्याही प्रकारच्या प्रत्यांकिक सुविधा दिल्या गेलेल्या नसून त्यादृष्टीने प्रयत्न देखील झालेले नाही. तरी कृपया १००% विकास निधी भरलेला असतांना देखील सदरील भागाकडे दुर्लक्ष का केले गेले? याचा खुलासा व्हावा ही नम्र विनंती.

**शहर अभियंता** : वार्ड क्र. ५७ मधील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय, तृतीय श्रेणी कर्मचारी गृहनिर्माण संस्था येथील खडी रस्ता तयार करणे बाबतच्या कामाची निविदा मागविण्यात आली असून स्थायी समिती सभेमध्ये मंजूर होने बाकी आहे. तसेच शिवराज हौसिंग सोसायटी येथील खडी रस्त्याचे काम अगोदरच पूर्ण करण्यात आले आहे. गुरुकृपा हौसिंग सोसायटी अंतर्गत खडी रस्त्याचे कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.

**कार्यकारी अभियंता - (पा. पु. ड्रेनेज स्लम)**

सध्या या भागात नळाच्या पाईप लाईन टाकल्या तरी आपण पाणी देऊ शकत नाही. तसेच शहानुरवाडी परिसरात जलनिस्सारणाची कामे करणे शक्य नाही. शिवाय सदर परिसरातील नाल्यामधून मुख्य वाहिणी टाकण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

**नगररचना** : गुरुकृपा गृहनिर्माण संस्था, उस्मानपुरा येथील स. नं. ४४ (भाग) चे रेखांकनाचे एकूण विकास खर्च रु. ७९,०४३/- आकारले असून सर्व रक्कम जमा झाली आहे. वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय तृतील श्रेणी गृहनिर्माण संस्था स. नं. १४ (भाग) साइी दिनांक १६/०१/८९ ला अंतमी मंजूर केले आहे. अंतिम मंजुरीची प्रत शहर अभियंता यांना दिली आहे. या रेखांकनाचे १००% विकास खर्च जमा आहे.

शिवराज गृहनिर्माण संस्था स. नं. १३ (भाग) शहानुरवाडी या रेखांकनास दिनांक १९/०६/८१ ला मंजुरी दिली असून रक्कम रु. ६१,९२२/- १००% विकास खर्च जमा केला आहे. या रेखांकनास दक्षिण हद्दिस एक पूर्व पश्चिम विकास योजना रस्ता तयार केला असून त्यांच डांबरीकरणही झालेले आहे.

रेखांकनास वसूल झालेल्या विकास खर्चाची माहिती दि. १९/०९/८८ ला पत्र क्रमांक अेएमसी/अेडीटीपो/टी/नीसी २३०२/८८ अन्वये मा. आयुक्तांना सादर केलेले असून त्याची प्रत शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या आहेत. व या रेखाकनांचा समावेश त्या स्टेटमेंटमध्ये आहे.

**मा. महापौर** : सर्व सदस्यांना विनंती करण्यात येते की, ज्या लोकांनी १००% विकास निधी भरलेले असून अजुनपर्यंत त्यांना नागरी सुविधा प्राप्त झालेल्या नसतील अशा वसाहतीसंबंधीची माहिती मा. आयुक्तांना शक्य तितक्या लवकर द्यावी.

**<u>प्रश्न क्र. १</u>** : मा. श्री. मोहसीन अहमद -
माझा प्रश्न असा आहे की, सर्व्हे नं. ९६७२/९२, १३,१४,१५ रोशनगेट येथील जियाउद्दिन ले-आऊट दिनांक १७/०१/८९ च्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र. १२ अनाधिकृत कंपाउंडचे बांधकाम पाडण्याचा ठरावा पास झाला असतांना सदरील कार्यवाही अद्यापपर्यंत झाली नाही का?

**सहा. संचालक नगररचना** :
दि. १७/०१/८९ रोजी विषय क्र. १२ अन्वये नगर भुमापन क्रमांक ९६०२/९२,१३,१४ व १५ या मिळकतीचे जागेवर दोन, तीन वेळेस सिमांकन करण्यात आले त्यावेळी स. सभासदही हजर होते. नगर रचना विभागाकडून करण्यात आलेले सिमांकन स. सभासद व संबंधित मिळकत धारकांनी मान्य केले नाही. तसेच रेखांकन नकाशा व नगर भुमापन आलेख या अभिलेखामध्ये थोडी तफा ावत आढळून येते. त्यामुळे सदर जागेचे मोणी करून ह्या भूखंडाचे हद्दि सिमा कायम करण्यास नगर भुमापन अधिकारी, औरंगाबाद यांना पत्र देण्यात आले. तसेच याबाबत त्वरेने कार्यवाही व्हावी यासाइी नगर भुमापन अधिकारी यांना स्मरणपत्र देखील देण्यात आलेले आहे.

या भागात वादग्रस्त मिळकतीच्या कायम खुणा व हद्दिच्या संदर्भात रेखांकन नकाशे व नगर भुमापन अभिलेख या मध्ये तफावत आढळून येत असल्याने तसेच नगर भुमापन अधिकारी हे मिळकतीच्या मालकी हक्क क्षेत्र, त्यांचे मोजमाप करून हद्दि खुणा कायम करणे तसेच जागेवरील सध्या परिस्थितीनुसार अतिक्रमण इत्यादीबाबत वस्तस्थिती स्पष्ट करणेच्या संदर्भात सक्षम अधिकारी आहे. त्यामुळे नगर भूमापन अधिकारी यांचे कडूनच या भूखंडाची मोणी करून अतिक्रमण असल्या बाबत शहानिशा करणे जास्त संयुक्तिक होईल व त्यानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करता येईल तसेच आता या प्रकरणात विद्यमान न्यायालयाचा मनाई हुकुम आला आहे.

**मा. श्री. मोहसीन अहमद** : दि. १७/०१/८९ च्या ठरावानुसार आपण अद्यापही अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण हटविलेले दिसत नाही. तेंव्हा रोषणगेट जवळील जियाउद्दिल ले आऊटच्या बाबतीत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मा. श्री. तकी हसन खाँ** : प्रस्तावित प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने या प्रश्नाच्या संदर्भात मा. आयुक्तांना विनंती करण्यात येते की, त्यांनी यां बाबतची वैधानिक चौकशी करून आगामी बैठकीत अहवाल सादर करावा.

**मा. महापौर** : विनंती करण्यात येते की, त्यांनी या बाबतची वैधानिक चौकशी करून आगामी बैठकीत अहवाल सादर करावा.

**प्रश्न क्र. १ -** मा. श्री. विठ्ठल पेरकर-

स्थायी समिती सभापतीने एक उपसमिती नेमून औरंगाबाद शहरामधील वादग्रस्त व न्यायाप्रविष्ट बांधकामाची चौकशी सुरु केली आहे तसा त्यांना कायने अधिकार आहे का? याचा खुलासा मा. आयुक्त साहेबांनी करावा.

**विधी सल्लागार** : उपरोक्त प्रश्न हा अधिनियमाचे परिशिष्ट २ चे उपकलम ५(१) (ब) अन्वये बाधित होत असून त्यात तात्वीक कायदे विषयक प्रश्नावर निर्णय देण्याविषयी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रश्नावर उत्तर देता येणार नाही.

**प्रश्न क्र. २ -** स्थायी समितीमध्ये मंजुरीसाठी विषय येण्याची पध्दत कोणत आहे या संबंधी अधिकाऱ्याने खुलासा करावा.

कारण मी माझ्या वार्डातील चार ते पाच कामे अंदाजपत्रक तयार असतांना सुध्दा गेली आठ ते दहा महिण्यापासून ते विषय स्थायी समिती पुढे आले नाही.

**मा. सचिव** : सं बंधीत विभागाकडून प्रास्ताविक कामाची संचिका तयार झाल्यानंतर तसेच प्रशासकीय अनुमती मिळाल्यानंतर प्रस्ताव मा. स्थायी समिती सभागृह अथवा मा. सर्वसाधारण सभागृहाचे निर्णयासाठी ठेवला जातो.

**मा. महापौर** : सचिवांनी केलेला खुलासा योग्य वाटत नाही.

**श्री. विठ्ठल पेरकर** : क्र. (४३) चे कामासंदर्भात गेली ८ ते १० महिन्यांपासून पाठपुरावा करूनही आणि अंदाजपत्रकात तरतूद असूनही विषय स्थायी समितीकडे आलेले नाही. यामुळे स्थायी समितीत पक्षपात होत आहे काय ह्याचा खुलासा व्हावा.

**मा. श्री. गंगाधर गाडे** : स्थायी समितीमध्ये कुठल्याही प्रकारचा पक्षपातीपणा नाही.

**मा. महापौर** : संबंधित वार्डातील कामे आणि अंदाजपत्रकीय तरतूद मा. आयुक्तांचे निदर्शणास आणून द्यावी आणि त्याच सोबत स्थायी समितीच्या अध्यक्षांनी या बाबतची चौकशी करावी.

**मा. सौ. लता दलाल** : शहरामध्ये तसेच कार्यालयात महिलांसाठी प्रसाधन गृहाची स्वतंत्र तरतूद करणे विषयी वारंवार मागणी करूनही त्याची पूर्तता होत नाही ही खेदाची बाब आहे. कृपया खुलासा व्हावा.

**मा. महापौर** : या संदर्भात मा. आयुक्तांनी योग्य ती चौकशी करून अंमलबजावणी कार्यान्वित करावी.

**प्रश्न क्र. १ -** : **मा. श्री. नारायण फत्तेलष्कर**

प्रभाग क्र.१५ काचीवाडा भागात नविन जलवाहिणी टाकणेबाबत गेल्या एक वर्षापासून वारंवार लेखी व तोंडी सांगून देखील अद्याप पावेतो सदरील जलवाहीनी टकणे बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे या भागातील रहिवाशांना पिण्याचे पाण्याचा भयंकर त्रास होत आहे. सदरील पाईप टकाणे बाबत संचिकेवर मा. आयुक्तांनी झोन क्र. ३ चा नकाशा पहाणी केल्यानंतर ही संचिका मंजूर होईल असे कळविल्याचे समजते. अशा कामांना मंजुरी देतांना असे नकाशे पाहिले जातात काय? सदरील लाईनचे काम कोणत्या कारणांमुळे प्रलंबित आहे. हे काम केंव्हा पूर्ण होणार याचा खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता** पा.पु**:** वार्ड क्र. १५ मध्ये जलवाहिणी टाकणेच्या रु. २,००,२००/- चे अंदाजपत्रक मंजूर होऊन या कामासाठी निविदा पण मागविण्यात आल्या आहेत निविदा मंजुरी नंतर काम त्वरित सुरू करण्यात येईल.

**मा. महापौर** : वार्ड क्र.१५ मध्ये जलवाहिणी टकाणेच्या कामांर्तगत ८ दिवसात कार्यवाही केली जाईल.

**प्रश्न क्र. २ -** : औरंगाबाद शहरातील संपूर्ण विद्युत खांबांवरील लाईट सुरू करणेबाबत महानगरपालिके मार्फत "उजाला सप्ताह" सुरू करून मोहिम हाती घेतलील होती. परंतु सदरील मोहिम संपल्यानंतर देखील औरंगाबाद शहरात तसेच सभोवतालच्या १८ खेड्यांमध्ये व सिडको, हडको या उपनगरातील असंख्य विद्युत खांबांवरील लाईट आजही बंद आहेत. या सप्ताहात काही भागात सुरू केलेले लाईट रात्रंदिवस चालू आहेत. याची कारणे काय? संपूर्ण शहरातून लाईट बाबत असंख्य तक्रारी येतात परंतु लाईट विभाग याबाबत कोणतीही कार्यवाही करत नाही. त्यामुळे शहराचा बराच भाग गेल्या कित्येक महिन्यापासून अंधारात आहे. या भागातील तसेच उपनगरे व १८ गावातील लाईट केंव्हा सुरू करणार या बाबत खुलासा व्हावा.

**शहर अभियंता** : औरंगाबाद शहरातील संपूर्ण लाईट सुरू करणेसाठी उजाला सप्ताह सुरू केला होता. दि. २४/०७/८९ तसेच २५/०७/८९ व इतर दिवशी पावसामुळे काम झाले नाही. परंतु २७/०७/८९ पासून जोरात काम सुरू झाले. त्यामुळे ते ३ ते ४ तारखेपर्यंत चालू होते. या सप्ताहात एकूण १११४ लाईट बंद होते व आणखी २०० बंद झाले होते. असे एकूण १३१४ लाईट बंद होते. त्यात १२८५ पोलचे काम केले व ८८५ पाले चालू झाले आहेत. बाकी पोलचे काम आठवड्यात पूर्ण होईल. तसेच पावसामुळे लाईट पूर्ण होईल. तसेच पावसामुळे लाईट बंद व दिवसा लाईन चालू असे फॉल्ट होत आहे हे काम म. रा. वि. मं. करत आहे.

तसेच शहरातील आलेल्या स्ट्रीट लाईटच्या तक्रारी एकूण १३५ आलेल्या होत्या त्यात १०९ तक्रारीचे निवारण करण्यात आले आहे. बाकीचे काम चालू आहे.

सर्व १८ खेडेगावातील काम पूर्णात्वाच्या मार्गावर आहे व फक्त चार ते पाच लाइट प्रत्येक खेड्यात बंद आहे. मुकुंदवाडी, ब्रिजवाडी, हर्सूल, पडेगांव, कांचनवाडीचे काम चालू आहे. वरील गावात या पूर्वी काम थोडेफार झालेले आहे. बाकी काम चालू आहे.

तसेच सिडको व हडको हे दोन्ही भाग महापालिकेच्या कक्षेत येत नाही. परंतु तेथील काम चालू आहे.

**श्री. छापरवाल** : शहराची मध्यवस्ती असलेल्या शहागंज सारख्या भागातही लाईटची व्यवस्था पूर्ण झालेली नाही मग १४०० ट्युब कुठे लावले याची माहिती द्यावी.

**मा. सौ. लता दलात** : शहर अभियंता यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे सहा हजाराच्या वर ट्युब खर्च केले. उप अभियंता व त्यांचा कर्मचारी वर्ग काम करत असतांना या बाबतची पूर्तता आतापर्यंत का झाली नाही.

**श्री. अजिज :** रेल्वेस्टेशन नक्षत्रवाडी, कांचनवाडी या भागात अंधाराचा फायदा घेऊन नेहमी चोऱ्या होतात ह्या संबंधीची जाणिव व तक्रार संबंधीत विद्युत

**जहागिरदार** विभागास देऊनही अद्याप कार्यवाही नाही.

**मा. महापौर** : याबाबत स्थायी समितीचे सभापती यांनी खुलासा करावा.

**मा. श्री. गाडे** : "उजाला सप्ताह" निमित्त बरीचशी कामे झाले आहेत व काही चालू आहेत. यामध्ये महानगरपालिका विद्युत अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून विद्युत तक्रार निवारणासंदर्भा अंतर्गतची कामे करून घेतल्या जात आहेत. परंतु या कामासंबंधी म. न. पा. ला सर्वस्वी एम.एस. ई. बी. वर अवलंबून रहावी लागते. कारण एम.एस.ई. बी. च्या वायरमनला विद्युत मंडळाचे अधिकाऱ्यांनी सूचना देऊनही कामाची तत्परता लक्षात घेता पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही. या संबंधी एम.एस. ई.बी. च्या संबंधीत अधिकाऱ्यांशीही चर्चा केलेली आहे. कारण विद्युत खांबांवरील ट्युब चालू करतांना एम.एस.ई.बी. च्या वायरमन वरती अवलंबून रहावे लागते. तरीही जलत गतीने काम करून घेण्याची शिकस्त केली जात असून पूर्वीपेक्षा आता नागरिकांच्या विद्युत संबंधी तक्रारी कमी प्रमाणात दिसून येतात यामध्ये एम.एस.ई.बी. व म.न.पा. यांच्या सहकार्याने हे काम केल्या जात असून काम निश्चितच प्रगती पथावर आहे. गैरसमज होऊ नये.

**मा. महापौर** : सर्व सभासदांचे मताशी मी सहमत आहे. विद्युत विभागाचे काम समाधानकारक नाही. संबंधित नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागातील मागण्या संबंधित अधिकाऱ्यांना द्याव्यात स. सभासदांनी

मागणी केल्यानंतर याची पूर्तता किमान एका आठवड्यात होईल याची दक्षता घ्यावी.

**श्री. धनंजय गंगाखेडकर:** याबाबत कर्मचाऱ्यांचा विचार करण्यात यावा. कारण महानगरपालिकेला सर्वस्वी एम.एस.ई.बी. वर अवलंबून रहावे लागते.

**डॉ. संचेती** : आम्ही दिलेल्या तक्रारी पंजिकृत करूनही याची दखल घेतली जात नाही.

**सौ. लता दलात** : आमच्या वार्ड क्र. २४ मध्ये बऱ्याच दिवसांपासून पोलची मागणी होत आहे. त्यासंबंधी एम.एस.ई.बी. अधिकाऱ्यांशीही माझी बोलणी झाली परंतु आपल्या म.न.पा. च्या विद्युत विभागात काम करणारे कर्मचारी हे कामावर फार उशिरा येतात असे सांगण्यात आले मग एम.एस.ई.बी. व म.न.पा.च्या कर्मचारी वर्गाचा ताळमेळ कसा जमेल. व वार्डातील कामे होणार कशी?

**रशिद मामू** : पोलवर विद्युत नळी लावल्यानंतर तो चालू आहे किंवा नाही याची तपासणी होत नाही आणि संबंधीत लाईनमन कार्यालयातही अनुपस्थित असतात कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात.

**मा. उपमहापौर** : लॅडर व गाडी खेरदी करण्याचे प्रपोजल पास झाले त्याचे काय?

**शहर अभियंता** : प्रस्तावित गाडी खरेदी करण्यात आली असून तीची योग्य ती फिटींग करण्यासाठी बाहेर पाठविण्यात आली आहे. एक ते दोन महिन्यात आवश्यक ती बांधीणी झाल्यानंतर उपलब्ध होईल.

**श्री. हाळनोर** : आम्ही जेंव्हा विद्युत विभागाकडे विचारणा करतो ट्युब किंवा बल्ब ह्या विषयी संबंधीत अधिकारी वर्ग माहिती पुरवित नाही. वार्डात विद्युत पुरवठा अस्तित्वात नसल्यास नागरिकांना कमालीचा त्रास होतो. याची प्रशासनाने जाणीव ठेवावी.

**मा. महापौर** : संबंधीत अधिकाऱ्यांनी संबंधित विभागाची आवश्यक ती माहिती वेळीच पुरविणे ठीक राहील. अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या तर त्यावेळी संपूर्ण चार्ज घेऊन याची माहिती देदण्याची तात्काळ व्यवस्था करावी.

**मा. श्री. सायन्ना** : वार्ड क्र. १ मध्ये गेल्या बरेच दिवसापासूनची २६ पोलची मागणी करीत आहे त्याचे काय झाले.

**उप अभियंता** : नियमाप्रमाणे २६ पोलची मागणी केलेली आहे. पैकी १२ पोल

उपलब्ध झालेले आहेत.

**मा. श्री. सायन्ना** : या वार्डात ९२ पोलने समस्या सुटणार नाही तेंव्हा मागणी केल्याप्रमाणे २६ पोलचा पुरवठा करण्यात यावा. येथील लोकवस्ती प्रमाणे पोल मिळणे आवश्यक आहे. यामुळे खेड्यातील लोकांसंबंधी आपल्याला काहीच जाणिव नाही आपण याची पूर्तता करीत नाही यामुळे मी सभात्याग करतो. (श्री. सायन्ना यांनी सभात्याग नंतर पांच मिनिटांनी पुन्हा सभागृहात प्रेवश केला.)

**मा. श्री. चंद्रकांत खैरे**
**मा. श्री. संचेती**
**मा.श्री. प्रकाश जावळे** : शहराचे आरोग्याचे संर्भात विधानसभेत लक्षवेधी सुचना आली आहे. या संबंधी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी -**

***<u>औरंगाबाद महानगरपालिकेतील काविळच्या रोगाबद्दल माहिती</u>***

औरंगाबाद शहरातून सोबत दिलेल्या तक्त्याप्रमाणे काविळीचे रुग्ण वैद्यकीय महाविद्यालयात भरती झालेले आढळले आहेत. शहरात वरील रुग्ण एकाच ठिकाणचे नाहीत. महानगरपालिकेने त्वरित रोग प्रतिबंधक उपाय योजना आरोग्य शिक्षण इत्यादी सुरू केले आहेत.

१. शहरातील सर्व उपहार गृहांची तपासणी करून पिण्याचे पाणी शुध्द ठेवण्यास तसेच स्वच्छते बाबतीतही त्यांना सांगण्यात येत आहे, तसेच हॅलोजन गोळ्या ही देण्यात आल्या आहेत. हॉटेल मालक व कर्मचारी यांना कॉन्टॅक्ट ट्रिटमेंट देण्यात येत आहे, शहरातील सर्व हॉटेलमधील पिण्याचे पाणी तपासणीसाठी पाठविण्याचे काम चालू आहे. यापुढे जर दूषित पाणी आढळले तर उपहार गृह बंद करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.
२. शहरातून घरोघर आरोग्य कर्मचारी जाऊन काविळचा रुग्ण शोधून काढणे त्यांना आरोग्य शिक्षण देणे व हॅलोजनच्या गोळ्या वाटणे, कॉन्टॅक्ट ट्रिटमेंट चालू आहे. तसेच शहरातील खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्याकडे जाऊन रुगणांबाबत माहिती घेणे चालू आहे. परंतु खाजगी व्यवसाय करणाऱ्यांकडे रुग्णाचे नांव वपत्ता वगैरे माहिती ठेवलेली आढळली नाही. नोटीफायवेल डिसीज ॲक्ट प्रमाणे रुग्णांची संपूर्ण माहिती आरोग्य विभागास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांनी देणे बंधनकारक आहे.
३. माशांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी ४० पंपांद्वारे शहरातून नोव्हान फवारणी चालू आहे.
४. शहरातून केर कचरा शेणाचे गोठे व शेणाचा मलदा उचलून शहराबाहेर हलविणे चालू आहे.
५. सर्व विभागीय अधिकारी यांचे मार्फत ग्रुप मिटींग घेऊन आरोग्या बाबत तसेच रोग प्रतिबंधक उपायबद्दल माहिती देणे चालू आहे.
६. महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रात या रोगाबद्दल वैद्यकीय उपचार करणे चालू आहे.

७. शहरातून एक एपीडेनिक स्क्वॉड तयार केला आहे. त्यामध्ये एक अन्ननिरिक्षक, दोन एम.पी. डब्ल्यू दोन मलेरिया वर्कर याद्वारे लागण झालेल्या भागात व इतरत्र त्वरित उपाय करणे चालू आहे.

८. शहरातील पाणी पुरवठा जायकवाडी व हर्सूल येथून होतो. या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी मात्र एम.एल.डी इतर पाणीसाठी ३६ कि. ग्रॅ. ऐवजी ५० कि. ग्रॅ. टीसीएल टाकणेत येत आहे. तसेच इतर सात टाक्या मध्येही टाकणे चालू आहे.

९. प्रयोगशाळे तर्फे महानगरपालिके तर्फे स्वतंत्र पाण्याचे नमूने पाठविले जातात. एप्रिल ते ऑगस्ट मध्ये घेतलेल्या नमुन्या पैकी फक्त ९% नमुने आयोग्य आढळले आहेत. त्यावर त्वरित कार्यवाही करण्यात आली आहे.

१०. शहरातून विविध ठिकाणी नळ तपासणी व जलनिस:सारण पाईप तपासणी चालू आहे. ज्या ठिकाणी दोष आढळले त्या ठिकाणी त्वरित दुरुस्ती करून पाईप लाईन बदलणे, नळाचे कनेक्शन बदलणे, त्यावर कव्हर करून घेणे चालू आहे. अशा प्रकारे काविळ प्रतिबंधक उपाय योजने चालू आहे.

## ***<u>नागरी मलेरिया निर्मुलन योजना</u>***

आरोग्य विभागातर्फे नागरी मलेरिया निर्मुलन योजना राबविली जाते यामध्ये खालील गोष्टी येतात.

१. डासांची उत्पत्ती नियंत्रित करणे (एन्टी लॉरवल स्कीम)
   अ) चानलायझेन करून,
   ब) मलेरिया ऑईल टाकून,
   क) मासे सोडून (बॉयलॉजिकल)
   ड) स्वच्छते बाबत, आरोग्य शिक्षण सांगणे.

२. डास मारणे बाबत.
   अ) धूर सोडून मारणे.
   ब) नोव्हान स्प्रे करून मारणे.

वरील कार्यवाही नगरपालिका असतांनाच्या मंजूर झालेल्या स्टाफ कडून करून घेण्यात येते. परंतु महानगरपालिका झाल्याने व विस्तार वाढल्याने केंद्र सरकारने मंजूर केलेला स्टाफ राज्य सरकार मंजूर करत नाही. त्यामुळे विस्तारीत प्रमाणात कार्य करू शकत नाही.

३. आरोग्य शिक्षण :

अ) शहरातून डासांचा प्रादुर्भाव प्रामुख्याने घरोघर साठविलेल्या पाण्यातून आहे त्यावर जनतेने आठवड्यातून एकदा पाणी साठविलेली भांडी/हौद रिकामी करावी व विंड पाईपला जाळ्या लावाव्यात तसेच आपला परिसर स्वच्छ ठेवावा.

***<u>काविळ रुग्णाबाबत अहवाल</u>***

| महिना | १९८९ म.न.पा. लागण | हद्दितील मृत्यू | १९८९ म.न.पा. लागण | हद्दि बाहेरील |
|---|---|---|---|---|
| जानेवारी | १२ | ३ | ५ | २ |
| फेब्रवारी | २ | - | १० | २ |
| मार्च | ९ | १ | ११ | ३ |
| एप्रिल | ५ | - | १३ | ५ |
| मे | ११ | १ | ९ | १ |
| जून | १६ | - | २२ | ८ |
| जुलै | १६ | १ | ४० | १२ |
| ऑगस्ट (१ ते ५) | ६ | ४ | ९ | ४ |
| एकूण | ७७ | १० | ११९ | ३५ |

**मा. डॉ. संचेती** : अधिकाऱ्यांनी केलेला खुलासा सुसंगत नाही. सभागृहात दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे.

**मा. आयुक्त** : आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती अचूक आहे.

**मा. श्री. घडामोडे**
**मा. श्री. जावळे** : संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे खाजगी डॉक्टर आपल्याला माहिती पुरवित नाही हे म्हणणे चुकीचे आहे मग यावर नियंत्रण कोण करू शकेल.

**मा. तकी हसन खान** : नोवॉन, फेवाईन हॅलोजन चा साठा म.न.पा. कडे उपलब्ध आहे काय? उपलब्ध असल्यास काय उपाययोजना केली आहे.

**मा. श्री. सोनवणे** : हॅलोजनच्या गोळ्या वाटण्यात आल्या ते सर्वस्वी चूकीचे आहे मग वाटल्या तर त्यापूर्वी बैठका, वॉर्डवाईज घेतल्या आहेत का? याचा खुलासा व्हावा.

**आ. वैद्यकीय अधिकारी** : फिनाईल व हॅलोजन गोळ्यांचा साठा उपलब्ध आहे परंतु नोव्हॉनचे बाबतीत भांडा विभागाकडून कळविण्यात आले की, नोव्हॉन संचिका स्थायी समितीकडे पडून आहे.

**मा. श्री. गाडे** : भांडार मध्ये नोव्हॉन आणि फिनाईल उपलब्ध आहे. आरोग्य अधिकाऱ्यांना जाहीर प्रकटना विषयी कळविण्यात आले होते. परंतु आरोग्य अधिकारी यांना कामाचा वकुब नाही.

**मा. महापौर** : मी स्वत: पडेगांव येथे कत्तलखाना पहाणी संदर्भात गेलो असतांना फिनाईन संबंधी विचारणा केली असता फिनाईल उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले.

**मा. श्री. गाडे** : औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनासंबंधीची वाच्यता विधानसभेत होणे अप्रस्तुत आहे.

**मा. महापौर** : मा. आयुक्त यांनी प्रस्तुतचे लक्षवेधी सुचनेविषयी चौकशी करावी.

**मा. उपमहापौर** : संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्येक महानगरपालिका सदस्यास विश्वासात घेऊन काम करावे. येणेप्रमाणे सभागृहातील महानगरपालिका सदस्यांनी चर्चेत भाग घेतला.

राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ६ सप्टेंबर, १९८९ रोजी झालेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत**

**दिनांक ६ सप्टेंबर, १९८९ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर, श्री. मोरेश्वर सावे यांच्या अध्यक्षतेखली नगरभूवन येथे विशेष सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेत निम्ननिर्दिष्ट स. सभासद व अधिकारी उपस्थित होते.**
**(स. सभासदांची उपस्थिती रजिस्टर प्रमाणे.)**

**"वंदे मातरम्" गिताने सभेस सुरुवात झाली**

**विषय क्र. १३ -** :
**संवाद**

**मा. महापौर** : ११.२० मिनिटांनी घोषित केले की, स्थापत्य समितीसाठी ज्या स. सभासदांनी नामांकन पत्रे दाखल केलेली आहेत त्यापैकी ज्या कोणास उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १० मिनिटाचा अवधी देण्यात येत आहे.

**श्री. गिल एकबालसिंग** : मतदान प्रक्रिया सभागृहास सविस्तरपणे समजावून देण्यात यावी.

**उपआयुक्त** : सभागृहात मतदान प्रक्रियेचा सविस्तर खुलासा केला.

**मा. महापौर** : निर्धारित निवडणूक लढवित आहेत हे स्पष्अ होते.

स. श्री. अजिमखाँ दादामियाँ अ. रहेमान
स. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
स. श्री. थोरात किशोर गोविंदराव
स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
स. श्री. प्रधान बंडू गोविंदराव
स. श्री. फैय्याजखान अहमद खान
स. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
स. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
स. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
स. श्री. सोनवणे केशव काशिनाथ
स. सौ. दलाल लता श्रीनिवास
स. श्री. अ. रशिदखाँ (मामू) अ. हमीद खान

**ठराव क्र. १३ -** : मतदान प्रक्रिया व मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर प्राप्त झालेल्या छाननी अहवालानुसार उपरोक्त १३ स. सभासदांपैकी निम्ननिर्दिष्ट ९ (नऊ) स. सभासद त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या मतसंख्येनुसार स्थापत्य समितीवर निर्वाचित झाल्याचे मा. घोषित केले.

| अ.क्र. | स. सभासदाचे नांव | मतसंख्या |
|---|---|---|
| १ | स. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान | ५४ |
| २ | स. श्री. अ. रशिदखाँ (मामू) अ. हमीद खान | ५४ |
| ३ | स. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | ५२ |
| ४ | स. श्री. थोरात किशोर गोविंदराव | ६३ |

| | | |
|---|---|---|
| ५ | सौ. दलाल लता श्रीनिवास | ५२ |
| ६ | स. श्री. फैय्याजखान अहमदखान | ५४ |
| ७ | स. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव | ५२ |
| ८ | स. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | ५४ |
| ९ | स. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | ५२ |

त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती, विधी समिती, शहर सुधार समिती, माध्यमिक पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती, गलिच्छ वस्ती निर्मूलन घरबांधणी व समाज कल्याण समिती या विशेष समित्यांसाठी प्राप्त झालेल्या उमेदवारी अर्जांपैकी ज्या स. सभासदांना आपली उमेदवारी वापस घ्यावयाची असेल त्यांना दुपारी २.१५ ते २.३० पर्यंतचा वेळ देण्यात येत आहे. असे मा. महापौरांनी सुचविले.

उपरोक्त कालावधीनंतर वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती, विधी समिती, शहर सुधार समिती, माध्यमिक पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती, गलिच्छ वस्ती निर्मूलन घरबांधणी व समाज कल्याण समिती या समित्यांवर खालीलप्रमाणे स. सभासद बिनविरोध निर्वाचित झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

## ***काविळ रुग्णाबाबत अहवाल***

स. श्री. ओक जयवंत केशवराव
स. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
स. श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
स. श्री. मानकापे नामदेवराव शामराव
स. श्री. मुजीब आलमखा खान
स. श्री. मोहसिन अहमद बशिर अहमद
स. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
स. श्री. डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
स. श्री. हाजी मोहम्मद हाफिजोद्दिन

## ***विधी समिती***

स. श्री. अजिजउल्ला बेग वाहेद बेग
स. श्री. काळे शांताराम यशवंत
स. श्री. गील एकबालसिंग प्रितमसिंग
स. श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
स. श्री. छापरवाल रमेश नारायण
स. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
स. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
स. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
स. श्री. हाजी मोहम्मद हाफिजोद्दिन

## ***शहर सुधार समिती***

स. श्री. पैठणकर पांडूरंग भिमाजी
स. श्री. फत्तेलष्कर नारायण मोहन
स. श्री. भगुरे तुळशीराम छगन
स. श्री. मोहसिन अहमद बशिर अहमद
स. श्री. यादव अशोक सायन्ना
स. श्री. स. अहमद एकबालोद्दिन स. अ. कुतुबुद्दिन
स. श्री. स. हुसैन स. अहमद
स. श्री. मगर शंकर जीजाराम
स. श्री. हाजी मोहम्मद हाफिजोद्दिन

***<u>माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती समिती</u>***

स. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग
स. श्री. गोडसे आनंद जगदिश
स. श्री. परदेशी सुभाष शिवलाल
स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
स. श्री. प्रधान बंडू गोविंदराव
स. श्री. मो. ईस्माईल अ. करीम
स. श्री. वाघमारे सुदाम भानुदास
स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव

***<u>गलिच्छ वस्ती निर्मूलन, घरबांधणी व समाज कल्याण समिती</u>***

स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
स. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
स. श्री. जावळे प्रकाश शिवराम
स. श्री. तकी हसन खॉन कासिमखान
स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
स. श्री. मो. आयुब गुलाम जिलानी
स. श्री. सग्रीम हरलाल रिडलान
स. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
स. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक

त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. दुपारी २.५५ वाजता राष्ट्रगीताने सभा समाप्त झाली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १६/०९/१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत

## कार्यक्रम पत्रिका क्र. ७

शनिवार दिनांक १६/०९/१९८९ रोजी सकाळी ११.०० वा. मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभुवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

१) स. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग
२) स. श्री. अशोक सायन्ना
३) स. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
४) स. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
५) स. श्री. अजिजउल्ला बेग वाहेद बेग
६) स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
७) स. श्री. सोनवणे केशव काशिनाथ
८) स. श्री. भगुरे तुळशीराम छगन
९) स. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
१०) स. श्री. घडामोडे मोतीराम नारायण
११) स. श्री. म. अयुब गुलाम जिलानी
१२) स. श्री. मुजीब आलमशा खान
१३) स. श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१४) स. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१५) स. श्री. जावेद हसन खान कासिम खान
१६) स. श्री. तकी हसन खान कासीम खान
१७) स. श्री. स. अ. एकबालुद्दिन स. मो. कुतुबुद्दिन
१८) स. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१९) स. श्री. ओक जयवंत केशव
२०) स. श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२१) स. श्री. वंजारे पीटर प्रभाकरराव
२२) स. श्री. अ. रशीद खान (मामू) अ. हमीद खान
२३) श्रीमती दलाल लता श्रीनिवास
२४) स. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२५) स. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२६) स. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन
२७) स. श्री. छापरवाल रमेश नारायण
२८) स. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२९) स. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
३०) स. श्री. डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल

३१) स. श्री. फैय्याजखान अहमदखान
३२) स. श्री. अलीम बेग मिर्झा कलिम बेग
३३) स. श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद
३४) स. श्री. स. हुसेन स. अहमद
३५) स. श्री. मगर शंकर जिजाराम
३६) स. श्री. मानकापे नामदेवराव शामराव
३७) स. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
३८) स. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
३९) स. श्री. अलफखान हुसेनखान
४०) स. श्री. वाघमारे सुदाम भानुदास
४१) स. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
४२) स. श्री. अजिमखॉ दादामिया अ. रहेमान
४३) स. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४४) स. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव
४५) स. श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
४६) स. श्री. बारवाल गजानन रामकिसन
४७) स. श्री. जहागिरदार अजिज मुख्तार अहमद
४८) स. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
४९) स. श्री. जावळे प्रकाश शिवराम
५०) स. श्री. गाडे गंगाधर सुखदेव
५१) स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
५२) स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५३) स. श्री. परेदशी सुभाष शिवलाल
५४) स. श्री. नवपुते कचरू चंद्रभान

"वंदे मातरम् " या गीताने सभेची सुरुवात झाली.

**विषय क्र. १४ :** दिनांक १६ ऑगस्ट, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :-**

**श्री. अलफखॉं हुसेनखॉं :** मागील सभेचे विषय क्र. १२/५ मध्ये जर एखाद्या घर मालकाने स्वत: घर किंवा दुकान भाड्याने दिले असेल तर अशा मालमत्तेपोटी मिळणाऱ्या भाड्याच्या उत्पन्नावर (भाडे पावती नुसार) मालमत्ता कर आकारणी करण्यात येईल अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**करमुल्य नि. अधिकारी :** सभासदांची सूचना योग्य आहे. भाड्याने दिलेल्या मालमत्तांची, मालमत्ता कर आकारणी भाडे पावती नुसारच करण्यात येईल.

**सौ. लता दलाल :** शहरातील ५०% घरांच्या मालमत्त कराची थकबाकी अद्याप वसूल झलेली नाही. याशिवाय बऱ्याच भागातील घरांना अद्याप टॅक्स लागलेला नाही. तेंव्हा मागील सभेमध्ये सूचविल्याप्रमाणे आतापर्यंत

अशा किती घरांची कार्यालयातर्फे चौकशी करण्यात आली याचा खुलासा व्हावा.

**मा. आयुक्त** : शहरातील मालमत्तंची कर आकारणी करण्याचे काम सर्वकाही पूर्ण झालेले आहे. याशिवाय काही घ्झरांना मालमत्ता कर आकारणी करण्याचे काम राहिले असेल अशा मालमत्ता बाबतची माहिती दिल्यास त्या घरांना टॅक्स लावण्याची कार्यवाही करण्यात येईल. सभागृहाने मंजुरी दिल्यानुसार मालमत्ता कर आकारणी करावयाच्या इमारतींचे बांधकामाबाबत कार्यालयाने निश्चित केलेल्या "बांधकाम वर्गीकरणाच्या अ/ब/क/ड वर्गीकरणाबाबतचा सविस्तर खुलासा स्थानिक वृत्तपत्रात केला जाईल."

**श्री. कचरू नवपुते** : शहरात बेकायदेशीररित्या बांधण्यात आलेल्या घरांना कर आकारणी बाबत कोणते धोरण राहील याचा खुलासा व्हावा.

**करमूल्य नि. अधिकारी** : फेर आकरणी करतांना अनाधिकृत घरांबाबतच्या संचिका वर सहाय्यक संचालक, नगर रचना यांचा अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. मोतीराम घडामोड** : विषय क्र. १२ बाबत चर्चा करतांनासिडको भागातील तयार स्लॅबच्या घरांवर पहिल्या मजल्याचे बांधकाम करण्यास परवानगी नसल्याने क वर्गीय बांधकामाप्रमाणे कर आकारणी व्हावी अशी नोंद इतिवृत्तात घेण्यात यावी.

**मा. महापौर** : सिडको हडको भाग सध्या महापालिका प्रशासनाचे ताब्यात नसल्यामुळे यावर आताच विचार करणे योग्य होणार नाही तरीही तशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात येत आहे.

**ठराव क्र. १४** : विषय क्र. १२ मध्ये "शहरातील जी घरे किंवा दुकाने भाड्याने दिली आहेत अशा घरांना किंवा दुकानांना त्यापासून मिळणाऱ्या भाड्याचे वास्तविक उत्पन्नावर मालमत्ता कराची आकारणी करण्यात यावी." "आणि" सिडको हडको भाग महापालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर या भागातील तयार स्लॅबची घरे बांधकाम प्रकाराच्या कर आकारणी करण्यात येईल. अशी वाढ करून दिनांक १६ ऑगस्ट, ८९ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५ :** मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका अग्निशामक दलातील कर्मचारी सध्या २४ तास कार्यरत असतात. कामाचे तास कमी करावेत अशी त्यांची अनेक दिवसांची मागणी आहे. त्यांची अनेक दिवसांची मागणी आहे. त्यांचे कामाचे तास कमी करावयाचे असल्याने अग्निशामक दलातील सध्याच्या कर्मचारी संख्येत वाढ करणे अपरिहार्य आहे. या दृष्टीने खालील पदे निर्माण करावयाचा प्रस्ताव आहे.

| अ.क्र. | पद | संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सब फायर ऑफिसर | २ | २९०-५४० |
| २. | प्रमुख अग्निशामक | १ | २५०-४३५ |
| ३. | फायरमन | ६ | २२०-३७५ |

वरील पदे निर्माण करण्यासाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा अग्निशामक दलातील कर्मचाऱ्यांना २४ तास कार्यरत रहावे लागत असल्यामुळे त्यांचे कामाचे तास कमी करणेच्या दृष्टीने खालीलप्रमाणे पदे निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पद | संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | सब फायर ऑफिसर | २ | २९०-५४० |
| २. | प्रमुख अग्निशामक | १ | २५०-४३५ |
| ३. | फायरमन | ६ | २२०-३७५ |

वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. १६ :** (दुरुस्त प्रस्ताव) औरंगाबाद मंजूर विकास योजने अंतर्गत जुनाबाजार येथील आरक्षण क्रमांक ११ खुली जागा व त्या लगतचे २० फुट रुंद रस्ते वगळण्याबाबत श्री. एस. के. पटेल व इतर यांना शासनास व महानगरपालिकेस दिनांक १७/०४/१९८६ रोजी प्राप्त झालेल्या अर्जात आरक्षण क्रमांक ११ ची ५० टक्के जागा त्यांचे मिळकती लगतचे २० फुट रुंद रस्ते आरक्षणतून वगळल्यास उर्वरित ६५१ चौ. मी. जमीन विना मोबदला महानगरपालिकेस देण्याची तयारी दर्शविली आहे. या संदर्भात शासनाचे पत्र क्रमांक टीपीएस/३०८५/१७२४/(सी.आर.-१७३/८५/न. वि. १२/दिनांक ०६/१२/१९८८) अन्वये "औरंगाबाद विकास आराखड्यातील स्थानांक क्रमांक ११ व त्या भोवतालचे २० फुटी रस्ते अनावश्यक असल्याने वगळण्यात येऊन आरक्षणाच्या आखणीत बदल करण्यात यावा." या प्रस्तावांशी शासन सहमत असून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरुराचा वैधानिक प्रस्ताव संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत शासनास सादर करण्यास कळविले आहे.

या आरक्षणाच्या सभोवती असलेल्या २० फुट रुंद रस्त्याच्या आखणीत सुमारे ६०९ चौ. मी. जमीन येते. अर्जदाराने दि. १७/०४/८६ रोजी आरक्षण क्रमांक ११ खुली जागा पैकी ६५१.०० चौ. मी. जागा महानगरपालिकेस विना मोबदला देण्याची तयारी दर्शविली असल्याने आरक्षण क्र. ११ "खुली जागा" च्या आखणीत फेरबदल करून २० फुट रुंद पूर्वेकडील रस्त्याच्या आखणीतील काही भागासह नकाशावर दर्शविल्याप्रमाणे क्षेत्र ६५१.०० चौ. मी. जागा आरक्षण क्र. ११ "खुली जागा" या आरक्षणात ठेवून उर्वरित २० फुट रुंद रस्त्याखालील व मंजुर विकास योजनेच्या खुली जागा या आरक्षणातील उर्वरित जागा निवास भागात सामील करण्यास वरील प्रस्तावास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करण्यास मागील सभेच्या चर्चेनुसार दुरुस्त प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

**संवाद :**

**श्री. चंद्रकांत खैरे, श्री. तुळशीराम भगुरे, श्री. केशव सोनवणे, श्री. एकबालसिंग गिल, श्री. डॉ. संचेती** : विकास आराखड्यातील आरक्षण वगळण्याबाबतचे सर्व प्रस्ताव

एकत्रितरित्या नगररचना विभागातर्फे सभागृहापुढे ठेवण्यात यावीत असे यापूर्वी ठरलेले आहे. तेंव्हा त्या प्रमाणे सर्व प्रस्ताव एकत्रितरित्या सभागृहापुढे ठेवून त्यावर विचार करण्यात यावा. तसेच आरक्षण वगळण्याबाबतची किती प्रकरणे आहेत? त्या साठी किती कालावधी लागेल याचा खुलासा व्हावा.

**सहा. संचालक न.र.** : विकास आराखड्यातून वगळावयाच्या आरक्षणाबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्यासाठी कमीत कमी ६ महिन्यांचा कालावधी लागेल तसेच सभागृहाच्या मंजुरीनुसार वगळण्यासत येणाऱ्या आरक्षणांच्या नकाशास शासनाकडून परवानगी मिळविण्यास अंदाजे १ ते १$^{१/२}$ वर्षाचा कालावधी लागेल.

**मा. महापौर** : मा. आयुक्त यांनी सदर प्रकरणांतर्गतचा दुरुस्त आराखडा शक्य तितक्या लवकर शासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

**ठराव क्र. १६ :** सर्वानुमते असे ठरले की, विकास आराखड्यातून वगळण्यात यावयाच्या आरक्षणा बाबतची सर्व प्रकरणे एकत्रितरित्या नगर रचना विभागातर्फे सभागृहापुढे ठेवण्यात आल्यानंतर यावर विचार करण्यात यावा.

**विषय क्र. १७ :** मोहल्ला उस्मानपुरा येथील स. नं. १२ पैकी नगर भुमापन क्रमांक १८३११ क्षेत्र १६२८६.००/भाग क्षेत्र ६३३.७५ ही सरकारी जमीन औरंगाबाद मंजूर विकास योजनेत शैक्षणिक क्षेत्र म्हणून दर्शविली आहे. सदर सरकारी मोकळी जागा परिसर अभियांत्रिकी प्रियदर्शनी सोसायटी इतर काहींनी सदर जमीन निवासोपयोगी करण्यासाठी मागतिलेली असल्यामुळे जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी केलेल्या विनंती वरून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये संदर्भित जागा शैक्षणिक क्षेत्रातून वगळून निवास भागात समाविष्ट करण्यासाठी कार्यवाही करण्यास दिनांक ०५/०८/८८ ला ठराव क्र. ७१ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार आवश्यक ती अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र औरंगाबाद विभाग पुरवणी भाग एक-अ चे पृष्ठांक १६७,१६८ दिनांक ११/०५/८९ व स्थानिक वर्तमानपत्र दैनिक अजिंठा दिनांक २७/०५/८८ व दैनिक आलमगिर टाईम्स दिनांक ३१/०५/८८ अन्वये प्रसिध्द करण्यात आले. त्यावर आलेल्या हरकती व सूचना संबंधात संबंधितास सुनावणी देण्यात आलेली आहे. प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झालेली असल्याने सदर किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी पाठविण्यास सर्वसाधारण सभेच्या ठरावासाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १७ :** सर्वानुमते असे ठरले की, विकास आराखड्यातून वगळण्यात यावयाच्या आरक्षणा बाबतची सर्व प्रकरणे एकत्रितरित्या नगररचना विभागातर्फे सभागृहापुढे ठेवण्यात आल्यानंतर यावर विचार करण्यात यावा.

**विषय क्र. १८ :** औरंगाबाद मंजूर विकास योजनेअंतर्गत पैठण रस्त्यालगत सिल्कमील्स व त्या लगतचा भाग औद्योगिक क्षेत्रात आहे या भागात विद्यमान मिल्सच्या जागेत रहिवास वसाहत झलेली आहे. औद्योगिक क्षेत्राच्या उत्तरेस मंजूर विकास योजनेचे निवास क्षेत्र असून त्या ठिकाणी रस्ते पाणीपुरवठा इत्यादी सुखसोयी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच औद्योगिक क्षेत्रातही झालेल्या रहिवास वसाहतीमध्ये वरील सुखसोयी

पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच या भागात मिल्सच्या कर्मचाऱ्यांना काही घरे बांधून देण्यात आली आहेत या भागत आता विद्यमान रहिवास वापरात बांधकाम परवानगी व इतर विकासाची काम करता यावी यासाठी सोबतच्या नकाशात भाग "अे", "बी" व "सी" मध्ये दर्शविलेले एकूण क्षेत्र ७.२ हेक्टर जमीन औद्योगिक क्षेत्रातून वगळून निवास भागात समाविष्ट करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी सादर.

**ठराव क्र. १८ :** सर्वानुमते विकास आराखड्यातून वगळण्यात यावयाच्या आरक्षणाबाबतची सर्व प्रकरणे एकत्रितरित्या नगररचना विभागातर्फे सभागृहापुढे ठेवण्यात आल्यानंतर यावर विचार करण्यात यावा.

## ***<u>पुरवणी विषयपत्रिका</u>***

**विषय क्र. १९ :** औरंगाबाद विकास आराखड्यात साईट नं. १५० व १५१ स. नं. ९/२ ही खुली जागा व प्राथमिक शाळेसाठी आरक्षित दाखविण्यात आली आहे. ते आरक्षण वगळून ती जागा निवास उपयोगी करावी.

सुचक - श्री. यादव अशोक सायन्ना
अनुमोदक - श्री. इकबालसिंग गील
दिनांक - १२/०९/१९८९

**ठराव क्र. १९ :** सर्वानुमते असे ठरले की, विकास आराखड्यातून वगळण्यात यावयाच्या आरक्षणाबाबतची सर्व प्रकरणे एकत्रितरित्या नगररचना विभागातर्फे सभागृहापुढे ठेवण्यात आल्यानंतर यावर विचार करण्यात यावा.

**विषय क्र. २० :** औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत सिध्दार्थ उद्यान येथे पोहण्याचा तलाव बांधण्यात आला असून महानगरपालिकेने या तलावाचे बांधकामावर आतापर्यंत लाखो रुपये खर्च केलेले आहेत. तरी देखील सदरील तलावाचे बांधकाम अद्याप पावेतो पूर्ण झालेले नाही.

सदरील तलावावर आतापर्यंत एकूण किती खर्च महानगरपालिके मार्फत करण्यात आला तसेच तलावाचे बांधकाम पूर्ण होण्यास अजून किती कालावधी लागणार आहे. तलावाचे सदोष बांधकामास व यात झालेल्या भ्रष्टाचारास कोण जबाबदार याबाबत सविस्तर माहिती सभागृहास सादर करण्यात यावी. व हा तलाव शहरामधील जलतरण पटुंसाठी पोहण्यासाठी त्वरित उपलब्ध करून द्यावा.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे
अनुमोदक - कचरू चंद्रभान नवपुते, बंडू प्रधान
दिनांक - १२/०९/८९

**संवाद :**

**शहर अभियंता** : सिध्दार्थ उद्यान येथील पोहण्याच्या तलावावर सुधारित अंदाजपत्रकानुसार आजपर्यंत ६३,६९,२०८/- रुपये खर्च झालेले आहेत. सिध्दार्थ उद्यान येथे ऑलिम्पिक धर्तीचा पोहण्याचा तलाव

बांधण्यासाठी रक्कम रु. ४०,०३,५५०/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र. ८६३ दि. ०९/१२/८३ द्वारे मंजुरी देण्यात आली होती.

सदरील कामाची बी-१ नमुन्यात दि. ३०/१२/८३ रोजी निविदा स्विकारण्यात आल्या व तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजे ४.५६% कमी दराची मे. बन्सिलाल मित्तल ॲन्ड कंपनी जालना यांची निविदा मंजूर करण्यात आली.

काम सुरू झाल्यानंतर व वेगवेगळ्या पोहण्याच्या तलावास भेटी दिल्यानंतर तसेच ऑलिम्पिक धर्तीवर सदरील तलाव बांधून घ्यावयाचा असल्यामुळे खालील बाबी करून घेणे अत्यावश्यक होते. परंतु सदरील कामे करून घेण्याबद्दल मुळे अंदाजपत्रकात तरतूद केलेली नव्हती. (१) ड्रायव्हींग बोर्ड वेगवेगळ्या उंचीचे, (२) फिल्टरेशन प्लॅन्ट इत्यादी बहुविध बाबींची गरज लक्षात घेऊन वेळोवेळी खर्चास मंजूर घेण्यात आली आहे. मूळ अंदाजपत्रकात, मूळ निविदेत व नकाशात कोणत्याही प्रकारची काँक्रेटमध्ये एलीमेंट टाकण्याची तरतूद नव्हती.

**मा. आयुक्त** : पोहण्याच्या तलावाची चौकशी चालू आहे.

**सौ. लता दालाल**
**श्री. गंगाधर गाडे** : शहर अभियंता यांनी सिध्दार्थ उद्यानस्थित पोहण्याच्या तलावाचे कामाबाबत केलेला खुलासा चुकीचा आहे. या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असा आमचा स्पष्ट आरोप आहे. अधिकाऱ्यांनी या कामासाठी त्यांच्या सोयीनुसार वेळोवेळी मंजुरी घेतली. यावरून या कामाचे सुरुवातीस व त्याचा सखोल व सविस्तर अभ्यास करणे आवश्यक होते.

अशा प्रकारे अधिकाऱ्यांनी या कामासाठी तुकडे पाडून मंजुरी घेतल्यामुळे महापालिकेचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. तेंव्हा या कामात झालेल्या भ्रष्टाचाराची कसून चौकशी करण्यात यावी.

**श्री. गंगाधर गाडे** : या कामांतर्गतच्या वेगवेगळ्या संचिका मंजुरीसाठी अधिकाऱ्यांकडे केंव्हा आल्या आणि त्यांना मंजुरी दिलेले अधिकारी कोण होते? याची माहिती सभागृहास देण्यात यावी.

**मा. महापौर** : स. सभासदांचे विचाराशी मी सहमत आहे. सभासदांचे विचार लक्षात घेता या कामाचे चौकशीसाठी एक उपसमिती कायम करण्यात यावी. या उपसमितीमध्ये मा. आयुक्त, (२) कार्य. अभियंता, परिसर अभियांत्रिकी, शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, सहाय्यक संचालक नगर रचना यांचा समावेश राहील. सदर उपसमितीने एक महिन्याचे आंत अहवाल सादर करावा.

**श्री. गंगाधर गाडे** : नेमण्यात आलेल्या समितीस आक्षेप आहे. या समितीमध्ये शासकीय पातळीवरच्या तज्ञ अधिकाऱ्याचा अंतर्भाव असणे अधिक श्रेयस्कर राहील

**श्री. अजिजउल्ला बेग** : त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा.

**श्री. बंडू प्रधान** : नेमण्यात आलेल्या समितीने आपला चौकशी अहवाल एक महिन्याच्या आत द्यावा असे बंधन घालण्यात यावे.

**डॉ. काळे** : तलावाचे कामासाठी आतापर्यंत बरीच मोठी रक्कम खर्ची पडलेली आहे या कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीचे काम चालू राहील. परंतु झालेला खर्च लक्षात घेता राहिलेले काम सत्वर पूर्ण करण्याचे दृष्टीने काम चालू ठेवावे. म्हणजे नागरिकांना त्याचा उपभोग घेता येईल.

**मा. महापौर** : पोहण्याच्या तलावाचे प्रशासकीय कालावधीत झालेले असल्यामुळे त्याची चौकशी होणे आवश्यक आहे.

**श्री. अशोक सायन्ना** : पोहण्याच्या तलावाचे बांधकामाबाबत जवाबदार असलेल्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे आणि तद्नंतर या प्रकरणांतर्गत चौकशी करण्यात यावी.

**मा. महापौर** : नियामानुसार आरोप सिध्द होईपर्यंत एखाद्या अधिकाऱ्याला निलंबित करणे उचित नव्हे तेंव्हा कायम करण्यात आलेल्या उपसमितीने सदरील कामाचा चौकशीचा अहवाल एक महिन्यात दाखल करावा. उपसमितीमध्ये स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे व श्री. अजिज जहागिरदार यांचा समावेश करण्यात यावा आणि पोहण्याच्या तलावाचे उर्वरित काम चार महिन्याच्या आंत पूर्ण करण्यात यावे.

**श्री. तकी हसन खान:** या चौकशीचे कामी शासकीय पातळीवरच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.

**श्री. गंगाधर गाडे, डॉ. संचेती, श्री. रशीद मामू** :
या शिवाय जिल्हा नियोजन व विकास महामंडळामार्फत या कामाची चौकशी चालू असल्याची माहिती मिळाली आहे. तेंव्हा चौकशी कामामध्ये जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे सहकार्य घेतल्यास हा प्रश्न मार्गी लागण्यास मदतच होईल.

**ठराव क्र. २० :** सर्वानुमते असे ठरले की, पोहोण्याच्या तलावाचे बांधकामासाठी आतापर्यंत बरीचशी रक्कम खर्ची पडलेली असल्यामुळे सदर काम बंद न ठेवता युध्द पातळीवर ४ महिन्याचे आत पूर्ण करून पोहण्याचा तलाव नागरिकांना उपलब्ध करून देण्यात यावा आणि या कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी

१) स. स. श्री. चंद्रकांत खैरे.
२) स. स. श्री. अजिज जहागिरदार.
३) मा. आयुक्त, महानगरपालिका.

४) मा. कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी.
५) सहा. संचालक नगर रचना, मनपा.
६) मुख्य लेखा परिक्षक, मनपा.
७) शहर अभियंता, मनपा.

यांचा समावेश असलेली एक उपसमिती कायम करण्यात येते. सदर समितीने उक्त बांधकामाचे चौकशीचा अहवाल एक महिन्याच्या आंत दाखल करावा. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१ :** औरंगाबाद शहरामधील विविध नाल्यांवर महानगरपालिकेमार्फत शॉपिंग सेंटर उभारण्यात यावे जसे म.न.पा. मार्फत नाथ मार्केट, मर्कंटाईल बँक बाधण्यात आले. त्याच प्रमाणे शहरात अनेक नाले असून त्यामुळे दुर्गंधी पसरते व रोगराई वाढते. अशा नाल्यांवर सार्वजनिक रस्त्यालगत शॉपिंग सेंटर उभारल्यास रस्ते सुशोभित दिसतील व शहराच्या सौंदर्यात अधिक भर पडेल, तसेच या इमारती बांधल्यास महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न देखील वाढेल व शहरातील रोगराई कमी होईल.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे
अनुमोदक - श्री. केशव सोनवणे, श्री. कचरू नवपुते.
दिनांक - १२/०९/८९

**संवाद :**

**श्री. स. हुसैन स. अ.** : शहरातील नाल्यांची जागा महापालिकेच्या मालकीची आहे किंवा कसे? तसेच महापालिकेला नाल्याची जागा लिजवर देण्याचे अधिकार महापालिकेला आहेत काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. आयुक्त** : शासकीय धोरणानुसार शहरामधील नाल्यांवर अशा प्रकारे जागा लिजवर देता येणार नाही.

**श्री. अजिजुल्ला बेग, श्री. अलफखाँ हुसेनखाँ, श्री. घडामोडे, श्री. रशीदखाँ मामू :**
: नाल्यांच्या जागा लिजवर दिल्यानंतर त्यावर उभ्या राहणाऱ्या इमारतीमुळे नाल्यांचा साफसफाईत अडथळा निर्माण होतो. परिणामी त्या परिसरातील नागरिकांना रोगराई होण्याची शक्यता टाळता येत नाही ही बाब लक्षात घेवून नाल्याच्या जागा लिजवर देण्यात येऊ नये.

**श्री. चंद्रकांत खैर** : आतापर्यंत, नाल्यांवर बांधण्यात आलेल्या इमारती लिज धारकांना कार्यालयाने घालून दिलेल्या नियमांची पूर्तता केली आहे काय?

**मा. महापौर** : मा. आयुक्तांनी याबाबतची पहाणी करून आवश्यक ती पूर्तता झाली नसल्यास संबंधीतांवर योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव क्र. २१** : सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्र. २२ :** औरंगाबाद शहरातील विविध सार्वजनिक मुख्य रस्त्यांवर, महानगरपालिकेच्या शाळेच्या परिसरांत शासकीय दवाखाने परिसरात तसेच शहरातील जनतेच्या मागणी प्रमाणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत विविध जातीचे वृक्षारोपन स्थानिक नगरसेवकांचा सहभाग घेऊन करण्यात यावे.

या कामी वनविभागाचे सहकार्य घेऊन मानगरपालिका उद्यान विभागामार्फत "वृक्षारोपन सप्ताह" साजरा करण्यात यावा. शहरातील सर्व धार्मिक स्थळे, सर्वधर्मीय स्मशानभूमिंचे परिसरात वृक्षारोपन करणे बाबत महानगरपालिकेमार्फत विशेष मोहिम हाती घेण्यात यावी.

शहरात औद्योगिक कररखान्यांची द्रुत गतीने वाढ होत असून त्यामुळे प्रदूषण वाढत आहे. शहरातील वृक्षतोड थांबविणे बाबत प्रयत्न करण्यात यावे. शहरालगतचे डोंगराळ भागात वृक्षारोपणाची खास मोहिम होती घेण्यात यावी. शहरातील सरकारी, निमसरकारी कार्यालये, महामंडळ, वित्तीय संस्था, खाजगी कारखाने व शासकीय शिक्षण संस्थांचे परिसरात त्यांचे प्रमुखांची परवानगी घेऊन वृक्षारोपन करण्यात यावे. जेणेकरून राष्ट्रीय कार्यात सहभागी झाल्याचे श्रेय महानगरपालिकेस मिळेल, शहरातील प्रदूषण रोखण्यास मदत होईल. नगरवासियांना स्वच्छ व शुध्द हवा मिळेल तसेच शहराचे सौंदर्यात अधिक भर पडून सुंदर औरंगाबादची संकल्पना साकार होईल.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे, श्री. कचरू नवपुते.
अनुमोदक - श्री. केशव सोनवणे.
दिनांक - १२/०९/८९

**संवाद** :

**डॉ. शांताराम काळे** : वृक्षारोपनाच्या ठरावावर विचार करत असतांना वृक्षारोपणाचे कार्यक्रमासाठी सर्व सभासद उपस्थित राहतात काय? यचा प्रथम विचार करणे आवश्यक आहे. वृक्षारोपणाचे कार्यक्रमामध्ये स. सभासदांचा उत्स्फूर्त सहभाग असणे अत्यावश्यक आहे.

**श्री. बंडू प्रधान** : आता पावसाळा संपत आल्यामुळे वृक्षारोपन कार्यक्रमाची मोहिम पुढील वर्षी हाती घेण्यात यावी.

**सौ. लता दलाल** : सभासदांनी वेळोवेळी मागणी करूनही उद्यान विभागाकडून ट्री गार्डस् मिळत नाही. ट्री गार्डस् (वृक्षसंरकक्षक जाळी) पुरविण्यात आल्यास काही प्रमाणात वृक्ष संवर्धनाचे प्रयत्न सफल होतील.

**श्री. रतनकुमार पंडागळे**: घाटी स्मशानभूममध्ये बराचसा केरकचरा टाकलेला आहे. तो साफ करून त्या ठिकाणी झाडे लावण्यात यावीत.

**श्री. अशोक सायन्ना** : अशाच प्रकारे इतरही स्मशानभूमीत कचरा टाकला जातो.

**उद्यान अधिक्षक** : महापालिकेकडे चालू वर्षाकरिता ३५० वृक्षसंरक्षक होते. स. सभासदांच्या मागणीनुसार त्यांची वाटप करण्यात आली आहे.

**मा. महापौर** : या ठरावाच्या अनुषंगाने सर्वांच्या सहकार्याने "वृक्ष प्राधिकरण" (ट्री ॲथोरिटी) कायम करण्यात येईल तेंव्हा चालू वर्षात वर्षभर "झाडे लावा झाडे जगवा" ही मोहिम राबविण्यात येणार आहे. लावण्यात आलेली झाडे जगविण्याची जवाबदारी त्या त्या वार्डाचे स. नगरसेवक व नागरिक यांच्यावर सोपविण्यात येईल.

**श्री. तकी हसन खान** : ज्या वार्डात ट्री गार्डस् दिलेले आहेत त्या ट्री गार्डस्चा योग्य प्रकारे उपयोग होत नसेल तर असे ट्रि गार्डस काढून ज्या ठिकाणी वृक्षारोपन करण्यात आले आहे अशा ठिकाणी लावण्यात यावेत.

**सौ. लता दलाल व मोतीराम घडामोडे :**
: हरित औरंगाबाद योजना राबविण्यासाठी जनतेचा सहभाग आवश्यक आहे.

**मा. आयुक्त** : ऑगस्ट १९८९ मध्ये शासनातर्फे सामाजिक वनीकरण घोषित करण्यात आले आहे. या वनीकरणाचे कार्य श्रमदानाने करावयाचे आहे. वनीकरणाचे कामामध्ये वनविभागाचा सहभाग ५०% व महापालिकेचा सहभाग ५०% राहणार आहे.

शासनाच्या निर्णयाप्रमाणे शहरातील विविध मुख्य रस्त्यावर महापालिकेतर्फे वृक्षारोपन करण्यास हरकत नाही याशिवाय शासकीय कार्यालयाने आणि संस्था या त्यांचे कार्यालयीन आवारात स्वतंत्रपणे वृक्षारोपन करीत असल्याने या विभागाकडून ट्री गार्डची (वृक्ष संरक्षक) मागणी होत आहे. यापुढे वृक्षारोपनणाचे कार्यक्रमात संबंधित वार्डाचे नगरसेवक आणि नागरिक यांच्या सहभागाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम होती घेतला जाईल

**श्री. अशोक सायन्ना** : सिडकोकडून जी जागा घेण्यात आली आहे त्यावर वृक्षारोपण करण्यात यावे.

**श्री. मोतीराम घडामोडे** : सिडको येथील टी. व्ही. सेंटरच्या बाजूस असलेली मोकळी जागा पत्रकारांना देण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे कळते.

**मा. आयुक्त** : स. सभासदांनी खुलासा केल्याप्रमाणे सदर जागा पत्रकारांना देण्याचा प्रस्ताव नाही. ही जागा "नो डेव्हलपमेंट" झोनमध्ये आहे.

**ठराव क्र. २२ :** सर्वानुमते असे ठरले की, सर्वांच्या सहकार्याने "वृक्ष प्राधिकरण" (ट्री ॲथॉरिटी) कायम करण्यात यावी. आणि चालू वर्षात वर्षभर "झाडे लावा, झाडे जगवा" ही मोहिम राबविण्यात यावी आणि लावण्यात आलेली झाडे संवर्धनाची जवाबदारी त्या त्या प्रभागाचे स. नगरसेवक व नागरिक यांच्यावर सोपविण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३ :** शहरामधील सर्व सार्वजनिक रस्त्यांवर उद्यानामध्ये जाळया, रस्ते सुशेभित करण्यासाठी दुभाजक व औद्योगिक संस्था व इतर ज्या ज्या संस्था वरील भाग सुशोभित करू इच्छित असेल मुंबई, ठाणे, पुणे, जळगांव या शहरांप्रमाणे तर त्यांना त्या त्या भागाचा विकास तसेच परिसर सुशोभित करण्यास परवानगी देण्यात यावी.

**सुचक** - श्री. कचरू नवपुते, श्री. चंद्रकांत खैरे
**अनुमोदक** - श्री. केशव सोनवणे
**दिनांक** - १२/०९/८९

**संवाद :**

**मा. आयुक्त** : शहर विकास आराखड्याप्रमाणे नागरी व औद्योगिक भागातील रस्त्यांचा विकास पूर्ण झाल्यानंतर या रस्त्याच्या कडेने झाडे लावणे व रस्ते सुशोभित करण्याचा विचार करणे योग्य राहील या शिवाय शहरातील रस्ते व चौक सुशोभित करण्याच्या दृष्टीने औद्योगिक व इतर संस्था यांचे सहकार्य घेण्याचा प्रयत्न केला असता आवश्यक तो प्रतिसाद मिळाला नाही.

**मा. महापौर** : शहरातील रस्ते, चौक आणि दुभाजक सुशोभित करण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या उद्योजकांच्या बैठकीत नगरसेवकांना समाविष्ट करून घेण्यात यावे आणि या सभेस उद्योजकांकडून शहरातील रस्ते, चौक आणि दुभाजक सुशोभित करून घेण्यासाठी आवश्यक ते सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येतील.

**श्री. यादव अ. सायन्ना** : भावसिंगपुरा स्मशानभूमी येथे प्रेतांची विल्हेवाट लावण्यास विद्यापिठाकडून मज्जाव होत आहे. याबाबत वेळोवेळी मागणीही करण्यात आलेली आहे. तेंव्हा या व वॉर्ड क्र.१ च्या विकास कामाविषयक निर्णय घेतले जातात. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही याचा खेद आहे.

**डॉ. चेनकरण संचेती** : रोकडा हनुमान येथील स्मशानभूमीच्या संदर्भातील न्याय प्रविष्ट प्रकरणाचा निर्णय महापालिकेच्या विरोधात गेला आहे. या प्रकरणासंबंधातील नागरिक सदर प्रकरणी महापालिकेशी वाटाघाटी करण्यास तयार आहेत. तेंव्हा वाटाघाटीमधून सदर प्रकरणी तडजोड घडवून आणण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व कागदपत्रे तयार ठेवण्यात यावी. म्हणजे वाटाघाटी करण्यासाठी बैठक आयोजित करता येईल.

**नगर रचनाकार** : भावसिंगपुरा स्मशानभूमीच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांचेकडून पत्र आले त्या पत्राच्या अनुषंगाने माहिती संकलन करून पुढील सभेमध्ये माहिती पुरविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

**श्री. यादव अ. सायन्ना** : सभागृहात करण्यात आलेला खुलासा चुकीचा आहे. सभागृहाची

दिशाभूल करण्यात येत आहे. तेंव्हा याचा निषेध करण्यात येतो.

**मा. महापौर** : स्मशानभूमी संदर्भात प्रश्न विषयपत्रिकेवर सभागृहामध्ये विचाराधीन नाही. तरी स. सभासदांचे संवेदनात्मक विचार लक्षात घेता त्यांच्या मताशी सहमत आहे. या संबंधात संबंधित अधिकारी व स. नगरसेवक डॉ. संचेती यांचेशी सविस्तर चर्चा करण्यात येईल. (मा. महापौर स्मशानभूमी संदर्भात खुलासा करीत असतांनाच स. नगरसेवक श्री. बंडू प्रधान आपले विचार मांडण्यास परवानगी मिळणे बाबतची मागणी आग्रहाने रेटीत होते.)

**श्री. बंडू प्रधान** : मा. महापौर साहेब मला याविषयी सभागृहात खुलासा करावयाचा आहे. तेंव्हा दोन शब्द बोलण्याची परवानगी देण्यात यावी.

**मा. महापौर** : माझा खुलासा अद्याप अपूर्ण आहे. तो मुद्दा पूर्ण झाल्यानंतर स. सभासदांनी आपले विचार मांडावेत अशी मी त्यांना विनंती करतो.

**श्री. बंडू प्रधान** : मा. महापौर आधी मला बोलण्याची संधी द्या मग तुमचे विचार मांडा. खुलासा करण्यास परवानगी मिळणे बाबत बराच वेळ पासून सभागृहात उभा आहे. तेंव्हा विचार मांडण्याची परवानगी द्यावी.

**मा. महापौर** : स. सभासद श्री. बंडू प्रधान आपणांस पुन्हा विनंती करतो की, माझा मुद्दा स्पष्ट झाल्यानंतर आपणास आपले विचार मांडण्यास परवानगी देण्यात येईल.

**श्री. बंडू प्रधान** : मा. महापौर साहेब माझे म्हणणे आधी ऐकूण घ्या मी बऱ्याच वेळची मागणी करीत आहे तरी आपण मला खुलासा करण्याची परवानगी देत नाही. यावरून आपण पक्षपात करता असा माझा आरोप आहे.

**मा. महापौर** : स. सभासद श्री. बंडू प्रधान यांना वेळोवेळी विनंती करूनही स. स. श्री. बंडू प्रधान हे सभागृहाचे नियम पाळीत नाहीत. त्यामुळे सभा कामकाजात अडथळा निर्माण होत आहे म्हणून उपस्थित मार्शल यांना स. सभासद श्री. बंडू प्रधान यांना सभागृहाबाहेर नेण्याचा आदेश दिला जातो.

आदेशाप्रमाणे स. सभासद श्री. बंडू प्रधान यांना मार्शल सभागृहाबाहेबर घेऊन जात असतांना स. नगरसेवकांनी "महापौरांचा धिक्कार" करणाऱ्या घोषणा दिल्या वरील घटनेच्या निषेधार्थ स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे, अजिज जहागिरदार व उपमहापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय व

आघाडीच्या सर्व उपस्थित नगरसेवकांनी अंदाजे २.०० वाजता धिक्काराच्या घोषणा देत सभात्याग केला.

**ठराव क्र. २३ :** सर्वानुमते असे ठरले की, शहरातील औद्योगिक उद्योजक आणि संस्था यांचे सहकार्याने रस्ते, चौक, वाहतुक बेट सुशोभित करण्याच्या दृष्टीने संबंधितांची बैठक आयोजित करण्यात यावी. या बैठकीत वरील संस्थाच्या साहाय्याने शहराच्या सौंदर्यात भर पडेल अशा योजना हाती घेण्याबाबत संबंधीतांस आवाहन करण्यात यावे. या बैठकीमध्ये नगरसेवकांना सहभागी करून घेण्यात यावे.

तसेच रोकडा हनुमान स्मशान भूमीच्या संदर्भातील प्रकरणाबाबत स. स. श्री. डॉ. चेनकरण संचेती, मा. आयुक्त आणि मा. सहा. संचालक, नगररचना यांनी संयुक्तीरित्या चर्चा करून सदर प्रश्न मार्गी लावण्यात यावा. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४ :** सिडको, हडको या भागामधून शहरात येण्यासाठी १०० फुट रुंदीचा सार्वजनिक रस्ता तयार करण्यात येत आहे. सदरील रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सिडको, एन-१२ पर्यंत पूर्ण होत आले असून सदरील रस्ता व्ही. आय. पी. रोड म्हणून वापरात आहे, परंतु पुढे हा रस्ता गणेश कॉलनी पंचायत समिती मार्गे गुलशन महल समोरून जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील सार्वजनिक रस्त्यात जोडलेला आहे. या रस्त्याला मजनु हिल तलावापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत बरीच वळणे घेण्यात आलेली आहेत. त्यामुळे सदरील सार्वजनिक रस्त्यावर नेहमी अपघात होतात ते टाळण्यासाठी सिडको-हडको कडून येणारा हा रस्ता मजनु हिल पासून लगतचे तलावाच्या किनाऱ्याने सरळ दिल्लीगेट जवळ जिल्हाधिकारी कार्यालयासमोरून येणाऱ्या मुख्य रस्त्यास जोडण्यात यावा हा नविन रस्ता तलावाच्या किनाऱ्याने तयार करण्यात यावा कारण त्यामुळे कोणाही मालमत्ताधारकांची मालमत्ता या रस्त्यात बाधित होणार नाही. तसेच या १०० फुट रस्त्यावरील वाहनांची रहदारी कमी होईल व अपाघात टळेल हा नविन रस्ता तयार होऊन या रस्त्यावर शहरातील वाहने तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या रिंगरुमच्या बसेस धावतील व यामुळे सिडको, हडको या भागात राहणाऱ्या नागरिकांची सार्वजनिक रस्त्याची मागणी पूर्ण होईल.

**सुचक** - श्री. केशव सोनवणे
**अनुमोदक** - १) श्री. कचरू नवपुते.
२) श्री. बंडू प्रधान.
**दिनांक** - १२/०९/८९.

**संवाद :**
**श्री. घडामोडे, केशव सोनवणे**
: सभागृहापुढे मांडण्यात आलेला प्रस्ताव योग्य आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या नागमोडी रस्त्यावरून सिडकोवासिय नागरिकांना रहदारी करणे कठीण जात आहे. तंव्हा प्रस्तावांतर्गतची तयार करण्यासाठी आवश्यक असलेली जागा कोणाच्या मालकीची आहे? याबाबत सविस्तर माहिती घेऊन प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रस्ता तयार करण्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात यावी.

सुमारे २.०५ वाजता आघाडीच्या उपस्थित नगरसेवकांनी सभागृहात प्रवेश केला.

**श्री. बंडू प्रधान** : मा. महापौरांनी "एकेरी शब्द" वापरून आपमान केला आहे. तेंव्हा मा. महापौर यांनी सभागृहाची माफी मागावी. हा केवळ एका सभासदाचा अवमान नसून संपूर्ण सभागृहाचा अवमान आहे. तेंव्हा मा. महापौर जोपर्यंत माफी मागत नाही तोपर्यंत सभागृहात बैठा सत्यागृह करीत आहे यासाठी सर्व नगरसेवकांनी पाठींबा द्यावा (असे म्हणून त्यांनी बैठा सत्यागृह सुरू केला.) या बैठासत्यागृहामध्ये स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. मुजीब खान, श्री. जावेद हसन खान यांनी भाग घेतला. आणि मा. महापौरांनी माफी मागावी असा आघाडीच्या सर्व सभासदांनी आग्रह धरला.

**मा. महापौर** : मा. आयुक्त व सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी प्रस्तावाबाबतची सविस्तर माहिती व अहवाल एकत्रित करून सदर प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा असे घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

***<u>कार्यक्रम पत्रिका क्र. ६</u>***

### *दिनांक १८/१०/१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

बुधवार दिनांक १८ ऑक्टोंबर, १९८९ रोजी सकाळी ११.०० वा. मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभुवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.

१) स. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग
२) स. श्री. यादव अशोक सायन्ना
३) स. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
४) स. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
५) स. श्री. अजिजउल्ला बेग वाहेद बेग
६) स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
७) स. श्री. गंगाखेडकर रतनकुमार नारायणराव
८) स. श्री. सोनवणे केशव काशिनाथ
९) स. श्री. भगुरे तुळशीराम छगन
१०) स. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
११) स. श्री. पाटील नरेंद्र यादवराव
१२) स. श्री. घडामोडे मोतीराम नारायण
१३) स. श्री. म. अयुब गुलाम जिलानी
१४) स. श्री. मुजीब आलमशा खान
१५) स. श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१६) स. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१७) स. श्री. जावेद हसन खान कासिम खान
१८) स. श्री. तकी हसन खान कासीम खान
१९) स. श्री. स. अ. एकबालुद्दिन स. मो. कुतुबुद्दिन
२०) स. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
२१) स. श्री. ओक जयवंत केशव
२२) स. श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२३) स. श्री. वंजारे पीटर प्रभाकरराव
२४) स. श्री. अ. रशीद खान (मामू) अ. हमीद खान
२५) श्रीमती दलाल लता श्रीनिवास
२६) स. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२७) स. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२८) स. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन
२९) स. श्री. छापरवाल रमेश नारायण
३०) स. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल

३१) स. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
३२) स. श्री. डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
३३) स. श्री. म. इस्माईल अ. करीम
३४) स. श्री. फैय्याजखान अहमदखान
३५) स. श्री. अलीम बेग मिर्झा कलिम बेग
३६) स. श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद
३७) स. श्री. स. हुसेन स. अहमद
३८) स. श्री. मगर शंकर जिजाराम
३९) स. श्री. मानकापे नामदेवराव शामराव
४०) स. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
४१) स. श्री. सुग्रीव हरलाल रिडलान
४२) स. श्री. अलफखान हुसेनखान
४३) स. श्री. वाघमारे सुदाम भानुदास
४४) स. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
४५) स. श्री. थोरात किशोर गोविंदराव
४६) स. श्री. अजिमखॉ दादामिया अ. रहेमान
४७) स. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४८) स. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव
४९) स. श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
५०) स. श्री. जहागिरदार अजिज मुख्तार अहमद
५१) स. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
५२) स. श्री. जावळे प्रकाश शिवराम
५३) स. श्री. गाडे गंगाधर सुखदेव
५४) स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
५५) स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५६) स. श्री. परेदशी सुभाष शिवलाल
५७) स. श्री. नवपुते कचरू चंद्रभान

"वंदे मातरम् " या गीताने सभेची सुरुवात झाली.

**संवाद** :

**श्री. अजिज जहागिरदार:** मागील सभेच्या वेळी स. सभासद श्री. बंडू प्रधान यांच्याविषयी मा. महापौरांनी नकळत काही शब्द वापरले त्यामुळे स. सभासद श्री. बंडू प्रधान आणि पर्यायाने सभागृहाच्या भावना दुखावल्या होत्या. लोकप्रतिनिधी हे जनतेची काम करण्यासाठी एकत्र येतात. तेंव्हा कळत नकळत झालेल्या गोष्टीबद्दल मा. महापौरांनी माफी मागण उचित राहील अशी मी विनंती करतो.

**मा. महापौर** : सर्व स. सभासद हे शहरातील जबाबदार नागरिक आहेत यात शंका नाही. सभागृहाची प्रतिष्ठा राखणे हे सदस्यांचे नैतिक कर्तव्य आहे. गत सभेत काही गोष्टी दुर्दैवाने घडल्या हे योग्य नाही. त्यात माझा काहीही वैयक्तिक हेतू नव्हता. सभागृहाचे

कामकाज चालू असताना त्यासाठी तयार केलेल्या नियमांचे पालन करणे मला क्रमप्राप्त आहे. स. सभासदांच्या विचाराशी मी सहमत आहे. तेंव्हा स. सभासद श्री. बंडू प्रधान यांचे बाबतीत माझेकडून कळत नकळत काही शब्द वापरले गेले त्या प्रसंगाविषयी मी दिलगिरी व्यक्त करतो.

सभा कामकाजाबाबत जी नियमावली निश्चित केलेली आहे त्या नियमाप्रमाणे सर्व स. सभासदांनी काम करावे व ही महापालिका एक आदर्श पालिका कशी होईल, यादृष्टीने प्रयत्न करावे अशी मी विनंती करतो.

**डॉ. चेनकरण संचेती** : दिलगिरी व्यक्त करून मा. महापौरांनी सभागृहाचा मान राखला त्याबद्दल मा. महापौर यांचे अभिनंदनाचा ठराव सभागृहापुढे मांडण्यात येतो.

**श्री. अजिज जहागिरदार:** या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**ठराव क्र. २४** : मा. महापौरांनी दिलगिरी व्यक्त केल्यामुळे सभागृहातर्फे त्यांना धन्यवाद देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

**विषय क्र. २५** : दिनांक १६ सप्टेंबर, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद** :

**श्री. एकबालसिंग गिल** : विषय क्र. १६ मध्ये जुनाबाजार येथील आरक्षण क्र. ११ खुली जागा व त्या लगतचे रस्ते वगळण्याबाबत सहा. संचालक नगर रचना पुढील सभेत माहिती देतील, असा निर्णय झालेला असतांना इतिवृत्तात नोंदविलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही पूर्ण करण्यास किमान तीन ते चार वर्षे लागतील व हे काम पूर्ण होणार नाही. तेंव्हा विषय क्र. १६ ला मंजुरी देण्यात यावी, तसेच विषय क्र. १७ व १८ लाही मंजुरी देण्यात यावी.

**मा. महापौर** : सभागृहाने एकदा मंजूर केलेला ठराव, ठराव पास झाल्यापासून तीन महिने त्यात बदल करता येत नाही, असा नियम आहे. तेंव्हा आवश्यकता असल्यास याबाबत फेर ठराव पुढील सभेत दाखल करावा.

**मा. आयुक्त** : शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊनविकास आराखडा तयार करण्यात यावा, असे शासनाचे धोरण आहे. औरंगाबाद शहरी विकास आराखड्यात ४२ ठिकाणी मोकळ्या जागासाठी आरक्षण दाखविण्यात आले आहे. यापैकी आरक्षित केलेल्या ६ मोकळ्या जागा महापालिकेच्या ताब्यात आहेत. उर्वरित आरक्षित करण्यात आलेल्या मोकळ्या जागांवर अतिक्रमणे झाली आहेत. आरक्षण क्र.

११ ची जागा शहराचे विकासासाठी सहा. संचालक नगर रचना यांनी तयार केलेल्या विकास आराखड्यात खुली जागा म्हणून राखीव आहे.

**श्री. अविनाश कुमावत** : महापालिका मालकीच्या खुल्या जागांचे संरक्षण करण्याची जबाबदारी म.न.पा.ची आहे. महापालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने मनपाच्या जागा

**श्री. अविनाश कुमावत** : महापालिका मालकीच्या खुल्या जागांचे संरक्षण करण्याची जबाबदारी म.न.पा. ची आहे. महापालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने मनपाच्या जागा बळकावल्या गेल्या आहेत. आजही शहरात महापालिका मालकीच्या जागांवर प्लॉटींग होत आहे.

**मा. आयुक्त** : पालिका प्रशासनाने याबाबत योग्य ती दखल घेतलेली आहे व त्या संदर्भाने उचित कार्यवाही कार्यरत आहे.

**श्री. एकबालसिंग गिल** : शहरी विकास आराखड्याप्रमाणे आरक्षित केलेल्या जागांबाबत गेल्या १०-१५ वर्षापासून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे नागरीक त्रस्त झाले आहेत.

आरक्षण क्र.११ खुली जागा, या संदर्भाने दि. ०६/१२/८८ च्या पत्रान्वये शासनाने आरक्षणाच्या आखणीत बदल करण्यास अनुमती दर्शविली असून आवश्यक तो ठराव शासनाकडे पाठविण्यास कळविले आहे. तेंव्हा विषय क्र.१६ मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावास सभागृहाने मंजुरी द्यावी.

**डॉ. शांताराम काळे** : स. सभासद श्री. कुमावत एकीकडे आरक्षण वगळण्याचा ठराव मांडत असतांना स. सभासद श्री. खैरे आरक्षित जागा संपादन करण्याचा प्रस्ताव मांडीत आहेत. यात दोन्ही सभासदांच्या भिन्न भूमिका निदर्शनास येतात. तेंव्हा सभागृहाने यावर धोरणात्मक निर्णय घ्यावा.

**श्री गिरजाराम हाळनोर** : इतिवृत्ताचे विषय क्र. १७ मध्ये मो. उस्मानपुरा येथील स. नं. १२ पैकी न.भू.क्र.१८३११ व १८३१०/भाग चे क्षेत्र शैक्षणिक क्षेत्रातून वगळून निवास भागात समाविष्ट करण्यास दि. ०५/०८/१९८८ ठराव क्र. ७१ अन्वये मंजुरी मिळाल्याचा उल्लेख आहे. तेंव्हा ०५/०८/१९८८ ला कोणत्या सभेत हा निर्णय घेण्यात आला याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** : टंकलेखनाच्या चुकीमुळे ०५/०५/८८ ऐवजी ०५/०८/८८ अशी नोंद झालेली आहे. तेंव्हा ०५/०८/८८ ऐवजी ०५/०५/८८ अशी दुरुस्ती करण्यात यावी. तसेच सचिव विभागाने टंकलेखनाचे वेळी अशा प्रकारे चुका होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**श्री. अजिज जहागिरदार:** विषय क्र.१७ मधील मो. उस्मानपुरा येथे स. नं १२ पैकी न. भू.क्र.१८३११ व १८३१०/ भाग ही जागा सरकारी मालकीची नाही याची नोंद घेण्यात यावी.

**श्री. केशव सोनवणे** : विषय क्र.२४ अन्वये सिडको हडको या भागातून शहरात येण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेला १०० फुट रुंदीचा रस्ता वाहतुकीसस सुकर व्हावा या दृष्टीने मजनुहिलपासून तलावाच्या किनाऱ्याने सरळ दिल्लीगेट येथील मुख्य रस्त्यास जोडण्याबाबतच्या प्रस्तावासंबंधीचा एकत्रित अहवाल पुढील सभेत ठेवण्यात यावा असा निर्णय झालेला आहे. तेंव्हा सदर अहवालाबाबत खुलासा व्हावा.

**मा. आयुक्त** : स. सभासदांनी सुचविलेला रस्ता सिडको प्रशासनाकडे आहे. तूर्त यावर विचार करणे योग्य होणार नाही.

**श्री. मोतीराम घडामोडे** : सिडको हडको भाग व शहर यांना जोडणाऱ्या या मुख्य रस्त्यावर होणारी संभाव्य वाढ लक्षात घेऊन स. सभासदांनी सुचविलेल्याप्रमाणे रस्ता तयार करण्याच्यान प्रस्तावास तात्पुरती मंजुरी देण्यात यावी. सदर रस्त्याचे काम करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय होईपर्यंत याबाबतची कार्यवाही करण्याचा पाठपुरावा करण्यात यावा.

**मा. महापौर** : विषय क्र. २४ मधील प्रस्तावाबाबत संबंधित विभागाचे नगरसेवक आणि प्रशासकीय अधिकारी यांनी पुढील आठवड्यात या प्रस्तावाबाबत प्रत्यक्ष पाहणी करून पाठपुरावा करावा.

**श्री. मोतीराम घडामोडे** : विषय क्र. १४ मध्ये सिडको-हडको भागातील तयार स्लॅबची घरे बांधकाम प्रकाराच्या "क" वर्गामध्ये ग्राह्य धरण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्याऐवजी सिडको भागातील नऊ इंच भिंती व कमी व्यासाचे स्लॅब असलेल्या ज्यावर दुसऱ्या किंवा तिसऱ्या मजल्याचे बांधकामाची परवानगी नाही, अशी तयार घरे बांधकाम प्रकाराच्या "क" वर्गामध्ये ग्राह्य धरण्यात यावी अशी दुरुस्ती करावी.

**श्री. गंगाधर गाडे** : स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे सिडकोने बांधून दिलेली घरे "क" वर्गात समाविष्ट करतांना इतरांनी तयार केलेली घरे त्यात समाविष्ट होणार नाहीत काय?

**ठराव क्र. २५** : विषय क्र. १४ मध्ये "सिडको हडको भाग महापालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर या भागातील तयार स्लॅबची घरे बांधकाम प्रकाराच्या "क" वर्गामध्ये ग्राह्य धरून तद्अनुषंगाने मालमत्ता कर आकारणी करण्यात येईल." च्या ऐवजी "सिडको हडको भाग महापालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर या भागातील ९ इंच भिंती व कमी व्यासाचे स्लॅब

असलेली व ज्यांना दुसऱ्या / तिसऱ्या मजल्याच्या बांधकामाची परवानगी नाही, अशा फक्त सिडको हडकोने तयार करून हस्तांतर केलेली घरे बांधकाम प्रकाराच्या "क" वर्गामध्ये ग्राह्य धरून तद्अनुषंगाने मालमत्ता कराची आकारणी करण्यात येईल" या दुरुस्तीसह दि.१६ सप्टेंबर १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. २६ :** पशुधन विकास अधिकारी महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, सन-१९९० या वर्षाकाइी खालील दर्शविलेल्य दिवशीस महानगरपालिका हद्दितील कत्तलखाने (बीफ, मटन, चिकन पोर्क व इतर) बंद ठेवण्यात यावे.

प्रजासत्ताक दिन, रामनवमी, डॉ. आंबेडकर जयंती, महावीर जयंती,शिवजयंती, बौध्द पोर्णिमा, गोकुळ आष्टमी, स्वातंत्र्य दिन, गणेश चतुर्थी, महात्मा गांधी जयंती

वरील दिवशी सन १९८९ या वर्षी शहरातील कत्तलखाने बंद ठेवण्यात आले होते. तरी वरील दर्शविलेल्या दिवशी शहरातील कत्तलखाने बंद ठेवण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गंगाधरा गाडे :** शहरातील बीफ, मीट इ. कत्तलखाने बंद ठेवणे आणि आंबेडकर जयंती यांचा परस्पराशी काहीही संबंध नसल्यामुळे प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे आंबेडकर जयंतीचे दिवशी कत्तलखाने बंद ठेवण्याची आवश्यकता नाही. सबब हा दिवस त्यातून वगळण्यात यावा.

**श्री. रतनकुमार पंडागळे:** म. गांधी जयंती, महावीर जयंती या दिवशी शहरातील कत्तलखाने बंद ठेवण्याचा प्रस्ताव असल्यामुळे आंबेडकर जयंतीलाही शहरातील कत्तलखाने बंद ठवेण्यात यावेत.

**मा. महापौर :** आंबेडकर जयंती ऐवजी महाशिवरात्री या सणाचा समावेश करून प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. तसेच फक्त १९९० ऐवजी पुढील काळाकरिता कत्तलखाने बंद ठेवण्याबाबत विचार करणे योग्य राहील.

**श्री. शंकरराव मगर, श्री. पी. बी. पैठणकर :** आषाढी व कार्तिकी एकादशी हे दोन दिवस प्रस्तावात समाविष्ट करण्यात यावेत.

**डॉ. चेनकरण संचेती :** सभागृहाने मंजूर केलेल्या ठरावावप्रमाणे बंद घोषित केलेल्या दिवशी शहरातील कत्तलखाने बंद राहतील याबाबतची कडक अंमलबजावणी प्रशासनाने करावी.

**मा. उपमहापौर :** शहरातील कत्तलखाने बंदचा विचार करत असतांना कत्तलखान्यावर उपजिविका करणाऱ्या लोकांच्या रोजगारावर परिणाम होणार नाही याचा विचार करावा.

**श्री. अजिज जहागिरदार:** मा. उपमहापौर यांचे सूचनेशी मी सहमत आहे.

**ठराव क्र. २६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन आणि आंबेडकर जयंती हे दिवस वगळून सन १९९० आणि त्यानंतरच्या आगामी कालावधीकरिता निम्ननिर्दिष्ट दिवशी महानगरपालिका हद्दितील सर्व कत्तलखाने, (बीफ, मटन, चिकन, पोर्कव इतर) बंद ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यत येते.

महाशिवरात्री, रामनवमी, आषाढी एकादशी, गोकुळ आष्टमी, गणेश चतुर्थी, कार्तिकी एकदाशी, महावीर जयंती, शिवजयंती, बौध्द पोर्णिमा, महात्मा गांधी जयंती वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ***<u>पुरवणी विषयपत्रिका</u>***

**विषय क्र. २७ :** सि. स. नं. ९६७२/२ शिट नं. ४८ चालता नं. ५० रोशनगेट समी कॉलनी मधील आरक्षण क्र. ४४ चा भाग आरक्षणातून वगळणेबाबत.

विनंतीपूर्वक प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सदर आरक्षणातून काही भाग (मधला) वगळण्यात येवून त्यास जियाउद्दिन ले-आऊट म्हणून मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच दोन्ही बाजूस उरलेल्या जागेवर संपूर्णपणे वसाहत विकसित झालेली आहे व महानगरपालिकेने कर आकारणी करून या भागात सर्व सोयी पाणीपुरवठा, सडके, गटारी, ड्रेनेज पाईपलाईन व वीज पुरवड्ा उपलब्ध करून दिलेला आहे. ही वसाहत गरीब कामगार वर्गाची असून त्यांनी आपापली घरे बांधली आहे. येथे जियाउद्दिन ले-आऊटच्या दोन्ही बाजूस जवळपास शंभर कुटुंबे राहत आहे. महापालिकेने लाखो रुपये खर्च करून उपरोक्त सर्व सोयी उपलब्ध करून दिले आहे.

अशा प्ररिस्थितीत या भागात पार्क करणे जनतेच्या हिताचे ठरणार नाही. म्हणून सदर आरक्षण क्र. ४४ संपूर्ण आरक्षणातून वगळून तेथे वसाहती साठी रितसर परवानगी देवून या भागास आर-१ म्हणून मंजुरी द्यावी करिता प्रस्ताव सादर

सुचक - श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद
अनुमोदक - श्री. बंडू प्रधान
दिनांक - १३/१०/८९

**संवाद** :

**श्री. मुजीब खान** : सभागृहात प्रस्ताव पारित केले जातात पण त्यांची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे जनतेची कामे होण्यास विलंब लागतो. तेंव्हा पारित ठरावाची अंमलबजावणी अविलंब होईल या दृष्टीने मार्ग काढण्यात यावा.

**मा. आयुक्त** : स. सभासदांचे म्हणणे योग्य असले तरी प्रशासनाचे दृष्टीने त्यावर कार्यवाही करण्याबाबत योग्य ती दखल घेणे क्रमप्राप्त असते.

**मा. उपमहापौर** : मा. आयुक्त यांच्या सूचना योग्य असल्या तरी नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन मंजूर झलेल्या ठरावाचा पाठपुरावा करण्यात यावा.

**श्री. यादव अ. सायन्ना** : विकास आराखड्यातील आरक्षणे वगळणे बाबतचे सर्व ठराव

एकत्र करून विकास आराखडा सुधारित करतेवेळी यावर फेरविचार करणे योग्य होणार नाही. अशाप्रकारची कार्यवाही करण्यास लागणारा विलंब लक्षात घेऊन सभागृहाने वेळोवेळी मंजूर केलेले ठराव, शासनाचे मंजुरीसाठी पाठविण्यात यावेत.

**श्री. एकबालसिंग गिल** : स. सभासदांच्या सूचनेशी मी सहमत आहे.

**डॉ. चेनकरण संचेती** : नक्षत्रवाडी, कांचनवाडी यासारख्या बराच भाग महापालिका क्षेत्रात समाविष्ट झालेला आहे. विकास आराखड्यातील आरक्षणे वगळण्याची बरीच प्रकरणे प्रलंबित आहेत. विकास आराखड्यात ज्या जागा आरक्षित केल्या आहेत, अशा जागांवर सुध्दा बांधकाम परवानगी दिली गेली आहे. या शिवाय आरक्षित जागेवर अनाधिकृत बांधकाम होणार नाही या दृष्टीने विकास आराखड्यातील आरक्षणे वगळण्याचा एकत्रित ठरावा पास करण्याऐवजी आरक्षण वगळण्याचे जसजसे ठरावा पास होतील त्याप्रमाणे शासनाचे मंजुरीसाठी पाठविणे योग्य राहील.

**मा. आयुक्त** : विकास आराखड्यातील आरक्षणे वगळण्याबाबत जोपर्यंत शासन मंजुरी देत नाही तोपर्यंत महापालिका प्रशासनाला काहीही करता येणे शक्य नाही.

**श्री.अजिज जहागिरदार** : सिल्कमील कॉलनीमध्ये एक जागा औद्योगिक झोनमध्ये आरक्षित केली आहे. या आरक्षणामुळे त्या ठिकाणी बांधकाम परवानगी दिली जात नाही.

**श्री.स.हुसेन स.अहमद** : विकास आराखड्यातील आरक्षण वगळण्याबाबत झालेली चर्चा लक्षात घेता सभासदाच्या मागणीनुसार आरक्षणे वगळण्याचे प्रकरणा अंतर्गत योग्य मार्ग काढून किमान वेळेत कामे कशी होतील याचा प्रयत्न करावा.

**डॉ. शांताराम काळे** : स. सभासद श्री. यादव अशोक सायन्ना, एकबालसिंग गिल, डॉ. चेनकरण संचेती यांनी जे विचार मांडले ते योग्य आहेत असे मला वाटत नाही, विकास आराखड्याबाबत संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिका व नगरपालिकाकरिता योग्य होईल, अशा दृष्टीने आज ठराव करण्याची गरज आहे. ठराव करतांना त्या-त्या शहरातील प्रत्येक वार्डाकरिता बगीचा, खेळाचे मैदान, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, इत्यादी बाबत संबंधीत वार्डाची लोकसंख्या गृहीत धरून त्यासाठी आवश्यक असलेल्या जागे व्यतिरिक्त १५ ते २५% अधिक जागा आरक्षण करून प्रत्येक वार्डाचा विकास करण्याबाबत विचार व्हावा. यासाठी आवश्यक तो ठरावा पारीत करून शासनाकडे पाठविण्यात यावा.

**श्री. केशव सोनवणे** : ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय कृषी जमिनीचे अकृषिमध्ये रुपांतर होत नाही. ना हकरत प्रमाणपत्रासाठी नागरिकांना वेळोवेळी महापालिकेकडे खेट्या माराव्या लागतात. तेंव्हा नागरिकांचा त्रास लक्षात घेऊन ना हरकत शक्य तितक्या लवकर हस्तांतराची व्यवस्था व्हावी.

**मा. आयुक्त** : ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबत प्रशासनाने केलेल्या नियमाप्रमाणे ना हरकत प्रमाणत्र देण्यात येतील.

**श्री. गंगाधर गाडे** : स. सभासद श्री. मोहसीन अहमद यांनी मांडलेला प्रस्ताव योग्य असून तो मंजूर करावा व पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठवावा.

**मा. महापौर** : शहराचा विकास द्रुतगतीने होणे आवश्यक आहे. अनेक अनाधिकृत वस्त्या झाल्या आहेत. शहराची होणारी वाढ लक्षात घेता ठराविक कामासाठी आरक्षित केलेल्या जागा, त्या आरक्षाणतून वगळण्याचा विचार करणे योग्य होणार नाही. तेंव्हा या दृष्टीने सर्व सभासदांनी विचार करावा. स. सभासद डॉ. शांताराम काळे यांनी व्यक्त केलेल्या विचाराशी मी सहमत आहे. तेंव्हा शहराच्या विकाससंबंधी सभासदांनी दुरदृष्टी ठेवून या निर्णयाप्रत यावे. तसेच विकासाच्या दृष्टीने नगर रचना विभागाकडूनही प्रयत्न व्हावेत. स. सभासदांनी त्यांचे प्रभागाच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना आगामी पंधरा दिवसांत नगररचना विभागाकडे पाठवाव्यात म्हणजे डिसेंबर अखेर पर्यंत यावर विचार करणे सोईचे होईल व सदर ठराव तूर्त स्थगित ठेवावा.

**श्री. नरेंद्र पाटील** : विकास आराखड्यातील आरक्षणे वगळण्याबाबत सभागृहापुढे आलेल्या प्रस्तावाचा विचार केला तर यात (१) ज्या आरक्षित जागांवर मुळात वसाहती झालेल्या आहेत अशी आरक्षणे (२) ज्या जागा विकासाच्या दृष्टीने आरक्षित केल्या असून सध्या मोकळ्या आहेत, अशा प्रस्तावाचा समावेश आहे, तेंव्हा विकासाच्या दृष्टीने आरक्ष्ज्ञित पण मुळात वसाहत झालेली आहे. फक्त अशीच आरक्षणे वगळण्याबाबत विचार व्हावा व शहराचा विकास घडवून आणावा.

**श्री. मोहसिन अहमद** : मागील सभेत प्रस्तावात नमूद केलेल्या जागांपैकी, काही भाग वगळणे संबंधी ठराव पारीत झाला आहे व काही भाग आरक्षित आहे. तेंव्हा आरक्षित असलेला भाग वगळण्यासाठी, ठरावा पारीत करण्यास हरकत नसावी.

**श्री. रतनकुमार पंडागळे**: विकास आराखड्यातील आरक्षण वगळण्याबाबत अनेक ठराव

पारित झाले आहेत, परंतु अशा ठरावांना शासनाकडून अद्याप मंजुरी मिळालेली नाही, ही बाब लक्षात घेऊन मा. महापौरांनी आताच केलेल्या वक्तव्याशी मी सहमत आहे.

**श्री. एकबालसिंग गिल** : आरक्षित जागेसंबंधीचे एकत्रित प्रस्ताव एकत्रितरित्या आहे डिसेंबर मध्ये शासनाकडे पाठविण्याची कार्यवाही पूर्ण होईल. अशी सभागृहाला खात्री देण्यात यावी.

**श्री. तकी हसन खान** : वेगवेगळ्याभागातील आरक्षणे वगळण्याबाबत सभासदांकडून प्रस्ताव मांडले जात आहेत. तेंव्हा आरक्षण वगळण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत सर्व सभासदांनी एकत्र बसून आरक्षणाबाबतचा एकत्रित ठरावा मंजूर करून शासनाकडे पाइवावा व महापालिका प्रशासनातर्फे त्याचा पाठपुरावा करावा.

**मा. महापौर** : माहे डिसेंबर मध्ये आरक्षणे वगळण्यासंबंधी आवश्यक तो ठराव सभागृहापुढे ठेवण्याच्या दृष्टीने मा. आयुक्त आणि सहा. संचालक नगररचना यांनी आरक्षण वगळण्याबाबतची संपूर्ण प्रकरणे एकत्रितरित्या दाखल करण्याची व्यवस्था करावी.

**ठराव क्र. २७** : सर्वानुमते असे ठरले की, विकास आराखड्यातील आरक्षणे वगळण्याबाबतच्या एकत्रित ठरावामध्ये इतर प्रकरणांबरोबर प्रस्तावित प्रकरणाचा समावेश करण्यात यावा.

**विषय क्र. २८** : एकनाथनगर ही वसाहत सध्या गृहनिर्माण मंडळाकडे असून या वसाहीतस औरंगाबाद महानगरपालिके मार्फत पाणी पुरवठा, विद्युत, ड्रेनेज आदी सुविधा पुरविण्यात येत आहेत. ही वसाहत गृहनिर्माण मंडळाकडे असली तरी देखील या वसाहतीमधील सर्व घरांना महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कर तसेच इतर कर आकारलेला आहे. या वसाहतीमधील सर्व नागरिकांनी मालमत्ता कर भरलेला आहे.

एकनाथनगर ही वसाहत गृहनिर्माण मंडळाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यात यावी, तसेच या वसाहतीसाठी सर्व नागरी सुविधा महानगरपालिकमार्फत पुरविण्यात याव्यात. सदरील वसाहत महानगरपालिकेकडे हस्तांतर झ ााल्यानंतर महानगरपालिका या वसाहतीस नागरी प्राथमिक सुविधा पुरवील, जेणेकरून या वसाहती मधील नागरीकांना प्राथमिक नागरी सुविधांचा लाभ मिळू शकेल.

सुचक - श्री. गिरजाराम हाळनोर
अनुमोदक - श्री. प्रदिप जैस्वाल
दिनांक - ११/१०/१९८९.

**संवाद** :

**श्री. अलफखाँ हुसेनखाँ** : एकनाथनगर वसाहत महानगरपालिकेकडे हस्तांतरास विरोध नाही. नगरपरिषद काळात या संबंधी काही करार झाले आहेत. त्यांचे अवलोकन करण्यात यावे, तसेच या भागातील नागरिकांना

गृहनिर्माण मंडळाने दिलेल्या घरा व्यतिरिक्त त्या भागातील नागरिकांनी जे जादा बांधकाम केले आहे. ते ड्रेनेज व पाणीपुरवठा लाईनवर केले आहे. त्यामुळे या भागातील जलनिःसारण वाहिनी चोकअप होतात. तेंव्हा गृहनिर्माण मंडळाने गाळेधारकांना गाळ्याव्यतिरिक्त किती जागा दिली आहे? उरलेली जागा कोणाच्या मालकीची आहे? याबाबतचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर सदर प्रस्तावावर विचार करणे योग्य होईल.

**श्री. मोतीराम घडमोडे :** पालिका प्रशासन गृहनिर्माण मंडळाचे गाळेधारकांकडून मालमत्ता कराची वसूली करते अशी माहिती मिळाली आहे आणि पालिका मालमत्ता कर वसूल करत असेल तर या गाळेधारकांना सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**श्री. तकी हसन खान :** मालमत्ता कर आणि विकास खर्च या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. पालिका प्रशासन विकास खर्च भरल्यानंतरच सुविधा उपलब्ध करून देते तेंव्हा या भागाचाही विकास खर्च प्रशासनाकडे जमा होणे आवश्यक आहे. तेंव्हा या भागाचा विकास खर्च प्रशासनाकडे जमा होण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधी आणि पालिका प्रशासन यांनी मंडळाकडे आग्रह धरावा.

**मा. उपमहापौर :** गृहनिर्माण मंडळाकडून रक्कम रु. १,८०,०००/- वसूल करण्याची कार्यवाही स्वतंत्र्यपणे करावी आणि येथील गाळेधारकांनी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विचार व्हावा.

**श्री. मोतीराम घडामोडे** : मा.उपमहापौरांच्या विचाराशी मी सहमत आहे.

**मा. महापौर :** महापालिका प्रशासनातर्फे थकीत रक्कम वसूल करणेस्तव योग्य तो पाठपुरावा करण्यात यावा. विकास कार्यास्तव निधी संकलनाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

**ठराव क्र. २८** : सर्वानुमते असे ठरले की, गृहनिर्माण मंडळाकडून वसूल करावयाच्या रकमेबाबत पाठपुरावा करावा आणि मगच सुविधा पुरविण्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९ :** औरंगाबाद शहरामधील सर्व्हे क्र. (८) गजानन महाराज मंदिर, जवाहर कॉलनी, प्रभाग क्र. (५८) लगतचा परिसर औरंगाबाद महानगरपालिकेने आरक्षित केलेला असून ह्या परिसरात १००% लोकवस्ती झालेली असून या भागास महानगरपालिकेमार्फत काही नागरी सुविधा पुरविलेल्या आहेत. या भागातील रहिवाशांचे मालमत्तेवर महानगरपालिकेने मालमत्ता करही आकारलेला असून या भागातील नागरिकांनी मालमत्ता व इतर सर्व कर महापालिका कार्यालयात भरणा केलेला आहे.

महापालिकेने हा परिसर ज्या कारणासाठी राखून ठेवला आहे तो उद्देश पूर्ण करणे आता तेथे भरपूर लोकवस्ती झालेमुळे महापालिकेस शक्य होणार नाही.

तरी विनंती की, सर्व्हे नं (८), गजानन मंदिर परिसर हा भाग आरक्षणातून वगळून निवासोपयोग क्षेत्रात समाविष्ट करण्यात यावे, जेणेकरून या भागातील रहिवाशांना महापालिकेच्या प्राथमिक व इतर नागरी सुखसोई व सुविधांचा लाभ मिळेल तसेच या भागातील रहिवाशांकडून मालमत्ता कर वसूल होऊन महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल.

सुचक - श्री. अविनाश कुमावत
अनुमोदक - श्री. चंद्रकांत खैरे.
दिनांक - १३/१०/८९

**ठराव क्र. २९ :** सर्वानुमते असे ठरले की, विकास आराखड्यातील आरक्षणे वगळण्याबाबतच्या एकत्रित ठरावा मध्ये इतर प्रकरण बरोबरच प्रस्तावित प्रकरणाचा समावेश करण्यात यावा.

**विषय क्र. ३० :** शहरामधील अनेक प्रभागामधून ड्रेनेज, रस्ते, पाणीपुरवठा आदी कामांचे प्रस्ताव आलेले असूनही त्या प्रभागामधील विविध विकास कामे आर्थिक तरतूद नाही या सबबी खाली पूर्ण होत नाही. वास्तविक त्या प्रभागामधील नागरिकांनी विकास निधी तसेच मालमत्ता कर तसेच इतर सर्व कर पूर्ण भरलेला असतांना देखिल य भागातील नागरिकांना नागरी सुखसोयी व सुविधा महानगरपालिके मार्फत पुरविण्यात येत नाही. या बाबत खुलासा व्हावा.

सुचक - सौ. लता दलाल
अनुमोदक - श्री. गिरजाराम हाळनोर
दिनांक - १३/१०/८९

**संवाद** :

**मा. महापौर:** सभा कामागाज नियमावलीप्रमाणे प्रत्येक महिन्याच्या २० तारखेच्या आत सर्वसाधारण सभा होते. हे सर्व सभासदांना माहिती आहे. आजच्या विषयपत्रिके वरील व पुरवणी पत्रिके वरील विषय विचारात घेता सभा कामकाज नियमावली प्रमाणे सर्व सभासदांनी त्यांचे पुरवणी प्रस्ताव किंवा प्रश्न प्रत्येक महिनयाचे १० तारखेपूर्वी सचिव कार्यालयाकडे प्राप्त होतील अशी व्यवस्था करावी. या साठी लवकरच एक सर्वसमावेशक धोरण ठरविण्यात येईल.

**ठराव क्र. ३० :** सभागृहासमोर ठेवलेले निवेदन हे प्रस्तावात मोडत नसल्याने प्रशासनाकडून योग्य तो लेखी खुलासा देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३१ :** औरंगाबाद शहरामधील प्रत्येक झोन मधील एकूण मालमत्ता करापैकी किती टक्के मालमत्ता कर आता पर्यंत वसूल झाला? किती मालमत्ता कर प्रत्येक झोननिहाय महानगरपालिकेस येणे बाकी आहे. तसेच हा कर किती वर्षापासून बाकी आहे? शहरातील एकूण किती मालमत्ता कर न्यायालयाचे स्थगिती असल्यामुळे वसूल झाला नाही या बाबत सविस्तर खुलासा विहित नमुन्यात आकडेवारीसह सभागृहात सादर करण्यात यावा.

सुचक - सौ. लता दलाल
अनुमोदक - श्री. चंद्रकांत खैरे
दिनांक - १३-१०-८९

**ठराव क्र. ३१ :** सभागृहासमोर ठेवलेले निवेदन हे प्रस्तावात मोडत नसल्याने प्रशानाकडून योग्य तो लेखी खुलासा देण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३२ :** महानगरपालिकेच्या जकात विभागातील भ्रष्टाचारासंबंधी एका साप्ताहिकात बातमी काही दिवसांपूर्वी छापून आली होती व त्यात वरिष्ठ अधिकारीही गुंतलेले आहेत असे म्हणलेले आहे. तरी याबाबत सविस्तर चौकशी करण्यात येऊन सभागृहात अहवाल सादर करण्यात यावा.

सुचक - सौ. लता दलाल
अनुमोदक - श्री. अविनाश कुमावत
दिनांक - १३/१०/८९

**संवाद** :

**सौ. लता दलाल** : जकात विभागातील भ्रष्टाचारात संबंधी सा. चपराक या वृत्तपत्रात सविस्तर वृत्त प्रसिध्द झालेले आहे. या वृत्तामध्ये जकात अधिक्षक यांचे पीए श्री. चिरागोद्दीन ह्याचे शहागंज भागात टी. व्ही. / व्ही. सी. आर. चे विक्रीचे दुकान असल्याचे कळते या दुकानावर येणारा बराच माल विना जकात आलेला आहे. या प्रकरणाचे प्रसिध्दी नंतर पुन्हा याच साप्ताहिकात जकात विभागातील भ्रष्टाचाराबाबत माहिती प्रसिध्द झाली आहे. यामुळे पालिका प्रशासन आणि पर्यायाने लोकप्रतिनिधींचा अवमान आहे. जकात विभागात काम करणारे क. लिपिक श्री. चिरोगोद्दिन यांचा पूर्वेतिहासही अशाच भ्रष्टाचार केला असल्याची माहिती मिळते. तेंव्हा प्रसिध्द झालेल्या वृत्ताप्रमाणे जकात विभागातील भ्रष्टाचारा बाबत कसून चौकशी व्हावी व यातील दोषी कर्मचाऱ्यांना शासन व्हावे.

**मा. महापौर** : चपराक साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या जकात भ्रष्टाचारा प्रकरणी स्थयी समितीतही चर्चा झालेली आहे. या प्रकरणाचे संदर्भाने विधी विभागाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार** : सा. चपराकचे संपादक यांना या संदर्भात कायदेशिर नोटीस पाठविण्यात आली आहे. सदर नोटीसचे उत्तरी संबंधीत संपादकाने इंग्रजी नोटीसचे मराठी भाषेत भाषांतर करून पाठविण्यास कळविले आहे. त्या प्रमाणे सदर नोटीसचे मराठी भाषांतर करून पाठविण्यास कळविले आहे. त्याप्रमाणे सदर नोटीसचे मराठी भाषांतर करून पाठविण्याची कार्यवाही होत आहे.

प्रशासनाचा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने इंग्रजी नोटीसचे मराठी रुपांतर करून देणेस हरकत नाही असे वाटते.

**डॉ. शांताराम काळे** : सदर प्रकरणी वाद घालण्यापेक्षा मा. महापौर व मा. आयुक्त यांनी या प्रकरणी स्वतः लक्ष घालून शहानिशा करावी.

**मा. महापौर** : प्रसिध्द झालेल्या प्रकरणामुळे सभागृहाची आणि मा. आयुक्तांची बदनामी होत आहे. तेंव्हा या पकरणी चर्चा होणे आवश्यक आहे.

**मा. महापौरांचे संभाषण :** मा. महापौरांचे संभाषण चालू असतांना स. सभासद, श्री. रशिदखान मामू यांनी मा. महापौरांना उद्देशून सदर प्रकरणी त्यांचे विचार मांडण्याबाबत वारंवार मागणी केली. त्यावेळी मासे संभाषण पूर्ण झाल्यानंतर आपण आपले विचार मांडावेत अशी सूचना मा. महापौरांनी स. सभासदांना वारंवार केली असतांनाही स. सभासद, श्री. रशिदखान मामू चढ्या आवाजात आपली मागणी मा. महापौरांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून रेटत राहिले. तंव्हा मा. महापौरांनी सभा कामकाज नियमावलीचे आधारे स. सभासद, श्री. रशिद खान मामू यांचे दस्यत्व एक दिवसासाठी रद्द करण्यात येते असे जाहीर केले. मा. महापौरांच्या उक्त निर्णयाविरुध्द निषेधात्मक घोषणा देत स. सभासद श्री. रशिदखान मामू यांनी सुमारे १.५० वाजता सभागृह सोडले.

**मा. महापौर** : स. सभासद श्री. रशिदखान मामू यांचे विचार ऐकूण न घेता सभासदत्व रद्द करणे यावरून मा. महापौर पक्षपाती धोरण अवलंबतात असे दिसते.

**मा. महापौर** : महापौर पदी निवड झाली त्या वेळीच मी कोणत्याही एका पक्षाचा प्रतिनिधी नसून औरंगाबाद शहराचा प्रथम नागरिक या नात्याने शहराच्या विकासाच्या दृष्टीने काम करेन असे जाहीर केले होते. ही बाब लक्षात घेऊन उपमहापौरांनी अशा प्रकारे निराधार आरोप करू नयेत. तेंव्हा उपमहापोरांनी सभा कामकाज नियमावली प्रमाणे सभागृहाचे कामकाज कसे चालेल याचा विचार करावा.

**मा. आयुक्त** : कोणत्याही प्रकरणाची चौकशी करण्यापूर्वी त्या प्रकरणाविषयी आवश्यक ती माहिती उपलब्ध करून त्याचा विचार करणे आवश्यक आहे. सभागृहात उल्लेख केल्याप्रमाणे जकात पावती पुुस्तका बाबतीत जी चर्चा झाली त्यानुसार उल्लेख केलेली पुस्तके प्रशासनाने छापलेली नाहीत तेंव्हा सभागृहात उल्लेख केलेल्या पुस्तकांबाबत निश्चित माहिती देण्यात यावी.

**श्री. यादव अ. सायन्ना** : साप्ताहिक चपराक मध्ये प्रसिध्द झालेल्या वृत्ताचे संदर्भात स्थायी

समितीमध्ये चर्चा झालेली आहे. त्या दृष्टीने सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारासाठी घेणे योग्य नाही. स्थायी समितीत झालेल्या चर्चेनुसार या प्रकरणी चौकशी करण्यास इतका उशीर का झाला हेच समजत नाही.

**श्री. किशोर थोरात** : मा. उपआयुक्त यांच्या सहीची नक्कल करतांना संबंधित कर्मचाऱ्याने वेतन प्रमाणपत्रधारकाच्या मुळ वेतनामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात अवास्तव वाढ दर्शवून प्रमाणपत्र हस्तांतर केल्याची माहिती मिळाली आहे. तेंव्हा याची चौकशी व्हावी.

**मा. महापौर** : जकात विभागातील भ्रष्टाचाराचे प्रकरणाबरोबरच संबंधित कर्मचाऱ्याने मा. उप आयुक्त यांच्या सहीची नक्कल करून राज कार्पोरेशन यांच्या संगनमताने दुचाकी वाहनांचे संदर्भात अपहार केल्याची माहिती उघडकीस आली आहे.

**श्री. अजिजउल्ला बेगम** : जकात विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या होत्या परंतु या बदल्यांना स्थगिती दिलयाची माहिती मिळाली आहे. तेंव्हा झालेल्या बदल्यांना स्थगिती का व कुणी दिली याचा खुलासा व्हावा.

**ठराव क्र. ३२ :** सर्वानुमते असे ठरले की, मा. आयुक्तांनी सदरचे प्रकरणी स्वतः लक्ष घालून सविस्तर चौकशी करावी व तद् अनुषांगिक अहवाल सर्वसाधारण सभेत दाखल करावा.

**विषय क्र. ३३ :** औरंगाबादमधील माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालया समोरील सार्वजनिक रस्त्या लगतची सध्या रिकामी असलेली जागा कमीत कमी ५ एकर महानगरपालिकेने ताब्यात घ्यावी. तसेच या जागेवर स्वतःचे मालकीची भव्य ईमारत बांधवी.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे
अनुमोदक - श्री. पांडूरंग भिमाजी पैठणकर
दिनांक - १३/१०/८९

**संवाद** :

**सभागृहनेता** : सदर प्रस्तावावर विचार करण्यापूर्वी स. सभासद, श्री. रशिद खान मामू यांचे आजच्या सभासदत्व रद्द प्रकरणी संबंधितांकडून दिलगिरी व्यक्त करणेच्या अटीवर श्री. रशिदखान मामू यांना सभागृहात पुन्हा प्रवेश करण्याची परवानगी द्यावी अशी श्री. मा. महापौर महापौर व सभागृहास विनंती करतो.

**मा. महापौर** : सभागृहाची प्रतिष्ठा राखणे ही सर्व सभासदांची जबाबदारी आहे. कोणत्याही सभासदांबाबत माझ्या मनात वैयक्तिक आकास नाही. कोणत्याही सभासदांना हेतुतः दुखावण्याचा माझा उद्देश नाही.

तेंव्हा सभागृहनेता यांचे विनंती नुसार यापुढे सभागृहाच्या प्रतिष्ठेला बाधा येणार नाही याची खबरदारी घेऊन श्री. रशिदखान मामू यांनी दिलगिरी व्यक्त करावी या अटीवर सभागृह पुनप्रवेशास परवानगी देण्यात येते.

मा. महापौर यांच्या सूचनेप्रमाणे झालेल्या प्रकाराबद्दल श्री. रशिदमामू यांनी सभागृहात प्रवेश करून दिलगिरी व्यक्त केली.

**ठराव क्र. ३३ :** प्रस्तावात दर्शविलेली जागा खाजगी मालकीची असून, या प्रकरणी न्यायालयात वाद चालू आहे. तेंव्हा सदर प्रस्ताव सूचक यांनी परत घ्यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३४ :** औरंगाबाद शहराचे सध्याचे नांव बदलून संभाजीनगर असे ठेवण्यात यावे. छत्रपती संभाजी राजांची राष्ट्रनिष्ठे बाबतची कायम स्मृती रहावी म्हणून या शहराचे नांव बदलण्यात यावे याबाबत.

सुचक - श्री. चंद्रकांत खैर.
अनुमोदक - सौ. लता दलाल
दिनांक - १३/१०/८९

**ठराव क्र. ३४ :** सदर प्रस्ताव वगळण्यात येतो असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३५ :** औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी चालणारे अनाधिकृत कत्तलखाने, बिफ मार्केट, चिकन मार्केट, मच्छी मार्केट त्याच प्रमाणे भर रस्तयावर चालणारी खुली मटन विक्री दुकाने की ज्यामुळे सार्वजनिक आरोग्यास वार्धा येते. अशी सर्व कत्तलखाने, बिफ, मच्छी व चिकन मार्केट आदी दुकानांवर व खुल्या मटन विक्रीवर बंदी घालण्यात यावी, या व्यापाऱ्यांना व दुकान दारांना महापालिकेमार्फत वरील व्यवसाय करण्याचा रिसर परवाना देवून त्यांची दुकाने उदा. सिल्लेखाना, बारुदगरनाला, जाफरगेट, बुढ्ढीलेन, जवाहर कॉलनी, लोटाकारंजा, शहागंज तसेच शहरातील मुख्य ठिकाणी असलेले सर्व खुले मटन, चिकन, मच्छी विक्रीची दुकाने शहराबाहेर योग्य जागी हलविणे बाबत.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे
अनुमोदक - श्री. अविनाश कुमावत
दिनांक - १३/१०/८९

**संवाद :**

**मा. महापौर** : अशा प्रकारचे निवेदन हे प्रस्ताव होऊ शकत नाही. तेंव्हा सभासदांनी यापुढे खबरदारी घ्यावी. पशुधन विका अधिकारी, या प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करतील.

**श्री. तकी हसन खान** : बिफ मार्केटसाठीची जागा घेतली होती, त्याबाबत न्यायालयाकडून मनाई हुकूम मिळाला आहे. बिफ मार्केटसाठी सदर जागा आवश्यक आहे. तेंव्हा न्यायालयातर्फे देण्यात आलेला मनाई हुकूम

उठविण्याची कार्यवाही त्वरित करावी. या मार्केट मुळे दिल्लीगेट, शहाबाजार इ. भागाचा प्रश्न सुटेल, आणि पर्यायाने खुल्या जागांवर अशा प्रकारे मांस विक्री होणार नाही.

**पशुधन विकास अधिकारी:** मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली सदर प्रकरणी सभा बोलावण्यात आली होती. या सभेमध्ये शहराची संभाव्य वाढ लक्षात घेऊन १०% जादा दुकानांचा समावेश असलेल्या २३ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत.

**श्री. अविनाश कुमावत** : मांस विक्री करणाऱ्या दुकान चालकांना प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालनास्तव बंधन घालण्यात यावे.

**श्री. अजिजउल्ला बेग** : पशुधन विकास अधिकारी यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या २३ जागा कोणत्या याचा खुलासा व्हावा.

**श्री. केशव सोनवणे** : शहरात बरीच दुकाने अनाधिकृतपणे चालतात या दुकानाबाबत चौकशी करून अनाधिकृत चालणारी दुकाने नियमित करण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री.पशुधन विकास अधिकारी:** ऑक्टोंबर, १९८८ मध्ये झालेल्या एका बैठकी नुसार शहरातील अस्तित्वात असलेल्या मांस, मासोळी दुकानांची संख्या व नियोजित २५% वाढ असे धरून एकूण २३ ठिकाणी मार्केट बांधण्या बाबतची सविस्तर रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला. अशा प्रकारचे मार्केट तयार झाल्यास उघड्यावर मांस विक्री होणार नाही.

**मा. महापौर** : सभासदांचे विचार लक्षात घेता या आर्थिक वर्षाचे शेवट पर्यंत शहरात कमीत कमी दोन मार्केट विकसित करण्याची कार्यवाही केली जावी. ज्या जागेसंबंधी कायद्याचा प्रश्न उपस्थित केला जाईल, त्यासाठी पर्यायी जागा सुचवावी. त्या संबंधाने प्रशासन योग्य ती कार्यवाही करील.

**श्री. चंद्रकांत खैरे** : बारूदगर नाला भागात दोन दुकाने आहेत, असा असा नुकताच उल्लेख करण्यात आला आहे. तेंव्हा या भागात दोन दुकाने नसून किमान दहा-बारा दुकाने आहेत. या दुकानातून विक्री होणाऱ्या मांसाबाबत त्याच भागात राहणाऱ्या नागरिकांच्या काही तक्रारी आहेत. तेंव्हा या प्रकरणी नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**ठराव क्र. ३५** : स. सभासद, श्री. मोतीराम घडामोडे, श्री. चंद्रकांत खैरे, श्री. अजिमखान दादामिया, श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. अजिज जहागिरदार यांनी या प्रकरणी प्रशासनाचे सहाय्याने कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ३६ :** स्थायी समिती महानगरपालिका, औरंगाबाद ह्यांनी दि. २५/८/८९ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्र. २०७ द्वारे बीड, परभणी व नांदेड इ. ठिकाणी अतिवृष्टी आणि पूर ह्यामुळे आपदग्रस्त झालेल्या लोकांसाठी मुख्यमंत्री महानगरपालिका औरंगाबाद तर्फे एक लाख (रु. १,००,०००) अनुदान सर्वानुमते मंजूर केले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ अन्वये शहराचे बाहेर खर्च करणेस्तव सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. स्थायी समितीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. ३६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बीड, परभणी व नांदेड इ. ठिकाणी अतिवृष्टी आणि पूर ह्यामुळे आपदग्रस्त झालेल्या लोकांसाठी मुख्यमंत्री निधीला औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे एक लाख (रु.१,००,०००) अनुदान देणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३७ :** सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आह की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.परसे-१०८९/प्र.क्र./१७९/८९ कोषागार-१ दि. २८/०७/८९ अन्वये श्री. गं. तु. खाडीलकर, (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१ (कनिष्ठ) संवर्गातील अधिकारी) यांना मुख्य लेखा अधिकारी या संवर्गाबाह्य पदावर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहणी अवधी, परसेवा इत्यादी) नियम १९८१ मधील परिशिष्ट दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती नुसार प्रथमतः दोन वर्षासाठी प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले आहे. परंतु आपल्या महानगरपालिकेत मुख्य लेखाधिकारी हे पद नसून मुख्य लेखा परिक्षक असे पद आहे.

करिता श्री. गं. तु. खाडीलगर यांची दि. ८/९/१९८९ पासून महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहन अवधी, परसेवा इत्यादी) नियम १९८१ मधील परिशिष्ट दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार मुख्य लेख परिक्षक या पदावर प्रथमतः दोन वर्षासाठी प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत व मुख्य लेखाधिकारी या पदाऐवजी मुख्य लेखा परिक्षक हे पद शासनास कळविण्याबाबत ठराव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. गं. तु. खाडीलकर यांची दिनांक ८/९/८९ पासून महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, परसेवा इत्यादी) नियम १९८१ मधील परिशिष्ट दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती नुसार मुख्य लेखा परिक्षक या पदावर दोन वर्षासाठी प्रतिनियुक्तीस तसेच मुख्य लेखाधिकारी या पदाऐवजी मुख्य लेखा परिक्षक हे पद शासनास कळविण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## *परिशिष्ट - दोन*

### शासकीय कर्मचाऱ्यांची स्वीयेत्तर सेवेत बदली करण्यासंबंधातील प्रमाण अटी व शर्ती

**टीप -** या अटीमध्ये जेथे जेथे शासकीय कर्मचारी असा शब्द प्रयोग करण्यात आला असेल तेथे या अटी लागू करतांना शासकीय कर्मचाऱ्यांचे नांव नमूद करण्यात यावे.

सांविधिक महामंडळे, स्वायत्त संस्था धरून स्वीयेत्तर सेवेत शासकीय कर्मचाऱ्यांची बदली करण्याच्या प्रमाण अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत अशा विहित केलेल्या अटी व शर्ती यांच्याबाबत कोणतेही विचलन अनुज्ञेय असणार नाही.

१. <u>प्रतिनियुक्तीचा कालावधी</u>

शासकीय कर्मचारी ज्या तरखेला शासकीय सेवेत पदाचा कार्यभार सुपूर्द करील त्या तारखेपासून स्वीयेत्तर सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला तो आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्विकारील त्या तारखेला समाप्त होईल.

प्रथमतः-... (येथे कालावधी नमूद करावा) वर्षाच्या कालावधीसाठी शासकीय कर्मचारी प्रतिनियुक्तीवर राहील, परंतु.

१) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर, प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्याला परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकारी राखून ठेवील.

२) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्याला मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेत्तर नियोक्त्याला राहिल, मात्र याप्रमाणे परत पाठवण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला/सक्षम अधिकाऱ्याला तीन महिन्याची नोटीस दिली पाहिजे.

३) त्योन मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्याची लेखी नोटीस शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्याला मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहिल.

२. <u>वेतन</u> - शासकीय कर्मचाऱ्याला स्वीयेत्तर सेवेत असतांना सर्वसाधारण नियमांनुसार प्रतिनियुक्तीच्या पदाचे वेतन निश्चित करवून घेणे किंवा जर त्यांची स्वीयेत्तर सेवेत प्रतिनियुक्ती झाली नसती, तर त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी त्याने जे पद धारण केले होते, त्या .. (येथे पदनाम नमूद कराव) पदाकरिता विहित केलेल्या रु.________________ या वेतनमानात मूळ विभागामध्ये जे वेतन घेतले असते ते वेतन अधिक तया वेतनाच्या जास्तीत जास्त २० टक्क्यांइतका दरमहा रु. २५०/ च्या कमाल मर्यादे मर्यादेपर्यंत प्रतिनियुक्ती भत्ता घेणे यापैकी कोणताही पर्याय स्विकारता येईल. मात्र मूळ वेतन अधिक प्रतिनियुक्ती भत्ता यांची एकूण बेरीज, प्रतिनियुक्ती नंतर धारण केलेल्या पदाच्या वेतनमानातील कमाल वेतनाहून किंवा प्रतिनियुक्तीचे पद नियम वेतनावरील असेल तर त्या नियम वेतनाहून अधिक होता कामा नये, तसेच ते कोणत्याही बाबतीत दरमहा रु. ३,०००/- पेक्ष अधिक होता कामा नये. प्रतिनियुक्ती भल्याचा हिशोब करतांना मूळ विभागात स्वतंत्र्य वेतनमानाऐवजी मंजूर केलेले विशेष वेतन विचारात घेता येईल.

जर शासकीय कर्मचाऱ्यांचे प्रतिनियुक्ती पदाचे वेतनमान निवडले आणि त्या वेतनमानातील किमान वेतन हे, त्याचे मूळ वेतन अधिक २० टक्के दराने नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम २० मधील तरतूदी लागू करण्यात येतील आणि प्रारंभिक वेतन, प्रतिनियुक्ती पदाच्या वेतनमानातील मिान वेतनाखालील योग्य त्या रकमेवर अशा रितीने निश्चित केले जाईल की, असे निश्चित केलेले वेतन प्रतिनियुक्ती व्यक्तीच्या

मूळ वेतनात खाली दर्शविलेल्या रकमा मिळवल्या असता येणाऱ्या रकमेपेक्षा अधिक होणार नाही.

| | | |
|---|---|---|
| अ) | रु. ७५० पेक्षा अधिक मूळ वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता | = मूळ वेतनाच्या २५% किंवा रु. २२५/ यापैकी जी अधिक असेल ती रक्कम |
| ब) | रु. ३०० पेक्षा अधिक पण रु. ७५०/- पर्यंत मूळ वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्याकरिता | मूळ वेतनाच्या ३०% किंवा रु. १००/- यापैकी जी अधिक असेल ती रक्कम |
| क) | रु. १०० आणि त्यापेक्षा अधिक पण | मूळ वेतनाच्या ३३ १/२% |

३. **<u>महागाई भत्ता</u> -** शासकीय कर्मचारी राज्य शासनाकडील आपले वेतनमान कायम ठेवील त्याप्रमाणे त्याला राज्य शासनाकडील किंवा स्वीयेत्तर नियोक्त्याकडील नियमानुसार अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

४. **<u>घरभाडे भत्ता / स्थानिक पुरक भत्ता</u> -**

शासकीय कर्मचाऱ्याला राज्य शासनाच्या नियमानुसार वेळोवेळी अनुज्ञेय असेल त्याप्रमाणे घरभाडे भत्ता / स्थानिक पुरक भत्ता मिळण्याचा हक्क असेल पण स्वीयेत्तर नियोक्ता स्वेच्छा निर्णयानुसार स्वीयेतर सेवेच्या नियमान्वये हे भत्ते मंजूर करू शकेल.

५. **<u>पदग्रहण अवधी वेतन आणि बदली प्रवास भत्ता</u> -**

स्वीयेतर सेवेत बदली झाल्यानंतर आणि तेथून परत आल्यानंतर अशा दोन्ही वेळच्या पदग्रहण अवधीमध्ये त्याचे वेतन व प्रवास भत्ता, राज्य शासनाच्या संबंधित नियमानुसार स्वीयेतर नियोक्त्याकडून देण्यात येतील

६. **<u>प्रतिनियुक्तीच्या कालावधीत कर्तव्यार्थ केलेल्या प्रवासाकरिता प्रवास भत्ता</u> -**

शासकीय कर्मचाऱ्याला स्वीयेत्तर सेवेत रूजू झाल्यानंतर कराव्या लागणाऱ्या प्रवासांकरिता राज्य शासनाच्या संबंधित नियमान्वये किंवा स्वीयेत्तर नियोक्त्यांच्या नियमान्वये प्रवास भत्ता आणि दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

७. **<u>रजा</u> -**

अशा बदलीपूर्वी शासकीय कर्मचाऱ्याला लागू असलेले रजेचे नियम बदलीनंतरही त्याला लागू होत राहतील. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ च्या नियम १८(२) मध्ये दिलेल्या कार्यपध्दतीच्या काटेकोरपणे अवलंब करण्यात यावा. स्वीयेतर सेवेतून मुक्त झाल्यानंतर त्याला परस्पर रजेवर जाण्यास स्वीयेत्तर नियोक्त्याने परवानगी देता कामा नये. म्हणजेच प्रथम शासकीय सेवेत रजू होऊन मूळ विभागातील सक्षम प्राधिकाऱ्याकडून नेहमीच्या पध्दतीने त्याने आपली रजा मंजूर करून घेतली पाहिजे.

८. स्वीयेत्तर सेवेच्या दरम्यान किंवा अखेरीस घेतलेल्या रजेच्या कालावधीत द्यावयाच्या कोणत्याही पूरक भत्त्याच्या संबंधातील संपूर्ण खर्च स्वीयेत्तर नियोक्त्याला सोसावा लागेल.

**९.** स्वीयेतर सेवेत असतांना किंवा अशा सेवेच्या अखेरीस महिला शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तिने घेतलेल्या प्रसुती रेजच्या कालावधीत द्यावयाच्या रजा वेतनाचा खर्च स्वीयेतर नियोक्त्याला सोसावा लागेल.

(जेव्हा जेव्हा महिला शासकीय कर्मचाऱ्यांची स्वीयेत्तर सेवेत प्रतिनियुक्ती करावयाची असेल तेंव्हा तेंव्हा तशा अर्थाची विशिष्ट अट समाविष्ट करण्यात यावी.)

**१०. <u>विकलांगता रजेबद्दल रजा वेतन</u> -**

स्वीयेतर सेवेत किंवा अशा सेवेमुहे आलेल्या विकलांगतेबद्दल मंजूर करता येईल अशा रजेच्या संबंधात अशी विकलांगता स्वीयेतर सेवा संपल्यानंतर उघडीकस आली तरीसुध्दा रजा वेतन देण्यांस स्वीयेतर नियोक्ता जबाबदार असेल. अशा रजा वेतनाचा खर्च स्वीयेतर नियोक्त्यांकडून वसूल करण्यात येईल.

**११. <u>रजा वेतन आणि निवृत्ती वेतन अंशदाने</u> -**

ए) परिशिष्ट - चारमध्ये विहित केलेल्या दरानुसार स्वीयेतर नियोक्त्याकडून रजा वेतन आणि निवृत्तीवेतन अंशदाने देण्यात येतील.

बी) स्वीयेतर नियोक्ता, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीपासून पंधरा दिवसांच्या आत किंवा वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी स्वीयेतर सेवेतील प्रतिनियुक्ती समाप्त होत असेल तर स्वीयेतर सेवेच्या अखेरीस पुढील दरांनी वार्षिक रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदाने देईल.

१) रजा वेतन अंशदाने ----------------- दरमहा ------------- रुपये

२) निवृत्तीवेतन अंशदाने ----------------- दरमहा ------------- रुपये

अंशदानाच्या रकमा पुढील लेखाशिर्षकाखाली जमा कराव्यात

(एक) रजा वेतन अंशदान - (योग्य ते अर्थसंकल्पीय शीर्ष नमूद करावे) (ज्या सेवा लेखाशिर्षाखाली अधिकाऱ्यांचे वेतन खर्ची टाकले जाते, त्यासेवा लेखा शिर्षाला अनुरूप असे जमा शीर्ष येथे नमूद करावे किंवा जेंव्हा त्या प्रधान शीर्षाशी अनुरूप असे कोणतेही जमा शीर्ष नसेल तेंव्हा, ०६५, इतर प्रशासकीय सेवा-सी-इतर सेवा (टी) इतर जमा रकमा (-------------) रजा वेतन अंशदान हे शीर्ष नमूद करावे.

(दोन) निवृत्तीवेतन अंशदान इ ६६ निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ यांच्या संबंधातील अंशदाने व वसुलीच्या रकमा-ए- वर्गण्या व अंशदाने (एक) स्वीयेतर सेवेतील अधिकारी उपरोक्त दर लेखा परिक्षा कार्यालयाकडून कायम केले जाईपर्यंत तात्पुरते मानले जातील आणि ते भूतलक्ष्मी प्रभावाने समायोजित करता येतील.

सी] स्वीयेतर सेवेतील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत रजा वेतनाची किंवा निवृत्ती वेतनाची देय असणारी अंशदाने पूर्वीक्त कालावधीत दिली गेली नाहीत तर, शासनाने स्पष्टपणे सूट दिलेली नसल्यास, स्वीयेतर नियोक्ता हा अदत्त अंशदानाच्या रकमेवर, म्हणेच पूर्वीक्त कालावधीत संपण्याच्या तारखेपासून अंशदाने अंतिमरित्या दिल्याच्या तारखेपर्यंत देय होणाऱ्या रकमेवर दर दिवशी प्रत्येक १०० रुपयांस दोन पैसे या दराने शासनाला व्याज देईल. शासकीय कर्मचारी किंवा स्वीयेतर नियोक्ता यापैकी ज्याने अंशदान भरले असेल तो व्याज देईल.

डी] रजा वेतन अंशदान आणि निवृत्तीवेतन अंशदाने निरनिराळ्या लेखाशिर्षकाकडे जमा केली जात असल्यामुळे ती वेगवेगळी भरावीत आणि कोणत्याही बाबीदाखल शासनाकडून वसूल करावयाच्या येणे रक्कमांची अशा अंशदानांमधून वजावट करण्यात येऊ नये.

**१२. <u>रजा मुदती प्रवास सवलत</u> -**

या विषयावरील राज्य शासनाच्या संबंधित नियमान्वये शासकीय कर्मचाऱ्याला रजा मुदती प्रवास ववलत मिळण्याचा हक्क असेल. या संबंधातील खर्च स्वीयेतर नियोक्त्याला सोसावा लागेल.

**१३. <u>रजेचे रोखीकरण</u> -**

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ च्या नियम ७३ अन्वये अनुज्ञेय असलेल्या अर्जित रजेच्या रोखीकरणाचा लाभ घेण्याचा हक्क शासकीय कमचाऱ्यांना असेल, रजा वेतनावर प्रदेय असणाऱ्या पूरक भत्यांचा महागाई भत्त्याचा खर्च स्वीयेतर नियोक्त्याला सोसावा लागेल.

**१४. <u>वैद्यकीय सेवा सवलती</u> -**

शासकीय कर्मचाऱ्याला महाराष्ट्र नागरी सेवा सुविधांपैकी कमी प्रतीच्या नसतील अशा सुविधा मिळण्याचा हक्क असेल आणि त्यावरील खर्च स्वीयेत्तर नियोक्त्याला सोसावा लागेल.

**१५. <u>सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची वर्गणी</u> -**

शासकीय कर्मचारी विहित नियमानुसार ज्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार असेल त्याच निधीला वर्गणी देणे चालू ठेवील.

**१६. <u>विभागीय चौकशी</u> -** जर शासकीय कमचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरू करावयाची असेल तर त्याला त्याच्या मूळ विभागाकडे परत पाठवण्यात येईल. शासन त्याला निर्वाह भत्ता देईल. पण तो स्वीयेत्तर नियोक्त्याकडून वसूल करण्यात येईल.

**१७. <u>बोनस / सानुग्रह प्रदान</u> -**

(ए) दरमहा जास्तीत जास्त रु. १,६०० वेतन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याला बोनस प्रदान अधिनियम, १९६५ अन्वये ज्यांनी कायदेशीररित्या बोनस देणे आवश्यक आहे,त्या सार्वजनिक उपक्रमांमध्ये तो तात्पुरत्या बदली असेल, तेंव्हा अशा उपक्रामंनी जाहिर केलेले सानुग्रह प्रदान स्विकारण्यास परवानगी देता येईल.

**टीप** :- वरील (ए) मध्ये वेतन याचा अर्थ बोनसप्रदान अधिनियम १९६५ च्या कलम २(२१) मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे पगार किंवा मंजुरी असेल व त्यामध्ये वेतन, कोणतेही असलयास विशेष वेतन आणि महागाई भत्ता यांचा समावेश होईल. प्रतिनियुक्ती भत्ता हा विशेष वेतन म्हणून वर्गीकृत करण्यात आल्यामुळे तो देखील हिशोबात घेण्यात यावा या प्रयोजनांकरिता शहर पूरक भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी हिशोबात घेण्यात येऊ नयेत.

**टीप** :- २ वरील टीप १ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे दरमहा जास्तीत जास्त रुपये १,६०० इतके वेतन घेणाऱ्या प्रतिनयुक्त शासकीय कर्मचाऱ्यांना केवळ असे सानुग्रह प्रदान स्विकारण्याची परवानगी देण्यात येईल.

**टीप** :- ३ शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा रु. ७५० पेक्षा अधिक असेल तेंव्हा, सदर वेतन दरमहा रु. ७५० आहे असे मानून सानुग्रह प्रदान किंवा यथास्थिती बोनस यांची गणना करण्यात येईल. अशा उपक्रमांमध्ये प्रतिनियुक्तीवर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला देण्यात येणाऱ्या सानुग्रह प्रदानाची किंवा बोनसची जास्तीत जास्त रक्कम, कायद्याने प्रदेय असलेल्या बोनसप्रमाणे दरमहा रुपये ७५० पेक्षा अधिक नसलेल्या वेतनाच्या २० टक्क्यापर्यंत मर्यादित असावी.

**१८. <u>प्रपत्र बढती</u>**

शासकीय कर्मचारी प्रतिनियुक्तीवर असतांना त्याची मूळ विभागात बदली होण्याची वेळ आली असेल तर सर्वसाधारणपणे त्याची प्रतिनियुक्ती पुढे चालू ठेवू नये. तथापी जर सक्षम प्राधिकाऱ्याने त्याची प्रतिनियुक्ती पुढे चालू ठेवली तर त्याला प्रतिनियुक्ती भत्ता न देता निकट निम्नता - नियमानुसार बढतीच्या पदाचे वेतन मंजूर केले जाईल आणि बिकट - निम्नता- नियमाचा लाभ सहा महिन्यानंतर अनुज्ञेय असणार नाही.

**१९. <u>कायमचे सावेशन</u>**

जर मागाहून त्या शासकीय कर्मचाऱ्यांची सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या स्वायत्त मंडळाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवांमध्ये सामावून घेतले जाण्याची इच्छा असेल तर, तो समावून घेतला जाईल, तया तारखेस शासकीय सेवेतून निवृत्त झाल्याचे मानले जाईल.

**विषय क्र. ३८ :** सहाय्यक आयुक्त -१ यांनी प्रस्ताव सदर केला आहे की, श्री. जी. व्ही जंबगी, कार्यकारी अभियंता यंची प्रतिनियुक्ती महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ मुंबई यांचे आदेश क्र. एल.ई.ओ/१०८९/३१०/आ-१/दि. १८/८/८९ अन्वये कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) या पदावर सोबतच्या अटी व शर्ती प्रमाणे त्यांच्या कार्यमुक्तीच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधी करिता प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले आहे.

श्री. जी. व्ही. जंबगी, कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग, लातून येथून दि. ११/९/८९ रोजी कार्यमुक्त झाले आहेत.

करिता श्री. जी. व्ही. जंबगी, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनिः स्सारण) यांची दि. १९/९/८९ पासून तीन वर्षाकरिता महानगरपालिका, औरंगाबाद येथे प्रतिनियुक्ती वरील कालावधीस सोबतच्या अटी व शर्ती नुसार मंजुरी देण्या बाबत ठराव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. जी. व्ही जंबगी, कार्यकारी अभियंता यांची प्रतिनियुक्ती महाराष्ट्र पाणी पुरवझ व जलनि:सारण मंडळ, मुंबई यंचे आदेशानुसार कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा या पदावर सोबतचे अटी व शर्ती प्रमाणे) त्यांच्या कार्यमुक्तीच्या दिनांकापासून तीन वर्षाऐवजी दोन वर्षाकरिता दि.११/९/८९ पासून कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) या पदावर करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

# ANNEXURE – 1

Terms and conditions of deputation of pereign service

**1) <u>Period of Deputation</u>** :- The foreign service shall commence from the date the office hands over charge of the post & will expire on the date be

sesumes charge of his post under Board. The office shall be on reputation for a period of year in the first enstance provided that :-

i. Board reserves the right to recall him any time before expiry of the period of deputation, is his service are required by board in the interest of Board services:
ii. If his services are not required by the foreign employer, it shall be open to the foreign employer to reverst him to the Board by the foreign employer besore affecting such reversion : and
iii. It is open to him to revert to the Board after he gives a notice of not less than three months in writing to Board of his intention to do so.

2) **Pay** :- While an fereign service, he shall draw pay which he would have drawn in the parent department but for his reputation an foreign service in the pay scales mentioned below viz.

Which he held immediately prior to his deputation plus deputation allowance equal to 20% of that pay subject to maximum of Rs. 250/- per mensem, provided that the sum total of “Basic Pay” plus deputation allowance does not exceed the maximum of the scale of pay of the post held on deputation or where the post on deputation is an a fixed pay, that fixed pay & provided further it does not in any case exceed Rs. 3000/- per month.

For the purpose of computing the deputation allowance, the special pay, which as sanationed in lies of a separate scale of pay in the parent department, may be taken into account.

3) **Dearness Allowance** :- The officer will be entitled to draw dearness allowance is admissible under the Board.

4) **House rent Allowance / Compensatory Loacl Allowance** :-

The officer will be entitled to draw House Rent Allowance / Compensatroy Loacal Allowance as admissible under the board rules from time to time.

5) **Joining Time Pay and Transfer Travelling Allowance** :-

His pay and traveling allowance during the joining time both transfer to an reversion from foreign service shall be paid by the foergn comloyer in accordance with the Bombay civil service rules.

6) **Travelling Allowance for Journey on Duty during the period of deputation** : -

He will be entitled to Travelling Allowance and daily Allowance for Journeys undertaken after joining the foreign service according to the Bombay Civil service rules or under the rules fo the foreign employer.

7) **Leave** :- He will continue to be governed by the leave rules applicable to him before such transfer. The procedure laid down in Bombay Civil services rules 558 should be followed scrupulously on being relieved from foreign service he will not be allowed to proced an leave direot by the foreign comployer. i. e. without first joining board service and without getting his leave sanctioned by the competent authority in the parent department in the usual manner.

8) **Leave salary on Account of disability leave** :- The foreign employer shall be liable to pay leave salary in respect of any disability leave that may be granted on account of disability incurred in or through foreign service even though such disability manifests if sels offer the fermination of foreign service. The leave salary charge of such leave shall be recovered from the foreign employer.

9) The whole expenditure in respect of any compensalory allowances for the period of leave taken during of at the end of foreign service shall be born by the foreign employer.

10) **Leave Salary and Pension Contribution** :-

a) The leave salary and pension contributions shall be paid by foreign employer In accordance with the rates prescribed in Appendix VII-A of the Bombay Civil Service Rules as amended from time to time.

b) The foreign employer shall pay leave and pension contribution annually within fifteen days from the end of each financial year or at end of the foreign service, if the deputation on foreign service expires befor the end of a financial year at the rates to be communicated by the concerned superintending engineer, to the board and foreign employer.

The amount of contributions on account of pension and leave salary should be paid to the Maharashtra water supply and sewerage Board directly under intimation to the superintending Engineer.

If contributions for leave salary or pension which are due in respect as the officer in foreign service are not paid within the prescribed period. The foreign employer shall pay to board unless it is speciafically remitted by board interest on the unpaid contribution at the rate as two paise a day or Rs. 100 upon the amount due from the date of expiry of the period after said upto the date an which the contribution are finally paid. The interest shall be paid by the officer of the foreign employer accordingly as the contribution is paid by the former or the later.

11) **Leave Travel Concession** :- He shall be entitled to the leave travel concession as admissible to government servants under government resolution finance department no. TRA. 1163/2726 V Dt. The 23rd Octomber, 1963 as amended from time to time. The expenditure in this respect shall be barne by the foreign employer.

12) **Encashment of leave** :- He shall be entitled to the benefit of encashment of earned leave in accordance with the government resolution, finance department No. LEV. 2726/145/76/SER-9 dated the 31st March 1976 has amended from time to time. The expenditure on account of compensatory allowance payable on the leave salary shall be borne by the foreign employer.

13) **Medical Concessions** :- He shall be entitled to medical facilitieds not infericr to those admissible under Maharashtra water supply and Sewerage Board employers medical benefit regulation 1980 and the cost of that account shall be borne by the foreign employer.

14) **General Provident Fund Subscription** :-

He shall eontinue to his subscription to the general provident fund of which he is a member in accordance with the prescribed rules.

**15) <u>Departmental Enquiry</u>** :-

If a departmental enquiry is to be instituted againt the Board servant, he shall be reverted to board. The substance allowance shall be paid by board, but it will be recovered from the foreign employer.

**16) <u>Bonus</u>** :- The officer shall be permitted to accept bonus dedared by the foreign employer to the extent and subject to conditions mentioned in Government Resolution, Finance Department No. FNS-1067/79-67/x dated 15$^{th}$ November, 1969.

**17) <u>Proforma Promation</u>** :-

If while an deputation the officer becomes due for promation in the Board he should not ordinarily be continued an deputation. If however, he is continued an deputation by the competent authority, he will be allowed the pay of the promotion post under the N. B. R. without any deputation allowance and that the benefit of N. B. R. will not be admissible beyond six months.

**18) <u>PERMANENT ABSORPTION</u>** :-

If subsequently the officer desires to get absorbed in the services of the public sector undertaking he shall be required to regign his appointment under Board and Permanent absorption shall be with effect from the date of accepjnee of the refignation.

**19) <u>Group Saving Linked Insurance Scheme</u>** :-

Shall ensure that the recovery of the subseription towards the Maharashtra water supply and sewerage Board Group Saving Linked insurance scheme is effected in respect of Shri. Promptly and credit the same by demand draft in savour of M.W.S.S.B. New Bombay

**20) <u>Recovery of House Rent</u>** :-

If while on deputation the officer is provided with residential quarters and the board permitted to refain the quarters while an deputation, the borrowing body will have to pay standard rent of the quarters of the board plus service charges, However, the officer pay amount of standared rent, plus service charges or at the rate tipuated in Boards's rules from time to time as rent to the borrowing body.

**विषय क्र. ३९ :** मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगपुरा येथील नाथ मार्केट (सुपर मार्केट) इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. लाईट फिटींग, लिफ्ट उभारणी इ. कामे पूर्ण करून लवकरच सदरचे शॉपिंग सेंटर तीन मजली (तळ मजला, अधिक तीन मजले) असून तळ मजल्यात चार दुकाने व पहिल्या मजल्यावर १४ दुकाने अशी १८ दुकाने आहेत. तर दुसरा मजला व तिसरा मजल्यावरील गाळे ऑफिससाठी भाड्याने देण्यासाठी आहेत. सदर शॉपिंग सेंटर बांधणीसाठी कार्यालयाने

मोठ्या स्वरुपाची आर्थिक मुंतवणूक केलेली आहे. त्यामुळे या शॅपिंग सेंटर पासून मोठ्या स्वरुपाचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

(अ) या शॉपिंग सेंटर मधील गाळे (विशेषतः तळमजला व पहिल्या मजल्यावरील १८ दुकाने) निविदा पध्दतीने जास्तीत जास्त भाडे देणारांना भाड्याने देण्याचा प्रस्ताव आहे व दुसऱ्या व तीसऱ्या मजल्यावरील गाळे शासकीय, निमशासकीय कार्यालये, बँका, सहकारी खाते यांना भाड्याने देण्याबाबत विचार केला जावा व काही गाळे शिल्लक राहीले तर अर्ज मागवून योग्य भाडे देणारांना भाड्याने देण्याचा प्रस्ताव आहे.

अ पध्दतीने सदरचे शॉपिंग सेंटर भाड्याने देण्या संबंधात कार्यालयाने धोरण मसूदा तयार केलेला आहे जो विचारास्तव सोबत सादर करण्यात येत आहे.

(ब) सदरचे शॉपिंग सेटंर बांधण्यासाठी कार्यालयाने मोठी आर्थिक गुंतवणूक केलेली आहे. तेंव्हा जास्तीत जास्त रक्कम अनामत (डिपॉझिट) घेवून निविदा पध्दतीने शॉपिंग सेंटर भाड्याने देण्यात यावे व वसूल होणारी डिपॉझिटची मोठी रक्कम इतर विकास कामासाठी वापरावी अशी सूचना मा. महापौर यांनी पत्र क्र. महापौर/स्वी.स./२२५/८९ दि.०३/१०/८९ अन्वये केलेली आहे.

शहर अभियंता यांनी शॉपिंग सेंटर पासून मिळणाऱ्या अनामत रकमेचा व भाडे उत्पन्नाचा अंदाज दिलेला आहे. तसेच सहाय्यक संचालक, नगररचना यांनी भाडे उत्पन्नाचा अंदाज दिलेला आहे. वरील दोन्ही अंदाजाचे स्वतंत्र तक्ते सोबत जोडण्यात आलेले आहेत. ह्याप्रमाणे किंवा त्यापेक्षा अधिक भाडे आल्यावरच दुकाने किरायाने देण्या संबंधीची कार्यवाही करण्यात येईल.

सदरचे शॉपिंग सेंटर भाड्याने देण्यासाठी निश्चित स्वरुपाची प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी अ व ब बाबत विचार होऊन निर्णय होणेस्तव प्रस्ताव

**संवाद** :

**मा. महापौर** : नाथ सुपर मार्केट येथील दुकाने भाड्याने देणे बाबत नियम तयार केले आहेत. नियम तयार करतांना शासनाचे धोरणाप्रमाणे ५% जागा दुर्बल घटाकांसाठी ठेवण्यात आल्या आहेत. त्या नियमाबाबत सभासदांनी त्यांच्या सूचना तीन दिवसांत मा. आयुक्त यांच्याकडे पाठवाव्या.

**श्री. रतनकुमार पंडागळे** : ५% ऐवजी ३४% जागा दुर्बल घटाकांसाठी राखीव ठेवण्यात याव्यात.

**श्री. गंगाधर गाडे** : मार्केट मध्ये ५% जागा राखीव ठेवण्यात याव्यात असे शासनाचे बंधन नसून फक्त डायरेक्टीव्हज (नितीनिर्देशक) आहेत, तंव्हा अनुसूचित जाती / अनु. जमाती सह ३४% राखीव गाळे ठेवण्यात यावे.

**मा. महापौर** : नाथ सुपरमार्केटसाठी प्रशासनाने बराच पैसा खर्च केला आहे. प्रशासनाने खर्च केलेल्या रकमेपैकी थोडा का होईना पैसा वसूल व्हावा हा उद्देश समोर ठेवून दुर्बल घटाकांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ५% जागा योग्य आहेत. तेंव्हा सभासदांनी या प्रश्नाचा आग्रह धरू नये.

**श्री. स. अहमद स. हुसेन:** नाथ मार्केटच्या भाड्या बाबतचे तक्त्यावरून रुपये ४८०/- हा दर कमी वाटतो. या मार्केटसाठी झालेला खर्च लक्षात घेता त्यात वाढ करावी.

**मा. महापौर** : स. सभासदांच्या सूचनेशी मी सहमत आहे. या मार्केट मधील प्रत्येक दुकानावर नंबर टाकून टेंडर मागविण्यात यावे त्यानंतर योगय तो निर्णय घेण्यात येईल.

**डॉ.श्री.चेनकरण संचेती :** नाथ मार्केटमधील दुकाने भाड्याने देताना जास्तीत जास्त डिपॉझिट व कमीत कमी भाडे ही पध्दत अवलंबिली गेली तर योग्य होईल.

**मा. आयुक्त** : डिपॉझिटच्या बाबतीत काही प्रमाणात डिपॉझिट घ्यावे व जास्तीत जास्त भाडे घ्यावे हे धोरण ठरविणे योग्य राहील.

**श्री. तकी हसन खान** : नाथ मार्केट मधील दुकाने भाड्याने देतांना जास्तीत जास्त अनामत व कमीत कमी भाडे हे तत्व ठेवल्यास सामान्य नागरिक त्यापासून वंचित राहील त्यादृष्टीने सर्वसमावेशक धोरण ठरविण्यात यावे.

**श्री.अजिज जहागिरदार :** जास्तीत जास्त भाडे, प्रमाणशिर अनामत हे धोरण ठेवल्यास नागरिक न्यायालयात जाऊन मनाई हुकूम आणण्याची शक्यता आहे.

**मा. महापौर** : या प्रस्तावात सोबतचे तक्त्यातील दर कायम करून भाडे निश्चित करण्यात यावे. यासाठी टेंडर मागविण्यात यावे.

**ठराव क्र. ३९** : सर्वानुमते असे ठरले की, नाथ मार्केट येथील गाळे भाड्याने देतांना या गाळ्यासाठी प्रशासनाने दर्शविलेल्या अनामत रकमेबाबत पुन्हा विचार करण्यात येऊन ती कायम करण्यात यावी आणि प्रत्येक गाळ्याचे भाडे करण्यासाठी जाहिररित्या निविदा मागवून नियमाप्रमाणे गाळे भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *नाथ मार्केट भाड्याने देणे बाबत धोरण*

नाथ मार्केट भाड्याने देणे बाबत धोरण ठरविण्यासाठी दि. ११/०५/८९ रोजी संत एकनाथ रंगमंदिर येथे बैठक घेण्यात आली. मा. उप आयुक्त यांचे प्रमुख उपस्थितीत सदरची बैठक झाली, त्यात सहाय्यक संचालक नगर रचना, शहर अभियंता व मालमत्ता अधिकारी यांचा सहभाग होता.

तळ मजल्यावरील चार दुकाने व पहिल्या मजल्या वरील चौदा दुकाने भाड्याने देण्याबाबत खालीलप्रमाणे धोरण ठेवण्या बाबत ठरले.

१) सदरची दुकाने निविदा पध्दतीने जास्तीत जास्त भाडे देणाऱ्यास भाड्याने दिली जातील.

२) या दुकानांना कार्यालयाकडून दुकान नंबर दिले जातील व प्रत्येक दुकानासाठी स्वतंत्र्य निविदा स्विकारली जाईल, मात्र एका पेक्षा जास्त दुकान एका व्यक्तिस

दिले जाणार नाही. अर्जाची (निविदा फार्मची) किंमत १००/- रुपये ठेवली जाईल. अर्जासोबत शॉपिंग सेंटरची माहिती पुरिवणारे बुकलेट निविदा भरणे सोईचे व्हावे म्हणून पुरविण्यात येईल. निविदा सोबत रुपये ५,०००/-ची अनामत घेतली जाईल. अस्विकृत निविदेची अनामत तात्काळ परत केली जाईल, व स्विकृत निविदेची अनामत कराराचा कालावधी संपल्यानंतर परत केली जाईल. मात्र या अनामत रकमेवर व्याज दिले जाणार नाही. अनामत रक्कमेसाठी किंवा अगाऊ भाडयासाठी बँक गॅरंटी किंवा एफ. डी. आर स्विकारले जाणार नाही.

३) पांच वर्ष मुदतीचा भाडे पट्टा (करार) केला जाईल.

४) १८ वर्षाखालील व्यक्ती अर्ज करण्यास पात्र राहणार नाहीत, असे अर्ज आल्यास विचारात घेतले जाणार नाहीत.

५) (अ) निविदा स्विकृत झाली असे कळविल्यापासून एक महिन्याचे आत एक वर्षाचे अगामी भाडे भरण्याचे स्विकृत निविदा धारकांवर बंधन राहील, तो पर्यंत त्यास दुकानाचा ताबा दिला जाणार नाही. जर त्यानी एक महिन्याचे आत रक्कम भरली नाही तर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. आणि ॲलाटमेन्ट रद्द करण्यात येईल.

५ (ब) निविदा स्विकृत झाल्यानंतर एक वर्षाचे आगाऊ रक्कम भाडे भरणा केल्यानंतर पुढील करार काळात सुध्दा याच पध्दतीने दर वर्षाचे आगाऊ भाडे भरावे लागेल. नसता दुकान खाली करून घेण्याचा महानगरपालिकेस अधिकार राहील अशा वेळी ५,०००/- रुपयेची अनामत जप्त करून दुकान दुसऱ्यास भाड्याने देण्याचा महानगरपालिकेस अधिकार राहील.

६) दर पाच वर्षांनी सुधारित भाडे आकारण्याचा तसेच नियम अटी सुधारित करण्याचा महानगरपालिकेस अधिकार राहील. भाडेकरूस सुधारित भाडे व सुधारित अटी मान्य असल्यास भाडे पट्टा नुतनिकरण करून देण्याचा अधिकार महानगरपालिकेला राहील. यावेही सुध्दा अनामत रक्कम रुपये ५,००० भरावी लागेल. किंवा आधीच्या करार काळातील अनामत पुढे कायम ठेवता येईल

७) भाडेकरूस मालमत्ता कर वगळता इतर कर (सेस) नियमाप्रमाणे भाड्याव्यतिरिक्त भरावे लागतील. तसेच लिफ्टमॅन, वॉचमॅन, स्विपर इत्यादीचे खर्चा पोटी दरमहा रुपये ५/- प्रति चौ. मिटर मेन्टेनन्स चार्जेस सेवा शुल्क भाड्या व्यतिरिक्त भरावे लागेल.

८) दुकान परस्पर हस्तांतर करून देण्याचा, पोट भाडेकरू ठेवण्याचा भाडेकरूस अधिकार राहणार नाही. दुकान तारण ठेवण्याचा किंवा त्यावर, आर्थिक बोजा करण्याचा अधिकार भाडेकरूस राहणार नाही असे निदर्शनास आल्यास अनामत जप्त करून दुकान खाली करून दुसऱ्यास भाड्याने देण्याचा महानगरपालिकेस अधिकार राहील.

९) भाडेकरूस दुकानात फेरबदल करण्याचा अधिकार राहणार नाही. दुकानचे स्वरुपात बदल किंवा उपयुक्ततेस बाधा येईल, असे बांधकाम करता येणार नाही. महानगरपालिकेची लेखी परवानगीने किरकोळ दुरुस्ती व रंग रंगोटी भाडेकरूस स्वखर्चाने करून घ्यावी लागेल.

१०) दुकानाचा वापर जड वस्तु ठेवण्यासाठी किंवा गोडावून म्हणून करता येणार नाही.

११) विद्युत मिटर भाडेकरूस स्वखर्चाने घ्यावे लागेल. मात्र महानगरपालिकेची ना हरकत घेतल्याशिवाय त्यास विद्युत मिटर घेता येणार नाही. विद्युत देयकास भाडेकरू जबाबदार राहील.

१२) ज्या इसमाकडे किंवा त्यांचे कुटुंबातील घटकाकडे महानगरपालिकेचे इतर शॉपिंग सेंटर मधील दुकान भाड्याने आहे अशांना या दुकानासाठी अर्ज करता येणार नाही.

१३) राजकीय / सामाजिक किंवा धार्मिक पक्षाचे कार्यालयासाठी या शॉपिंग सेंटर मधील जागा भाड्याने दिली जाणार नाही.

१४) या शॉपिंग सेंटरमधील दुकाने / गाळे हॉटेल, देशी दारु दुकान, विदेशी दारु दुकान, बार, मटन शॉप, स्फोटक वस्तू व ज्वालाग्रही वस्तू (विक्री / साठा) चे व्यवसायासाठी भाड्याने दिले जाणार नाहीत.

१५) कोणत्याही मागण्या कोणतेही कारण न देताना रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना राहील. एका गाळ्यासाठी एकच मागणीदार आल्यास ते स्विकृत करणे किंवा नकारण्याचा किंवा वाटाघाटी करण्याचा अधिकार त्यांना राहील.

१६) तळ मजला व पहिला मजला मिळून एकूण १८ दुकाने या शॉपिंग सेंटर मध्ये आहेत. शिवाय या शॉपिंग सेंटर उभारणीस कार्यालयाने मोठ्या स्वरुपाची गुंतवणूक केली आहे. तेंव्हा जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याचे हेतूने या शॉपिंग सेंटर मध्ये राखीव दुकाने न ठेवता इतरत्र कार्यालय जे शॉपिंग सेंटर / टपरी लहान जागा उभारील त्यात राखीव दुकाने ठेवणे योग्य होईल.

१७) दुसरा व तिसरा मजला देण्यासाठी शासकीय, निमशासकीय कार्यालये, बँका, सहकारी खाते, फक्त त्यांना देण्यांत येईल, जर काही गाळे शिल्लक राहिले तर त्यासाठी अर्ज मागविण्यात यावेत व त्यांनी योग्य भाडे दिल्यास त्यांना भाड्याने द्यावेत.

**विषय क्र. ४० :-** मुख्य लेखा परिक्षक योनी प्रस्ताव सादर केला आहे की, केंद्र शासनाच्या भंगी मुक्ती योजनेनुसार महानगरपालिकेच्या हद्दित सुमारे ४००० (चार हजार) जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर जलौधित करण्यासंबंधीचे योजनेस प्रति संडास रु. २,२००=०० या हिशोबाने एकूण खर्च रुपये ८८,००,०००=०० येणार असून सदर खर्चापैकी ५०% रक्कम रुपये ४४,००,०००=०० केंद्र शासनाकडून अनुदानाचे रुपात व २५% रक्कम २२,००,०००=०० महानगरपालिका आणि २५% रक्कम रुपये २२,००,०००=०० संडासाचे रुपांतर करून घेणाऱ्या धारकास करावयाचा आहे.

सदर योजनेची त्वरित अंमलबजावणी लक्षात घेता आणि महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता सदर योजना महानगरपालिकेच्या फंडातून राबविणे शक्य नाही. करिता सदर योजना यशस्विरित्या पार पाडण्यासाठी वरील एकूण रक्कम रुपये ८८,००,०००=०० पैकी ५०% रक्कम रु. ४४,००,०००=०० हडको कडून कर्ज (लोन) घेणे आवश्यक आहे. तसेच संडासाचे रुपांतर धारकांकडून २५% रक्कम जमा झाल्यानंतर आणि हडको कडून वरील कर्ज मंजूर झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात येईल करिता हडको कडून सदर कामासाठी रु. ४४,००,०००/- (चौरेचाळीस लाख) कर्ज घेण्याच्या प्रस्तावास मंजुरीसाठी सादर करीत आहे.

**ठराव क्र. ४० :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या भंगी मुक्ती योजनेनुसार महापालिका हद्दितील सुमारे ४,००० जुन्या पध्दतीचे संडासाचे रुपांतर जलौधित करण्याच्या योजनेची त्वरित अंमलबजावणी आणि महापालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता सदर योजना महापालिकेच्या फंडातून राबविणे शक्य नसल्यामुळे योजना यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी रक्कम रु. ४४,००,०००=०० हडको कडून कर्ज घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. हडको कडून मिळणारे आणि लाभ धारकांकडून २५% रक्कम जमा झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१ :-** मुख्य लेखा परिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहा कन्सलटन्सी नुसार शहरातील विविध भागात टाकणेत येणाऱ्या नियोजित मुख्य जलनिःसारण वाहिण्यांच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम (यादी जोडल्यानुसार) रुपये ३,१०,८७,५००/- आहे. योजनेवर येणाऱ्या एकूण खर्चापैकी १.२० कोटी शासनातर्फे अनुदानाच्या रुपात मिळणार आहे. (पहा शासन निर्णय क्र. एएमसी/१८८९/३२१/सिआर-१६/नवि-२४/दिनांक २७ सप्टेंबर, १९८९) उर्वरित रक्कम रुपये १.९० कोटीचा खर्च महापालिकेस करावा लागेल. परंतु महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता सदर खर्च करणे महानगरपालिकेस शक्य नाही. करिता सदर रक्कम हडको कडून कर्जाच्या रुपाने घेणे आवश्यक आहे. करिता सदर कामी रक्कम रुपये १.९० कोटी हडकोकडून कर्ज घेण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ४१ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहा कन्सल्टन्सी नुसार शहरातील विविध भागात टाकण्यात येणाऱ्या नियोजित मुख्य जलनिस्सारण वाहिन्यांच्या कामासाठी येणाऱ्या एकूण रक्कम रुपये ३,१०,८७,५००/- च्या खर्चापैकी रककम रुपये १.२० कोटीचा खर्च दि.२७ सप्टेंबर, १९८९ च्या पत्रानुसार शासनातर्फे अनुदानाच्या स्वरुपात मिळणार असला तरी उर्वरित रक्कम रुपये १.९० कोटीचा खर्च महापालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, पालिकेस करणे शक्य नसल्यामुळे या योजनेसाठी हडको कडून रक्कम रुपये १.९० कोटी कर्जाच्या रुपाने घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२ :-** औरंगाबाद महानगरपालिकेच्या सुधारित पाणी पुरवठा योजना टप्पा २ भाग १ ही योजना महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिसःसारण मंडळातर्फे राबविण्यात येत आहे त्याची एकूण अंदाजित रक्कम २७.२७ कोटीची आहे. त्या पोटी महानगरपालिकेस १०% लोकवर्गणी २.७२ कोटी भरावयाची आहे. महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती पहाता व स्वतःचे उत्पन्नातून इतर योजना राबविणे सोईस्कर व्हावे म्हणून सदरची रक्कम एल.आय.सी. कडून कर्ज रुपाने घेणे योग्य होईल.

शहराचे पाणी पुरवठा योग्य प्रकारे होणेस्तव सदरची योजना त्वरित पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे लोकवर्गणी भरणेसाठी एल.आय.सी. प्रचलित नियम व अटी अन्वये २.०० कोटी रुपये कर्ज उचलण्यास व पाणी पुरवठा आणि जलनिसःसारण मंडळाला प्राधिकृत करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ४२ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या सुधारित पाणी पुरवठा योजना टप्पा २ भा १ करिता महापालिकेतर्फे लोकवर्गणीच्या स्वरुपात भरावयाची रक्कम रुपये २.७२ कोटी पाणीपुरवठा व जलनिसःस्सारण मंडळाला प्राधिकृत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. महापालिकेची

सध्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता आणि स्वत:चे उत्पन्नातून इतर योजना राबविणे सोईस्कर व्हावे या दृष्टीने सुधारित पाणीपुरवठा योजना टप्पा २ भाग १ करिता लोकवर्गणी भरणेसाठी प्रचलित नियम व अटी अन्वये एल.आय.सी. कडून कर्ज रुपाने रक्कम रुपये २.०० कोटी उचलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३ :-** महापौर श्री स्पर्धा घेण्याकरिता जिल्हा शरील शौष्ठव संघटना, करीम कॉलनी, औरंगाबाद २) जिल्हा शरीर सौष्ठव संघटना, औरंगाबाद या दोन संस्थेतर्फे महापौर श्री स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. गतवर्षी महानगरपालिकातर्फे दोन्ही संस्थेला अनुक्रमे रु. ५,०००/- व रु. १०,०००/- अनुदान देण्यात आले होते. तथापि औरंगाबाद जि.श.सौ. संस्थेतर्फे महापौर श्री स्पर्धा आयोजित करण्यात आली नाही व रु.१०,०००/- चा हिशोब मनपात दाखल करण्यात आलेला नाही.

तेंव्हा या वर्षी महापौर श्री ही स्पर्धा उपरोक्त संस्थतर्फे घेण्यात यावी किंवा महापालिका क्रिडा विभागातर्फे घेण्यात यावी. या विषयीचे धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ४३ :-** महाराष्ट्र शासकीय पातळीवरील राज्य शरीर सौष्ठव संघटनेशी संलग्नित असलेल्या औरंगाबाद जिल्हा स्थित शरीर सौष्ठव संघटने संबंधीची अधिकृत माहिती मागवून तद्अनुषंगाने महापौर श्री स्पर्धा आयोजनार्थ अधिकृत शरील सौष्ठव संघटनेस प्रत्येकी रक्कम रुपये ५,०००/- (पाच हजार मात्र) चे अनुदान समायोजन दाखल करण्याचे अटीवर हस्तांतर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४ :-** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतिचौक ते चिकलठाणा विमानतळ पर्यंतचा रस्ता सार्वजनिक बांधकाम खाते औरंगाबाद यांनी दुरुस्त केलेला आहे. हा रस्ता महानगरपालिकेस हस्तांतरित करण्या बाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी पत्र क्र. ३१७६ दिनांक २४/४/८९ प्रमाणे विनंती केलेली आहे व महाराष्ट्र शासनही सदरहू रस्ता महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यास इच्छुक आहे. त्यानुसार प्रस्तावित केलेला क्रांतिचौक ते विमानतळ (फक्त) पर्यंतचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांचे कडून हस्तांतरीत करून घेणेस प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ४४ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडील पत्र क्र. ३१७६/दिनांक २४/४/८९ अन्वये क्रांतीचौक ते विमानतळ (फक्त) पर्यंतचा रस्ता सार्वजनिक बांधाकाम विभाग, औरंगाबाद कडून महापालिकेकडे हस्तांतरित करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५ :-** शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यानी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहरातील सादिया टॉकीजच्या मागच्या बाजूस (पूर्वेस) असलेल्या खदानीत शॉपिंग सेंटर बांधण्याचे प्रयोजन हाती घेण्याच्या विचाराधीन आहे.

ह्या इमारतीचे नकाशे स्तुप कन्सल्टंट मुंबई ह्यांच्या कडून बेसमेंट फ्लोअर व जी + ४ साठी तयार करून घेण्यात आले आहे. सध्या ह्या इमारतीचे बेसमेंट फ्लोअर व जी + २ इतके बांधकाम करण्याचे विचाराधीन आहे. ज्याचे एकूण चौथरा क्षेत्र

(बिल्टअप) ६९१७ वर्ग मी. म्हणजेच ७४४२७ वर्ग फुट आहे व या ईमारतीसाइी अंदाजित खर्च रु. २,३८,१५,०००/- एवढा अपेक्षित आहे. ज्यात सर्व बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

तसेच त्या इमारतीचे बेसमेंट फ्लोअर व जी + २ चे चटई क्षेत्र (कार्पेट) ३२७० चौ. मी. म्हणजेच ३५१८७ चौ. फुट आहे व त्याप्रमाणे प्रति वर्ग फुट रु. ६७७/- दर अपेक्षित आहे.

१) या इमारतीचा बेसमेंट फ्लोअर मध्ये एकूण १५ गोदामे असून ज्याचे एकूण चटई क्षेत्र २९२ वर्ग मी. आहे. त्याच प्रमाणे बेसमेंट फ्लोअर मध्येच कार पार्कींगचेही प्रयोजन करण्यात आलेले आहे.

२) ग्राऊंड फ्लोअरमध्ये एकूण ५२ दुकानांचे प्रयोजन करण्यात आलेले असून त्याचे एकूण चटई क्षेत्र ८१३ वर्ग मी. म्हणजेच एकूण ८७४५ वर्ग फुट आहे.

३) पहिल्या मजल्यावर एकूण १४ दुकानांचे प्रयोजन करण्यात आलेले असून त्याचे एकूण चटई क्षेत्र ४३५.१७ वर्ग मी. आहे. तसेच ह्याच मजल्यावर एक रेस्टॉरंट व एक बँकसाठी प्रयोजन करण्यात आलेले आहे. त्याचे चटई क्षेत्र अनुक्रमे ३८६.३५ व २७९.८३ वर्ग मी. आहे.

४) दुसऱ्या मजल्यामध्ये एकूण ३३ दुकानांचे प्रयोजन करण्यात आले असून त्याचे एकूण चटई क्षेत्र १०६४.२१ वर्ग मी. आहे म्हणजेच ११४५१ वर्ग फूट.

५) या इमारतीच्या बांधकामासाठी, प्रति चौरस फुटाप्रमाणे बांधकामासाठी रक्कम अनामत म्हणून घेण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी साधारण कमीत कमी दोन वर्षाचा अवधी लागेल आणि जे लोक अनामत रक्कम भरतील त्याचे नांव लॉटरी ड्रॉ करिता नोंदविण्यात येईल. लॉटरी ड्रामध्ये जर त्यांचे नांव आल्यास त्यास गाळा देण्यात येईल. मात्र अनामत रक्कम महानगरपालिकेकडे जोपर्यंत गाळा धारकांकडे गाळा आहे तोपर्यंत विना व्याजी राहील.

प्रति चौरस फुटाचे भाडे, सहाय्यक संचालक, नगर रचना नियमावलीनुसार ठरविण्यात येईल व ते गाळेधारकास बंधनकारक राहील.

प्रति ५ वर्षांनंतर गाळ्याचे भाडे नूतनीकरण करण्यात येईल.

**ठराव क्र. ४५ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील सादिया टॉकिजच्या मागच्या बाजूस (पूर्व ) असलेल्या खदानीत बांधण्यात येणाऱ्या शॉपिंग सेंटरच्या (बेसमेंट फ्लोर व जी + ४ या इमारतीचे नकाशे स्थूप कन्सल्टंट मुंबई ह्यांच्या कडून तयार करून घेण्यात आलेले) इमारतीचे बेसमेंट फ्लोअर व जी + २ इतके बांधकाम करण्यासाठी रु. २,३८,१५,०००/- च्या अपेक्षित , अंदाजित खर्चास आणि खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) या इमारतीचे बेसमेंट फ्लोअर व जी + २ चे चटई क्षेत्र (कार्पेट) ३२७० चौ. की. म्हणजेच ३५१८७ चौ. फुट आहे व त्याप्रमाणे प्रति वर्ग फुट रु. ६७७/- दर अपेक्षित आहे.

२) या ईमारतीचा बेसमेंट फ्लोअर मध्ये एकूण १५ गोदामे असून ज्याचे एकूण चटई क्षेत्र २९२ वर्ग मी. आहे त्याप्रमाणे बेसमेंट फ्लोअर मध्ये कार पार्कींगचेही प्रयोजन करण्यात आलेले आहे.

३) ग्राऊंड फ्लोअरमध्ये एकूण ५२ दुकानांचे प्रयोजन करण्यात आलेले असून त्याच एकूण चटई क्षेत्र ८१३ वर्ग मी. म्हणजेच एकूण ८७४५ वर्ग फूट आहे.

४) पहिल्या मजल्यावर एकूण १४ दुकानांचे प्रयोजन करण्यात आलेले असून त्याचे एकूण चटई क्षेत्र ४३५.१७ वर्ग मी. आहे. तसेच ह्याच मजल्यावर एक रेस्टारंट व एक बँकसाठी प्रयोजन करण्यात आलेले आहे. त्याचे चटई क्षेत्र अनुक्रमे ३८६.३५ व २७९.८३ वर्ग मी. आहे.

५) दुसऱ्या मजल्यामध्ये एकूण ३३ दुकानांचे प्रयोजन करण्यात आले असून त्याचे एकूण चटई क्षेत्र १०६४.२१ वर्ग मी. आहे म्हणजेच ११४५१ वर्ग फूट.

६) या इमारतीच्या बांधकामासाठी, प्रती चौरस फुटाप्रमाणे बांधकामासाठी रक्कम अनामत म्हणू घेण्याचे प्रस्तावीत आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी साधारणतः कमीत कमी दोन वर्षाचा अवधी लागेल आणि जे लो अनामत रक्कम भरतील त्यांचे नांव लॉटरी ड्रॉ करिता नोंदविण्यात येईल. लॉटरी ड्रॉ मध्ये जर त्यांचे नांव आल्यास त्यास गाळा देण्यात येईल. मात्र अनामत रक्कम महानगरपालिकेकडे जोपर्यंत गाळा धारकांकडे गाळा आहे. तोपर्यंत विना व्याजी राहील.

प्रति चौरस फुटाचे भाडे, सहाय्यक संचालक, नगर रचना नगर रचना नियमावलीनुसार ठरविण्यात येईल व ते गाळा धारकास बंधनकारक राहील.

प्रति ५ वर्षानंतर गाळ्याचे भाडे नुतनिकरण करण्यात येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

जन गण मन या राष्ट्रगीतानंतर मा. महापौर यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०/११/१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, १९८९ रोजी सकाळी ११.०० वा. मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभुवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | स. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग | उपमहापौर |
| २) | स. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | स. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | -//- |
| ४) | स. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | -//- |
| ५) | स. श्री. अजिजउल्ला बेग वाहेद बेग | -//- |
| ६) | स. श्री. गंगाखेडकर रतनकुमार नारायणराव | -//- |
| ७) | स. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | -//- |
| ८) | स. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | -//- |
| ९) | स. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | -//- |
| १०) | स. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | -//- |
| ११) | स. श्री. प्रधान बंडू गोविंदराव | -//- |
| १२) | स. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | -//- |
| १३) | स. श्री. जावेद हसन खान कासिम खान | -//- |
| १४) | स. श्री. तकी हसन खान कासीम खान | -//- |
| १५) | स. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | -//- |
| १६) | स. श्री. ओक जयवंत केशव | -//- |
| १७) | स. श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग | -//- |
| १८) | स. श्री. वंजारे पीटर प्रभाकरराव | -//- |
| १९) | स. श्री. अ. रशीद खान (मामू) अ. हमीद खान | -//- |
| २०) | श्रीमती दलाल लता श्रीनिवास | -//- |
| २१) | स. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | -//- |
| २२) | स. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | -//- |
| २३) | स. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | -//- |
| २४) | स. श्री. छापरवाल रमेश नारायण | -//- |
| २५) | स. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल | -//- |
| २६) | स. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | -//- |
| २७) | स. श्री. डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल | -//- |
| २८) | स. श्री. म. इस्माईल अ. करीम | -//- |
| २९) | स. श्री. फैय्याजखान अहमदखान | -//- |
| ३०) | स. श्री. अलीम बेग मिर्झा कलिम बेग | -//- |

| | | |
|---|---|---|
| ३१) | स. श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद | -//- |
| ३२) | स. श्री. स. हुसेन स. अहमद | -//- |
| ३३) | स. श्री. मगर शंकर जिजाराम | -//- |
| ३४) | स. श्री. मानकापे नामदेवराव शामराव | -//- |
| ३५) | स. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | -//- |
| ३६) | स. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | -//- |
| ३७) | स. श्री. अलफखान हुसेनखान | -//- |
| ३८) | स. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | -//- |
| ३९) | स. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | -//- |
| ४०) | स. श्री. थोरात किशोर गोविंदराव | -//- |
| ४१) | स. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव | -//- |
| ४२) | स. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव | -//- |
| ४३) | स. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. | -//- |
| ४४) | स. श्री. गोडसे आनंद जगदीश | -//- |
| ४५) | स. श्री. जहागिरदार अजिज मुख्तार अहमद | -//- |
| ४६) | स. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | -//- |
| ४७) | स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | -//- |
| ४८) | स. श्री. परेदशी सुभाष शिवलाल | -//- |
| ४९) | स. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | -//- |

"वंदे मातरम् " या गीताने सभेची सुरुवात झाली. स. सभासद, श्री. चंद्रकांत खैरे यांनी सुचविले की, स. नगरसेवक, श्री. केशव सोनवणे यांचे वडील, श्री. काशिनाथ सानेवणे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले आहे. तेंव्हा सभागृहातर्फे त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

स. सभासद, श्री. केशव सोनवणे यांचे वडील श्री. काशिनाथ सोनवणे यांचे दुःखद निधनानिमित्त सभागृहाने ००.२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. ४६ :-** दिनांक १८ ऑक्टोंबर १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद** :

**श्री. मोतीराम घडामोडे** : विषय क्र. २५ आणि त्या संदर्भातील चर्चेत सिडको-हडको भागातील तयार घरे बांधकाम प्रकाराच्या "क" वर्गामध्ये ग्राह्य धरण्यास मंजुरी मिळाली असली तरी या संदर्भाने मंजूर करण्यात आलेल्या वृत्तात "च्या ऐवजी" या शब्दाचे जागी "त्या व्यतिरिक्त" अशी किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**श्री. चंद्रकांत खैरे** : विषय क्र.३४ मध्ये सदर प्रस्ताव वगळण्यात येतो. असा उल्लेख आहे त्या ऐवजी सदर प्रस्ताव "स्थगित करण्यात येतो" अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**ठराव क्र. ४६ :-** स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे विषय क्र. २५ मध्ये "सिडको-हडको भागातील तयार घरे बांधकाम प्रकाराच्या "क" वर्गामध्ये ग्राह्य धरण्यात येतील या मंजुरीत नोंदविण्यात आलेल्या "च्या ऐवजी" या शब्दाचे जागी "त्या व्यतिरिक्त" आणि विषय क्र. ३४ मध्ये सदर प्रस्ताव वगळण्यात येतो "च्या ऐवजी" "सदर स्थगित करण्यात येतो" या दुरुस्तीसह दिनांक १८/१०/१९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात आली

**विषय क्र. ४७ :-** मौजे भावसिंगपुरा येथील भिमनगर या वसाहतीसाठी स्मशान भुमीची सोय होण्याच्या दृष्टीने क्रमांक एएमसी/एमसी/पीए/८८/३६४/ दिनांक २८.१०.८८ अन्वये तहसिलदार, औरंगाबाद यांनी मौजे भावसिंगपुरा येथील स.नं. ४५/१ व ४५/२ या जागा स्मशान भुमीसाठी सुचविल्यानुसार जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या जमिनीच्या भुसंपादनासंबंधी अभिप्राय मागविला असता या बाबत सहाय्यक जिल्हाधिकारी ,औरंगाबाद यांनी चौकशी करून जिल्हाधिकारी , औरंगाबाद यांना सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी , औरंगाबाद यांनी मौजे भावसिंगपुरा येथील स.नं. ४८ पैकी १ एकर जागा संपादन करण्यास सुचविले आहे.

स.नं.४८ भावसिंगपुरा या जमिनीपैकी स्मशानभुमीसाठी १ एकर जागासाठी भूसंपादन करता येईल. परंतू या जागेत जाण्या येण्यासाठी स.नं. ६२ च्या जमिनीतून अकृषी पोच रस्ता नाही. त्यामुळे भिमनगर भावसिंगपूरा या वसाहतीतून प्रस्तावित स्मशानभूमी पर्यंत जाण्यास किमान २५ फुट रूंद रस्त्याचेही भुसंपादन करावे लागेल, तरी स.नं.४८ भावसिंगपुरा पैकी १ एकर जमिन स्मशानभुमीसाठी व स.नं.६२ व ४८ पैकी २५ फुट रुंद पोच रस्त्यासाठी अंदाजे १७ गुंठे इतकी जमिन संपादन करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ४७ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा, भिमनगर या वसाहतीसाठी स.नं. ४८ भावसिंगपूरा या जमिनीपैकी स्मशानभुमीसाठी संपादन करण्यात येणाऱ्या एक एकर जमिन आणि भावसिंगपुरा वसाहतीतून प्रस्तावित स्मशानभुमी पर्यंत जाण्यासाठी स. नं. ६२ व ४८ पैकी जमिनीतून २५ फुट असलेली १७ गुंठे इतकी , जमिन संपादन करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८ :-** मोहल्ला गांधीनगर पदमपूरा येथील मंजुर विकास योजनेनुसार न.भु.क्रमांक १९४०० ते १९४०५ व १९६०१ ते १९६०४ मधून ३० फुट रूंद व पुढे न.भु.क्र. १९५९४ ते १९५९७ व आरक्षण क्र. ९६ आरोग्य केंद्र पर्यंत व त्यापुढे ४० फुट रूंद रस्त्याची आखणी नं.भु.क्र. १९५९४ ते १९५९७ या भुखंडा वरून जाते व भुखंडाच्या लगत २५ फुट रस्ता आहे. तेथील विकसित झलेल्या कॉलनीचे स्वरूप व त्यातील अस्तित्वातील रस्ते विचारात घेता या ठिकाणी म्हणजेच प्लॉट क्र. १९५९४ ते १९५९७ पर्यंत ४० फुट रूंद रस्त्याची आवश्यकता वाटत नाही. त्यासाठी २५ फुट रस्त्याच्या आखणीत संलग्न ३० फुट रुंद रस्ता दुरूस्त करणे योग्य होईल. त्यासाठी न.भु.क्र. १९५९४ ते १९५९७ या भुखंडा वरून जाणारी ४० फुट रस्त्याची आखणी कमी करून अस्तित्वातील २५ रूंद रस्त्यास ३० फुट रूंद करणे योग्य होईल. सबब ४० फुट रस्त्याच्या आखणीत बदल करून तो ३० फुट रूंद प्रस्तावित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही साठी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**ठराव क्र. ४८ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गांधीनगर, पदमपुरा येथील विकसित झालेल्या कॉलनीचे स्वरुप व त्यातील अस्तित्वात असलेले रस्ते विचारात घेता मंजूर विकास योजनेतील न. भु. क्र. १९५९४ ते १९५९७ या भूखंडावरून जाणारी ४० फुट रूंद रस्तयाची आखणी कमी करून अस्तित्वात असलेल्या २५ फुट रुंद रस्त्यास ३० फुट रुंद प्रस्तावित करण्यासाठी मंजूर विकास योजनेतील ४० फुट रुंद रस्त्याच्या आखणीत बदल करून सदर रस्ता ३० फुट रुंद करण्यासाठी महाराष्ट्र प्रोदशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३ अन्वये गौण फेरफार करण्यांस सर्वानुमते, मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९ :-** सहाय्यक आयुक्त -१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सध्या विधी विभागात कामाचा व्याप जास्त वाढलेला आहे व दिवसेंदिवस प्रकरणे जास्त दाखल होत आहेत. बऱ्याच प्रकरणांत एकटया विधी सल्लागार यांना लक्ष दयावे लागते. न्याय प्रविष्ठ प्रकरणातील उत्तरे तयार करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करावी लागते.वादग्रस्त व गुंतागुंतीच्या प्रकरणांत कायदेविषयक मत द्यावे लागते. महत्वाच्या प्रकरणांत न्यायालयात हजर रहावे लागते. ही सर्व कामे एकटया विधी सल्लागारांना पहावे लागतात.

वरील कामाचा व्याप लक्षात घेता विधी सहाय्यक हे एक नविनल पद वेतनश्रेणी ३३५-६८० या वेतन श्रेणीत निर्माण करण्यात येईल. सदरील पदाची वेतनश्रेणी ज्येष्ठ लिपीकाच्या वेतनश्रेणीच्या समान असल्यामुळे मंजुर ज्येष्ठ लिपीक संवर्गाच्या पदामधून एक पद कमी करून त्याचे रूपांतर विधी सहाय्यक या पदात वेतन श्रेणी ३३५-६८० मध्ये करण्याबाबत विधी सहाय्यक या पदावर नियुक्ती महानगरपालिकेच्या सेवा नियमात जी तरतुद करण्यात आली आहे. व त्या नियमात अंतिम मंजुरी मिळेल अशा अटीवर करण्यात येईल.

करीता एक विधी सहाय्यक हे पद वेतनश्रेणी रू.३३५-६८० वर निर्माण करण्याकरीता प्रस्ताव मंजुरीस्तव व आदेशास्तव सादर.

**संवाद** :

**श्री. श्री. चंद्रकांत खैरे** : सदर प्रस्तावावर पुढील सभेमध्ये विचार करण्यात यावा.

**मा. महापौर** : महानगरपालिका विधी विभागामार्फत नेमणूक केलेल्या विधीज्ञ पॅनलचे कामकाजा बाबत मा. महापौर यांनी सभागृहापुढे नाराजी व्यक्त केली, व या विषयाचा प्रस्ताव पुढील माहितीसह चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे सूचविले.

**विधी सल्लागार** : सहाय्यक आयुक्त-१ यांनी सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी ठेवण्याच्या संदर्भात विधी विभागाकडे प्रशासनाच्या मंजुरीने व विधी विभागातील कामाच्या वाढत्या व्यापामुळे या पदाच्या निर्मितीसाठी सभागृहाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

**मा. आयुक्त** : विधी विभागाच्या, विधी सहाय्यक या पदाच्या बाबतीत सभागृहासमोर मान्यतेसाठी हा विषय ठेवण्यात आलेला आहे या पदाची नियुक्ती महानगर पालिकेच्या सेवा नियमाप्रमाणे व त्यात घालू न देण्यात आलेल्या अटीवर करण्यात येणार आहे.

**श्री. अजिज जहागिरदार:** प्रशासनाने सभागृहात केलेल्या खुलाशाप्रमाणे विधीज्ञांच्या पॅनल

बाबतची माहिती त्यांचे कामकाजावरून योग्यता ठरवावी.

**डॉ. शांताराम काळे** : न्यायालयाच्या कामाची सर्वसामान्य माहिती सभागृहाला आहेच. न्यायालयाकडून निघालेल्या नोटीसेस संबंधीत इसमावर बजावण्यास बऱ्याच अडचणी येतात. ही बाब लक्षात घेऊन कार्यालयाचे विधी सल्लागार आणि पॅनलवर काम करणारे विधीज्ञ यांना काही अधिकार देण्यात यावेत आणि अडचणीच्या वेळी तत्परतेने पैसा उपलब्ध करून देण्या बाबत लेखा विभागास सूचना देणे आवश्यक आहे.

**ठराव क्र. ४९ :-** सर्वानुमते असे ठरले की, या प्रस्तावावर पुढील सभेत विचार करण्यात यावा.

**विषय क्र. ५० :-** महानगरपालिकेने ठराव क्र. ७७४ दिनांक ३१-३-८७ अन्वये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना गणवेश द्यावयाचे विनियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये मंजुर केले आहेत. सदरील विनियम क्र.३ तक्ता अ कलम ६ मध्ये गणवेश मान्य असलेल्या सेवकांना व चतुर्थ श्रेणी स्त्री व पुरूष संवकांना गणवेशासाठी लागणारा ख्र्च रू.२५०/- असा दर्शविलेला आहे.

तथापी स्थायी समितीच्या विषय क्र.७५०,७५४/६ दिनांक ५-१-८९ च्या चर्चेद्वारे सदरील गणवेशासाठी प्रत्यक्षात लागणारा खर्च विनियमात दाखविलेल्या खर्चापेक्षा जास्त असल्यामुळे सदरील खर्च रू.२५०/- ऐवजी रू.५००/- अशी विनियमामध्ये दुरूस्ती करण्यास मंजुरी दिली आहे.

गणवेश मान्य असलेल्या व चतुर्थ श्रेणी सेवकांना द्यावयाचा गणवेश खर्च रू.२५०/- ऐवजी रू.५००/- असा विनियम क्र.३ तक्ता अ कॉलम ६ मध्ये बदल करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. ५० :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना गणवेश द्यावयाचे विनियम क्र. ३ तक्ता "अ" कॉलम ६ मध्ये गणवेश असलेल्या सेवकांना व चतुर्थ श्रेणी स्त्री पुरुष सेवकांना गणवेशासाठी लागणारा खर्च रु. २५०/- असा असून गणवेशासाठी लागणारा खर्च दाखविलेल्या खर्चापेक्षा जास्त असल्यामुळे सदरील खर्च २५०/- ऐवजी रुपये ५००/- अशी विनियम क्र. ३ तक्ता "अ" कॉलम ६ मध्ये बदल करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५१ :-** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा, पुणे यांनी पत्र देवून विनंती केली की, शहरातून एका मार्गाला कुटुंब कल्याण मार्ग असे नांवे द्यावे त्यासाठी महानगरपालिकेतर्फे घाटी रोड याला कुटुंब कल्याण मार्ग असे नांव देण्यासाठी शिफारस केली आहे. त्याप्रमाणे नांव देण्याच्या मंजुरीसाठी सादर.

**ठराव क्र. ५१ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा पुणे यांनी केलेल्या विनंती नुसार महानगरपालिकेतर्फे "घाटी रोड" याला "कुटुंब कल्याण मार्ग" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२ :-** मुंबई प्रांतिक महानगरपिालका अधिनियम १९४९ चे कलम ४५८ (३२) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्या करून बेवारशी प्रेतांची विल्हेवाट लावण्याबाबतचे प्रारुप उपविधीचा नमुना सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करीत आहोत.

सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर त्या बाबतची सूचना स्थानिक वर्तमानापत्रातून विभागीय कार्यालयातून नागरिकांना माहितीसाठी प्रकाशित करण्यात येईल. व त्याबाबत नागरिकांच्या आक्षेप / सूचना आल्यास त्या स्विकारण्यात येतील. त्यानंतर आक्षेप / सूनांचा विचार करून प्रारुप उपविधी अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येतील.

तरी प्रेतांची विल्हेवाट लावण्याबाबतचे तयार केलेले उपविधी मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. ५२ :-** सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्तावावर पुढील सभेत विचार करण्यात यावा.

**विषय क्र. ५३ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५८(१८) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेने आवश्यक वाटल्या वरून परवानाधारक नळ कारागिर यांचेसाठी ठरविणेत आलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव ह्याबाबत तयार करणेत आलेले प्रारुप उपविधीचा नमुना सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करीत आहोत.

सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर त्या बाबतची सूचना स्थानिक वर्तमानपत्रातून विभागीय कार्यालयातून माहितीसाठी प्रकाशित करण्यात येईल व या बाबत नागरिकांच्या आक्षेप/सूचना आल्यास त्या स्विकारण्यात येतील त्यानंतर आक्षेप / सूचनांचा विचार करून प्रारुप उपविधी आंतिम मंजुरीसाठी सव्रसाधारण सभेपुढे ठेवण्यात येतील.

तरी परवानाधारक नळ कारागिर यांचेसाठी ठरविणेत आलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव ह्या बाबतचे तयार केलेले उपविधी मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. ५३ :-** सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्तावावर पुढील सभेत विचार करण्यात यावा.

## ***<u>ऐनवेळचे विषय</u>***

**विषय क्र. ५४ :-** औरंगाबाद शहरातील वितरण व्यवस्थेची पुनर्रचना टप्पा क्र. १ (शहा कन्सल्टन्सीच्या अहवालावर आधाराने) शस प्रशासकीय मान्यता रक्कम रु. १८,६२,००,०००/- मिळालेली आहे. योजनेत शहरात विविध ठिकाणी ७ जलकुंभ बांधणे व शहरात वितरण व्यवस्था टाकणे या कामाचा समावेश आहे. शहा कन्सल्टन्सी अहवालानुसार मुकुंदवाडी, चिकलठाणा, पडेगांव या सभोवतालच्या गावापर्यंत मुख्य जलवाहिणी टाकण्याचा प्रस्ताव आहे. गावातील वाढीव लोकसंख्येप्रमाणे त्या भागात जलकुंभ बांधण्याचा व नवीन वसाहतीमध्ये वितरण व्यवस्था टाकण्याचा समावेश केलेला नाही. त्यामुळे शासनाने मंजूर केलेल्या औरंगाबाद शहराच्या विशेष विकास योजने अंतर्गत मंजूर केलेल्या रकमेतून खालील कामांचा समावेश प्रस्तावित आहे.

१) पडेगांव येथे २.५० लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे.
२) मुकूंदवाडी येथे ३ लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे.

३) चिकलठाणा येथे ४.५० लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे.

वरील जलकुंभातून गावापर्यंत पाईप लाईन टाकणे व गावात वाढीव वसाहतीसाठी वितरण व्यवस्था करणे या कामाचा समावेश आहे. तसेच शहराचा ५० विविध भागात वितरण जलवाहिनी टकाणे या कामाचा समावेश केलेला आहे.

| **अ. क्र.** | **कामाची यादी** | **रक्कम** |
|---|---|---|
| १ | मुंकूंदवाडी येथे ३ लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे | ३,९०,९१५.०० |
| २ | पडेगांव येथे २.५० लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे. | ३,४२,७२०.०० |
| ३ | चिकलठाणा येथे ४.५० लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे. | ५,१५,५६५.०० |
| ४ | पडेगांव चिकलठाणा, मुकूंदवाडी व इटखेडा येथे वितरण व्यवस्था करणे. | ३६,००,०००.०० |
| ५ | शहराच्या विविध भागात वितरण व्यवस्था करणे. | ५१,१३,०००.०० |
| | रु. | ९९,९८,२००.०० |
| | रु. | १,००,००,०००.०० |

शहा कन्सल्टन्सी नुार शहरातील नियोजित मुख्य जलनिःसारण वाहिन्या व इतर वाहिन्यांची अंदाजपत्रकीय रक्कम तसेच आतापर्यंत टाकलेल्या जलनिसःसारण वाहिन्यांची रक्कम

| **अ. क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजपत्रकीय शेरा रक्कम** |
|---|---|---|
| १ | नियोजित जलनिसःरण वाहिनी खाम नदी ते मकईगेट व जालना रोड दक्षिणेकडील भाग ट्रंक बी व एफ शहा कन्सल्टन्सीनुसार. | १,८१,१७,५००/- |
| २ | आतापर्यंत टाकलेल्या वाहिन्याची अंदाजपत्रकीय रक्कम | ४५,७०,०००/- |
| ३ | नंदनवन कॉलनी | १२,००,०००/- |
| ४ | जवाहर कॉलनी व आजूबाजूचा परिसर | २५,००,०००/- |
| ५ | मेनन सोसायटी सराज सोसायटी व इतर परिसर | १७,००,०००/- |
| ६ | विवेकानंद सोसायटी व आजूबाजूचा परिसर | २०,००,०००/- |
| ७ | ज्योतीनगर सहकारनगर | १०,००,०००/- |
| | **एकूण** | **३,१०,८७,५००/-** |

| | | |
|---|---|---|
| 1. | Providing & Laying 20mm thick mix seal surface at Zone No. 6 | 3,60,880.00 |
| 2. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Ambedkar Nagar, Slum. | 83,200.00 |
| 3. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Sidhartha Nagar, Slum. | 1,36,00.00 |
| 4. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Mukundwadi Nagar, Slum. | 1,35,00.00 |

| | | |
|---|---|---|
| 5. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Naregaon Nagar, Slum. | 1,20,000.00 |
| 6. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Masnatpur, Slum. | 30,200.00 |
| 7. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Brijwadi, Slum. | 88,800.00 |
| 8. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Roza Bagh, Slum. | 50,000.00 |
| 9. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Ghati, Slum. | 1,07,100.00 |
| 10. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Kiradpura Slum. | 2,54,000.00 |
| 11. | Providing & Constructing W.B.M. road at Indira Nagar Slum. | 1,13,120.00 |
| 12. | Providing & laying under ground drainage line at Kiradpura Slum. | 4,76,000.00 |
| 13. | Providing & laying under ground drainage line at Indira Nagar Slum. | 4,42,000.00 |
| 14. | Providing of infrastructure at Mitmita slum | 6,05,867.00 |
| 15. | Providing of infrastructure at Lion's club, Mukundwadi slum | 3,33,034.00 |
| 16. | Providing of infrastructure at Ghati slum | 5,70,257.00 |
| 17. | Providing of infrastructure at Ashok Nagar,Shahabazar slum | 8,74,860.00 |
| 18. | Providing & laying R. C. C. half round gutter at Sanjay Nagar, Mukundwadi slum | 65,502.00 |
| 19. | Constructing W.B.M. Road at Sanjay Nagar, Mukundwadi slum | 1,00,000.00 |
| | **Total** | **50,00,000** |

**ठराव क्र. ५४ :-** औरंगाबाद शहराच्या विशेष विकास योजने अंतर्गत मंजूर केलेल्या रकमेतून खालील कामांना सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## पाणीपुरवठा विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | मुंकूंदवाडी येथे ३ लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे | ३,९०,९१५.०० |
| २ | पडेगांव येथे २.५० लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे. | ३,४२,७२०.०० |
| ३ | चिकलठाणा येथे ४.५० लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे. | ५,१५,५६५.०० |
| ४ | पडेगांव चिकलठाणा, मुकूंदवाडी व इटखेडा येथे वितरण व्यवस्था करणे. | ३६,००,०००.०० |
| ५ | शहराच्या विविध भागात वितरण व्यवस्था करणे. | ५१,१३,०००.०० |
| | रु. | ९९,९८,२००.०० |
| | रु. | १,००,००,०००.०० |

## जलनि:सारण विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | नियोजित जलनिस:रण वाहिनी खाम नदी ते मकईगेट व जालना रोड दक्षिणेकडील भाग ट्रंक बी व एफ शहा कन्सल्टन्सीनुसार. | १,८१,१७,५००/- |

| | | |
|---|---|---|
| २ | आतापर्यंत टाकलेल्या वाहिन्याची अंदाजपत्रकीय रक्कम | ४५,७०,०००/- |
| ३ | नंदनवन कॉलनी | १२,००,०००/- |
| ४ | जवाहर कॉलनी व आजूबाजूचा परिसर | २५,००,०००/- |
| ५ | मेनन सोसायटी सराज सोसायटी व इतर परिसर | १७,००,०००/- |
| ६ | विवेकानंद सोसायटी व आजूबाजूचा परिसर | २०,००,०००/- |
| ७ | ज्योतीनगर सहकारनगर | १०,००,०००/- |
| | **एकूण** | **३,१०,८७,५००/-** |

| | | |
|---|---|---|
| 1. | Providing & Laying 20mm thick mix seal surface at Zone No. 6 | 3,60,880.00 |
| 2. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Ambedkar Nagar, Slum. | 83,200.00 |
| 3. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Sidhartha Nagar, Slum. | 1,36,00.00 |
| 4. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Mukundwadi Nagar, Slum. | 1,35,00.00 |
| 5. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Naregaon Nagar, Slum. | 1,20,000.00 |
| 6. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Masnatpur, Slum. | 30,200.00 |
| 7. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Brijwadi, Slum. | 88,800.00 |
| 8. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Roza Bagh, Slum. | 50,000.00 |
| 9. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Ghati, Slum. | 1,07,100.00 |
| 10. | Providing & laying 20 mm thick mix seal surface at Kiradpura Slum. | 2,54,000.00 |
| 11. | Providing & Constructing W.B.M. road at Indira Nagar Slum. | 1,13,120.00 |
| 12. | Providing & laying under ground drainage line at Kiradpura Slum. | 4,76,000.00 |
| 13. | Providing & laying under ground drainage line at Indira Nagar Slum. | 4,42,000.00 |
| 14. | Providing of infrastructure at Mitmita slum | 6,05,867.00 |
| 15. | Providing of infrastructure at Lion's club, Mukundwadi slum | 3,33,034.00 |
| 16. | Providing of infrastructure at Ghati slum | 5,70,257.00 |
| 17. | Providing of infrastructure at Ashok Nagar,Shahabazar slum | 8,74,860.00 |
| 18. | Providing & laying R. C. C. half round gutter at Sanjay Nagar, Mukundwadi slum | 65,502.00 |
| 19. | Constructing W.B.M. Road at Sanjay Nagar, Mukundwadi slum | 1,00,000.00 |
| | **Total** | **50,00,000** |

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. महापौरांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

***दिनांक १६/१२/१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत***

**शनिवार दिनांक १६/१२/१९८९ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे, यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभूवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग | उपमहापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मण | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार | --//-- |
| ७) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ८) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ९) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| १०) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| ११) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १२) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १३) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १४) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १५) | मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | --//-- |
| १६) | मा. श्री. जावेद हसन खान कासिम खान | --//-- |
| १७) | मा. श्री. तकी हसनखाँन कासिमखाँन | --//-- |
| १८) | मा. श्री. अ. स. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दन | --//-- |
| १९) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| २०) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| २१) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २२) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २३) | मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ.हमीद खान | --//-- |
| २४) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २५) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २६) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २७) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २८) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २९) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| ३०) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३१) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३२) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३३) | मा. श्री. फैय्याजखान अहमदखान | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३४) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३५) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३६) | मा. श्री. स. हुसेन स. अहमद | --//-- |
| ३७) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३८) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३९) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ४०) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | --//-- |
| ४१) | मा. श्री. अलफखाँन हुसेनखाँन | --//-- |
| ४२) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४३) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४४) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ४५) | मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान | --//-- |
| ४६) | मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव | --//-- |
| ४७) | मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव | --//-- |
| ४८) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन | --//-- |
| ४९) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार | --//-- |
| ५०) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ५१) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ५२) | मा. श्री. गाडे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५३) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५४) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५५) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५६) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

"वंदे मातरम्" या गीताने सभेची सुरुवात झाली.

औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर, मा. श्री. मोरेश्वर सावे हे नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत औरंगाबाद लोकसभा मतदार संघातून खासदार म्हणून निवडून आल्याचे सभेत त्यांचे अभिनंदनाचा ठराव स. सभासद, श्री. चंद्रकांत खैरे यांनी तोंडी मांडला. त्यास स. सभासद, श्री. मोतीराम घडामोडे व श्री. अजिज जहागिदार यांनी अनुमोदन दिले.

औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर, मा. श्री. मोरेश्वर सावे हे नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत औरंगाबाद लोकसभा मतदार संघातून खासदार म्हणून निवडून आल्याने औरंगाबाद महानगरपालिका सभागृहातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येते.

**विषय क्र. ५५ :-** दिनांक नोव्हेंबर, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव क्र. ५५ :-** दिनांक २० नोव्हेंबर, १९८९ रोजी संपन्न झालेल्या, सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ५६ :-** सदस्य सचिव, जिल्हा कायदे विषयक सहाय्य व सल्ला समिती, औरंगाबाद ह्यांनी दिनांक १२/९/८९ चे पत्र पाठवून औरंगाबाद येथील उच्च न्यायालयामध्ये मोफत कायदा विषयक सहाय्य व सल्ला समितीची स्थापना करणेसाठी आपल्या महानगरपालिका सदस्यांमधून समितीवर एका सभासदाचे नांव पाठविणे बाबत विनंती केलेली आहे. तरी महानगरपालिका समितीच्या विधी समितीच्या अध्यक्ष हा पदसिध्द सदस्य म्हणून नेमणूक करणे व त्याचे नांव सदस्य सचिव जिल्हा कायदेविषयक सहाय्य व सल्ला समिती औरंगाबाद यांना कळविणे बाबत प्रस्ताव सादर.

**संवाद** :

**डॉ. शांताराम काळे** : सभागृहनेता यांनी केलेल्या मागणी नूसार इतिवृत्त कायम झाल्यानंतर मागील सभेचे राहिलेले विषय घेण्यात येतील असा खुलासा सभागृहात करण्यात आला आहे. मागील सभेच्या विषयात मालमत्ता कर आकारणीचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे तेंव्हा खुलासा केल्याप्रमाणे मागील सभेचे राहिलेले विषय प्रथम घेण्यात यावेत.

**मा. महापौर, श्री. अजिजउल्ला बेग, श्री. डॉ. संचेती :**
विषय पत्रिके वरील प्रशासकीय प्रश्नांवर चर्चा झाल्यानंतर या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर चर्चा जरूर केली जाईल. स. सभासद, श्री. शांताराम काळे यांनी सुचविल्याप्रमाणे मालमत्ता कर फेर आकारणीमुळे शहरातील नागरिक त्रस्त आहेत तेंव्हा सभासदांच्या भावना लक्षात घेता कर आकारणी संबंधीचा जिव्हाळ्याचा प्रश्न प्रथम चर्चेसाठी घेण्यात यावा.

**मा. महापौर** : कर आकरणीच्या प्रश्नाबाबत रुलिंग दिलेले आहे. त्यानुसार विषय पत्रिके वरील विषयांवर प्रथम चर्चा होईल त्या नंतर कर आकारणी विषयीच्या प्रश्नावर विचार केला जाईल.

**श्री. तकी हसन खान, श्री. अजिजउल्ला बेग** :
विषय समित्या कायम होऊन ६ महिन्याचा कालावधी लोटला आहे. अद्याप सभापतींची निवड झालेली नाही. तेंव्हा या विषय समित्यांच्या सभापतींची निवड कधी होणार? याचा खुलासा करण्यात यावा आणि विषय समित्यांच्या सभापतींची निवडणूक झाली नाही तर या विषयावर कसा विचार करता येईल.

**मा. महापौर** : विषय समित्यांचे सभापतींची निवड करण्यासाठी पुढील महिन्यात सभा घेण्यात येईल.

**ठराव क्र. ५६:-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद येथील उच्च न्यायालयामध्ये स्थापन करण्यात आलेल्या मोफत कायदा विषयक सहाय्य व सल्ला समिती वर औरंगाबाद महानगरपालिकेच्या विधी समितीचे अध्यक्ष यांची मोफत कायदा विषयक सहाय्य व सला समितीचे पदसिध्द सदस्य म्हणून नेमणूक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५८ (४८) अन्वये वराह पालन विषयी औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्या वरून

उपविधी तयार करण्यात आलेले असून त्या बाबतचे प्रारुप उपविधीचा नमुना सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करीत आहोत.

सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर त्या बाबतची सूचना स्थानिक वर्तमानपत्रातून, विभागीय कार्यालयातून नागरिकांना माहितीसाठी, सूचित करण्यात येईल. कार्यालयात नागरिकांच्या आक्षेप / सूचना आल्यास त्यावर विचार करून उपविधी अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येतील.

तरी उपविधी मंजुरी करिता सादर.

**संवाद** :

**श्री. एकबालसिंग गिल** : वराह पालनाविषयी तयार करण्यात आलेल्या प्रारुप मसूदा उपविधीतील अनुक्रमांक ७ (ब) मध्ये म्हटल्याप्रमाणे "नष्ट" या शब्दाऐवजी "विल्हेवाट" या शब्दाचा प्रयोग करून मंजुरी देण्यात यावी.

**श्री. रतनकुमार पंडागळे**: प्रशासनातर्फे तयार करण्यात आलेल्या विविध प्रारुप मसूदा उपविधीवर विचार करण्यासाठी एक उपसमिती कायम करण्यात यावी.

**मा. महापौर** : स. सभासद, श्री एकबालसिंग गिल यांचे सुचनेप्रमाणे या उपविधी मधील क्रमांक ७ (ब) मध्ये "नष्ट" या शब्दाऐवजी "विल्हेवाट" असा शब्द प्रयोग करण्यात यावा.

**श्री. सुग्रीम रिडलॉन** : वराह पालन हा वाल्मी समाजाचा पिढीजात व्यवसाय आहे या व्यवसायावर वाल्मी समाजातील लोक आपली उपजिविका चालवितात या उपविधीाचे अंमलबजावणीने वाल्मी समाजाच्या उपजिविकेचे साधनावर गदा येण्याची शक्यता आहे. तेंव्हा या उपविधींचा ठराव मंजूर करण्यास माझा आक्षेप नोंदविण्यात यावा.

**सौ. लता दलाल** : वराह पालन उपविधी मधील जाचक अटीमुळे वाल्मी समाजास वराह पालन व्यवसाय करण्यास अडचणी निर्माण होतील याचा विचार करण्यात यावा असे स. सभासदांना सुचवावयाचे आहे असे मला वाटते.

**ठराव क्र. ५७** :- सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्ताव पुढील सभेत विचारार्थ ठेवण्यात यावा

**विषय क्र. ५८ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७(२) (क) १४९(१), ४५४, ४५७(७) (१७) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्या वरून कुत्र्यावर कर लावणे बाबतचे प्रारुप नियमांचा नमुना सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करीत आहोत. सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर त्याबाबतची सूचना स्थानिक वर्तमानपत्रातून, विभागीय कार्यालयातून नागरिकांना माहितीसाठी सूचित करण्यात येईल. कार्यालयात याबाबत नागरिकांच्या सूचना / आक्षेप आल्यास त्या स्विकारण्यात येतील. त्यानंतर आक्षेप सूचनांचा विचार करून नियम अंतीम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेत ठेवण्यात येतील. तरी कुत्र्यावर कर लावणेबाबतचे नियम सर्वसाधारण सभेच्या मंजुरीकरिता सादर. (सोबत प्रारुप उपविधीचा नमुना जोडला आहे.)

**ठराव क्र. ५८ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात १९४९ चे कलम १२७(२) (क), १४९ (१) ४५४, ४५७ (७) (१७) अन्वये कुत्र्यांवर कर लावणे विषयी तयार करण्यात आलेल्या खालील प्रारुप नियमांच्या नमुन्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. आवश्यक ती वैधानिक कार्यवाही व्हावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १२७(२) (क) १४९(१), ४५४, ४५७(७) (१७)

१. संक्षिप्त नांव -

ह्या विनियमांना महानगरपालिका औरंगाबाद, कुत्र्यावरील कर नियम १९८८ असे म्हणता येईल.

२. व्याख्या -

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर ह्या नियमात:-

अ. "अधिनियम" म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९.

ब. "आयुक्त" म्हणजे शहराकरिता कलम ३६ अनुसार नियुक्त केलेला महानगरपालिका आयुक्त व यामध्ये कलम ३९ अनुसार नियुक्त केलेला हंगामी आयुक्त याचा अंतर्भाव होतो.

क. "पशुवैद्यकीय डॉक्टर" म्हणजे महानगरपालिकेचा पशुवैद्यकीय डॉक्टर.

ड. "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम.

ई. "कुत्रा" यामध्ये तीन महिने किंवा अधिक वयाच्या लहान कुत्रीचा व कुत्र्याचा समावेश आहे.

फ. "कर" म्हणजे कलम १२७(२) च्या खंड (क) अन्वये कुत्र्यावर बसवण्या जोगा कर.

ग. "वर्ष" म्हणजे १ एप्रिल पासून सुरू होणारे वर्ष.

२. ह्या नियमामध्ये वापरलेल्या, परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्द प्रयोगांना अधिनियमामध्ये जो अर्थ आहे तोच अर्थ राहील.

३. कुत्रा पाळणे.

आयुक्तांच्यालेखी परवानगी शिवाय किंवा अशा परवानगीच्या अटींशी अनुरूप असेल त्याशिवाय कोणतीही व्यक्ती कुत्रा पाळणार नाही किंवा त्यांच्या आवाराच्या कोणत्याही भागात कुत्रा ठेवण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

४. व्यक्ती कर देण्यास पात्र असणे.

नियम १२ स अधिन राहून महानगरपालिका क्षेत्रातील आपल्या जागेत कुत्रा पाळणारी व्यक्ती कर देण्यास पात्र राहील.

५. कराचा कर

दर वर्षात किंवा त्याच्या कोणत्याही भागास प्रत्येक कुत्र्यागणिक रु. ३०/- (तीस रुपये) या दराने कर वसुली केली जाईल.

६. कर आगाऊ भरणे.

संपूर्ण वर्षाचा कर हा त्या वर्षाच्या एप्रिल महिन्यात आगाऊ भरला जाईल.

७. कर भरण्याची पध्दत -

महानगरपालिका क्षेत्रातील आपल्या जागेत कोणत्याही वर्षी कुत्रा पाळण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीने त्या वर्षाचा एप्रिल महिन्या संपण्यापूर्वी कुत्रा पाळण्यासाठी परवानगी मिळण्याकरिता नमुना "अ" मध्ये आयुक्ताकडे अर्ज करावा.

मात्र त्या वर्षाचा एप्रिल महिना संपल्यानंतर कोणत्याही वेळी कोणत्याही व्यक्तीची कुत्रा पाळण्याची इच्छा असल्यास त्यांना कुत्रा पाळल्यानंतर सात दिवसाचे आत अर्ज करता येईल.

अशा प्रत्येक अर्जासोबत कराची पूर्ण रक्कम भरण्यात आलेली असेल.

आयुक्त, अर्ज मिळाल्यानंतर नमना "ब" मध्ये आवश्यक ती परवानगी देईल. कराचा भरणा केल्यानंतर बिल्ला व अनुक्रमांकासह परवानगी देण्यात येईल. आयुक्त वर्षा वर्षाला निश्चित करीत अशी रक्कम ही अशा बिल्ल्याची फी म्हणून करासोबत देय राहील.

८. कुत्रा मरण पावणे अथवा हरवणे इ. कळवणे -

कुत्र्याच्या बाबतीत कोणत्याही व्यक्ती कर देण्यास पात्र असेत तर अशी व्यक्ती कुत्रा हरवला किंवा ती दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित केला किंवा स्थलांतरीत करण्यात आला किंवा मरण पावला तर त्या बाबतीत तशी लेखी सुचना देईल. अशी माहिती मिळाल्यानंतर उक्त कुत्र्याच्या बाबतीतील कर देण्याचे दायीत्व नंतरच्या वर्षा पासुनच्या सुरवातीपासून रद्द होईल. अशा सुचने अभावी अशी व्यक्ती कर देण्यास पात्र राहील.

९. काही प्रकरणात पुढील कराचे प्रदान आवश्यक नसणे.

१. कोणत्याही वर्षात कुत्रा बाळगण्यामध्ये जर कोणताही बदल झाला असेल त्या वर्षासाठीच्या कराचा भरणा झालेला असेल तर त्या वर्षी कर देय होणार नाही. मात्र कुत्र्याचा ताबा ज्या व्यक्तीकडे आला ती व्यक्ती कुत्र्याला आयुक्तापुढे सादर करील. कुत्र्याचे जसे नांव त्या दाखल करण्याकरिता लेखी परवानगी देण्यात यावी.

२. ज्या कुत्र्याच्या बाबतीत ज्या कोणत्याही वर्षात कर भरण्यात आला असेल त्या वर्षात तर तो कुत्रा मरण पावला असेल तर त्या कुत्र्या बाबतची परवानगी असलेल्या व्यक्तीने एक रुपया कर भरला तर त्या व्यक्तीस त्या परवानगीमध्ये वर्षाच्या उर्वरित भागाकरिता इतर कोणताही कुत्रा बाळगता येईल.

१०. बिल्ल्या संबंधातील तरतुदी -

१. नियम ६(३) खाली पुरविण्यात आलेल्या बिल्ल्या संबंधीचा कुत्र्याच्या गळ्यात पक्का बांधला जाईल.

२. असा कोणताही बिल्ला हरवल्यास, नियम ६(३) मध्ये समाविष्ट असलेल्या फीचे प्रदान केल्यानंतर व त्या नविन बिल्ल्याचा दुरुपयोग टाकण्यासाठी आयुक्त, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर असा नविन बिल्ला देईल.

११. कुत्रा जप्त करणे व नष्ट करणे यासाठी तरतूद -

१. अनुज्ञाप्ती व बिल्ला याशिवाय असलेला कोणताही कुत्रा हा बेवारशी व मोकाट समजला जाईल व आयुक्त किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी त्याला जप्त करील.

२. नियम ११ च्या खंड (१) अनुसार जप्त करण्यात आलेला कोणताही कुत्रा हा आयुक्तास योग्य वाटेल त्याप्रमाणे मोकाट म्हणून नष्ट केला जाईल, किंवा बांधून ठेवण्यात येईल.

३. नियम ११ च्या खंड (एक) खाली कुत्रा जप्त करून आणल्यानंतर नष्ट करण्यात

आला तर आयुक्त त्या बाबतीत कोणतीही मागणी विचारात घेणार नाही.

४. कुत्रा बांधून ठेवण्यात आला असेल तर, मालक किंवा प्रभारी व्यक्ती यांनी आपल्या मालकीबाबत खात्री पटल्यानंतर ३ दिवसाच्या आंत मागणी केली पाहिजे.

५. मालकी विषयी समाधान करून दिल्यानंतर मालक किंवा प्रभारी व्यक्ती अनुज्ञाप्तीच्या बाबतीतील बाकी रक्कम व आयुक्ताने कुत्र्यासाठी केलेला परिरक्षण खर्च, लस टोचणी किंवा इतर खर्च या बाबतीतील सर्व बाकी रक्कम देईल.

६. मालक लस टोचणीच्या अनुसूचीप्रमाणे कुत्र्याला प्रतिबंधक लस टोचणी आहे याविषयी आयुक्तांचे किंवा महानगरपालिकेच्या आयुक्तांचे किंवा पशुवैद्यकीय डॉक्टरचे समाधान करू शकला नाही, तर ए.आर.पी. लस टोचल्याशिवाय कोणत्याही कुत्र्याची मुक्तता केली जाणार नाही.

७. कोणताही अनुज्ञाप्ती प्राप्त कुत्रा सार्वजनिक ठिकाणी एका वर्षात सलग तीन वेहा मोकाट फिरण्याबाबत जप्त केला असेत तर तो मुक्त केला जाणार नाही. व आयुक्तास योग्य वाटल्यास इतर मोकाट कुत्र्याप्रमाणे नष्ट केला जाईल.

८. कोणताही परवानगी नसलेला कुत्रा कोणत्याही आवारातून बेवारशी किंवा मोकाट म्हणून आयुक्त किंवा कोणताही प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून जप्त करण्यात येईल.

१२. सार्वजनिक ठिकाणी मोकाट फिरण्यास प्रतिबंध -

महापालिका आयुक्तास किंवा त्यांनी यथोचितरित्या प्राधिकृत अधिकाऱ्यास कुत्रा यथोचितरित्या अनुज्ञाप्ती असलेला असला तरी सुध्दा त्याला योग्य रितीने मुसक्या बांधून ठेवावा किंवा त्यास सार्वजनिक ठिकाणी मोकाट फिरण्यास प्रतिबंध्द करावा अशी कोणत्याही मालकाला किंवा कुत्र्याच्या प्रभारी व्यक्तीला नोटीस किंवा सार्वजनिक नोटीस देवून निर्देश देता येईल.

१३. कुत्रा निरिक्षणाकरिता दाखल करणे.

आवश्यक करण्यात येईल तेंव्हा, कुत्रा बाळगण्यास परवानगी दिलेल्या प्रत्येक व्यक्तीने त्याच्या जवळचा कत्रा हा आयुक्त किंवा त्यांने ह्याकरिता प्राधिकृत करण्यात आलेल्या इतर अधिकाऱ्याच्या समोर निरिक्षणाकरिता पडताळणी करिता सर्व योग्यवेळी दाखल करणे हे त्यावर बंधनकारक राहील.

१४. कुत्र्याला (रॉबीज) आलर्क पतिबंधक लस टोचणी -

कुत्र्याचा मालक किंवा प्रभारी व्यक्ती कुत्र्याला आलर्क प्रतिबंधक लस टोचणीचे प्रमाणात दाखल करिल. मालकाने दाखल केलेल्या आलर्क विरोधी किंवा लसटोचणी प्रमाणपत्राची महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय डॉक्टरचे पडताळणी केल्याशिवाय कोणतीही परवानगी दिली जाणार नाही.

१५. वाद, खटला आणि कायदेशिर कार्यवाही -

ह्या उपविधीच्या तरतुदीनुसार सद हेतुने केलेल्या कोणत्याही कामाच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीविरुध्द कोणताही वाद, खटला किंवा कायदेशिर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

१६. सुट -

महानगरपालिका क्षेत्रातून जाणाऱ्या खऱ्याखुऱ्या प्रवाशा जवळील किंवा महानगरपालिका क्षेत्रात १० दिवसाहून (दहा दिवसाहून) अधिक दिवस नसलेल्या व सहज राहणाऱ्या रहिवाशा जवळील कुत्र्याला नियमातील काहीही लागू होणार नाही.

१७. परवानगीच्या नविकरणासाठी अर्ज करण्यास उशिर झाल्यास खाली दिल्याप्रमाणे अतिरिक्त कर भरावा लागेल.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | ३० दिवसांच्या आंत | - | काही नाही |
| ब. | ३१ ते ६० दिवस | - | वार्षिक कराच्या १०% |
| क. | ६० दिवसापेक्षा वर | - | वार्षिक कराच्या १००% |

१८. नियमात भर -

अधिनियमाच्या अनुसूचित जर कोणताही नियम असेल तर त्यात ह्या नियमाची भर पडेल.

१९. निरसन व व्यावृति -

महानगरपालिकेने कर बसवण्यास सुरुवात केल्यानंतर कोणत्याही दराने महानगरपालिकेने कर वसुली नियम महानगरपालिका क्षेत्रात अंमलात आणली तर त्या क्षेत्रात ह्या नियमाच्या सुरुवाती पूर्वी अंमलात असलेले असे नियम त्या क्षेत्रात निरसित होतील व त्या नियमाच्या निसनापूर्वी त्या नियमानुसार केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या बाबी मात्र यास अपवाद करतील.

**विषय क्र. ५९ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५८(२०) (२१) अन्वये जनावरांच्या गोठ्या बाबत उपविधी औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्या करून तयार करण्यात आलेले असून त्या बाबतचे प्रारुप उपविधीचा नमुना सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करीत आहोत.

सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर त्या बाबतची सूचना स्थानिक वर्तमानपत्रातून विभागीय कार्यालयातून नागरिकांना माहितीसाठी ठेवण्यात येईल. कार्यालयात नागरिकांच्या आक्षेप / सूचना आल्यास त्यावर विचार करून उपविधी अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येईल. तरी वरील उपविधी मंजुरी करिता सादर.

**ठराव क्र. ५९ :-** सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्तावावर पुढील सभेत विचार करण्यात यावा.

**विषय क्र. ६० :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६३ (१३) आणि ४५८(४८) अन्वये गुरांच्या कोंडवाड्या संबंधी औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्या वरून उपविधी तयार करण्यात आलेले असून त्या बाबतचे प्रारुप उपविधी नमुना सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करीत आहोत.

सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर त्या बाबतची सूचना स्थानिक वर्तमानपत्रातून, विभागीय कार्यालयातून नागरिकांना माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येईल. कार्यालयात नागरिकांच्या आक्षेप/ सूचना आल्यास त्यावर विचार करून उपविधी अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येईल.

तरी उपविधी मंजुरीकरिता सादर.

**संवाद :**

**श्री. कचरू नवपुते, श्री. महादेव सुर्यवंशी, शंकर मगर, श्री. पांडुरंग पैठणकर :**

शहरात सध्या अस्तित्वात असलेल्या कोंडवाड्यांना दरवाजे नाहीत, तसेच या ठिकाणी वॉचमनही नाहीत पकडलेल्या बहुसंख्य जनावरांच्या कोंडवाडा फी च्या पावत्या फाडल्या जात नाहीत.

अशा अनेक तक्रारी आहेत. महानगरपालिका हद्दित समाविष्ट झालेल्या १८ खेड्यातील जनावरांची नोंद घेण्यात आलेली नाही. तेंव्हा महापालिका हद्दित सध्या किती कोंडवाडे आहेत? या कोंडवाड्यात पकडलेली किती जनावरे कोंडल्या गेली? त्या पासून महानगरपालिकेला किती उत्पन्न मिळाले या विषयीची संपूर्ण माहिती उपलब्ध झाल्यानंतरच य प्रस्तावावर विचार करण्यात यावा.

**श्री. चंद्रकांत खैरे** : कोंडवाडयात कोंडलेल्या जनावरांना पुरेसा चारा ,पाणी मिळत नाही या प्रकारच्या कोंडवाडयाविषयी अनेक तक्रारी आहेत. तेव्हा सन्माननीय सभासदांनी विचारलेली माहिती पुरविण्यांत यावी.

**ठराव क्र. ६०** : शहरात एकूण किती कोंडवाडे आहेत. या कोंडवाडयात सन १९८८-८९ या वर्षात एकूण किती जनावरे कोंडण्यात आली, या कोंडण्यात आलेल्या जनावरांची रवानगी कशी करण्यात आली, त्यापासून महानगरपालिकेला किती उत्पन्न मिळाले या विषयीची सविस्तर माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी पुढील दोन आठवडयात सर्व स.सभासदांना पुरविण्याची व्यवस्था करावी. त्यानंतर सदर प्रस्ताव पुढील सभेत मांडावा असे सर्वानुमते ठरले.

## ***पुरवणी विषयपत्रिका***

**विषय क्र.६१** : सध्या औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील मालमत्ता कराची फेरआकारणीची नोटीसेस देण्याचे काम चालू आहे. परंतू केलेली फेर आकारणी नियमबाहय आहे म्हणून सध्या फेरआकारणी रद्द करण्यात यावी. कारण संबंधित अधिकाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्वसाधारण सभेत दिशाभुल करून दर निश्चित करून घेतले आहे व खालील प्रमाणे नियमांचे उल्लंघन केले आहे.

१ मनपा अधिनियम १९४९ चे नियम ९९ चे अंमलबजावणी केली नाही.

२ महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम २१ (२) ची पालन केले नाही.

३ मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ८ (१) ची पुर्तता केली नाही.

४ तसेच सध्या जुने दराने कर वसुलीसाठी महाराष्ट्र मुन्यीसिपल ॲक्ट १९६५ चे कलम १२१ (१)(२) चे ही पालन करण्यांत आले नाही.

सुचक : श्री.अजिज जहागिरदार
अनुमोदक : डॉ.चेनकरण संचेती
दिनांक : १६-११-१९८९

**संवाद** :

**कर मुल्य निर्धारण अधिकारी** : सन १९८८-८९ चे फेर आकारणी साठी ठराव क्रमांक ५९२ दिनांक ९-११-१९८७ अन्वये कलम ९९ ची पुर्तता केलेली आहे. त्यानुसार दिनांक १-४-१९८८ पासून फेरआकारणीचे काम सुरू झाले. सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२/५ दिनांक १७-९-१९८९ अन्वये किरकोळ फेरफार करून दिनांक १६-७-१९८८ ठराव क्र.२२ अनुसार दिलेली स्थगिती उठविण्यांत आल्यामुळे फेरआकारणीची प्रक्रिया

दिनांक १-४-१९८९ पासून लागू केले आहे. त्यानुसार सन १९८९-९० च्या च्या अर्थसंकल्पात मालमत्ता कराचे अपेक्षित उत्पन्न रुपये ५ कोटी (१/४/८९ पासून लागू केलेल्या फेर आकारणी नुसार) ग्राह्य धरण्यात आलेली आहे.

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये महानगरपालिकेने प्रथमच १९८९-९० फेरआकारणीचे काम हाती घेतल्यामुळे नियम २१(२) चे पालनाचा प्रश्नच उद्भवत नाही.

३) जाहिर प्रगटन जा.क्र.१०४८/८७/दिनांक १-४-८७ नुसार ठराविक नमुन्यात माहिती व विवरण मागविण्यात येवून प्रकरण ८ नियम ८(१) चे पालन केले आहे. महापालिका अधिनियमान्वये मालमत्ता कर आकारणी करण्यात येत असल्याने अधिनियम १९६५ चे कलम १२१(१) (२) चे पालन करण्याचा प्रश्नच येत नाही.

**मा.महापौर** : मालमत्ता कर फेर आकारणी बाबत आता पर्यंत ४७ हजार मालमत्ता धारकांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. अद्याप ८ हजार मालमत्ता धारकांना नोटीसा देणे बाकी आहे. देण्यात आलेल्या ४७ हजार नोटीसाचे ११ हजार नागरीकांनी कर आकारणीस आक्षेप घेतला आहे. यापैकी ७/८ हजार आक्षेप अर्जाची सुनावणी झाली आहे. तेव्हा या प्रस्तावावर कायद्याचा किस न काढता फेर आकारणी संबंधी ज्या ज्या अडचणी येत आहे त्या अडचणी कशा कमी करता येतील याचा विचार व्हावा.

**श्री.अजिजउल्ला बेग** : शहरातील मालमत्ता कर आकारणीच्या सर्व्हे मध्ये बऱ्याच चुका झालेल्या आहेत. सर्वेकरतांना कनिष्ठ अभियंता ऐवजी त्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांनी काम केलेले आहे. हा सर्वे करतांना मालमत्तेसंबंधी मुळ कागदपत्रे पाहिली नाहीत. त्यामुळे फेरआकारणीच्या कामांत मुळ मालमत्ता धारकाचे नावांत बदल होणे असलेल्या खोल्यापेक्षा जादा खोल्यांची संख्या दाखविणे अशा प्रकारच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. तेव्हा मालमत्ता कर आकारणी साठी शहराचा पुन्हा सर्वे करून दिनांक १-४-१९८९ पासून कर आकारणी करण्यांत यावी.

**श्री.अजिज जहागिरदार** : सभासदांनी खुलासा केल्याप्रमाणे मालमत्ता कर फेर आकरणी मध्ये कर आकारणी विभागाकडून बऱ्याच चुका झालेल्या आहेत या बाबींचा विचार करून आक्षेप अर्जाच्या सुनावणी साठी ३१ जानेवारी १९९० पर्यंत मुदतवाढ देण्यांत यावी. म्हणजे मालमत्ता कर फेरआकारणी मध्ये काय सुधारणा करावयाच्या आहेत. याचा विचार करता येईल.

**श्री. अलफखाँ हुसेनखाँ** : मालमत्ता कर फेरआकारणी बाबतची दिनांक १२-१०-१९८९ ची नोटीस दिनांक २८/११/१९८९ ला मिळाली आहे. तसेच नोटीस वाटप करण्यामध्ये बऱ्याच त्रुटी राहिल्या आहेत. बहुतांशी नोटीसेस संबंधीत असमांस केंव्हा वाटप झाल्या याची तारीख किंवा सदर नोटीस केंव्हा वाटप केली यासंबंधी संबंधीत

कर्मचाऱ्याने तारखेची नोंद केलेली नाही. तसेच फेर आकारणी मध्ये खुल्या जागेवर कर आकारणी करण्यात आलेली नाही. तेंव्हा या सर्व बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

**डॉ. शांताराम काळे** : मालमत्ता करात झालेल्या वाढीमुळे शहरातील नागरिक संभ्रमात आहेत ही कर आकारणी सर्वसामान्य नागरिकांना जाचक आहे. तेंव्हा एखादा मालमत्तेचा एर.आर.व्ही परत वाढविण्याचा अधिकार आहे काय? बांधकाम वर्गीकरणाच्या अ, ब,क, ड प्रमाणे कर आकारणी करतांना मालमत्तेचा जो भाग भाड्याने दिला आहे त्या भागावर मिळणाऱ्या उत्पन्ना प्रमाणे कर आकारणी केली जाते का? याचा शोध घेणे आवश्यक आहे. नागरिकांना वाटप करण्यात आलेल्या कर आकारणीच्या नोटीसेस वरून लावण्यात आलेल्या कर क्षेत्रफळाचे ५०% ला उत्पन्नाच्या ५०% या प्रमाणे कर आकारण्यात आला आहे याचा नागरिकांना बोध होत नाही म्हणून या सर्व बाबींचा सर्वकष विचार झाल्याशिवाय कर आकारणी लागू करू नये.

**श्री.यादव अशोक सायन्ना:** सुनावणीला आलेल्या नागरिकांनाकडून वाढीव मालमत्ता कराबाबत चौकशी झाली असता नगरसेवकांनीच मालमत्ता कर वाढवला आहे असे अधिकाऱ्याकडून नागरिकांना सांगितले जाते हा काय प्रकार आहे तेच समजत नाही. त्यामुळे ही महापालिका महापौर, उपमहापौर, सभागृह चालवते किंवा अधिकारी चालवतात हेच समजत नाही.

**श्री. चंद्रकांत खैरे** : स. सभागृह श्री. यादव अशोक सायन्ना यांचे सुचनेप्रमाणे नागरिकांना माहिती देण्यात येते ही गोष्ट खरी आहे. मालमत्ता कराविषयी बऱ्याच तक्रारी आहेत. कर आकारणी संबंधाने सभासदांनी केलेलया सर्वसूचना योग्य आहेत. तेंव्हा ३१ जानेवारी, १९९० पर्यंत आक्षेप अर्जाची सुनावणी स्थगित करावी.

**सौ. लता दलाल** : शहरात एकूण किती घरे आहेत? त्यापैकी किती घरांना कर आकारणी लागू करण्यात आली? या माहिती वरून शहरातील बऱ्याच घरांना कर आकारणी, झालेली नाही. असे दिसते. कर आकारणीच्या सर्व्हेसाठी योग्य अशा कर्मचाऱ्यांची नेमणूक झालेली नाही. कर आकारणी संबंधी देण्यात आलेल्या नोटीसेस मध्ये बांधकाम वर्गीकरणाचा स्पष्ट उल्लेख नाही सभागृहाच्या मंजुरीप्रमाणे कर आकारणी संबंधी योग्य अंमलबजावणी झालेली नाही. व सभासदांनी मागितलेली माहितीही मिळत नाही, त्यामुळे शहरात सन्माननीय सभासदांनी बदनामी झाली आहे. म्हणून महापालिकेच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाचा निषेध करण्यात येतो. मालमत्ता कराच्या योग्य आकारणी साठी पुन्हा सर्व्हे करण्यात यावा काही कर्मचारी संगनमत करून कर कमी करण्याचा प्रयत्न करता म्हणून.

**डॉ. चेनकरण संचेती** : मालमत्ता कराचा पुन्हा सर्व्हे करण्यात यावा. स. सभासद

श्री. सायन्ना यांनी आत्ताच केलेलया खुलाशाप्रमाणे ही पालिका सभासद चालवत नसून अधिकारी चालवत आहेत.

**मा. महापौर** : भ्रष्टाचाराचा आरोप करतांना स. सभासदांनी संबंधीत विशिष्ट धिकाऱ्यांची नावे दिलीतर त्या विषयी योग्य ती कार्यवाही करता येईल. मा. आयुक्त यांचा महापालिका अधिकाऱ्यांवर अंकुश नाही.

**श्री.यादव अशोक सायन्ना:** वार्ड आणि शहरातील विकास कामाबाबत महानगरपालिका अधिकाऱ्याकडे बऱ्याच वेळा लेखी मागणी करण्यात आली तसेच स्थायी समिती मध्येही या प्रश्नांवर अनेक वेळा चर्चा घडवून आणली तरीही नागरिकांच्या हिताच्या कामांना महानगरपालिका अधिकाऱ्यांकडून गती मिळाली नाही. स्थायी समितीने अनेक कामांना मंजुरी दिलेली आहे. परंतु मंजुरी दिल्याप्रमाणे शहरात फारच कमी प्रमाणात विकास कामे चालू असल्याचे दिसते, अशा प्रकारे वारंवार मागणी करूनही विकास कामे होत नसल्यामुळे अधिकाऱ्यांच्या निषेधा बाबतचा ठराव सभागृहापुढे मांडत आहे. (असे सांगून स. सभासदांनी निषेधाचा ठराव लिहिलेला काळा कापडी फलक सभागृहापुढे दाखविला.)

**श्री. गंगाधर गाडे** : शहरातील नागरिकांकडून चुकीच्या पध्दतीने कर वसूल केला जात आहे. मालमत्ता कराबाबत सभागृहाने मंजूर केलल्या ठरावाप्रमाणे अंमलबजावणी केली जात नाही. आयुक्तांच्या अधिकाऱ्यांवर अंकुश नाही. शासनाची मर्जी सांभाळण्यासाठी आयुक्त काही विशिष्ट अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने काम करतात त्यामुळे, ही पालिका सभासद चालवत नसून अधिकारी चालवत आहेत असे दिसते. महापालिकेचे उत्पन्नात घट होण्यास सर्वस्वी मा. आयुक्त जबाबदार आहेत. उत्पन्नाच्या दैनिक आकडेवारीची तपासणी केली असता दररोजचे उत्पन्न फक्त २.५, २.४, २.३ असे तराजूच्या काट्याप्रमाणे रहात आहे. ते कमी किंवा जास्त कधीच होत नाही यावरून आयुक्तांच्या अधिकाऱ्यांवर अंकुश नाही. हेच सिध्द होते. आवश्यक माहितीसाठी आयुक्तांना अनेक पत्रे देऊन माहिती मागविण्यात आली आहे. यामध्ये मागील वर्षी अे-१ वर झालेल्या कामांच्या माहितीचा समावेश आहे. परंतु या पत्राचे संदर्भाने, आयुक्तांकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेने घेतलेलया निर्णयांची आयुक्तांकडून अंमलबजावणी केली जात नाही. आयुक्तांची मनमानल चालली आहे. स. सभासद श्री. यादव अशोक सायन्ना यांनी जो ठराव मांडला आहे. त्यास माझी सहमती आहे आयुक्तांच्या निषेध ठराव मंजूर करण्यात यावा.

**श्री. नरेंद्र पाटील** : भ्रष्टाचार हा गेल्या १५-२० वर्षापासून बोकाळला आहे. हा नविन नाही. भ्रष्टाचार निपटून काढण्याची आज नितांत गरज आहे.

**मा. महापौर** : मालमत्ता कर आकारणी संदर्भात आक्षेप अर्ज दाखल करणे व त्यांची सुनावणीसाठी ३१ जानेवारी, १९९० पर्यंत मुदतवाढ देण्यात येऊन मालमत्ता कर फेर आकारणी संबंधी ज्या-ज्या चुका झाल्या

आहेत त्या प्रकरणात पुन्हा सुनावणी करण्यात यावी. सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची नागरिकांना माहिती होण्याच्या दृष्टीने स्थानिक वृत्तपत्रात आवाहनात्मक निवेदन देण्यात यावे.

**श्री. रशिदखान (मामू)** : मालमत्ता कर आक्षेप अर्जाच्या सुनावनीसंदर्भात जे अधिकारी सुनावणीचे काम करतात त्या अधिकाऱ्यांना सुनावणीचे अधिकार आहेत काय? असल्यास ते कोणी दिलेत याचा खुलासा व्हावा. अवाजवी दराने कर आकारणी झालेली असल्यामुळे ही कर आकारणी रद्द करण्यात यावी. किंवा सन १९९०-९१ रोखण्यात यावी. अवास्तव मालमत्ता कर आकारणीचे माझा आक्षेप आहे.

**श्री. मनमोहनसिंग ओबेराय** :
मालमत्ता कर आकारणी प्रकरणी महानगरपालिका अधिकारी सभासदांना विश्वासत घेत नाहीत.

**श्री. अलफखाँ हुसेनखाँ** : मालमत्ता कर आकारणीवर फेर विचार करण्यासाठी विशेष सभा घेण्यात यावी.

**मा. महापौर** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे मालमत्ता कराचे संबंधाने ६ जानेवारी १९९० ला विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात येईल.

**श्री. मोतीराम घडामोडे** : सर्वसाधारण सभेच्या मंजुरीप्रमाणे बांधकाम. वर्गीकरणाबाबत निश्चित करण्यात आलेल्या अ,ब,क,ड वर्गीकरणाची सविस्तर माहिती, नागरिकांना होण्याच्या दृष्टीने आणि आक्षेप अर्ज दाखल करण्याकरिता सोईचे व्हावे या दृष्टीकोणातून झोन कार्यालयात मालमत्ता करा संबंधीचे आक्षेप अर्ज स्विकारण्याची व्यवस्था करण्यात यावी आणि प्रत्येक झोन कार्यालयात बांधकाम वर्गीकरणाच्या अ,ब,क,ड, वर्गीकरणाबाबत खुलाशेवार माहिती उपलब्ध ठेवावी.

**श्री. सुदाम वाघमारे** : मालमत्ता करासारख्या नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्ना संदर्भात माहिती घेण्याकरिता संबंधीत अधिकाऱ्याकडे विचारणा केली असता संबंधीत अधिकाऱ्यांनी माहिती देण्याचे सोडून नगरसेवक डोक्यावर बसतात असे अपशब्द वापरले. तेंव्हा नगरसेवकांविषयी अपशब्द वापरणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्याने सभागृहात माफी मागावी.

**करमुल्य निर्धारण अधिकारी:** स. नगरसेवक कार्यालयात आले होते, त्यावेळी संबंधितास मागीतलेल्या माहितीसंबंधी लेखी सूचना करण्यात सांगितले होते म्हणजे आवश्यक ती लेखी माहिती देता येईल असा खुलासा करण्यात आला तरीही यावेही अनवधानाने कळत न कळत स. सभासदांच्या भावना दुखावल्या गेल्या असल्यास मी दिलगीरी व्यक्त करतो.

**श्री. सुदाम वाघमारे / श्री. विठ्ठल पेरकर :**
: सन १९८९ मध्ये मालमत्ता करासंबंधी केलेल्या सर्व्हेच्या कामा बाबतचा राधा मोहन कॉलनी / रोकडिया हनुमान कॉलनी, पांडूरंग कॉलनी आदी भागांचे सर्व्हेचे बंच गहाळ असल्याची माहिती मिळाली आहे ही बाब अधिकाऱ्यांच्या लक्षात येताच या

भागांचा पुन्हा सर्व्हे करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. तेंव्हा सर्व्हेचे काम पुन्हा हाती घेण्यास कोणी परवानगी दिली होती इत्यादी सर्व प्रकरणांअंतर्गत संपूर्ण चौकशी करण्यात यावी.

**श्री. नरेंद्र पाटील** : एम.आय.डी.सी. भागात अद्याप मालमत्ता कर आकारणी बाबतच्या नोटीसेस वाटप झालेल्या नाहीत. तेंव्हा या भागात नोटीसा वाटतांना योग्य त्या दुरुस्त्यासह नोटीसेस देण्यात याव्यात.

**श्री.नामदेवराव मानकापे**: रोहिदासपुरा भागातील नागरिक, झोन अधिकारी, मो. शमिन आफंदी यांच्याकडे गेले असता श्री. आफंदी यांनी त्या नागरिकांना शिवीगाळ केली व त्या नागरिकांची कागदपत्रे फेकून दिली. तेव्हा या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी.

**डॉ. शांताराम काळे** : मालमत्ता कर आकारणी संबंधी ६ जानेवारी १९९० ला विशेष सभा घेण्याचा निर्णय सभागृहाने घेतलाच आहे. तेंव्हा सुनावणीचे काम बंद ठेवण्यात यावे.

**श्री. रतनकुमार पंडागळे**: मा. आयुक्त हे काही सभासदांनी सांगितल्याप्रमाणे चुकीची बेकायदेशिर कामे करत नाहीत, म्हणून सभागृहात मा. आयुक्तांचे विरोधात निषेध ठराव सभासदांकडून मांडला जावा हे योग्य नाही. अशा प्रकारे चुकीचा निषेध ठराव मांडण्याची सूचना योग्य नाही. मा. आयुक्त यांच्यावर चिखलफेक करणाऱ्या निषेध ठरावाचे निषेधार्थ स. सभासद, श्री. रतनकुमार पंडागळे यांनी १२.४० वाजता सभात्याग केला. स. सभासद, श्री. रतनकुमार पंडागळे यांचे सभात्यागाला पाठींबा व्यक्त करून स. सभासद श्री. किशोर थोरात व श्री. पिटर वंजारे यांनी सभात्याग केला.

**मा. महापौर** : आजच्या सर्वसाधारण सभेमध्ये मालमत्ता करासंबंधी आणि वाढीव मालमत्ता कर अंमलबजावणी बाबत स. सभासदांचे काही प्रस्ताव विचारार्थ सभे समोर असल्या नंतर सर्वसाधारणपणे बहुतांशी स. सभासदांनी सभागृहामध्ये यवर तीव्र आक्षेप घेऊन आपले काही विचार सभागृहासमोर मांडले आणि, मालमत्ता करा संदर्भात होत असलेले गैरप्रकार सभागृहाचे निदर्शनास आणले त्यावर योग्य सुधारणा होण्याच्या दृष्टीकोणातून सभागृहाच्या सर्व संमतीने मालमत्ता कर आक्षेपात अपिल करणे संबंधीची मुदत ३१ जानेवारी, १९९० पर्यंत वाढविण्यात येत असली तरीही त्याच बरोबर ज्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करासंबंधी नोटीसेस दिल्या नसतील, त्या नोटीसेस मध्ये योग्य ती दुरुस्ती करून अशा नोटीसेस देण्यात याव्यात. आक्षेप दाखल करणाऱ्या नागरिकांबरोबर ज्या अधिकाऱ्यांनी आक्षेपार्ह वर्तन केले असेल अशा अधिकाऱ्यांना सुनावणीच्या कामातून वगळण्यात यावे., तसेच मालमत्ता करासंबंधी निदर्शनास आलेल्या प्रकरणाबाबत स. सभासदांनी पालिका सचिव यांच्याकडे ३१ डिसेंबर, १९८९ पर्यंत आपल्या सूचना लेखी स्वरुपात पाठवाव्यात. मालमत्ता करासंबंधी सुधारित ठरावाबाबत ज्या स. सभासदांना ठराव मांडावयाचे असतील असे ठराव ६ जानेवारी, १९९० रोजी भरणाऱ्या विशेष सभेत मांडण्याच्या दृष्टीने पालिका सचिवांकडे सादर करावेत.

सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी या विषयीची सर्व माहिती सभेच्या दृष्टीने उपलब्ध ठेवावी. मालमत्ता करा संबंधी चालू असलेली सुनावणी प्रक्रीया ज्या पध्दतीने चालू आहे त्यात योग्य ती सुधारणा करून कार्यरत ठेवण्यात यावी. दि. ६ जानेवारी, १९९० रोजी सभागृहामध्ये जो काही निर्णय होईल, त्याची अंमलबजावणी करत असतांना त्यापूर्वी जो निर्णय घेतला जाईल त्या सर्व गोष्टी ६ जानेवारी, १९९० च्या निर्णयाच्या अधिन राहतील.

**श्री. मोतीराम घडामोडे** : मालमत्ता करा विषयी मा. आयुक्त यांनी वाल्मी येथे बोलावलेल्या बैठकीचे सूचनापत्रामध्ये स. सभासदांना उद्देशून ईमॉरल असा शब्द प्रयोग करून महापालिकेच्या सर्व सभासदांचा घोर अपमान केला आहे, अशा प्रकारे लोकनियुक्त स. सभासदांविषयी अशोभनिय शब्द वापरल्या बद्दल निषेध ठराव मांडत आहे.

**मा. उपआयुक्त** : मालमत्ता करासंबंधी वाल्मी येथे आयोजित केलेल्या सभेच्या सूचनेतील ईमॉरल या शब्दाबाबत मा. आयुक्त यांनी केलेला खुलासा मा. उपआयुक्त यांनी वाचून दाखविला व इमॉरल ऐवजी इनकेअर असा शब्द प्रयोग वाचावा असे संबोधून दिलगिरी व्यक्त केल्याचे सुचविले.

**मा. महापौर** : मा. आयुक्त ह्यांनी केलेले पहचान स्पष्टीकरणे समाधान कारक नाही.

**श्री.धनंजय गंगाखेडकर** : मा. आयुक्तांबाब बऱ्याच सभासदांनी नाराजी व्यक्त करून निषेध ठराव मांडला आहे, प्रत्येक सभासदाचे विचार वेगवेगळे असू शकतात, त्याला सर्वच सभासद सहमत असू शकतात असे नाही. तेंव्हा या ठिकाणी मांडलेल्या निषेध ठरावास मी सहमत नाही. मा. आयुक्त हे शासनाचे प्रतिनियुक्ती वरील सनदी अधिकारी आहेत, त्यामुळे शासकीय अधिकाऱ्याविषयी सभागृहात निषेध ठराव मांडणे योग्य नाही, त्या शिवाय अधिकारी सभागृहात उपस्थित नसतांना त्यांचे विषयी निषेध ठराव मांडण्याचा पायंडा पाडू नये.

**श्री. तकी हसन खान** : शासकीय अधिकारी सभागृहात उपस्थित नसतांना अशा प्रकारे निषेध ठराव मांडणे हे सभागृहाच्या दृष्टीने अयोग्य आहे, एखाद्या

**श्री. डॉ. शांताराम काळे** : अधिकाऱ्यावर लावण्यात आलेल्या आरोपांबाबत ठोस पुरावा असल्या शिवाय तया विषयीची कार्यवाही करणे योग्य होणार नाही त्यामुळे आम्ही या निषेध ठरावास सहमत नाही.

यावेळी स. नगरसेवक श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. किशोर थोरात व श्री. पिटर वंजारे यांनी सभागृहात प्रवेश केला. याचवेळी सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व अधिकारी वर्गानी १.३० वाजता सभागृह सोडले.

**मा. महापौर** : ज्या ज्या अधिकाऱ्यांनी सभागृह सोडले आहे अशा सर्व अधिकाऱ्यांना मा. उपआयुक्त यांनी कारणे दाखवा दखल पत्रे द्यावीत.

यानंतर मा. महापौरांनी निषेध ठराव मतदानास टाकण्याची सूचना सभागृहापुढे विचारार्थ ठेवली असता सभासदांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरू झाले यावेळी स. सभासद, श्री. रतनकुमार

पंडागळे, श्री. तकी हसन खान, श्री. पिटर वंजारे, श्री. किशोर थोरात श्री. म. अयुब गुलाम जिलानी यांनी निषेध ठरावा बाबत विरोध नोंदविला व २.०० वाजता सभात्याग केला.

**श्री.चंद्रकांत खैरे** : काही सभासदांनी यापूर्वीच निषेध नोंदविला असल्यामुहे पुन्हा नोंद घेण्याची आवश्यकता नाही.

प्रस्तावित सभागृहातील आरोप, प्रत्यारोप व सभात्यागाचे अनुषंगाने आणि वाल्मी येथे बोलविलेल्या स. सदस्यांचे बैठकीचे निमंत्रण पत्रिकेवर स. सभासदांसाठी मा. आयुक्त ह्यांनी इमॉरल (अनैतिक) हा शब्द वापरल्याबद्दल त्यांचा हे सभागृह बहुमताने निषेध नोंदवित आहे. मालमत्ता करासंबंधीचा प्रस्ताव पुढे ढकलण्यात येतो असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६२** : (सर्वसाधारण सभा दि. २०/११/८९) / पुरवणी दि. १७/११/८९ मालमत्ता कर आकरणी करिता नविन मंजूर दराने आकारण्यात आलेले करयोग्य मुल्यावर सामान्य कर २२% घेण्याऐवजी 'अ' व 'ब' वर्गा करीता १६% आणि 'क' व 'ड'वर्गाकरीता १४% प्रमाणे वसूल करण्याकरीता ठराव मंजूर करणे.

साफ सफाई कर ३% आकारण्या ऐवजी १% प्रमाणे वसूल करणे .

सूचक - श्री.अजिजुल्ला बेग
अनुमोदक - श्री.मिर्झा अन्वर बेग
दिनांक - १६-११-१९८९

**ठराव क्र. ६२** : सदर प्रस्ताव पुढे ढकलण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६३** : (सर्वसाधारण सभा दिनांक १६-१२-१९८९) / पुरवणी दिनांक १४-१२-१९८९ .

गेल्या सर्वसाधारण सभेत कराच्या बाबतीत जो ठराव पास करण्यात आला त्याप्रमाणे कराची वसूलीची अंमलबजावणी होत नसून जनतेमध्ये अनेक प्रकारचे गैरसमज पसरले आहेत. ज्यामुळे मनपाची बदनामी होत आहे. तरी कृपया सदरील कर आकारणीस स्थगिती देण्यात यावी व कर आकारणीवर फेर विचार व्हावा.

सुचक - श्री.गिरजाराम हळनोर
अनुमोदक - श्री.कचरू नवपूते
दिनांक - ८-१२-१९८९

**ठराव क्र. ६३** : सदर प्रस्ताव पुढे ढकलण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६४** : (सर्वसाधारण सभा दिनांक १६-१२-१९८९) / पुरवणी दिनांक १४-१२-१२८९

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सद्या औरंगाबाद मनपा हद्दीतील मालमत्ता कराची फेरआकारणीची नोटीसेस देण्यांचे काम चालू आहे.

परंतू वेळोवेळी फेर आकारणी नियमबाहय आहे म्हणून सद्या सदरील फेर आकारणी रद्द करण्यांत यावी कारण संबंधित अधिकाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यास सर्वसाधारण सभेस दिशाभुल करून दर निश्चित करून घेतले आहेत. व खालील प्रमाणे नियमांचे उल्लंघन केले आहे.

१ मनपा अधिनियम १९४९ चे नियम ९९ ची अंमलबजावणी केली नाही.
२ मनपा अधिनियम १९४९ प्रकरण ८ नियम २१ (२) चे पालन केले नाही.
३ मनपा अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील नियम ८ (१) ची पूर्तता केली नाही.
४ तसेच सद्या जुने दराने कर वसूलीसाठी महाराष्ट्र म्युनिसिपल ॲक्ट १९६५ चे कलम १२१(१) (९) चे पालन करण्यांत आले नाही.

सूचक - श्री.अजिज जहागिरदार
अनुमोदक - श्री.मिर्झा अन्वर बेग
दिनांक - १०-१२-१९८९

**ठराव क्र. ६४ :** सदर प्रस्ताव पुढे ढकलण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६५ :** (सर्वसाधारण सभा दिनांक २०-११-१९८९) / पुरवणी दिनांक १७-११-१९८९

वॉर्ड क्र.८ हर्सुल येथे महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये महानगरपालिकेच्या वतीने वाचनालय चालविणे बाबत.

सूचक - श्री.तुळशीराम भगुरे
अनुमोदक - श्री.मोहसिन अहमद
दिनांक - ०६-११-१९८९

**ठराव क्र. ६५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८ हर्सूल येथे महानगरपालिकेच्या वतीने वाचनालय चालविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६ :** (सर्वसाधारण सभा दिनांक २०-११-१९८९) / पुरवणी विषय पत्रिका

## *<u>ऐनवेळचे विषय</u>*

भूतपूर्व औरंगाबाद शहराची सुधारित विकास योजना तयार करणे बाबत.

औरंगाबाद महानगरपालिकेने ठराव क्र.७ दि. १८/०६/८८ अन्वये भूतपूर्व औरंगाबाद नगर पालिकेच्या क्षेत्राची मंजूर विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व कलम २३(१) अन्वये सुधारित करण्याचा इरादा जाहिर केला आहे.

मा. उप संचालक, नगररचना, औरंगाबाद , विभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्रमांक विखो/औरंगाबाद/(सु) सर्वसाधारण /उसें-ओ/३८६२/दिनांक ९/११/८९ अन्वये औरंगाबाद शहराची सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी शासनाच्यानगर रचना विभागाचा एक विशेष घटक मंजूर करून घेण्याबाबत सुचविले आहे. पुणे येथे सर्व महानगरपालिका आयुक्तांचे बैठकीत मा. संचालकांनीही तशीच सूचना केली आहे. महानगरपालिका क्षेत्राची विका योजना तयार करण्यासाठी नाशिक, ठाणे, पिंप्रीचिंचवड, नागपुर व कोल्हापुर महानगरपालिकांनी शासनाकडून नगररचना विभागाचा एक एक विशेष घटक तयार करून घेतला आहे. त्याचा धरतीवर औरंगाबाद शहराची सुधारित विकास

योजना तयार करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने नगररचना विभागाच्या उपसंचालकांच्या अधिपत्याखाली इतर कर्मचारी वर्गासह एक विशेष घटन निर्माण करण्यास शासनास विनंती करण्यात यावी. या विशेष घटकाचा खर्च महानगरपालिकेस सोसावा लागेल ही अवधी एक वर्षाकरिता रहील.

औरंगाबाद शहराची सुधारित विकास योजना जलद गतीने तयार होणे आवश्यक असल्याने वरील विशेष घटाकाची निर्मिती करण्यास मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

**संवाद** :

**श्री. अलफखाँ हुसेनखाँ** : शहराच्या सुधारित विकास आराखड्यासाठी आवश्यक त्या कर्मचारी वर्गाची व्यवस्था झाल्यास सुधारित विकास योजना तयार करण्याचे काम त्वरित होईल. या ठरावास मी सहमत आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग** : सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी नगररचना विभागाचा एक विशेष घटक मंजूर करून घेण्याबाबत सूचविले असले तरी या विशेष घटका बाबतचे सविस्तर विवरण त्या सोबत दिलेले नाही. विशेष घटका बाबतच्या पगार, भत्ते इत्यादी बाबतची सभासदांना माहिती असणे आवश्यक आहे.

**मा. महापौर** : स. सभासद, श्री. अजिजुल्ला बेग यांचे विचाराशी मी सहमत आहे.

**ठराव क्र. ६६** : सर्वानुमते असे ठरले की, सविस्तर माहितीसह सदर प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा.

**विषय क्र. ६७** : (सर्वसाधारण सभा दि. १६/१२/८९) / पुरवणी दि. १४/१२/८९.

यापूर्वी प्रमाणे प्रस्ताव सादर करतो की, शहरात पाणी पुरवठा करतांना ½ नळासाठी वार्षिक रु. ४००/- ऐवजी रु. ३००/- किंवा २५०/- करवा यासाठी यापूर्वी एक सब कमिटीही नेमण्यात आली होती. परंतु अद्याप त्यावर निर्णय नाही. तेंव्हा यास तीन महिनेच्या वर काळ लोटल्यामुळे पुनश्च तोच ठराव याद्वारे मांडीत आहे.

सुचक - मोतीराम घडामोडे
अनुमोदक - कचरू नवपुते.
दिनांक - ०७/१२/८९.

**संवाद** :

**श्री. मोतीराम घडामोडे, श्री. केशव सोनवणे**

: शहरात सध्या एक दिवसा आड पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत विशेषत: सिडको भागातील नागरिकांना तर आठवड्यातून तर आठवड्यातून दोन/दोन दिवस पाणी मिळत नाही. तेंव्हा खऱ्या अर्थाने पाणी पुरवठा होईपर्यंत तरी १/२ नळासाठी रु. ४००/- ऐवजी कमीत कमी ३००/- वार्षिक पाणीपट्टी आकारण्यात यावी.

**श्री. अजिजुल्ला बेग** : मालमत्ता कराप्रमाणेच पाणीपट्टीची आकरणी ही त्या मालमत्तेच्या एन. आर.व्ही वर काही टक्के प्रमाणे आकारण्यात यावी. तसेच नविन नळ कनेक्शन देतांना वॉटर मिटरसाठी रक्कम रु. १००/-

(वॉटर मिटर चार्जेस) घेतले जातात पण प्रत्यक्षात वॉटर मिटर पुरविले जात नाही. तर महापालिकेला वॉटर मिटर साठी रुपये १००/- घेण्याचा काय अधिकार आहे.

**श्री. धनंजय गंगाखेडकर:** पाणी पुरवठा करतांना त्या त्या आकारमानाच्या कनेक्शन मधून सर्व ठिकाणी सारख्याच प्रमाणात पाणी पुरवठा होणार आहे ही बाब लक्षात घेता मालमत्ता धारकाकडून मालमत्तेच्या एक.आर.व्ही. वर काही टक्के दराने पाणीपट्टीची आकारणी करणे योग्य होणार नाही यामुळे सर्वांना सारखाच पाणीपुरवठा होऊन सुध्दा पाणी पट्टीच्या दरात तफावत निर्माण हाईल म्हणून स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे मालमत्तेच्या एन.आर.व्ही. वर काही टक्के दराने पाणीपट्टी आकरणयात मी सहमत नाही.

**श्री. अलफखाँ हुसैनखाँ :** स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे पुणे शहरात एन.आर.व्ही. च्या रकमेवर ८%, ९% अशा दराने पाणीपट्टी आकरण्याची पध्दत आहे. या पध्दती प्रमाणे मालमत्तेच्या करमुल्यावर टक्केवारी पमाणे पाणीपट्टी वसूल करत असतांना अनेक अडचणी येणार आहेत तसेच पाणीपट्टीचे दर कमी करत असतांना महापालिकेला पाण्यासाठी खर्च करावी लागणारी रक्कम लोकवर्गणी इत्यादी बाबींचा सर्वकष विचार व्हावा.

**श्री. केशव सोनवणे** : स. सभासद, श्री घडामोडे यांचे प्रस्तावा प्रमाणे रुपये ४००/- ऐवजी रु. ३००/- वार्षिक या प्रमाणे आकारणे योग्य आहे.

**ठराव क्र. ६७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात पाणीपुरवठा करतांना १/२ नळ कनेक्शनसाठी रुपये ४००/- ऐवजी रुपये ३००/- वार्षिक. या दराने दिनांक १ जानेवारी, १९९९० पासून पाणीपट्टी आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

तसेच नळ कनेक्शन देतांना वॉटर मिटरचा पुरवठा होणार असेल तरच यासाठी घेण्यात येणारे रुपये १००/- चार्जेस वसूल करण्यात यावे अन्यथा वॉटर मिटरचा पुरवठा होणार नसेल तर अशा प्रकारचे चार्जेस वसूल करण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६८ :** (सर्वसाधारण सभा दि. २०/११/८९) / पुरवणी दि. १७/११/१९८९.

क्रीडा विभागास राज्य व केंद्रीय शासनाकडून वेगवेगळ्या स्वरुपाचे अनुदान प्राप्त करून घ्यावे. क्रीडा विभागाने मनपाच्या दृष्टीकोनातून केलेल्या प्रगतीचा अहवाल सभागृहास देण्यात यावा.

सुचक - श्री. मोहसिन अहमद

अनुमोदक - श्री. अजितकुमार शेळके

दिनांक - १६/११/८९

**ठराव क्र. ६८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रीडा विभागास राज्य व केंद्र शासनाकडून वेगवेगळ्या स्वरुपाचे अनुदान प्राप्त करून घेण्यास आणि क्रीडा विभागाने म.न.पा.च्या दृष्टीकोनातून केलेल्या प्रगतीचा अहवाल सभागृहास सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

### *दिनांक १६/१/१९९० रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**मंगळवार दिनांक १६/०१/१९९० रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे, यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभूवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग | |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मण | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजुउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार | --//-- |
| ७) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ८) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| ९) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| १०) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| ११) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १२) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १३) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १४) | मा. श्री. प्रधान बंडू गोविंदराव | --//-- |
| १५) | मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | --//-- |
| १६) | मा. श्री. जावेद हसन खान कासिम खान | --//-- |
| १७) | मा. श्री. तकी हसनखाँन कासिमखाँन | --//-- |
| १८) | मा. श्री. अ. स. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दन | --//-- |
| १९) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| २०) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| २१) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २२) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २३) | मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ.हमीद खान | --//-- |
| २४) | सौ. दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २५) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २६) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २७) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २८) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २९) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| ३०) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३१) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३२) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३३) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |

३४) मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद --//--
३५) मा. श्री. स. हुसेन स. अहमद --//--
३६) मा. श्री. मगर शंकर जिजाराम --//--
३७) मा. श्री. मानकापे नामदेव शामराव --//--
३८) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी --//--
३९) मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान --//--
४०) मा. श्री. अलफखान हुसेनखान --//--
४१) मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास --//--
४२) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी --//--
४३) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव --//--
४४) मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान --//--
४५) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव --//--
४६) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. --//--
४७) मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन --//--
४८) मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार --//--
४९) मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम --//--
५०) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम --//--
५१) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव --//--
५२) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव --//--
५३) मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल --//--
५४) मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान --//--

"वंदे मातरम्" या गीताने सभेची सुरुवात झाली.

**विषय क्र. ६९ :** दिनांक १६/१२/८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. रशिद मामू :** माहालिकेचा एकही अधिकारी आज सभागृहात उपस्थित नाही ही खेदाची बाब असून सभागृहाचा अवमान आहे. तेंव्हा या बाबत खुलासा व्हावा.

**मा. महापौर :** स. सभासदांचे मताशी मी सहमत आहे. अधिकारी वर्गाचे अनुपस्थितीबाबत सभागृहात वेगळी चर्चा केली जाईल. तत्पूर्वी जनतेच्या जिव्हाळ्याचा व महत्वाचा प्रश्न सभाग्रहापुढे विचाराधीन असल्याने यावर सभागृहाला योग्य निर्णय घ्यावयाचा आहे त्यासाठी अधिकारी वर्गाच्या उपस्थितीची आवश्यकता नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** विषय क्र. ६१ मध्ये स. नगरसेवक श्री. सुदाम वाघमारे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा. सभागृहाच्या एका सभासदाचा अवमान म्हणजे सर्व नगरसेवकांचा अवमान आहे असे मी मानतो. तेंव्हा अशा अधिकाऱ्याविरुध्द मुं. प्रां. महानगरपालिका अधिनियमा अंतर्गत योग्य ती वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. मधुकर शिंदे** : मापालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे जनतेची कामे घेऊन गेल्यास अधिकारी अरेरावीची भाषा करतात. तेंव्हा अशा अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करणार? याची माहिती देण्यात यावी.

**मा. महापौर** : इतिवृत्ताचा विषय कायम झाल्यानंतर महापालिकेच्या अधिकाऱ्यांविरुध्द काय कार्यवाही करावयाची यावर विचार करण्यात येईल. दि. १६/१२/१९८९ च्या सभेत करमुल्य निर्धारण अधिकारी यांनी सभागृहात दिलगिरी व्यक्त केली आहे. या व्यतिरिक्त सभागृहाबाहेर अधिकाऱ्यांचे जे वर्तण झाले त्या बाबत काय कार्यवाही केली याची माहिती नंतर सभागृहाला देण्यात येणार आहे.

**श्री. इकबालसिंग गिल** : ठराव क्र. ५६ अन्वये विधी समितीचे अध्यक्ष यांचीच मोफत कायदाविषयक सहाय्य व सल्ला समितीचे पदसिध्द सदस्य म्हणून नेमणू करावी असा नियम आहे काय? माझ्या माहितीप्रमाणे महापालिकेच्या कोणत्याही सदस्याचे नांवाची शिफारस करता येते. त्यानुसार सभागृहाने घेतलेला ठराव चुकीचा आहे असे माझे मत आहे.

**मा. उपमहापौर** : दि. १६/१२/८९ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तातील निषेध ठरावाबाबत स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांचेशी झालेल्या चर्चेअंती इतिवृत्तातून "निषेध" हा शब्द काढून टाकण्यात यावा असे ठरले होते. तेंव्हा इतिवृत्त कायम करण्यापूर्वी या इतिवृत्तातून "निषेध" हा शब्द काढून टाकण्यात यावा.

**श्री. मोतीराम घडामोडे** : मा. आयुक्तांतर्फे सभासदांना देण्यात आलेल्या पत्रात "इमॉरल" हा शब्द वापरला म्हणून सभागृहात निषेध इराव मांडला होता. या इमॉरल शब्दाबाबत मा. आयुक्तांनी पत्र देऊन दिलगिरी व्यक्त केली असेल तर मी देखील माझा निषेध ठराव मागे घेण्यास बांधील आहे.

**श्री. अजिज जहागिरदार**: मा. आयुक्तांनी मागील सभेत पत्र देऊन "इमॉरल" या शब्दाऐवजी "इनफेवर" हा शब्द वापरावा असे सांगून दिलगिरी व्यक्त केली होती. त्यामुळे पुन्हा लेखी सूचना देण्याची गरज नाही.

**डॉ. चेनकरण संचेती** : व्यक्त केली होती. त्यामुळे पुन्हा लेखी सूचना देण्याची गरज नाही.

**मा. महापौर** : ज्याप्रमाणे मा. आयुक्तांच्या पत्रात "इमॉरल" हा शब्द वापरून सभासदांना पत्र वाटप करण्यात आले त्याचप्रमाणे त्याचा खुलासाही सर्व सभासदांना वैयक्तिकरित्या द्यावयाला हवा होता. किंवा सभागृहात खुलासा करावयास हवा होता. तो झाला नाही. कोणाचाही अवमान होऊ नये अशी अपेक्षा आहे. सभागृहाची प्रतिष्ठा राखली जावी.

**श्री. नरेंद्र पाटील** : दिनांक १६/१२/८९ च्या सभेतील निषेध ठरावाचा स्पष्ट उललेख होत नाही. तेंव्हा याबाबत स्पष्ट खुलासा व्हावा.

**श्री. तकी हसन खाँ / श्री. अलफखाँ हुसेनखाँ**

: दि.१६/१२/८९ च्या सभेत निषेध ठरावाबाबत मतदान झाले नाही. स्पष्ट खुलासा इतिवृत्तात असतांना निषेधाचा ठराव बहुमताने मंजूर झाला असे म्हणणे चुकीचे होईल. तेंव्हा या ठरावातील बहुमत हा शब्द काढून टाकण्यात यावा.

**मा. महापौर** : ठराव क्र. ६१ मधील बहुमत हा शब्द वगळण्यात यावा.

**श्री. अजिजुल्ला बेग** : विषय क्र. ६७ मध्ये नळ कनेक्शन देतां वॉटर मिटरचा पुरवठा होणार असेल तरच यासाठी घेण्यात येणारे रु. १००/- चार्जेस वसूल करण्यात यावे असा उल्लेख करण्यात आलेला आहे. या ठिकाणी चार्जेस हा शब्द योग्य नाही. तेंव्हा चार्जेस या शब्दाऐवजी "डिपॉझिट" (अनामत) हा शब्द वापरावा. याशिवाय य ठरावात डिपॉझिट बाबतची अंमलबजावणी केंव्हापासून करण्यात येईल याचा उल्लेख नाही. तेंव्हा ज्याप्रमाणे रु. ४००/- ऐवजी रु. ३००/- वार्षिक या दराने पाणीपट्टी आकारण्यास १ जानेवारी, १९९० पासून मंजुरी दिली आहे. त्याच्प्रमाणे वॉटर मिटरच्या डिपॉझिट बाबतच्या निर्णयाची अंमलबाजवणी १ जानेवारी, १९९० पासून करण्यात यावी अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. अलफखाँ हुसेनखाँ** : पाणीपट्टी आणि वॉटर मीटर डिपॉझिटबाबत आवश्यक ते उपविधी तयार करण्यात आलेले आहेत. सभागृहाच्या निर्णयाप्रमाणे पाणीपट्टी व वॉटरमिटर डिपॉझिटबाबत दुरुस्ती करावयाची असेल तर या संदर्भातील उपविधीमध्ये आवश्यक ती दुरुस्ती केली तरच या ठरावाची योग्यरित्या अंमलबजावणी करता येईल. तेंव्हा त्यादृष्टीने विचार व्हावा.

**श्री. मोतीराम घडामोडे** : सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने सभागृहाने १/२ इंच नळ कनेक्शनकरिता रु. ४००/- ऐवजी रु. ३००/- वार्षिक पाणीपट्टी आकारण्यास मंजुरी दिली आहे. त्याचप्रमाणे ३/४ इंची नळ कनेक्शन आणि १ इंच नळ कनेक्शनसाठी त्या त्या प्रमाणात वार्षिक दर कमी करण्याबाबत विचार व्हावा

**मा. महापौर** : १/२ इंच नळ कनेक्शनच्या वार्षिक पाणीपट्टी दर कमी करण्यास सभागृहाने ज्याप्रमाणे मंजुरी दिली आहे त्याचप्रमाणे निवासोपयोगी वापरासाठी असलेल्या ३/४ इंची आणि १ इंची नळ कनेक्शनचे वार्षिक पाणीपट्टी दर कमी करण्यात यावेत. तसेच ठराव क्र. ६७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वॉटर मीटर डिपॉझिट बाबतची अंमलबजावणी १ जानेवारी, १९९० पासून करण्यात यावी.

**श्री.रतनकुमार पंडागळे** : आयुक्तांचे अनुपस्थितीत उपायुक्त हे आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून काम पहातात. त्याप्रमाणे उपायुक्त यांनी मागील सभेत मा. आयुक्तांनी व्यक्त केलेल्या दिलगिरीचे पत्र सभागृहात वाचून दाखविले महापालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांना जनतेची कामे करावयाची आहेत. तेंव्हा अशा प्रकारे निषेध व्यक्त करणे योग्य होणार नाही. म्हणून स. सभासद घडामोडे यांनी निषेध ठराव मागे घ्यावा.

**डॉ. चेनकरण संचेती** : मा. महापौर यांनी सुचविल्याप्रमाणे सभासदांना वैयक्तिकरित्या

लेखी खुलासा करावयास पाहिजे हे म्हणणे बरोबर असले तरी मा. आयुक्त यांचे विचार सभागृहास मा. उपायुक्तांनी वाचून दाखविले आहेतच. तेंव्हा "निषेध" शब्द काढून टाकणे योग्य होईल.

**श्री. तकी हसनखाँ** : वाल्मी येथील बैठकीत देखील मा. आयुक्तांनी दिलगिरी व्यकत केली होती. त्यावेळी या शब्दाचा खुलासा उपस्थित सभासदांनी करावयास होता.

**श्री. कचरू नवपुते** : वाल्मी येथे झालेल्या सभेत उपस्थित होता. यावेळी सदरची सभा शासकीय आहे किंवा अशासकीय आहे? अशा प्रकारची विचारणा मी व स. सभासद श्री. अशोक सायन्ना यांनी केली होती.

**मा. महापौर** : वाल्मी येथे आयोजित सभा अधिकृत नव्हती तरीही या सभेसाठी ज्या सभासदांना पत्र दिले त्याचप्रमाणे मा. आयुक्त यांनी दिलगिरी निर्देशक पत्र सभासदांना द्यावयास हवे होते. दिलगिरी व्यक्त करणे म्हणजे फार कमीपणा घेणे असे नाही. असे मला वाटते.

**ठराव क्र. ६९** : सभागृहातील चर्चेनुसार -

१) ठराव क्र. ६१ मधील मा. आयुक्त ह्यांनी "इमॉरल" हा शब्द वापरल्याबद्दल मा. आयुक्तामार्फत उप आयुक्त ह्यांनी सभागृहात दिलगिरी व्यक्त करून "इमॉरल" शब्दाऐवजी "इनफेवर" हा शब्द वापरावा, तसेच सभागृह बहुमताने निषेध नोंदवित आहे. या वाक्याऐवजी "निषेध" हा ज्यांचा त्यांचा वैयक्तिक विचार गृहीत धरून "सभागृह बहुमताने निषेध नोंदवित आहे" या वाक्यातील "सभागृह बहुमताने" हे शब्द वगळण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

२) ठराव क्र. ६७ मधील "नळ कनेकशन" देताना वॉटर मीटरचा पुरवठा होणार असेल तरच यासाठी घेण्यात येणारे रु. १००/- चार्जेस वसूल करण्यत यावेत या वाक्यातील "चार्जेस" या शब्दाऐवजी "अनामत अशी दुरुस्ती करून १/२" नळ कनेक्शन प्रमाणेच ३/४ नळ कनेक्शनकरिता रु. ७२०/- ऐवजी रु. ४५०/- वार्षिक या दराने दिनांक १ जानेवारी १९९० पासून पाणीपट्टी आकारणी आणि वॉटर मीटर बाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी. यासाठी प्रशासनाने तयार केलेल्या उपविधीमध्ये आवश्यक ती रितसर दुरुस्ती करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

वरील दुरुस्ती व वाढ करण्यासह दिनांक १६/१२/८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त काय करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ७०** : दिनांक १६ डिसेंबर १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत घोषित केल्याप्रमाणे महानगरपालिका प्रशासनातर्फे कार्यान्वित करावयाच्या मालमत्ता कर विषयक, फेर आकरणी संदर्भात सर्वकष विचार विनिमयार्थ प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद** :

**मा. महापौर:** मालमत्ता कर आकरणीचा विषय प्रशासनामार्फत सभागृहापुढे विचारार्थ आला होता. या ठरावाचे अंलमबजावणीचे वेळी नागरिकांच्या मनात उद्रेक निर्माण झाला आणि पर्यायाने मालमत्ता कराविषयी अनेक आक्षेप अर्ज प्राप्त झाले. त्यानुसार काही

अधिकारी पुण्यास जाऊन मालमत्ता कराबाबत अभ्यास करून आले असता त्यांच्या असे निदर्शनास आले की, मालमत्तेत बदल झाला नसेल तर करयोग्य मुल्यामध्ये वाढ करता येत नाही. तसेच करयोग्य मुल्यामध्ये वाढ करण्यास शासनाकडून अद्याप संमती मिळालेली नाही. या बाबी लक्षात घेता शहरातील मालमत्ताचे करयोग्य मुल्य वाढविणे योग्य होणार नाही.

(यावेळी मा. महापौरांनी प्रशासनातर्फे करण्यात आलेला खुलासा सभागृहात वाचून दाखविला) वरील बाबी लक्षात घेता मालमत्ता कर आकरणी बाबत सभागृहास पुनर्विचार करावयाचा आहे. त्यानुसार मालमत्ता कर आकारणी बाबत खालीलप्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव सभागृहासमोर विचारार्थ ठेवण्यात येत आहे.

**ठराव क्र. ७०** : मालमत्ता कराच्या संबंधी जो ठराव दि. १६/८/८९ (क्र.४) रोजी सभागृहासमोर प्रशासनाने ठेवलेला होता. तो ठराव योग्य पध्दतीने मांडलेला नव्हता म्हणून तो ठराव रद्द करण्यात यावा. कारण पूर्वीच्या एन.आर.व्ही मध्ये कुठलेही फेरबद्दल होऊ शकत नाही. जर काही मातमत्ते फेरबद्दल किंवा नविन बांधकाम झालेले आहे त्या मालमत्तांची पाहणी करून नियम २० प्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

नियम क्र. २० प्रमाणे ज्या मालमत्ता सुनावणी होऊन नविन पध्दतीने कर आकारणी करण्यात आलेली असेल, तो कर नियमाप्रमाणे कमी करून बाकीचा फरक पुढील वर्षात समाविष्ट (ॲडजस्टमेंट) करण्यात यावा.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे

अनुमोदक - श्री. अजिज जहागिरदार

वरील ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौरांनी घोषित केले.

राष्ट्रगितानंतर आजची सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

***दिनांक १९/०२/१९९० रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त***

**दिनांक १९/०२/१९९० रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे, यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभूवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | |
| २) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ३) | मा. श्री. अजीजुउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ४) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ५) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ६) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| ७) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| ८) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| ९) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १०) | मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | --//-- |
| ११) | मा. श्री. तकी हसनखाँन कासिमखाँन | --//-- |
| १२) | मा. श्री. अ. स. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दन | --//-- |
| १३) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| १४) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| १५) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| १६) | मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ.हमीद खान | --//-- |
| १७) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| १८) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| १९) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २०) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २१) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| २२) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| २३) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| २४) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| २५) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| २६) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| २७) | मा. श्री. स. हुसेन स. अहमद | --//-- |
| २८) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| २९) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३०) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ३१) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | --//-- |
| ३२) | मा. श्री. अलफखान हुसेनखान | --//-- |
| ३३) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |

३४) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी --//--
३५) मा. श्री. अजिमखॉं दादामिया अ. रहेमान --//--
३६) श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव --//--
३७) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. --//--
३८) मा. श्री. गोडसे आनंद जगदिश --//--
३९) मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार अहमद --//--
४०) मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम --//--
४१) मा. श्री. गाडे गंगाधर सुखदेव --//--
४२) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव --//--
४३) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव --//--
४४) मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान --//--

**विषय क्र. ७१ :** दिनांक १६ जानेवारी, १९९० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद** :

**श्री. अजिजुल्ला बेग** : मागील बैठकीत सुविल्याप्रमाणे वॉटर मीटरच्या अनामत रकमेबाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी व जानेवारी १९९० पासून करण्यात यावी असे ठरले होते तेंव्हा प्रशासनाने ह्याबाबत काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** : गत सभेंत ठरल्याप्रमाणे १/२ इंची नळ कनेक्शनसाठी रक्कम रु. ३००/- प्रतिवर्ष आणि मीटर अनामत व घेण्यासंबंधीच्या निर्णयाची अंमलबजावणी संदर्भात प्रशासनाने योग्य ती उपविधी दुरुस्ती व अंमलबजावणी करावी.

**श्री. रशिद मामू** : शिवसेना नेते श्री. भानुशाली ह्यांनी शहरातील निवडणूक प्रचाराचे वळी स्त्रीयांचे बाबतीत काढलेल्या अनुचित उद्‌गारा संदर्भात मी निषेध प्रस्ताव मांडला होता. तेंव्हा सभागृहात निषेध ठराव पारित करण्यात यावा.

**मा. महापौर** : स. सदस्य श्री. रशिद मामू यांचे निषेध प्रस्तावाशी ह्या सभागृहाचा काही एक संबंधी पोहोचत नसल्याने प्रसताव दाखल करता येत नाही.

स. सदस्य श्री. रशीद मामू ह्यांचा प्रस्ताव मा. महापौरांनी फेटाळून लावल्याने स. सदस्य श्री. रशिदमामू ह्यांचा सभात्याग.

**ठराव क्र. ७१ :** दिनांक १६ जानेवारी, १९९० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ७२ :** शासन निर्णय नगर विकास आरोग्य व गृहनिमार्ण विभाग क्र. व्हीपीएस-३०६७-२२-९६३ दिनांक २४-१९६९ व क्रमांक ३०७३-४२५ डब्ल्यु-२ दिनांक ६-१-१९७५ अन्वये औरंगाबाद शहराची विकास योजना (भुतपूर्व हद्दीसाठी ) दोन टप्प्यांत मंजुर करण्यांत आली असून ती दिनांक १-३-१९७५ पासून अंमलात आली आहे. महाराष्ट्र

प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ अन्वये विकास योजना मंजूर होवून अंमलात आल्यानंतर त्योच रिव्हीजन दहा (१०) वर्षात किमान एकदा होणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहराची सुधारित विकास योजना अंमलात येऊन १० वर्षे झालेले आहे. त्यामुळे आता सुधारित विकास योजना तयार करून प्रकाशित करणे आवश्यक आहे. याकरिता विद्यमान जमीन वापर सर्व्हेक्षण इत्यादी कामे लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे व त्यासाठी अनुभवी व जाणकार कर्मचारी असणे जरुरीचे आहे. औरंगाबाद शहराची झपाट्याने हो असलेली वाढ व त्यानुंषागाने वाढत्या लोकासंख्येच्या गरजा लक्षात घेता सध्या असलेल्या सुविधांवर ताण पडत आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने ठराव क्र. ७ दिनांक १८/०६/१९८८ अन्वये भूतपूर्व औरंगाबाद नगर परिषदेच्या हद्दिसाठी मंजूर विकास योजनेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३(१) अन्वये विकास योजना सुधारित करण्याचा इरादा जाहिर केला आहे. मा. उपसंचालक, नगररचना औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी त्यांचे प. क्र. वियो/औरंगाबाद (सु) सर्वसाधारण/उसऔ/३८३२ दिनांक ०९/११/८९ अन्वये औरंगाबाद शहराची वाढ व झालेलया विकास लक्षात घेऊन सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी शासनाचा नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाचा एक विशेष घटक मंजूर करून घेण्याबाबत सुचविले आहे. पुणे येथे सर्व महानगरपालिका आयुक्तांच्या बैठकीत मा. सचिवांनही तशीच सुचना केली आहे. नाशिक, ठाणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर व कोल्हापूर इत्यादी महानगरपालिकांनी शहराची सुधारित विकास योजना तयार करतांना शासनाकडून उपसंचालक, नगररचना यांची नियुक्ती करून एक एक विशेष घटक तयार करून घेतला आहे त्याच धर्तीवर औरंगाबाद शहरांची सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेनेही नगर रचना विभागाच्या उपसंचालकांच्या अधिपत्याखाली खालील कर्मचारी वर्गासह एक विशेष घटक प्रस्तापित करवे लागणार आहे. त्यात पुढील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी शासनामार्फत नियुक्त केले जातील.

| अ.क्र. | नियुक्त करावयाची पदे | वेतनश्रेणी पदांची (सुधारित) संख्या |
|---|---|---|
| १. | उपसंचालक नगररचना | ३७००-५००० |
| २. | नगर रचनाकार | २२००-३७०० |
| ३. | सहाय्यक नगर रचनाकार | १६४०-१९०० |
| ४. | रचना सहाय्यक | १४००-२३०० |
| ५. | अधिक्षक | १६४०-२९०० |
| ६. | लघुलेखक (उच्चश्रेणी) | २०००-३२०० |
| ७. | लिपिक नि टंकलेखक | ९५०-१५०० |
| ८. | सहाय्यक आरेखक | १४००-२३०० |
| ९. | कनिष्ठ आरेखक | १२००-२०४० |
| १०. | शिपाई | ७५०-९४० |

वरील घटकाचा एक वर्षाचा सर्वसाधारण खर्च अंदाजे रु.४,५०,०००/- अपेक्षित आहे व खर्च महानगरपालिकेस सोसावा लागेल.व हा अवधी एक वर्षाचा राहील औरंगाबाद शहराची सुधारित विकास योजना जलद गतीने तयार होणे आवश्यक असल्याने वरील विशेष घटाकची सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी निर्मिती करण्यास प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ७२ :** प्रस्तावात निर्देशित केल्याप्रमाणे औरंगाबाद शहराची सुधारित विकास योजना गतिमान करणेस्तव नाशिक, ठाणे, कोल्हापुर पिंपरी-चिंचवड व नागपूर इ. महानगराचे धर्तीवर नगररचना उपसंचालक नगररचना यांची नियुक्ती करून त्यांचे अधिपत्याखाली निम्ननिर्दिष्ट कर्मचारी वर्गासह एक विशेष घटक एका वर्षासाठी व तद्अनुषांगिक खर्चासाठी रक्कम रु. ४,५०,००० च्या खर्चास निम्निर्दिष्ट केल्याप्रमाणे मंजुरी देण्यात येते. नियुक्त करावयोच पद आणि वेतनश्रेणीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| **अ.क्र.** | **नियुक्त करावयाची पदे** | **वेतनश्रेणी पदांची (सुधारित) संख्या** |
|---|---|---|
| १. | उपसंचालक नगररचना | ३७००-५००० |
| २. | नगर रचनाकार | २२००-३७०० |
| ३. | सहाय्यक नगर रचनाकार | १६४०-१९०० |
| ४. | रचना सहाय्यक | १४००-२३०० |
| ५. | अधिक्षक | १६४०-२९०० |
| ६. | लघुलेखक (उच्चश्रेणी) | २०००-३२०० |
| ७. | लिपिक नि टंकलेखक | ९५०-१५०० |
| ८. | सहाय्यक आरेखक | १४००-२३०० |
| ९. | कनिष्ठ आरेखक | १२००-२०४० |
| १०. | शिपाई | ७५०-९४० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३ :** औरंगाबाद मंजूर विकास योजने अंतर्गत जुनाबाजार येथील आरक्षण क्र. ११ "खुली जागा" व त्या लगतचे २० फुट रुंद रस्ते वगळण्याबाबत श्री. एस.के. पटेल व इतर यांनी शासनास व महानगरपालिकेस विनंती केली असून त्यांचे महानगरपालिकेस विनंती केली असून त्यांचे महानगरपालिकेस दि. १७/४/८६ रोजी प्राप्त झालेल्या अर्जात आरक्षण क्र. ११ ची ५० टक्के जागा त्यांचे मिळकती लगतचे २० फुट रंद रस्ते आरक्षणातून वगळल्यास उर्वरित ६५१ चौ. मि. जमीन विनामोबदला महापालिकेस देण्याची तयारी दर्शविली आहे. या संदर्भात शासनाचे प. क्र. टीपीएस/३०८५/१७२४/सी.आर. १७३/८५/न.वि १२ दिनांक ६/१२/८८ अन्वये "औरंगाबाद" विकास आराखड्यातील स्थानांक क्र. ११ व त्या भोवतालचे २० फुटी रस्ते अनावश्यक असल्याने वगळण्यात येऊन आरक्षणाच्या आखणीत बदल करण्यात यावा" या प्रस्तावाशी शासन सहमत असून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरफाराचा वैधानिक प्रस्ताव संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे मार्फत शासनास सादर करण्यास कळविले आहे.

**संवाद** :

**मा. महापौर** : यापूर्वी सुचित केल्याप्रमाणे नगररचना विभागाच्या अंतर्गत असणारे सर्व प्रसताव विकास कामांचे दृष्टीने एकत्रित करून सभेपुढे सादर करावे.

**श्री. अजिज जहागिरदार, श्री. तकी हसनखान श्री. मिर्झा अन्वर बेग :**
सदरचा प्रस्ताव यापूर्वीच सीीने मंजूर केलेला असून केवळ शासनाकडे पाठपुरावा करणेसाठी सदरील प्रस्ताव दुरुस्त करून घेणे आवश्यक होते. त्याप्रमाणे दुरुस्त प्रस्ताव मंजूर करण्यास

हरकत नाही.

**ठराव क्र. ७३ :** प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजने अंतर्गतच्या जुनाबाजार येथील आरक्षण क्रमांक ११ "खुली जागा" महापालिका प्रशासनास विना मोबदला देऊ केलेली ६५१ चौ. मी. जागा आरक्षणात ठेवून उर्वरित २० फुट रुंद रस्त्याखालील व मूंर विकास योजनेच्याखुली जागा या आरक्षणातील उर्वरित जागा निवास भागात सामील करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४ :** मोहल्ला उस्मानपुरा येथील स.न.१२ पैकी नगर भूमापन क्रमांक १८३११ क्षेत्र १६२८६ चौ. मी. व नगर भूमापन क्र. १८३१०/भाग क्षेत्र ६३३.७५ ही सरकारी जमीन औरंगाबाद मंजूर विकास योजनेत शैक्षणिक क्षेत्र म्हणून दर्शविली आहे. सदर सरकारी मोकळी जागा परिसर अभियांत्रिकी, प्रियदर्शनी सोसायटी इतर काहींनी सदर जमीन निवासोपयोगी कारणासाठी मागितलेली असल्यामुळे जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी केलेल्या विनंतीवरून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये संदर्भित जागा शैक्षणिक क्षेत्रातून वगळून निवास भागात समाविष्ट करण्यासाठी कार्यवाही करण्यास दिनांक ०५/०८/१९८८ ला ठराव क्र. ७१ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार आवश्यक ती अधिसूचना महाराष्ट्र शासना राजपत्र अैरंगाबाद विभाग पुरवणी भाग एफ-अ चे पृष्ठांक १६७,१६८ दिनांक ११/०५/१९८९ व स्थानिक वर्तमानपत्र दैनिक अजिंठा दिनांक २७/०५/१९८८ व दैनिक आलमगीर टाईम्स दिनांक ३१/०५/१९८८ अन्वये प्रसिध्द करण्यात आले. त्यावर आलेल्या हरकती व सूचना संबंधात संबंधितास सुनावणी देण्यात आलेली आहे. प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झालेली असल्यास सदर किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी पाठविण्यास सर्वसाधारण सभेच्या ठरावासाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ७४ :** सदर प्रस्ताव आगामी सभेत योग्य त्या कार्यवाहीसाठी ठेवण्यात यावा. असे ठरले.

**विषय क्र. ७५ :** औरंगाबाद विकास योजने अंतर्गत पैठण रस्त्यालगत सिल्कमिल्क व त्या लगतचा भाग औद्योगिक क्षेत्रात आहे. या भागात विद्यमान मिल्सच्या लगत औद्योगिक क्षेत्रात बहुतांशी जागेत रहिवास वासाहत झालेली आहे. औद्योगिक क्षेत्राचा उत्तरेस मंजूर विकास योजनेचे निवास क्षेत्र असून त्या ठिकाणी रस्ते, पाणी पुरवठा इत्यादी सुखसोयी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच औद्योगिक क्षेत्रातही झालेल्या रहिवास वसाहतीमध्ये वरील सुखसोयी पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच या भागात मिल्सच्या कर्मचाऱ्यांना काही घरे बांधून देण्यात आली आहेत. या भागात आता विद्यमान रहिवास वापरात बांधकाम परवानगी व इतर विकासाची काम करता यावी यासाठी सोबतच्या नकाशात भाग

"ए" "बी" व "सी" मध्ये दर्शविलेले एकूण क्षेत्र ७.२ हेक्टर जमीन औद्योगिक क्षेत्रातून वगळून निवास भागात समाविष्ट करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी सादर.

**ठराव क्र. ७५ :** सदर प्रस्ताव आगामी सभेत योग्य त्या कार्यवाहीस्तव ठेवण्यात यावा, असे ठरले.

**विषय क्र. ७६ :** दिनांक ०३/०२/१९९० रोजी झालेल्या विशेष स्थायी समिती सभेमध्ये मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(क) मधील तरतुदीनुसार शहराचा सर्वांगिण विकास व अस्थापनेवरील खर्च लक्षात घेता सन १९९०-९१ या वित्तीय वर्षासाठी मालमत्तेवरील कराचा दर निम्ननिर्दीष्ट केल्याप्रमाणे कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१] नागरी कर अ) नागरी भागसाठी २५% करयोग्य मुल्यावर
ब) गामीण व स्लम भागासाठी २२% करयोग्य मुल्यावर
२] साफसफाई कर ३% करयोग्य मुल्यावर
३] वृक्ष कर ०.५०% करयोग्य मुल्यावर
४] अग्निशमन कर १% करयोग्य मुल्यावर
५] सर्वसाधारण पाणीपट्टी ३% (ज्या घरांना नळ कनेक्शन नाही अशा इमारतींवर)

सन १९९०-९१ वर्षात लागू करावयाच्या विशेष साफसफाई कराबाबतचा स्थायी समिती ठराव क्र. १०९६ दि. २८/४/८९ चा निर्णय विचार विनिमयार्थ अग्रेषित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

याशिवाय मालमत्ता कराबरोबरच शासनाचे कराद्यान, शिक्षण कर, रोजगार हमी उपकर व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर वसूल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ तहत नियमाप्रमाणे सर्वसाधारण सभेस मंजुरीसाठी शिफारस करण्यात आली विचारार्थ सादर.

**संवाद** :

**श्री. अलफखाँ हुसेनखाँ** : दिनांक २८/०४/८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीत ठराव क्र. १०९६ अन्वये हॉटेल, टपऱ्या, रसवंती ह्यांना साफसफाई कर लावणेसंबंधीचा ठराव पारीत झाला आहे. तद्अनुषंगाने हॉटेल ह्या सदरातील अनुक्रम नं. १ ते ४ चा फेरविचार व्हावा. लहान हॉटेल टपऱ्या ह्यांना सदरचा कर अवाजवी वाटतो.

**श्री. शंकर मगर** : शहरातील अनेक भागात लहान हॉटेल, टपऱ्या आहेत. तंव्हा अशा सर्व टपरी धारकांकडून साफसफाई कर वासूल केला जातो काय? ज्या टपरीधारकांचा कचराच बाहेर पडत नाही अशा टपरीधारकांचे काय? तसेच शहराचे बऱ्याच भागात साफसफाईच केली जात नाही त्याचे काय? अशा व्यावसायिकांसाठी काय तरतूद आहे?

**डॉ. शांताराम काळे** : काही भागात अनेक लहान लहान टपऱ्या विनापरवानगी चालतात. या बाबत संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणूनही काही एक कार्यवाही होत नाही. किंवा साधी चौकशीही होत नाही. त्यामुळे नगरसेवकांना पाहिजे तसा प्रतिसाद संबंधित अधिकाऱ्यांकडून मिळत नाही.

**मा.महापौर** : स.सदस्यांचे सुचनेनुसार शहरातील ज्या भागात विनापरवानगी टपऱ्या आणि हॉटेल्स कार्यरत असतील अशा सर्व व्यवसायीकांना नियमाप्रमाणे कर लावणे संबंधिची कार्यवाही व्हावी.अनधिकृत

टपऱ्या अथवा हॉटेल्सच्या बाबतीत संबंधित अधिकाऱ्यांनी कळवावे. संबंधितांकडून योग्य ती कार्यवाही केली गेली नाही तर सदरीची बाब मा. आयुक्तांकडे लेखी तक्रार देण्यांत यावी.

**डॉ. संचेति चेनकरण** : स्थायी समिती ठराव क्र.१०९६ अन्वये हॉटेल्ससाठी जे कर निश्चित करण्यांत आले आहेत त्यामध्ये हॉटेल/हॉस्पीटल, थेअटर साठी एकच कर दाखविला आहे. शहरात अनेक प्रकारचे लहान मोठे दवाखाने कार्यरत आहेत. तेव्हा अशा दवाखान्यांना कर कसा निश्चत केला याचा खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त** : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३७ अन्वये पारित करण्यात आलेल्या विशेष करा संबंधि हॉटेल हया सदरात एक ते चार हॉटेल्ससाठी वेगवेगळे दर निश्चित केले आहेत. तथापि अनुक्रम ४ साठी लावण्यात येणाऱ्या करासंबंधी फेरविचार करावयाचा असल्यास तसा प्रस्ताव सुचवावा.

**सौ.लता दलाल** : प्रस्तावात निर्दिष्ट केलयाप्रमाणे हॉटेल संदर्भातील क्रमांक तीनचे प्रतवारीतील हॉटेल, टपरी, रसवंती आणि ज्युस बार इ. दर निर्दिष्ट केल्याप्रमाणे कर आकरण्यात येणार आहे का? कारण बऱ्याच ठिकाणी नियमबाह्य करवसूली होत आहे. तेंव्हा नियमाप्रमाणे अनधिकृत हॉटेल्स, टपऱ्या इ. व्यावसायिकांना हुडकून काढून सक्तीने कर वसूली करणे उचित राहील. पर्यायाने म.न.पा प्रशासनाचे उत्पन्नात भर पडेल.

**मा.महापौर** : कोणतेही हॉटेल, दवाखाने अथवा लहान टपऱ्या ह्यांना महानगरपालिका प्रशासनाने परवानगी दिली आहे किंवा नाही ह्याची पडताळणी करूनच कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.नामदेवराव मानकापे**: साफसफाई करासंबंधी स्थायी समिती ठराव क्र. १०९६ अन्वये कार्यन्वित होणारा कर लहान हॉटेल व टपरीधारकांना परडवणारा नाही तेंव्हा त्यांचेसाठी कर कमीत कमी कसा करता येईल याचा विचार व्हावा.

**मा. आयुक्त** : महानगरपालिका अधिनियमानुसार शहरातील विविध भागातील लहान हॉटेल्स, टपऱ्या आणि मोठे हॉटेल्स, दवाखाने ह्यांचे क्षेत्रात विचार करूनच कर आकारणी कार्यान्वित करण्यात येईल.

**डॉ. शांताराम काळे** : औरंगाबाद महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या ग्रामीण भाग अजूनही प्राथमिक सुविधांपासून वंचित आहे तेंव्हा अशा भागातील व्यावसायिकांसाठी काय तरतूद करण्यात आली आहे? ह्याचा खुलासा व्हावा.

**श्री. रशिद मामू** : कार्यान्वित करावयाचा साफसफाई कर लहान हॉटेल व्यावसाययिक, टपरीधारक ह्यांना जाचक आहे. तो परवडणारा नाही तंव्हा हा कर लावणेबाबत फेरविचार व्हावा.

**श्री. अलफखान हुसेनखाँ**: शहरात कार्यरत असलेल्या हॉटेल व्यवसायाकरिता अ,ब,क,ड अशी प्रतवारी करणे उचित राहील व त्या प्रतवारी प्रमाणे दर निश्चिती व्हावी.

**श्री.अजिज जहागिरदार** : स. सदस्य श्री. अलफखान ह्यांचे मताशी मी सहमत आहे. त्यांचे

म्हणण्याप्रमाणे हॉटेल व्यवसायाची अ,ब,क,ड अशी प्रतवारी (ग्रेडेशन) निश्चित करण्यात यावी.

**मा. महापौर** : प्रस्तावातील हॉटेल व्यवसायाची १, २, ३, ४ अशी प्रतवारीच अपेक्षित अहे. तरीही ह्या संदर्भात काही उचित सूचनांचा विचार करण्यात येईल.

**श्री. नरेंद्र पाटील** : शहरातील मोठे हॉटेल्स, मध्यम हॉटेल्स, आणि लहान हॉटेल्स ह्यांचे साफसफाई दरात बदल करण्यात यावेत. उदा. थ्री स्टार, पंचतारांकित ह्यांचेसाठी प्रस्तावित रु. ६०००/- प्रतवर्षाऐवजी रु. १०,०००/- प्रतिवर्ष आकारण्यात यावा.

**डॉ. संचेती चेनकरण** : हॉटेल, हॉस्पिटल आणि थिएटर इ. साठी आकारण्यात आलेल्या रक्कम रु. २४००/- ऐवजी रु. १८००/- प्रतिवर्षी करण्यात यावा.

**श्री. अलफखाँ हुसेनखाँ** : उपरोक्त दराप्रमाणेच लहान हॉटेल्स, टपऱ्या, ज्युसबार आणि रसवंती इ. साठी आकारण्यात आलेल्या रु. १२००/- ऐवजी रु. ६००/- प्रतिवर्षी कर आकारण्यात यावा.

**मा. महापौर** : नागरी भागासाठी आणि ग्रामीण भागासाठी लावण्यात आलेला मालमत्ता कराच्या दर संदर्भात मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : ज्या मालमत्तांचे करयोग्य मुल्य रु. १ ते १००० पर्यंत आहे अशा मालमत्तांसाठी २२% आणि हजारापेक्षा करयोग्य मुल्य जास्त असल्यास अशा मालमत्तांना २५% मालमत्ता कर कायम करण्यात आला आहे. ग्रामीण व नागरी असा फरक करणे योग्य होणार नाही.

**ठराव क्र. ७६ :** स. सदस्यांनी चर्चेअंती सुचविलेल्या तीन व पंचतारांकिंत हॉटेल्ससाठी रु. १०,०००/- मध्यम हॉटेल्यसाठी रु. १८००/- प्रतिवर्षी व लहान हॉटेल्स टपरी, रसवंती, ज्युसबार इ. साठी रु. ६००/- आणि अन्य कोणतयाही टपरीसाठी रु. ३६०/- प्रतिवर्ष ह्या दराने वार्षिक साफसफाई कर आकरणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

रुपये १०००/- पेक्षा जास्त करयोग्य मुल्य अलेल्या मालमत्ताना २५% मालमत्ता कर (२) साफसफाई कर करयोग्य मुल्यांवर ३% (३) वृक्षकर करयोग्य मुल्यांवर ०.५०%, (४) अग्नीशमन कर १% आणि (५) सर्वसाधारण पाणीपट्टी - फक्त मालमत्ता धारकांकडे नळ कनेक्शन नाही अशासाठी ३% करयोग्य मुल्यांवर याशिवाय मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ तहत मालमत्ता कराबरोबरच शासनाचे कराधान, शिक्षण कर, रोजगार हमी व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर वसूल करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७ :** दिनांक ०३/०२/९० रोजी झालेल्या विशेष स्थायी समिती सभेमध्ये सन १९८९-९० या आर्थिक वर्षात औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेल्या जकात कराचे दरानेच सन १९९०-९१ या आर्थिक वर्षात जकात कर वसूल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ तहत नियमाप्रमाणे सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी शिफारस करण्यात आली. विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ७७ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये इ. स. १९८९-९० या आर्थिक वर्षात औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनातर्फे कायम करण्यात आलेल्या जकात कराप्रमाणेच सन १९९०-९१ ह्या वर्षात जकात कर वसूलीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## <u>ऐनवेळचे प्रस्ताव</u>

**विषय क्र.७८ :** महाराष्ट्र शासनाने जकात कर रद्द करून सर्वसाधारण प्रवेश कर अंमलबजावणी संर्दीात नागरिक, महानगरपालिका प्रशासन, सन्माननीय नगरसेवक तथा पालिका कर्मचाऱ्यांची मते व सूचना संकलित करून विशेष सचिव महाराष्ट्र शासन ह्यांचेकडे (एक प्रत संयुक्त सचिव, महाराष्ट्र शासन ह्यांचेकडे अग्रषितसह) १७ फेब्रुवारी, १९९० पर्यंत पाठविणेस सुचविले आहे. (सोबत ११ जानेवारी १९९०चे शासकीय राजपत्र) प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. अजिज जहागिरदार:** ऐनवेळी मांडण्यात आलेल्या प्रस्तावासंबंधी शासनाकडून आलेल्या पत्रानुसार तातडीची बैठक बोलावून सर्व स. सभासदचा विचार घेणे आवश्यक होते. काही नगरसेंवकांना जनरल एन्ट्री टॅक्सबाबतचा जकातीला पर्याय म्हणून आलेल्या प्रस्तांवाची माहिति वेळेवर मिळू न शकल्याने सदस्यांना आप-आपले विचार मांडता येणार नाही. तेंव्हा जकातीला पर्याय म्हणून आलेल्या प्रस्तावास सर्वानुमते विचार होणे आवश्यक आहे.

**डॉ. संचेती चेनकरण :** मांडण्यात आलेल्या प्रस्तवासंबंधी दि. १९/०१/९० चे शासन राजपत्रामधील जनरल एन्ट्री टॅक्सबाबतच्या प्रस्तावानुसार आणि सोबत पाठविलेल्या पत्रानुसार दि. १७/०२/९० पर्यंत पाठवावयाच्या काही हरकती / सुचनांचा प्रस्ताव सदस्यांना उशिरा मिळाल्याने सर्व सदस्यांचे चिर एकमताने झालेल्या नाही. आणि आजच पाठविण्यात आलेल्या हरकती / सूचनाबाबत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे सर्व सदस्यांना प्रति मिळाल्या परंतु या अगोदरच प्रशासनाने सर्व सदस्यांना विचार विनिमयासाठी संबंधीत विषयी माहिती देऊन कळविले असते तर सर्वानुमते जकात विषयक कारणाची भूमिका स्पष्ट करता आली असती. तेंव्हा प्रशासनाने उशीर करून स. सभासदाची मते विचारात घेतली नाही, तेंव्हा या बाबत खुलासा व्हावा.

**मा. आयुक्त :** शासनाकडील आलेले पत्र आणि सोबत शासन राजपत्रासंबंधी जनरल एन्ट्री टॅक्सबाबतचा पर्यायी प्रस्ताव दि. १४ फेब्रुवारी, १९९० रोजी या कार्यालयामध्ये प्राप्त झाला. सदरील पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक १७ फेब्रुवारी, ९० पर्यंत जनरल एन्ट्री टॅक्स बाबतचे हरकती / सूचना आपल्या महानगरपालिके मार्फत पाठविण्याचे सुचविले म्हणजे फक्त तीन दिवसाचे मुदतीत जकातीला पर्यायीसंबंधी सूचना / हरकती शक्य नाही. करिता पत्रात सुचविल्याप्रमाणे सर्व स. नगरसेवक, कम्रचारी वर्ग आणि

नागरिकांच्या ज्या काही सूचना हरकती एवढ्या कमी कालावधीत मागवून शासनाकडे पाठविणे होणार नाही. त्यासाठी एक अर्धशासकीय पत्राने दि. १४ फेब्रुवारी, ९० रोजी दिलेला वेळ अपुरा असून अजून पुढे काही दिवस या विषयी सर्वांच्या विचारार्थ वेळ वाढवून देण्यासंबंधी संबंधीत नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे पत्राद्वारे विनंती केली. आणि पुढील कार्यवाही करण्यात उपआयुक्त यांचेकडे सूचना दिलेल्या आहेत.

**मा. उपआयुक्त** : शासनाचे पत्र आणि मा. महापौर पुणे, यांचेही पत्र दि. १४/०२/९० रोजी कार्यालयात प्राप्त झाले. पत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे दिनांक १७/०३/९० पर्यंत आपल्या महानगरपालिका कार्यालयाचे स. नगरसेवक कर्मचारी आणि नागरिक यांचे एन्ट्री टॅक्स बाबतच्या प्रस्तावासंबंधी काही हरकती / सूचना असतील त्या मागवून शासनाकडे या कार्यालयामार्फत पाठविण्याचे सुचविले. त्याप्रमाणे सोबत पाठविण्यात आलेले शासन राजपत्रामधील जनरल एन्ट्री टॅक्सबाबतचा प्रस्ताव आणि महापौर पुणे, यांनी पाठविलेलया हरकती / सूचना सर्व स. नगरसेवकांना, आणि महानगरपालिका विभाग प्रमुखांना त्या सर्व प्रतिच्या झेरॉक्स करून वाटप करण्यास विलंब लागला. मा. महापौर यांचेशी जकात अधिक्षक आणि मी स्वतः चर्चा करून तात्काळ कार्यवाही करणेस्तव औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे १ ते १३ पर्यंत मुद्यांचा सूचना /हरकती विषयी मसूदा तयार करून दि.१५/०२/९० रोजी मा. स्पेशल ट्र द गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, फायनान्स डिपार्टमेंट मंत्रालय, मुंबई-३२ आणि जॉईंट सेक्रेटरी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे पाठविण्यात आले. तसेच नागरिकांच्या माहितीस्तव कही वर्तमानपत्रामधून शासनाकडील आलेल्या प्रस्तावाची माहिती देवून काही सूचना / हरकती कळविणेसाठी प्रसिध्दी देण्यात आली आहे.

**डॉ. काळे शांताराम** : काही महत्वाचे निर्णय घेत असतांना महानगरपालिका सभागृह नेत्याशी विचार विनिमय करूनच सोडविला जावा. कारण सभागृह नेते असल्याने कोणत्याही प्रश्नाविषयी चर्चेद्वारे सोडविण्यास भाग पाडतील.

**ठराव क्र.७८** : शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थाना विश्वासात न घेता विचाराधीन असलेल्या सर्वसाधारण प्रवेश कराबाबत एकतर्फी निर्णय घेणे सर्वस्वी अयोग्य कृतीस विरोध आहे. जकात करास सुकर असा पर्याय उपलब्ध झाल्याशिवाय जकात कर रद्द करू नये. असा सर्वसंमत ठराव शासनाकडे पाठविण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९** : सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सदर केला आहे की, श्री. बी. डी. सानप उपआयुक्त यांची प्रतिनियुक्ती महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक डीपीटी-११८८/७१२१/ई/-१ मंत्रालय, मुंबई-३२ दि. ०४/१२/१९८९ अन्वये उप

आयुक्त या पदावर सोबतच्या अटी शर्ती प्रमाणे ते सदर पदाचा पदभार स्विकारातील त्या दिनांकापासून प्रथम दोन वर्षासाठी करण्यात आली आहे.

श्री. बी. डी. सानप हे उपआयुक्त य पदावर दि.१२/१२/८९ रोजी रुजू झाले आहेत.

करिता श्री. बी. डी. सानप, उपआयुक्त यंची दि. १२/१२/८९ पासून प्रथम दोन वर्षाकरिता महानगरपालिका औरंगाबाद येथे प्रतिनियुक्तीवरील कालावधीस सोबतच्या अटी व शर्तीनुसार मंजुरी देण्याबाबत ठराव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.७९** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका उप आयुक्त श्री. बी. डी. सानप यांची उपआयुक्त पदाचा पदभार स्विकारल्यापासून प्रथम दोन वर्षाकरिता महानगरपालिका येथे प्रतिनियुक्तीवरील कालावधीस संलग्नीत अटी व शर्तीनुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

*दिनांक २०/०३/१९९० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत*

**मंगळवार दिनांक २० मार्च, १९९० रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे, यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभूवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) मा. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग
२) मा. श्री. यादव अशोक सायन्ना
३) मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
४) मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
५) मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग
६) मा. श्री. पंडागळे रतनकुमार
७) मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
८) मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ
९) मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन
१०) मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
११) मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव
१२) मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण
१३) मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी
१४) मा. श्री. मुजीब आलमशा खान
१५) मा. श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१६) मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१७) मा. श्री. तकी हसनखाँन कासिमखाँन
१८) मा. श्री. स. अ. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दन
१९) मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
२०) मा. श्री. ओक जयवंत केशव
२१) मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग
२२) मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
२३) मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ.हमीद खान
२४) श्रीमती दलाल लता श्रिनिवास
२५) मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२६) मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन
२७) मा. श्री. छापरवाल रमेश नारायण
२८) मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल
२९) मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
३०) मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल
३१) मा. श्री. म. इस्माईल अ. करीम
३२) मा. श्री. फैय्याजखान अहमदखान
३३) मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग
३४) मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद

३५) मा. श्री. स. हुसेन स. अहमद
३६) मा. श्री. मगर शंकर जिजाराम
३७) मा. श्री. मानकापे नामदेव शामराव
३८) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
३९) मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
४०) मा. श्री. अलफखाँन हुसेनखाँन
४१) मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास
४२) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
४३) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव
४४) मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान
४५) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४६) मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव
४७) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
४८) मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन
४९) मा. श्री. गोडसे आनंद जगदिश
५०) मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार
५१) मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
५२) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम
५३) मा. श्री. गाडे गंगाधर सुखदेव
५४) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
५५) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५६) मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल
५७) मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान

सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने झाली.

**विषय क्र. ८०** : दिनांक १९ फेब्रवारी, १९९० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद** :

**श्री. नरेंद्र पाटील** : मागील सभेमध्ये श्री. मोतीराम घडामोडे यांच्या राजीनामा प्रकरणी सभागृहात झालेल्या चर्चेची नोंद या इतिवृत्तामध्ये का घेण्यात आली नाही, याचा खुलासा व्हावा.

**श्री. अविनाश कुमावत** : श्री. घडामोडे यांचेसोबत झालेली चर्चा ही त्यांची वैयक्तिक बाब असल्याने आज सभागृहात त्यांचेवर चर्चा होणे अप्रस्तुत वाटते.

**मा. महापौर** : स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी मागील सभेमध्ये केलेले वर्तन अयोग्य होते त्यामुळे झालेली चर्चा सभेतील विषयाला धरून नसल्याने सदर चर्चेस महत्व देणे बरोबर नाही.

**श्री. धनंजय गंगाखेडकर**: सभागृहातील चर्चा इतिवृत्तामध्ये नोंद होणे आवश्यक आहे. तद्अनुषंगाने संबंधीत विभागास आदेश देण्याचे करावे.

**मा. महापौर** : सभागृहात झालेली ही वैयक्तिक असून ती त्यासभेच्या विषयाला

अनुसरून नव्हती त्याची इतिवृत्तामध्ये नोंद घेणे आवश्यक नव्हते वा नाही.

**श्री. नरेंद्र पाटील** : सभागृहामध्ये झालेल्या चर्चेची सर्व नोंद इतिवृत्तामध्ये होणे आवश्यक आहे. परंतु स. स. श्री. मोतीराम घडामोडे यांचेबाबतीत झालेली चर्चा संपूर्णपणे का वगळण्यात आली याचा खुलासा करावा? नसता सभागृहातील झालेल्या चर्चेला काहीही महत्व राहणार नाही.

**मा. महापौर** : सभागृहात विषयाला अनुसरून चर्चा होत असल्यास त्याचर्चेची नोंद घेणे आवश्यक आह. परंतु स.स. श्री. मोतीराम घडमोडे यांचेबाबतीत सभागृहात झालेली चर्चा ही त्यांचे वैयक्तिक वर्तनाची होती. महापालिका कामकाजाचा सदर वर्तनाशी काही एक संबंध नसल्याने अशी कृती इतिवृत्तात घेणे सर्वस्वी अप्रस्तुत आहे.

**श्री. अविनाश कुमावत** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे सभागृहातील चर्चेची इत्यंभूत किंवा विषयांतरित नोंद घेणे कधीच शक्य होणार नाही वा ती घेण्यात येऊ नये असे मला वाटते.

**श्री. अजिज जहागिरदार**: स. स. श्री. मोतीराम घडामोडे यांनी राजीनामा दिलेला आहे. अशी नोंद इतिवृत्तामध्ये का घेतली नाही, याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** : स. स. श्री. मोतीराम घडामोडे यांनी स्थायी समिती सदस्यात्वाचा राजीनामा दिलेला आहे आणि तो मा. आयुक्तांच्या नांवे सादर केलेला आहे. तेंव्हा ती नोंद इतिवृत्तामध्ये घेणे आवश्यक नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी स्थायी समिती सदस्यत्वाचा दिलेला राजीनामा प्रथमतः स्थायी समिती अध्यक्षांना द्यावयास पाहिजे होता आणि नंतर मा. महापौर मा. आयुक्त यांचेकडे सुपूर्द करावयास पाहिजे.

**डॉ. शांताराम काळे** : आतापर्यंत झालेल्या चर्चेवरून स. सभासदांचे बाबतीत भरपूर आस्था आहे, हे यावरून स्पष्ट होते. परंतु दिलेल्या राजीनाम्याची नोंद इतिवृत्तामध्ये घेणे आवश्यक होते, कारण गतवर्षी सभागृहात मतदानाच्या वेळेस घडलेल्या संपूर्ण माहितीची नोंद इतिवृत्तामध्ये घेण्यात आलेली असल्याने, तशाच प्रकारे प्रस्तावित इतिवृत्तात सभागृहात झालेल्या चर्चेची नोंद घेणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

**श्री. अजिज जहागिरदार**: स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांच्या राजीनाम्याविषयीची नोंद इतिवृत्तामध्ये न घेतल्याबद्दल आम्ही आघाडीचे वतीने "निषेध" नोंदवून सभात्याग करीत आहोत. (याच बरोबर सर्व आघाडीचे सदस्यांनी ११.३० वा. सभात्याग केला.)

**मा. महापौर** : स. सभासदांचे बाबतीत आमच्या मनात योग्य तो आदर आहेच. कोणत्याही प्रकारची आकसाची भावना नाही. गतसभेत स. सदस्य श्री. मोतीराम घडामोडे ह्यांचे सभागृहातील वर्तन योग्य नव्हते. त्यांचे संदर्भात सभागृहात झालेली चर्चा ही वैयक्तिक स्वरुपाची होती. ते इतिवृत्तात घेता येणार नाही, त्यामुळे ही चर्चा येथेच संपविणे ठीक राहील.

**ठराव क्र. ८०** : दिनांक १९ फेब्रुवारी, १९९० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ८१** : सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री. बी. अमरनाथ, शहर अभियंता यांनी प्रतिनियुक्ती महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन आदेश क्रमांक पीओजी/११८९/२/ सेवा-१ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ३१/१०/८९ अन्वये शहर अभियंता या पदावर सोबतच्या अटी व शर्तीप्रमाणे दिनांक ६/११/८९ पासून प्रथम एक वर्षाकरिता म्हणजे दि.०५/११/१९९० पर्यंत करण्यात आली आहे.

करिता श्री. बी. अमरनाथ, शहर अभियंता यांची दि. ०६/११/८९ पासून प्रथम एक वर्षाकरिता महानगरपालिका औरंगाबाद येथे प्रतिनियुक्तीवरील कालावधीत सोबतच्या अटी व शर्तीनुसार मुंरी देण्याबाबत ठराव विचारार्थ व निर्णयास्तव सादर. (अटी व शर्ती सोबत आहेत.)

**ठराव क्र. ८१** : श्री. बी. अमरनाथ, शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रतिनियुक्ती, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन आदेश क्र. पीओजी/११८९/२/सेवा-१, मंत्रालय, मुंबई-३२, दि. ३०/११/८९ अन्वये दि. ०६/११/८९ पासून प्रथम एक वर्षाकरिता महानगरपालिका औरंगाबाद येथे शहर अभियंता या पदासाठी प्रतिनियुक्तीवरील कालावधीस व सोबतच्या अटी व शर्तीनुसार सर्वानुमते, मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

(सर्व आघाडीचे सदस्य व श्री. मोतीराम घडामोडे ह्यांचा सभागृहात प्रवेश)

**शासन पत्र, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. डी टी एन/११९०/ /८/ सेवा-१ दिनांक ०७/०२/९० चे सहपत्र**

**शासकीय कर्मचाऱ्यांची स्वीयेत्तर सेवेत बदली करण्यासंबंधातील प्रमाण अटी व शर्ती**

१) प्रतिनियुक्तीचा कालावधी श्री. बी. अमरनाथ कार्यकारी अभियंता, ज्या तारखेला शासकीय सेवेतील पदाचा कार्यभार सुपूर्द करतील त्या तारखेपासून स्वीयेत्तर सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला ते आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्वीकारतील त्यातारखेला समाप्त होईल.

प्रथमत: एक (येथे कालावधी नमूद करावा) वर्षाच्या कालावधीसाठी शासकीय कर्मचारी प्रतिनियुक्तीवर राहील, परंतु (एक) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर, प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन / सक्षम प्राधिकारी राखून ठेवील.

(दोन) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर, त्यांना मूळ विभागाकडे परत पाठवण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्तयाने शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्याची नोटीस दिली पाहिजे.

२) वेतन - श्री. बी. अमरनाथ का. अ. यांना स्वीयेत्तर सेवेत असतांना, सर्वसाधारण नियमानुसार प्रतिनियुक्तीच्या पदाचे वेतन निश्चित करवून घेणे किंवा

जर त्यांची स्वीयेत्तर सेवेत प्रतिनियुक्ती झाली नसती तर, त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी त्यांनी जे पद धारण केले होते, त्या (कार्यकारी अभियंता) पदाकरिता विहित केलेल्या रु. ३०००-१००-३५००-१२५-४५०० या वेतनमानात मूळ विभागामध्ये जे वेतन घेतले असते ते वेतन अधिक त्या वेतनाच्या जास्तीत जास्त २० टक्क्यांइतका दरमहा रु.२५०/- च्या कमाल मर्यादेपर्यंत प्रतिनियुक्ती भत्ता घेणे, यापैकी कोणताही पर्याय स्विकारता येईल मात्र मूळ जे वेतन प्रतिनियुक्ती भत्ता घेणे, यापैकी कोणताही पर्याय स्विकारता येईल. मात्र मूळ जे वेतन प्रतिनियुक्ती भत्ता यांची एकूण बेरीज, प्रतिनियुक्ती नंतर धारण केलेल्या पदाच्या वेतनातील कमाल वेतनाहून किंवा प्रतिनियुक्तीचे पद नियत वेतनावरील असेल तर त्या नियत वेतनाहून अधिक होता कामा नये, तसेच ते कोणत्याही बाबतीत दरमहा ३००० पेक्षा अधिक होता कामा नये.

प्रतिनियुक्ती भत्त्याचा हिशोब करतांना, मूळ विभागात स्वतंत्र वेतनाऐवजी मंजूर केलेले विशेष वेतन विचारात घेता येईल.

जर श्री. बी. अमरनाथ, कार्यकारी अभियंता यांनी प्रतिनियुक्ती पदाचे वेतनमान निवडले आणि त्या वेतनमानातील किमान वेतन हे त्यांचे मूळ वेतन अधिक २० टक्के दराने प्रतिनियुक्ती भत्ता यांच्या बेरजेपेक्षा बरेच अधिक असेल तर महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम २० मधील तरतुदी लागू करण्यात येतील आणि प्रारंभिक वेतन, प्रतिनियुक्ती पदाच्या वेतनमानातील किमान वेतनाखालील योगय त्या रकमेवर अशा रितीने निश्चित केले जाईल की, असे निश्चित केलेले वेतन, प्रतिनियुक्त व्यक्तीच्या मूळ वेतनात खालील दर्शविलेल्या रकमा मिळवल्या असता येणाऱ्या रकमेपेक्षा अधिक होणार नाही.

| | | |
|---|---|---|
| ए | रु. ७५०/- पेक्षा अधिक मूळ वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता | मूळ वेतनाच्या २५ टक्के किंवा रु. २२५ यापैकी जी अधिक असेल ती रक्कम |
| बी | रु. ३०० पेक्षा अधिक पण रु. ७५०/- पर्यंत मूळ वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता | मूळ वेतनाच्या ३० टक्के किंवा रु. १००/- यापैकी जी अधिक असेल ती रक्कम मूळ वेतनाच्या ३३$^{१/२}$ टक्के |
| सी | रु. १०० आणि त्यापेक्षा अधिक पण रु. ३००/- पर्यंत मूळ वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता | |

३) महागाई भत्ता - श्री. बी. अमरनाथ, कार्यकारी अभियंता राज्य शासनाकडील आपले वेतनमान कायम ठेवतील किंवा स्वीयेत्तर सेवेतील पदाशी संलग्न असणाऱ्या वेतनमानात वेतन घेतील त्याप्रमाणे त्यांना राज्य शासनाकडील किंवा स्वीयेत्तर नियोक्याकडील नियमानुसार अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

४) घरभाडे भत्ता / स्थानिक पुरक भत्ता - श्री. बी. अमरनाथ का. अ. यांना राज्य शासनाच्या नियमानुसार वेळोवेळी अनुज्ञेय असेल त्याप्रमाणे घरभाडे भत्ता / स्थानिक पूरक भत्ता मिळण्याचा हक्क असेल. पण स्वीयेत्तर नियोक्ता स्वेच्छा निर्णयानुसार स्वीयेत्तर सेवेच्या निमान्वये हे भत्ते मंजूर करू शकेल.

५) पदग्रहण अवधी वेतन आणि बदली प्रवासभा- स्वीयेत्तर सेवेत रुजू झाल्यानंतर आणि तेथून परत आल्यानंतर अशा दोन्ही वेळच्या पदग्रहण अवधीमध्ये त्यांचे वेतन व

प्रवासभत्ता, राज्य शासनाच्या संबंधीत नियमानुसार स्वीयेत्तर नियोक्त्याकडून देण्यात येतील.

६) प्रतिनियुक्तीच्या कालावधीत कर्तव्यार्थ केलेल्या प्रवासाकरिता प्रवास भत्ता.

शासकीय कर्मचाऱ्याला स्वीयेत्तर सेवेत रुजू झाल्यानंतर कराव्या लागणाऱ्या प्रवासाकरिता, राज्य शासनाच्या संबंधीत नियमान्वये किंवा स्वीयेत्तर नियोक्त्याच्या नियमान्वये प्रवासभत्ता आणि दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

७) रजा - अशा बदलीपर्वी शासकीय कर्मचाऱ्याला लागू असलेले रजेचे नियम बदलीनंतरही त्याला लागू होत राहतील. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ च्यानियम १८(२) मध्ये दिलेल्या सेवेतून मुक्त झाल्यानंतर त्यांना परस्पर रजेवर जाण्यास स्वीयेतर नियोक्त्याने परवानगी देता कामा नये, म्हणजेच प्रथम शासकीय सेवेत रुजू होऊन मूळ विभागातील रजा मंजूर करून घेतली पाहिजे.

८) स्वीयेतर सेवेव्या दरम्यान किंवा अखेरीस घेतलेलया रजेच्या कालावधीबद्दल द्यावयाच्या कोणत्याही पूरक भत्त्याच्या संबंधातील संपूर्ण खर्च स्वीयेत्तर नियोक्त्याला सोसावा लागेल.

९) विकलांगता रजेबद्दल रजा वेतन - स्वीयेतर सेवेत किंवा अशा सेवेमुळे आलेल्या विकलांगतेबद्दल मंजूर करता येईल अशा रजेच्या सबंधात, अशी विकलांगता स्वीयेतर सेवा संपल्यानंतर उघडकीय आली तरीसुध्दा रजा वेतन देण्यास स्वीयेतर नियोक्ता जबाबदार असेल. अशा रजा वेतनाचा खर्च स्वीयेत्तर नियोक्त्याकडून वसूल करण्यात येईल

१०) रजा वेतन आणि निवृत्ती वेतन अंशदाने - (ए) परिशिष्ट चार मध्ये विहित केलेल्या दरानुसार स्वीयेत्तर नियोक्याकडून रजा वेतन आणि निवृत्ती वेतन अंशदाने देण्यात येतील.

ब) स्वीयेतर नियोक्ता, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीपासून पंधरा दिवसांच्या आंत किंवा वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी स्वीयेतर सेवेतील प्रतिनियुक्ती, समाप्त होत असेल तर स्वीयेतर सेवेच्या अखेरीस नियमानुसार वार्षिक रजा, वेतन व निवृत्तीवेतन अंशदाने देईल.

ए) रजा वेतन अंशदान : दरमहा नियमाप्रमाणे

(दोन) निवृत्तीवेतन अंशदान : दरमहा नियमाप्रमाणे अंशदानाच्या रकमा पुढील लेखाशिर्षाखाली जमा कराव्यात :-

(एक) रजा वेतन अंशदान - (योग्य ते अर्थसंकल्पीय शिर्ष नमूद करावे.)

(ज्या सेवा लेखा शिर्षाखाली अधिकाऱ्याचे वेतन खर्ची टाकले जाते, त्या सेवा लेखा निर्षाला अनुरूप असे कोणतेही जमा शिर्ष नसेल तेंव्हा ००७०- इतर प्रशासकीय सेवा - ६०- इतर सेवा -८००- इतर जाम रकमा (नऊ) रजा वेतन अंशदाने - हे शिर्षा नमूद करावे) (दोन) निवृत्तीवेतन अंशदान - "०" ०७१ निवृत्तीवेतन व इतर सेवा निवृत्ती लाभ याच्या वसूली संबंधातील अंशदाने व वसूलीच्या रकमा - ०१ नागरी - १०१ अभिदाने व अंशदाने (एक) स्वीयेतर सेवेतील अधिकारी

उपरोक्त दर लेखापरीक्षा कार्यालयाकडून कायम केले जाईपर्यंत तात्पुरते मानले जातील आणि ते भूतलक्षी प्रभावाने समायोजित करता येतील.

(सी) स्वीयेतर सेवेतील श्री. की. अमरनाथ कार्यकारी अभियंता यांचे बाबतीत, रजा वेतनाची किंवा निवृत्ती वेतनाची देय असणारी अंशदाने पूर्वीक्त कालावधीत दिली गेली नाहीत तर शासनाने स्पष्टपणे सूट दिलेली

नसल्यास, स्वीयेत्तर नियोक्ता हा अदत्त अंशदानाच्या रकमेवर म्हणजेच पूर्वीक्त कालावधी संपण्याच्या तारखेपासून अंशदाने अंतिमरित्या दिल्याच्या तारखेपर्यंत देय होणाऱ्या रकमेवर दर दिवशी प्रत्येक १०० रुपयांस दोन पैसे या दराने शासनाला व्याज देईल शासकीय कर्मचारी किंवा स्वीयेत्तर नियोक्ता यापैकी ज्याने अंशदान भरले असेल तो व्याज देईल.

(डी) रजा वेतन अंशदाने आणि निवृत्तीवेतन अंशदाने निनिराळ्या लेखा शिर्षाकडे जमा केली जात असल्यामुळे ती वेगवेगळी भरावीत आणि कोणत्याही बाबीदाखल शासनाकडून वसूल करावयाच्या येणे रकमांची अशा अंशदानातून वजावट करण्यात येऊ नये.

११) रजा मुदती प्रवास सवलत - या विषयावरील राज्य शासनाच्या संबंधीत नियमान्वये शासकीय कर्मचाऱ्यांला रजा मुदती प्रवास सवलत मिळण्याचा हक्क असेल या संबंधातील खर्च स्वीयेत्तर नियोक्तयाला सोसावा लागेल.

१२) रजेचे रोखीकरण - महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम ७३ अन्वये अनुज्ञेय असलेल्या अर्जित रजेच्या रोखी करणाचा लाभ घेण्याचा हक्क शासकीय कर्मचाऱ्याला असेल रजा वेतनावर प्रदेय असणाऱ्या पूरक भत्याचा व महागाई भत्याचा खर्च स्वीयेतर नियोक्त्याला सोसावा लागेल.

१३) वैद्यकीय सवलती - शासकीय कर्मचाऱ्याला महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकीय उपचार नियम १९६१ अनुसार अनुज्ञेय असणाऱ्या वैद्यकीय सुविधापेक्षा कमी प्रतीच्या नसतील अशा सुविधा मिळण्याचा हक्क असेल आणि त्यावरील खर्च स्वीयेतर नियोक्त्याला सोसावा लागेल.)

१४) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची वर्गणी- शासकीय कर्मचारी विहित नियमानुसार ज्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार असेल त्याच निधीला वर्गणी देणे चालू ठेवील.

१५) विभागीय चौकशी - श्री. बी. अमरनाथ कार्यकारी अभियंता यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरू करावयाची असेल तर त्यांना त्यांच्या मूळ विभागाकडे परत पाठवण्यात येईल. शासन त्यांना निर्वाह भत्ता देईल. पण तो स्वीयेतर नियोक्त्याकडून वसूल करण्यात येईल.

१६) बोनस / सानुग्रह प्रदान - (ए) दरमहा जास्तीत जास्त रुपये २५०० वेतन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याला बोनस प्रदान अधिनियम १९६५ अन्वये ज्यांनी कायदेशीररित्या बोनस देणे आवश्यक आहे त्या सार्वजनिक उपक्रमांमध्ये तो तात्पुरत्या बदलीवर असेल तेंव्हा, अशा उपक्रमांनी घोषित केलेला बोनस स्वीकारण्याची परवानगी देण्यात येईल

(बी) बोनस किंवा सानुग्रह प्रदान जाहीर करणाऱ्या सर्वजनिक उपक्रमांमध्ये (त्यांच्यावर बोनस देण्याचे कायदेशिर बंधन नसले तरीही) तात्पुरती बदली करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना अशा उपक्रामांनी जाहिर केलेले सानुग्रह प्रदान स्विकारण्यास परवानगी देता येईल.

१७) प्रपत्र बढती - श्री. बी. अमरनाथ, कार्यकारी अभियंता हे प्रतिनियुक्तीवर असतांना त्यांची मूळ विभागात बढती होण्याची वेळ आली असेल तर सर्व साधारणपणे त्यांची प्रतिनियुक्ती पुढे चालू ठेवू नये. तथापि, जर सक्षम प्राधिकाऱ्यने त्याची प्रतिनियुक्ती पुढे चालू ठेवली तर त्यांना प्रतिनियुक्ती भत्ता न देता निकट-निम्नता नियमानुसार बढतीच्या पदाचे वेतन मंजूर केले जाईल आणि निकट निम्नता- नियमाचा लाभ सहा महिन्यानंतर अनुज्ञेय असणार नाही.

१८) कायमचे समावेशन - जर मागावून श्री. बी. अमरनाथ कार्यकारी अभियंता प्राधिकरणाच्या सेवामध्ये सामावून घेतले जाण्याची इच्छा असेल तर ते सामावून घेतले जातील त्या तारखेस, शासकीय सेवेतून निवृत्त झाल्याचे मानले जाईल.

१९) राज्य गट विमा योजनेनुसार भरावयाची वर्गणी
श्री. बी. अमरनाथ कार्यकारी अभियंता हे राज्य गट विमा योजनेनुसार मासिक वर्गणी पूर्वीप्रमाणे देणे चालू ठेवतील. या योजनेखालील वगैणी (नियमाप्रमाणे) "८०११" - विमा व निवृत्तीवेतन निधी - १०६ - इतर विमा व निवृत्तीवेतन निधी -१- महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गट विमा योजना या लेखा शिर्षाखाली जमा करावी.

**विषय क्र. ८२ :** औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार जाणाऱ्या १०० फुट रुंद रस्त्यापासून इदगाहकडे जाणाऱ्या प्रस्तावित ४० फुट रुंद विकास योजना रस्तयामुळे छावणी पाणी पुरवठ्याची टाकी व लगतचा परिसर, अभियांत्रिकी विभागाच्या कार्यालयाची इमारत बाधित होते. शिवाय या प्रस्तावित रस्त्याखेरीज नगर भूमापन क्र. २३३ च्या पूर्वबाजूस २५ फुट रुंद डांबरी रस्ता अस्तित्वात आहे. तेंव्हा सदर ४० फुट रुंद रस्त्याची आखणी विद्यमान रस्तयाप्रमाणे बदलून घेण्यासाठी किरकोळ फेबरदलाची कार्यवाही करणेसाठी ठराव क्र.६७६ दि. १९/१२/१९८७ मंजुरी दिली आहे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तरी जागेवरील सद्य परिस्थितीचा विकास लक्षात घेता सदर ४० फुट रुंद रस्त्याची दक्षिण भागातील आखणी बदलून विद्यमान इदगाह रस्त्याप्रमाणे घेणे आवश्यक वाटते. तसेच सदर आखण बदलल्यामुहे मंजूर विकास योजनेच्या ४० फुट रुंद रस्ता व प्रास्तावित फेरबदल करावयाचा रस्ता व प्रास्तावित फेरबदल करावयाचा रस्ता यामध्ये शैक्षणिक भाग येतो. तो निवास भागात सामील करावा लागणार आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आवश्यक ती कार्यवाही पूर्ण केली असून आता सदर प्रस्ताव शासनाच्या अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद** :

**श्री. प्रदिप जैस्वाल** : सदरील प्रस्ताव नामंजूर करण्यात यावा.

**श्री. गंगाधर गाडे** : मा. महापौर, सध्या पाण्याचा प्रश्न ज्वलंत आहे. लोक हैराण झालेले आहेत, तेंव्हा या विषयावर सभागृहामध्ये प्रथमतः चर्चा करण्यात यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : आता विषयपत्रिकेतील विषयास सुरुवात झालेली असल्याने सध्या या प्रश्नावर विचार करण्यात येऊ नये.

**श्री. महापौर** : स. सभासदांच्या सूचनेप्रमाणे शहरातील अत्यंत जिव्हाळ्याचा असा पिण्याच्या पाणी प्रश्नावर सभागृहात चर्चेला घेतल्याशिवाय सभा संपविणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**ठराव क्र. ८२** : सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ८३** : मराठी चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने मराठी चित्रपटावर आकारला जाणारा मनोरंजन कर (शो टॅक्स) रद्द करावा किंवा तो

नाममात्र दराने आकारला जावा अशी शासनाने विनंती केली आहे. तद्अनुषांगाने मुंबई आणि सोलापुर महानगरपालिकांनी मराठी चित्रपटांसाठी सदरचे करात सुट देऊन प्रति शो नाममात्र दराने रु.१/- दराने मनोरंजन कर आकरणी कार्यान्वित केली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे सदरचा मनोरंजन कर प्रति शो रु. १५/- प्रमाणे आकारला जातो.

मराठी चित्रपटासाठी सवलत देणे असल्यास महापालिकेचे आर्थिक नुसान होईल या सर्व बाबी लक्षात घेता मराठी चित्रपटांसाठी मनोरंजन कर आहे त्याच दरात वसूल करावयाचा किंवा त्यात सुट द्यावयाची ह्यासंबंधात धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ८३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मराठी चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनातर्फे मराठी चित्रपटावर आकारला जाणारा मनोरंजन कर (शो टॅक्स) प्रति शो नाममात्र रु. १/- या दराने आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४ :** मो. उस्मानपुरा येथील स. नं. १२ पैकी नगर भू क्रमांक १८३११ क्षेत्र १६२८६.०० चौ. मी. व नगरभुमापन क्र. १८३१०/भाग क्षेत्र ६३३.७५ ही सरकारी जमीन औरंगाबाद मंजूर विकास योजनेत शैक्षणिक क्षेत्र म्हणून दर्शविली आहे. सदर सरकारी मोकळी जागा परिसर अभियांत्रिकी प्रियदर्शनी सोसायटी व इतर काहींनी सदर जमीन निवास उपयोगी कारणासाठी मागितलेली असल्यामुळे जिलहाधिकारी औरंगाबाद यांनी केलेल्या विनंतीवरून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये संदर्भित जागा शैक्षणिक क्षेत्रातून वगळून निवास भागात समाविष्ट करण्यासाठी कार्यवाही करण्यास दि.०५/०८/८८ ला ठराव क्र. ७१ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार आवश्यक ती अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र औरंगाबाद विभाग पुरवणी भाग एक- अ चे पृष्ठांक १६७,१६८ दि. ११/०५/१९८९ व स्थानिक वर्तमानपत्र दैनिक अजिंठा दि. २७/०५/८८ व दैनिक आलमगिर टाईम्स दि. ३१/०५/८८ अन्वये प्रसिध्द करण्यात आले. त्यावर आलेल्या हरकती व सूचना आलेली आहे. प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झालेली असल्याने सदर किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात सर्वसाधारण सभेच्या ठरावासाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ८४ :** सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ८५ :** औरंगाबाद मंजूर विकास योजने अंतर्गत पैठण रस्त्यालगत सिल्कमील व त्यालगतचा भाग औद्योगिक क्षेत्रात आहे. या भागात विद्यमान मिल्सच्या लगत औद्योगिक क्षेत्रात बहुतांशी जागेत रहिवास वासाहत झालेली आहे. औद्योगिक क्षेत्राच्या उत्तरेस मंजूर विकास योजनेचे निवास क्षेत्र असून त्या ठिकाणी रस्ते, पाणीपुरवठा इत्यादी सुखसोयी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच औद्योगिक क्षेत्रातही झालेल्या रहिवास वसाहतीमध्ये वरील सुखसोयी पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच या भागात मिल्सच्या कर्मचाऱ्यांना काही घरे बांधून देण्यात आली आहेत. या भागात आता विद्यमान रहिवास वापरात बांधकाम परवानगी व इतर विकासाची कामे करता यावी यासाठी सोबतच्या नकाशात भाग "ए" "बी" व "सी" मध्ये दर्शविलेले एकूण क्षेत्र ७.२ हेक्टर जमीन औद्योगिक क्षेत्रातून वगळून निवास भागात समाविष्ट करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना

अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी सादर.

**ठराव क्र. ८५** : सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

## ***<u>ऐनवेळचे विषय</u>***

**विषय क्र.८६** : पिण्याचा पाण्याचा प्रश्न

**संवाद** :

**मा. महापौर** : स. सदस्य श्री. गंगाधर गाडे यंचे म्हणण्यानुसार शहरातील नागकिरकांची पिण्याचे पाण्याची अत्यंत दयनिय अवस्था असून नागरिकांच्या अनेक तक्रारी दररोज येत आहेत. त्यानुसार संबंधीत स. सदस्यांना आपापले पिण्याच्चया पाण्यासंबंधीचे विचार सभागृहात मांडण्याचसाठी परवानगी देण्यात येत आहे.

त्यानुसार उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या वार्डातील पिण्याच्या पाण्याचे समस्यासंबंधी तळमळीने विवेचने केलीत प्रत्येक वार्डातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर असून स. सदस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. प्रत्यक्ष झोनमधील ज्यु. इजिनिअर व विभागीय अधिकारी यांना वेळोवळी भेटून सुध्दा कार्यवाही होत नाही.

बऱ्याच वार्डात पाणी कमी दाबाने येते. कधी वेळेवर येत नाही, तर कधी विद्युत पुरवठा बंद असलयाचे सांगण्यात येते, मात्र हॉटेल्सना वेळेवर दोन वेळेस पाणी पुरवठा बंद असल्याचे सांगण्यात येते. वार्डात अजिबात पाणी न आल्यास विचारणा केल्यावर उत्तर मिळते की, "पाईपलाईन फुटलेली आहे."

टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा सुध्दा वेळेवर होत नाही. नागरिकांत असंतोष पसरत आहे. स. सदस्य स्वतः साईटवर फिरुन अधिकाऱ्यांचा पाठपुरावा करतात परंतु नेमके आश्वासान दिले जाते, कार्यवाही काही होत नाही. अधिकारी ऐकूण घेण्याचे मनस्थितीत नाही, लाईनमन कर्मचारी व्हॉल्व आवश्यक त्या प्रमाणात सोडत नाहीत. ज्या कॉलनीतील नागरिक संबंधीत कर्मचाऱ्यांना पैसा देतात त्यांचेकडे जादा पाणी सोडले जाते. काही वार्डातून ५/६ महिन्यापासून पाईपलाईनसाठी खड्डे खोदून ठेवलेले आहेत, ती अपूर्ण कामे पूर्ण कधी होणार?

शहागंज काचीवाडा भागामध्ये दोन वेळेस पाणी पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे. शिवाय काही ठिकाणी बिल्डर्सना नळ कनेक्शन करून देण्यात आलेले आहेत, ते बंद करण्यात यावेत. बरेचसे नागरिक पाणी पुरवठा यंत्रणेशी संगनमत करून अनाधिकृत नळ कनेक्शन करून घेतात, पर्यायाने नागरिकांना प्रोत्साहित केले जाते. झोनल ऑफिसवर तक्रारी नोंद करण्यासाठी

गेले असता अधिकारी वर्ग भेटत नाही. उलट साईटवर गेले असल्याचे नेहमीच सांगितल्या जाते.

काही नागरिक विद्युत मोटार बसवून आपल्या घरात पाणी भरपूर घेतात. ज्यामुळे आजुबाजूचे नागरिकांवर अन्याय होतो. शहरातील सिडको, हडको भागातील बऱ्याचशा नागरिकांनी ५/६ वर्षापासून पाण्याची बिल अदाई केलेली आढळून येत नाही, अशा नागरिकांवर योगय ती कार्यवाही व्हावी.

मागील वर्षी असे ठरले होते की, वेळ पडल्यास जनरेटरचा उपयोग करण्यात येईल. आणि शक्यतो पाण्याच्या टाक्या बांधण्यात याव्यात. परिसर अभियांत्रिकी यांचेकडून महानगरपालिकेला पाणीपुरवठा होत असतो. या विभागाशी चर्चा करण्यात यावी.

**श्री मोतीराम घडामोडे** : (मा. महापौर यांनी राजीनामा द्यावा असा प्रस्ताव मांडला, तो प्रस्ताव सभागृहामध्ये वाचून दाखविला)

गेल्या काही दिवसांपासून सिडको भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिशय वाईट झालेला आहे. होळी सणानिमित्त तरी भरपूर प्रमाणात पाण्याचा पुरवठा होईल असे वाटते. परंतु त्या दिवशीसुध्दा लोकांना अक्षरशः वाटच पाहत राहावे लागले आणि शेवटी सणानिमित्ताने महानगरपालिकेच्या नांवाने बोंबा मराव्या लागल्या. दुसरे असे की, काही वर्तमानपत्रामध्ये सुध्दा शहरतील आणि सिडको भागातील पाण्याच्या गैरसोयी बाबत अनेक मथळ्याखाली बातम्या प्रसिध्द झाल्या त्या सर्वांची कात्रणे माहितीसाठी सभागृहात दाखवू इच्छितो. मनपाच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून मा. महापौर यांचे कारकिर्दीत नागरिकांना योग्य न्याय मिळत नसून पाण्याचा पुरवठा नियमितरित्या होत नाही ही शरमेची बाब आहे. उलट आठवड्यातून काही दिवस पुरवठा होतो, तर काही वेळेस पाणी पुरवठा वेळेवर होऊ शकणार नाही, अशी दिलगिरी व्यक्त करून खुलासा स्पष्ट करतात, या सर्व उदा. वरून मा. महापौरांचे कारकिर्दीत कामे कमी होत आहेत, याची कल्पना येते. या सर्व बाबींचा सारासार विचार करून विद्यमान महापौर नागरिकांचे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास अपयशी ठरले, या अपयशाची जबाबदारी स्विकारून मा. महापौर यांनी राजीनामा द्यावा असा प्रस्ताव सभागृहासमोर मांडित आहे.

**श्री शंकर मगर** : एक नगरसेवक एक वार्डाचा फक्त पाण्याचा प्रश्न सोडवू शकला नाही. ही आश्चर्याची बाब आहे. त्यामुळे ते नगरसेवकाच्या पदास लायक नसल्याने, त्यांनी राजीनामा देणे उचित होईल. स. नगरसेवक श्री. मोतीराम घडमोडे यांनी महापौरांविषयी काढलेले उद्‌गार निषेधार्ह आहेत. मी संबंधिताचा निषेध करतो.

(याच वेळेस आरोप प्रत्यारोपास सुरुवात होऊन प्रकरण हातघाईवर आले.)

**मा. महापौर** : परिस्थितीचे भान राखून पंधरा मिनिटांसाठी सभा तहकुब

करण्यात येत आहे. (असे सूचित केले. वेळ १२.३० वा.)
"अंदाजे पंधरा मिनिटानंतर सभेस पुन्हा सुरुवात झाली"

**मा. महापौर** : सभागृहात होत असलेल्या कामकाजाबाबत मतमतांतरावरून अनेक वेळा गोंधळ होत असतो. त्याचप्रमाणे आज सभागृहात गोंधळ निर्माण झाला. यावेळी सभागृहामध्ये मा. महापौर किंवा मा. आयुक्त यांचे परवानगीशिवाय पोलिसांचा हस्तक्षेप व्हायला नको होता. सभेच्या कामाकाजाच्या वेळी करण्यात आलेल्या पोलिसाचा हस्तक्षेप अप्रस्तुत वाटतो. स. सदस्य श्री. गाडे यांच्या सूचनेवरून शहरातील पाणी पुरवठ्याच्या ज्वलंत प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा करून प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना आखण्यासाठी चर्चेला संमती दिली. सिडकोवासियांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नाबाबत नाईलाजाने सिडकोकडून महानगरपालिकेने पाणी वाटप करण्याच्या दृष्टीने हस्तांतर झालेले आहे. आणि त्या प्रमाणात सिडको नागरिकांना पाण्याचे वाटप योग्य प्रमाणात करण्याची शिकस्त केली जात आहे. नव्याने निर्माण झालेल्या सिडको वस्तीसाठी पाणी पुरवठ्याबाबतची योजना तत्वत: फोल ठरली असून यासाठी जोपर्यंत सिडको, शहराला जोडला जात नाही, तोपर्यंत त्या भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकणार नाही.. स. सदस्य श्री. घडमोडे यांनी आज सभागृहामध्ये जे निवेदनाद्वारे भाष्य केले, ते असमथनीय आहे. स्वत: सिडकोचे नगरसेवक आहेत. हे लक्षात असायला पाहिजे सिडकोची पाणीपुरवठा लाईन कशी आहे, ते सर्वश्रुत आहे. आता नव्याने महानगरपालिकेतर्फे पाईपलाईन टाकून पाणी पुरवठा करणेच्या दृष्टीने सर्व ते उपाय योजिले जात आहेत. मुलतः मनपा, सामाजिक बांधीलकी पत्करून सर्वांना पिण्याचे पाणी कसे मिळेल याचा सातत्याने प्रयन्त करीत आहे आणि पुढेही चालूच राहणार आहे. स. सदस्यांनी सभागृहात अशा प्रकारचे निवेदन करणे अशोभनिय आहे. सभा तहकुब करणे योग्य नाही. जे घडले ते विसरून जावे, सभागृहाची अनुमती असेल तर, पाणी प्रश्नावर संबंधित अधिकाऱ्यांना खुलासा करणे सुचवितो.

**श्री. अब्दुल रशीदखाँ** : स. सदस्यांनी सभागृहामध्ये मारहानीसारखे प्रकार करावे हे योग्य वाटत नाही.

**श्री. रतनकुमार पंडागळे**: सभागृहात घडलेला प्रकार निंदनिय असून या प्रकाराचा निषेध करून सभात्याग करीत आहे. (याच सोबत आघाडीच्या सर्व सदस्यांनी सभात्याग केला वेळ अंदाजे १२.४० वाजता.)
(वेळ अंदाजे १२.४५ वाजता)

**कार्य. अभियंता पा.पु.** : (खुलासा वाचून दाखविला.)
औरंगाबाद शहराला आवश्यक असलेली पाण्याची गरज ६० दशलक्ष लिटर

प्रतिदिन इतकी आहे. म्हणजेच दरदिवशी १२ दशलक्ष लिटर इतके पाणी कमी पडते. त्यातूनच वरचेवर होणाऱ्या खंडित विज पुरवठ्यामुहे येणारे पाणी अनियमित व अपुरा होतो. शहराची वाढती पाण्याची गरज लक्षात घेता, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिसःसारण मंडळातर्फे रु. २७.२७ कोटी खर्चाची वाढीव पाणीपुरवठा योजना टप्पा-१ व १८.६२ कोटी खर्चाची सुधारित वितरण व्यवस्था (टप्पा-१) हाती घेतलेले असून प्रगतीपथावर आहेत.

१) जायकवाडी जलाशयातील उद्‌भवाची कामे व मुख्य विहिर व पंपगृह पूर्ण झाले
२) जायकवाडी ते फारोळा पर्यंतचे अशुध्द पाण्याचे पंपींग मेनचे काम ९० टक्के पूर्ण झाले.
३) अशुध्द पाणी पंप करावयाचे पंपाची उभारणीचे काम चालू आहे.
४) फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्राचे काम ६० टक्के पूर्ण झाले आहे.
५) फारोहा ते नक्षत्रवाडी पर्यंतची पंपीगचे मेनचे लोखंडी पाईप्सचे काम ९० टक्के पूर्ण आहे. तर त्याच भागातील प्रिस्ट्रेस पाईपचे काम ५० टक्के पूर्ण आहे.
६) नक्षत्रवाडी येथील मुख्य जलकुंभ चे काम पूर्ण झाले आहे.
७) मुख्य जलकुंभापासून क्रांतीचौकापर्यंतचे जलवाहिनीचे काम ६० टक्के पूर्ण झाले आहे. त्याशिवाय खालील टाक्या नविन बांधावयाचे प्रस्ताव आहेत.
१) पॉलिटेक्निक जवळील टाकी ६/९० पर्यंत पूर्ण होईल.
२) क्रांतीचौकातील टाकी ५/९० ला पूर्ण होईल.
३) किराडपुरा टाकी ६/९० ला पूर्ण होईल.
४) कमबरा टाकी पूर्ण झाली.
५) मेडीकल, ६) पहाडसिंगपुरा, ७) गारखेडा टाक्या प्रगतीपथावर आहेत. ही सर्व कामे पूर्ण होऊन, नविन योजनेतून शहराला वाढीव पुरवठा साधारणतः १९९१ पर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. इ. स. २००१ झाली १०.५० लक्ष लोकसंख्येला दररोज दरडोई १४० लि. प्रमाणे आखणी केलेली आहे. महानगरपालिकेने सन १९८९-९० साली मंजूर केलेली कामे ए. सी. पाईप्सचे अभावी पूर्ण करणे शक्य झाले नाही. आता पाईप्सचा पुरवठा प्राप्त झालेला असून सर्व लहान कामे शिघ्र गतीने पूर्ण करण्यात येतील.

१) शहरात वेगवेगळ्या ठिकाणी ६५ विंधन विहिरी घेण्यात येऊन त्याला हातपंप बसविण्यात येतील.
२) शहरात ९० खाजगी व सार्वजनिक, सभा चांगल्या विहिरीचे गाळ काढून या दुरुस्त व निर्जंतूक करून त्या वापरात आणल्या जातील.
३) महानगरपालिकेचे टॅंकर्स व्यतिरिक्त गरजेनुसार जास्तीचे टॅंकर्स इतर सरकारी कार्यालयाकडून उपलब्ध करून घेण्यात येतील.

**डॉ. शांताराम काळे** : विद्युत जनरेटरची व्यवस्था केलेली आहे काय?

**कार्यकारी अभियंता**(स्लम): पिण्याचे पाण्याची व्यवस्था योग्य रितीने हाताळण्याची कसोशिने प्रयत्न होत आहे.

**तकी हसन खान** : कैसर कॉलनी भागातील पाईप लाईन एका नगरसेवकाच्या

सांगण्या वरून थांबविण्यात आल्याची माहिती मिळाली आहे ते खरे आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** : अधिकाऱ्यांशी केलेला खुलासा समाधानकारक वाटत नाही. आगामी तीन महिन्यात पिण्याचे पाण्याचे दुर्भिक्ष जाणवणार असून पाणी समस्या जलद गतीने सुआवी या संदर्भात एक समिती नेमण्यात येत असून तीत स्थापत्य समितीचे सदस्य आणि उपआयुक्त व कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा या सर्वाची एक समिती कायम करण्यात येते.

**मा. आयुक्त** : विभागीय कार्यालयांमार्फत नळांची पाहणी करण्यात येईल, आणि त्या ठिकाणी एक दक्षता पथक नेमून नेमक्या बाधित स्पॉटची पाहणी करण्यात येईल. पाणी पुरवठा प्रकरणी संबंधित दक्षता पथकाकडून पाहणी करून तीवर योग्य कार्यवाही करण्यात येईल. ज्या भागामध्ये अतिशय कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे अशा ठिकाणी टँकर्सद्वारे त्वरित पाणी पुरवठा केला जात आहेच शहरामध्ये दररोज ६० दशलक्ष पाणी पुरवठा केला जातो. तरीही पाण्याची गरज पडते. अशावेळी बोअरिक करून प्रश्न सोडविला जात आहे. तर बऱ्याचशा भागामध्ये पाईप लाईनची काम चालू आहेत आणि नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करणेही चालू असून, या कामी एखाद्या वेळी कर्मचारी वर्गाकडून कोणत्याही प्रकारची हयगळ आढळल्यास कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी त्या प्रमाणे दखल घेण्यात येईल.

**मा. अलफखाँ** : शहरामध्ये बऱ्याच भागासाठी जवळ जवळ ४२ लाखांची बोरींग्सचे कामे करण्यात आलेली आहेत तरीही आज त्या प्रमाणे कमीच वाटते काही ठिकाणी बोरींग्स यशस्वी झाले नाहीत., तर काही भागात पाणी लागले. यामुळे बराच खर्च अपेक्षित आहे.

**मा. उप-महापौर** : नळ कनेक्शन देत असतांना ३ "इंची ऐवजी ६" इंची पाईप टाकण्या यावी अशा वेळी अधिकारी / कर्मचारी वर्ग नकाशा बघण्याचे कारण न सांगता, ठरवून दिलेल्या दराची निश्चिती केल्यानंतर नळ कनेक्शन जोडले जावेत. काही भागामध्ये नळ कनेक्शन देत असतांना अंदाजित खर्च लावून कनेक्शन जोडले जात आहे. यामुळे नेमक्या काही नागरिकांना याचा फायदा होत असतो व काही अडचणीत येतात. यासाठी सर्व सदस्यांनी मिळून त्यावर विचार करावा असे वाटते.

**मा. नरेंद्र पाटील** : एम.आय.डी.सी चे पाईप लाईनच्या संदर्भात प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने या भागासाठी होणारा त्रास वाचविण्यासाठी सर्व सदस्यांनी मिळून एक. आय.डी.सी. प्रशासनावर दबाव आणून शक्य तितक्या लवकर पाणी प्रश्न मार्गी लावावा.

**सौ. लता दलाल** : मागील वर्षी सुध्दा याच पाणी प्रश्नावर एक समिती नियुक्त करण्यात आलेली होत. तथापि या समितीने काय निष्पन्न झाले ते सर्व सदस्यांच्या स्मरणार्थ आहेच. जो खुलासा कार्यकारी अभियंता, पा. पु. यांनी केला तो योग्य वाटत नाही. पाणी

पुरवठ्या संबंधी परिसर अभियांत्रिकी आणि विद्युत मंडळ ह्यांच्यात समन्वय दिसून येत नाही. याची चौकशी करण्यात यावी. पाणी प्रश्नावर गांभिर्यपूर्ण निर्णय व्हावा. टँकरने पाणी पुरवठा हा पर्याय नव्हे.

**मा. महापौर** : पाणी पुरवठा प्रश्नावर तोडगा काढणेसाठी, स्थापत्य समिती तर्फे जास्तीत जास्त लक्ष द्यावे. सन्माननीय सभापती, दादामियाँ यांनी उपआयुक्तांशी सत्वर संपर्क साधून, काय उपाययोजना करता येईल या दृष्टीने पाणी समस्यांवर अधिकाधिक लक्ष केंद्रित करावे.

**मा. अजित शेळके** : बेगमपुरा वार्डात नागरिकांची पाण्यासाठी नेहमीच ओरड असते तेंव्हा याबाबत मनपाने आवश्यक ती तात्काळ कार्यवाही करावी.

**मा. महापौर** : स. सभासदांच्या सुचनेनुसार पिण्याच्या पाण्याच्या प्रश्ना संदर्भात आलेल्या तक्रारींचे निराकरण पोटतीडकीने व्हावे. तसे न झाल्यास उपआयुक्त यांचेकडे तक्रार नोंदवावी.

**ठराव क्र.८६** : सभागृहातील चर्चेनुसार शहरातील पिण्याचे पाण्याच्या ज्वलंत प्रश्नाबाबत उपाययोजना करणेसाठी, स्थापत्य समिती सदस्यांची एक समिती कायम करण्यात येते. सदरचे समितीने उपआयुक्त यांचे सल्ल्यानुसार योग्य ती अविलंब उपाययोजना करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८७** : सुपर मार्केट बाबत

**संवाद** :

**अब्दुल रशिदखाँ, अजिजुल्ला बेग, मा. महापौर** : सदरील विषय स्थापत्य समितीच्या मार्फत या सभेमध्ये यावयास पाहिजे होता. कारण दोनच दिवसापूर्वी या समितीची बैठक संपन्न झालेली असल्याने तीन या विषयावर विचार करण्यात आला असता.

**मा. महापौर** : सदरच्या प्रस्तावासंबंधी फेर निविदा मागविण्यात येऊन भाडेपट्याने देण्याचे ठरले त्याप्रमाणे मंजुरी देण्यास हरकत नसावी.

**श्री. बंडू प्रधान** : सुपर मार्केट मध्ये मागासवर्गीयासाठी ठरविण्यात असलेल्या अनामत रकमेच्या दर प्र. चौ. मी. रु.१०००/- च्या ऐवजी रु. ५००/- असा करण्यात यावा.

**श्री. गंगाधर गाडे** : सन्माननीय सभासदांनी सुचविल्याप्रमाणे अशा प्रकारच्या दुरुस्त्या सूचनांचा विचार करण्याची तरतूद नसून, सुपर मार्केट तयर होऊन गेले कित्येक दिवसांपासून पडलेले आहे. जर हे मार्केट भाड्याने दिले असते तर, बरेचशे भाडे वसूली झाली असती. तेंव्हा सर्व प्रकारची पूर्तता झाली असतांना फेर निविदा मागविण्यात येत असून सर्वसाधारण गटासाठी अनामत रक्कम रु. २०००/- आणि मागासवर्गियासाठी अनामत रक्कम रु. ५००/- कायम करण्यास हरकत नसावी.

**मा. महापौर** : स. सभासद, श्री. बंडू प्रधान यांच्या सुचनेनुसार

मागासवर्गियासाठी जी दुकाने राखून ठेवण्यात आलेली आहेत त्यासाठी अनामत रक्कमेचा दर प्रति. चौ. मी. रु. १०००/- च्या ऐवजी रु.५००/- ठेवण्यात यावा तसेच सुपर मार्केटच्या बाबतीत फेरनिविदा मागविण्यात याव्यात.

**डॉ. शांताराम काळे** : सुपर मार्केटचे गाळे भाडे पट्ट्याने देत असतांना, ज्यांचे नांवाने निविदा भरलया आहेत, त्यांचाच ताबा असावा अशी तरतूद असावी.

**श्री. अजिज जहगिरदार** : कही निविदा सर्वात जास्त दराने प्राप्त झालेलया आहेत, अशा निविदा धारकांसाठी आपण काय करणार? मागील मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये बऱ्याच निविदा जास्त दराच्या होत्या, तेंव्हा याचाही विचार व्हावा.

**मा. महापौर** : आपल्या सर्वांचे संमती नुसार ज्यांच्या सर्वात जास्त दरांच्या निविदा असतील त्या मंजूर करण्यास हरकत नसावी.

**मा. अजिज जहागिदार** : जास्त दराच्या निविदा धारकांचे दर संमत करण्यास हरकत नसावी.

**सौ. लता दलाल** : गती समितीच्या सभेत सुपर मार्केट अ.ाप म.न.पा. प्रशासकांकडे हस्तांतर झाले नाही असे समजते. तेंव्हा हस्तांतरणाची कार्यवाही का केली नाही याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** : म.न.पा. प्रशासनास भरपूर अधिकार आहे. हस्तांतरणाची काळजी करण्यासारखे काही नाही.

**ठराव क्र. ८७ :**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुपर मार्केटमधील दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील क्षेत्रफळ अनुक्रमे ७४९३.५२ चौ. फुट व ९३९४.३७ चौ. फुट असे एकुण १६८९०.३८ चौ. फु. क्षेत्रफळ शासकीय / निमशासकीय कार्यालयांना खालील अटींवर भाड्याने देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

१) **भाडे** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम खाते ठरवून देतील त्या दराने मात्र त्यांनी ठरवून दिलेला दर रु. २६.५० प्रती चौ. मी. प्रतिमहा पेक्षा कमी नसावा.

१) भाड्या व्यतिरिक्त :- १) महानगरपालिकेचे सर्व कर जागा भाड्याने घेणारास भरावे लागतील.

२) सर्विस चार्जेस पोटी रु.५/- प्रती चौ. मी. प्रतिमहा जागा भाड्याने घेणारास भरावा लागले.

सदर ठरावाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**ठराव क्र. ८७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुपर मार्केट मधील तळमजल्या वरील व पहिल्या मजल्यावरील दुकानाचे गाळे भाड्याने देणे बाबत, खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते मान्य केला जात आहे.

१) सुपर मार्केटमधील दुकान गाळे भाड्याने देणेसाठी मागविण्यात आलेल्या सर्व निविदा अस्विकृत करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरची दुकाने भाड्याने देणेसाठी फेर निविदा मागविण्याचा निर्णय सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे.

२) कार्यालयाने सदरचे शॉपिंग सेंटर उभारणीसाठी मोठी आर्थिक गुंतवणूक केलेली आहे ही बाब विचारात घेऊन अनामत रक्कमेचा दर प्रती चौ. मी. साठी रु. ५००/- ऐवजी रु. २०००/- करण्याचा मात्र मागासवर्गियांसाठी जी दुकाने राखिव ठेवण्यात आली आहेत त्सासाठी अनामत रक्कमेचा दर प्रति चौ. मी. रु.१०००/- च्या ऐवजी रु. ५००/- असा करण्याचा सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) निविदा मधील भाडे दराची मोठ्या स्वरुपाची विसंगती टाकळण्यासाठी कार्यलयाने स्वत:चे भाड्याचे दर (अपसेट प्राईज) ठरवणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने तळमजला व पहिल्या मजलयावरील दुकानासाठी, भाड्याने दर प्रती महा प्रती चौ. मी. अनुक्रम रु.९०/- व रु. ८०/- कायम करण्याचे व या दरापेक्षा जास्त दराने भाडे देवू करणाऱ्या निविदा धारकास दुकाने दिली जावीत असे सर्वानुमते ठरविण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**सोमवार दिनांक २६/०३/१९९० रोजी ठिक ११.५५ वाजता संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण अंदाजपत्रकीय सभेचा इतिवृत्तांत**

**सोमवार दिनांक २६/०३/१९९० रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे, यांच्या अध्यक्षतेखाली "नगरभूवन" येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वधारण अंदाजपत्रकीय सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) मा. श्री. यादव अशोक सायन्ना
२) मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
४) मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग
५) मा. श्री. पंडागळे रतनकुमार
६) मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ
८) मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन
९) मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
१०) मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव
११) मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण
१२) मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी
१३) मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१४) मा. श्री. तकी हसनखाँन कासिमखाँन
१५) मा. श्री. स. अ. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दन
१६) मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१७) मा. श्री. ओक जयवंत केशव
१८) मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग
१९) मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
२०) मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ.हमीद खान
२१) श्रीमती दलाल लता श्रिनिवास
२२) मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२३) मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२४) मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन
२५) मा. श्री. छापरवाल रमेश नारायण
२६) मा. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२७) मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२८) मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल
२९) मा. श्री. म. इस्माईल अ. करीम
३०) मा. श्री. फैय्याजखान अहमदखान
३१) मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग
३२) मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद
३३) मा. श्री. स. हुसेन स. अहमद

३४) मा. श्री. मगर शंकर जिजाराम
३५) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
३६) मा. श्री. अलफखाँन हुसेनखाँन
३७) मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास
३८) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
३९) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव
४०) मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान
४१) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४२) मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव
४३) मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन
४४) मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार
४५) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम
४६) मा. श्री. गाडे गंगाधर सुखदेव
४७) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
४८) मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल
४९) मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान

"वंदे मातरम्" या गीताने सभेची सुरुवात झाली.

**विषय क्र. ८८** : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनाचे सुधारित अंदाजपत्रक १९८९-९० आणि मुळ अंदाजपत्रक १९९०-९१ सर्वकर्ष विचारार्थ सादर.

**संवाद** :

**मा. महापौर** : औरंगाबाद महानगरपालिकेचे सुधारित सन १९८९-९० आणि मूळ अंदाजपत्रक सन १९९०-९१ आणि मूळ अंदाजत्रक सन १९९०-९१ चे अर्थसंकल्पाबाबत स. सदस्यांनी आवश्यक त्यासूचना विचारार्थ ठेवाव्यात.

**श्री. पाटील** : आजची अंदाजपत्रकीय सभा ठिक ११.३० वाजता सुरू होणार होती तथापि अंदाजे १२.०० वाजे पर्यंतही सभा सुरू न झाल्याने मा. महापौर यांनी सभागृहात दिलगिरी व्यक्त करावी.

**श्री. अजिज जहागिरदार:** महापालिकेचे सन १९९०-९१ चे मूळ अंदाजत्रकीय व सुधारित अंदाजपत्रकीय विशेष सभेबाबत प्रथमतः सभागृह नेता आणि विरोधी पक्षनेता यांच्याशी विचार विनिमय करूनच अंदाजपत्रक सर्वांच्या विचारार्थ सभेपुढे ठेवणे योग्य झाले असते. परंतु तसे झाले नाही.

**मा. महापौर** : स. स. च्या सूचनेनुसार आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, महानगरपालिकेचे सुधारित आणि मूळ अंदाजपत्रकीय अंदाजपत्रक यापूर्वी स्थायी समितीच्या सभेपुढे सर्वांच्या विचाराधीन ठेवण्यात आलेले होते. आणि त्यांचे संमतीनुसार सदरील अंदाजपत्रक मंजूर करून सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर करण्यात आले. तेंव्हा पुन्हा याच विषयावर वारंवार चर्चा करणे अप्रस्तुत वाटते.

**श्री. गंगाधर गाडे** : औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असल्यामुळे या शहराचे

आकर्षन अधिक असणे स्वाभाविक आहे. त्यानुसार शहराची वाढती शहर लोकसंख्या लक्षात घेता, अंदाजपत्रकामध्ये सर्वसामान्यांचा विचार करूनच शहर विकासात्मक आणि नागरी सुविधा उपलब्ध होणेच्या दृष्टीने तरतूद करण्यात आलेली आहे. या मुळे शहरातील मागास भागाच्या हीताच्या दृष्टीने प्रामुख्याने स्लम विभागाकरिता सुध्दा यामध्ये विचार करण्यात आलेला असून तो. मा. महापौर यांच्याकडे विचारार्थ सादर करीत आहे.

**श्री. कचरू नवपुते** : सन १९९०-९१ च्या, अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट खेड्यासाठी तरतूद केलेली दिसून येत नाही. औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दित एकूण १८ खेड्याचा नव्याने समावेश झालेला आहे. त्यानुसार विविध कर वसूल केले जातात परंतु विकासात्मक कोणत्याही योजना या खेड्यामध्ये राबविल्या जात नाही वा विचाराधीन नाही असे वाटते. तेंव्हा मुळ अंदाजपत्रकामध्ये या भागांसाठी काय तरतूद करण्यात आलेली आहे. याचा खुलासा व्हावा.

**श्री. अजिजउल्ला बेग** : सुधारित आणि मूळ अंदाजपत्रक सन १९८९-९० व १९९०-९१ या मध्ये कमी जास्त प्रकारे ॲडजस्ट केलेले दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने महानगरपालिका कर (पोट विभाग (अ) मध्ये साफसफाई कराबाबतीत सन १९८९-९० आणि सन १९९०-९१ यामध्ये बऱ्याच प्रमाणात तफावत दिसून येते. तेंव्हा सन १९९०-९१ मधील मूळ अंदाजपत्रकात रु. ३ लक्षच्या ऐवजी ८ लक्ष रु. ठेवण्यात यावे. यामध्ये कमी जास्त प्रमाणात ( ) वसूलीही होऊ शकते. तसेच सर्वजनिक बांधकाम खाते क्र. १७ मध्ये शहर मोजणी प्राथमिक खर्च या करामध्ये मूळ अंदाजपत्रकामध्ये निरंक दाखविण्यात आलेला आहे. तेंव्हा शहरातील बऱ्याचशा भागातील घरांचे सर्व्हे व्हावयाचे असून यासाठी अंदाजपत्रकामध्ये किमान ५० हजार रु. ची तरतूद करणे आवश्यक आहे.

वाचनालय या सदररात येणारी पुस्तक खरेदीसाइी पान क्र. ३७ मध्ये दाखविण्यात आलेली मूळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. १५० हजार रुपये आहे. यामध्ये केवळ उर्दू पुस्तके, खरेदी करणेसाठी वाचनालयात ५० हजार रु. ची तरतूद करण्यात यावी.

इतर योजनामध्ये वाचनालय यासाठी मूळ अंदाजपत्रकामध्ये सन १९९०-९१ मध्ये सुध्दा रु. १० हजारांची तरतूद करण्यात यावी.

महानगरपालिका मिळकती पासून मिळणारे उत्पन्न यामध्ये इमारत भाडे / दुकानासाठी मूळ अंदाजपत्रकता रु. ५२५ हजार दाखविण्यात आलेले आहे. या ऐवजी रु. ८ लक्ष एवढी वाढ करण्यात यावी. आणि उर्दू लायब्ररीसाठी रु. ३ लख ऐवजी रु. ५ लक्ष एवढी तरतूद करण्यात यावी.

**श्री. सुर्यवंशी** : स्थायी समिती सभेमध्ये साफ सफाई करद्वारे विविध श्रेणी नुसार

मान्यता दिलेली आहे. आणि त्यामुळे जवळ जवळ १ लक्ष ९६ हजार रु. महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये भर पडणार असून या वर्षाच्या अंदाजपत्रकात तसे दाखविण्यात आल्याचे दिसून येत नाही. असे का? याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** : मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

**लेखा परिक्षक** : सन १९८९-९० चे सुधारित अंदाजपत्रक आणि सन १९९०-९१ चे मूळ अंदाजपत्रकामध्ये सुरुवातीची शिल्लक या सदरामध्ये साफसफाई कराची रक्कम ४००० हजार अशी दर्शविलेली आहे. ही ४० लक्ष अशीच समजायची आहे. आकडा हजारात दर्शविलेला आहे.

**श्री. जहागिरदार** : सुधारित अंदाजपत्रकामध्ये दाखविण्यात आलेले रु. ४० लाख कमी असून कमीत कमी ६५ लाख रु. वाढ करण्यात यावी.

**मा. महापौर** : स.स. च्या सूचनेप्रमाणे ६५ लक्ष रु. वाढ करण्याऐवजी रु. ५० लाख करण्यास हरकत नसावी.

**अजित शेळके** : अंदाजपत्रकामध्ये साफ सफाई करासाठी करण्यात आलेली तरतूद ही दोन वेळेसच्या कामासाठी करण्यात आली आहे काय?

**श्री. अलफखान** : सदरील अंदाजपत्रकामध्ये ५० लाखाऐवजी रु. ६० लाख अशी वाढ ठेवण्यात यावी यामुळे बऱ्याच प्रमाणात फरक दिसून येईल.

**मा. आयुक्त** : स. स. च्या सूचनेप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये बऱ्याच प्रमाणात फरक पडणार असून अंदाजपत्रकामध्ये कमी जास्त करणे योग्य नसून परिस्थितीनुसार बदल करण्यास हरकत नसावी.

**श्री. पाटील नरेंद्र** : सन १९९०-९१ चे अंदाजपत्रकातील जमा व खर्चाच्या बाबी यामध्ये महसूली जमा मध्ये नगरपालिका कर असे लिखीत केलेले आहे तेव्हा महानगरपालिका कर अशी दुरुस्ती करण्यात यावी.

१) मालमत्ता करामध्ये प्रशासनातर्फे मागील सर्वसाधारण सभेच्या मान्यतेप्रमाणे नवीन वाढीव कर आकारणी ऐवजी जुन्याच करयोग्य मुल्यावर कर आकारणी करण्याची प्रक्रिया चालू आहे काय?

२) इमारत बांधणीसाठी दाखविण्यात आलेली अंदाजपत्रकीय तरतूद रु. १०,६०० हजार ही केवळ प्रशासकीय इमारतीसाठी आहे काय इतर इमारती बांधकामासाठी करून ठेवलेली तरतूद याचा खुलासा व्हावा.

३) झोपडपट्टी सुधारणा याबाबतचा वर्ष भरातील संपूर्ण अहवाल सर्वाच्या माहितीसाठी दाखविण्यात यावा.

**लेखा परिक्षक** : स. स. च्या सुचनेप्रमाणे इमारत बांधणीसाठीचा संपूर्ण तपशिल अंदाजपत्रकातील पान क्र.४१ मध्ये इमारत बांधणी या सदररात दाखविण्यात आलेला आहे.

**श्री. पिटर वंजारे** : आरोग्य समितीमध्ये असे ठरविण्यात आले होते की, साफसफाई शहरामध्ये एका वेळेस मनपा कर्मचाऱ्याकडून साफ होत असते तेंव्हा दररोज दोन पाळ्यामध्ये (वेळेत) साफ सफाई होणेच्या दृष्टीने सर्वानुमते संमती देण्यात आली. त्यानुसार या अंदाजपत्रकामध्ये काय तरतूद करण्यात आलेली आहे याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** : स.स.च्या सुचनेप्रमाणे संबंधीत विभाग किंव प्रशासनामार्फत या

विषयी योग्य ती खबरदारी घेण्यात येईल.

**श्री. अलफखान** : महानगरपालिका कर या सदराखाली.

१) पोट विभाग (ई) संकिर्ण मधील ड्रेनेज पाणी विक्री यामध्ये दाखविण्यात आलेली अंदाजपत्रकीय रक्कम एक लाख रु. ही या कामासाठी कमी असून ड्रेनेजच्या / विक्री कामासाठी किमान रु. ४ ते ५ लाख वाढ करण्यात यावी.

२) खत कचरा विक्री याबाबत बरेचसे उत्पादन उत्पादन महानगरपालिकेला मिळू शकते. तेंव्हा याबाबतीत विचार करून दुरुस्ती करण्यात यावी.

३) महानगरपालिका कर यातील पोट विभाग. मोकाट कुत्री मारणे व जनावरे पकडणे या सदरराखाली येणारे इंधन व दुरुस्तीसाठी दाखविण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय रकमेत काही प्रमाणात बदल होणे आवश्यक आहे. तर पोट विभाग "रोषनाई खाते" याबाबत सदरील अंदाजपत्रकामध्ये दाखविण्यात आलेल्या रकमेतही थोड्या प्रमाणात बदल करणे आवश्यक आहे तेंव्हा या सर्व बाबींचा सहानुभूमतीपूर्वक विचार करण्यात यावा.

**श्री. प्रभाकर विधाते** : पोट विभाग लोकशिक्षक विभागातर्फे या अंदाजपत्रकात दाखविण्यात आलेल्या फर्निचर व दुरुस्तीसाठी काही प्रमाणात अल्पशी असून ती २ लाख एवढी रक्कम वाढविण्यात यावी. महानगरपालिकेच्या बऱ्याच शाळेमध्ये फर्निचर अपूरे असल्याने यावर्षीच्या अंदाजपत्रकात वाढीव रक्कम करण्यात यावी.

**श्री. रतनकुमार** : सन १९९०-९१ च्या मूह अंदाजपत्रकामध्ये झोपडपट्टी सुधारणा यामध्ये ७० लाख रु. अंदाजाची तरतूद दाखविण्यात आलेली आहे. तंव्हा ती कमी असून किमान १ कोटी रु. मूळ अंदाजपत्रकात झोपडपट्टी सुधारणा या कामासाठी तरतूद ठेवावी.

**श्री. रशिदखाँ (मामू)** : महानगरपालिका कर यामध्ये दाखविण्यात आलेल्या अंदाजपत्रकात साफसफाई कराची रक्कम रु. ५००० हजार अल्पशी असून ती कमीत कमी रु. १० लाख इतकी वाढवून या वर्षीच्या मूळ अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**मा. महापौर** : महानगरपालिका अंदाजपत्रकात दाखविण्यात आलेला खर्च जवळ जवळ ५०% प्रशासकीय कामासाठी आहे तर ५०% विकासात्मक कामासाठी करण्यात येतो. यामुळे स. स. च्या सूचनेप्रमाणे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये कशाप्रकारे भर पडेल याचा विचार होणे आवश्यक आहे. आणि त्यानुसार विकासात्मक बाबींचा आवर्जून विचार करण्यात यावा.

**श्री. गंगाधर गाडे** : शहरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता एकंदरीत असे दिसून येते की, साफसफाई बाबत महानगरपालिकेच्या चतुर्थ श्रेणी कर्मचारी कमी पडतातृ यामुळे शहरातील साफसफाई नियमित आणि वक्तीशीर होण्याच्या दृष्टीने किमान आणखी १०० चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गाची आवश्यकता दिसून येईल. त्यानुसार १०० चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गाची नव्याने पदे निर्माण करण्यात यावीत.

**श्री. पिटर वंजारे** : औरंगाबाद वाढता विस्तार लक्षात घेता स. स. श्री. गंगाधर गाडे यांच्या सूचनेप्रमाणे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची नितांत आवश्यकता असून १०० कर्मचाऱ्यांऐवजी २५० चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गाची भरती करणेसंबंधी मान्यता देण्यास हरकत नसावी.

**श्री. अलफखान** : स. स. च्या सुचनेप्रमाणे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची नितांत गरज लखात घेता प्रशासनाने १०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून इतर काही अंदाजित अपेक्षित खर्चातून खर्च पगाराबाबत ॲडजस्ट करण्यास हरकत नाही. याशिवाय विद्युत बाबतच्या अंदाजीत खर्चामध्ये दाखविण्यात आलेल्या खर्च अपेक्षेपेक्षा जास्त असून या मधूनही बराच खर्च कमी करून प्रशासन अशा कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत आणि इतर खर्चावर नियंत्रण येऊ शकेल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर** : मी आपल्या असे निदर्शनास आणू इच्छितो की, चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्ग सकाळच्या वेळेस नियमित हजर राहत नसून उलट स्वतःच्या जागेवर दुसऱ्यांना रोजदारीने काम करण्यास पाठवितात आणि स्वतः बसून. पगार मात्र नियमितपणे घेतात हे योग्य आहे काय? एक तर ४ कर्मचारी आणि त्यांचेवर नियंत्रण ठेवणारे अधिकारी यांचे काय संगनमत आहे यांची पहाणी करून अशा दोषी कर्मचाऱ्यावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. पंडागळे** : स.स.श्री. नारायण फत्तेलष्कर यांनी सुचविल्याप्रमाणे काही चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्ग काम करतांना आढळून येत नाही. ते योग्य नसून साफसफाई करणारे कर्मचारी यांच्या मागे नियंत्रण ठेवणारे अधिकारी असतात यामुळे त्यांचे कामाची दररोजची उपस्थिती असते किंवा नाही याबाबत संबंधीत विभागीय अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध असते. तेंवहा चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या नावाने अशा प्रकारची ओरड करणे योग्य नाही.

**श्री. पैठणकर** : वाहन खरेदीबाबत या अंदाजपत्रकात रु. १० लाख अशी तरतूद आहे. तेंव्हा वाहन खरेदीचा विचार करून किमान दोन लाख रुपये वाढ करून एकूण रक्कम रु. १२ लाखाची तरतूद करण्यात यावी.

**श्री. विठ्ठल पेरकर** : महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये झेरॉक्स मशिन खरेदी करण्यासाठीची तरतूद करण्यात यावी. महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाबाबतची अत्यंत तातडीचे कामे खाजगी इन्स्टिटय़ुट मधून झेरॉक्स वा टंकलिखित केल्या जाते. तेंव्हा मनपाचा बराचसा खर्च होतो. यामुळे झेरॉक्स मशीन खरेदी केल्यास मनपाचा खर्च कमी होण्याची शक्यता आहे.

**श्री. अजिजउल्ला बेग** : ट्रान्सपोर्टनगर यासाठी मनपा अंदाजपत्रकामध्ये दाखविण्यात आलेली तरतूद आणि शासकीय अनुदान तरतुदीमध्ये बदल दिसून येतो. सन ८९-९० मध्ये १००० हजार रुपये तरतूद मनपासाठी केलेली होती. ती सन ९०-९० मध्ये १०० हजार रुपये अशी कमी करण्यात आली. तेंव्हा या वर्षातला अंदाजपत्रकात इतका कमी बदल का करण्यात आला, सन १९९०-९१ च्या अंदाजपत्रकामध्ये बदल करण्यात यावा.

**लेखा परिक्षक** : सन ८९-९० चे सुधारित अंदाजपत्रकात जी तरतूद शासकीय अनुदानाच्या संबंधात दर्शविली आहे. त्यातील अपुरी कामे ही सन ९०-९१ मध्ये करावयाची आहेतच रु. १०० हजाराची तरतूद ही अतिरित्क आहे.

**पिटर वंजारे** : कुटुंब कल्याण अंदाजपत्रकामध्ये दाखविण्यात आलेली रक्कम रुपये २०० हजार यामध्ये कुटुंब कल्याण उत्तेजनार्थचा खर्च व इतर राष्ट्रीय कार्यक्रमावर करण्यात येणाऱ्या खर्चाबरोबरच जी विशेष आरोग्य समिती स्थापित झालेली आहे या समितीच्या दैनंदिन पाहणी दौऱ्यासाठी होणाऱ्या वाहनावरील खर्चासाठी या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात यावी.

**श्री. अजिज जहागिरदार**: महानगरपालिकेच्या ज्या विविध विशेष समितत्या स्थापित झालेल्या आहेत या सर्व समितीच्या सभापतींना एक एक वाहन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यासाठी वाहन खरेदी करण्यासाठी १५ लाख रुपये महापालिका खर्चातून तर १५ लाख रु. डेप्रीसिएशन फंडातून खर्च करण्याची तरतूद या अंदाजपत्रकात ठेवण्यात यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : माझ्या माहितीप्रमाणे काही महानगरपालिकांमध्ये अशी व्यवस्था आहे की विशेष समित्यांच्या सभापतीला शहरातील विविध भागाची पाहणी करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करण्यात येते तर अशा प्रकारची व्यवस्था औरंगाबाद महानगरपालिकेच्या सभापतींना देखील करण्यात यावी.

**डॉ. संचेती** : मालमत्ता कराच्यानोटीसा प्रशासनाने नव्याने पाठवूनच मालमत्ता कर वसूल केला जात आहे अशा नागरिकांच्या तक्रारी विविध भागातून अनेक सदस्याकडे येत आहेत. तेंव्हा सर्वसाधारण सभेचा ठराव एकमताने मंजूर होऊनही प्रशासनाने योग्य ती दखल का घेतली नाही याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** : संबंधित अधिकाऱ्यांनी याचा खुलासा करावा.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** स. सदस्यांनी विचारलेल्या सूचनेप्रमाणे प्रशासनातर्फे योग्य ती कार्यवाही चालूच असून स. सदस्यांच्या माहितीसाठी जे कर आकारले जात आहेत ते पुढीलप्रमाणे...

ज्या घरात फरेबदल नाही, ज्या इमारतीच्या बांधकामात कुठल्याही प्रकारची वाढ नाही, इमारतीच्या प्रकारामध्ये बदल नाही अशा इमारतीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे मालमत्ता कराचे, पूर्वीचे करमूल्य कायम होऊन नवीन दराने कर वसूल करण्यात यावी. त्याप्रमाणे प्रशासनातर्फे वाटचाल चालू आहे.

**डॉ. संचेती** : मा. महापौर संबंधित अधिकाऱ्यांनी केलेला खुलासा चुकीचा असून आपल्या माहितीस्तव असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, बऱ्याचशा मालमत्त धारकांकडे ज्या नोटीसा पाठविल्या जातात त्या नोटीसेसवर हिरव्या लाल रंगाच्या शाईच्या टिक मार्क केलेलया खुणा दिूसन येत आहेत. यामुळे बरेचशा मालमत्ताधारकांना पुन्हा जुन्याच प्रमाणे कर आकारणी केली जात आहे का अशा संभ्रमात पडलेले असून सर्वसाधारण सभेने एकमताने घेतलेलया निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याने नागरिक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत. तेंव्हा प्रशासनाने याबाबत योग्य ती दखल घेऊन कार्यवाही करावी.

**मा. महापौर** : मा. आयुक्तांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. नरेंद्र पाटील** : स.स.श्री. चंद्रकांत खैरे यांची औरंगाबाद विधानसभा मतदार संघातून "आमदार" म्हणून निवड झाल्याने त्यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव मांडित आहे.

**श्री. जहागिरदार, श्री. गंगाधर गाडे, श्री. प्रदिप जैस्वाल** : स.स. श्री. नरेंद्र पाटील यांनी सूचविल्याप्रमाणे या प्रस्तावाशी आमचे सहमत आहे.

**मा. महापौर** : सर्वानुमते नवनिर्वाचित आमदार श्री. चंद्रकांतजी खैरे यांचे अभिनंदनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**श्री. अजिज जहागिरदार**: औरंगाबाद महानगरपालिकेच्या मूळ अंदाजपत्रकामध्ये कशा प्रकारे बदल करण्यात येणार आहे याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

**मा. महापौर** : औरंगाबाद महानगरपालिकेच्या इ.स. १९९०-९१ या अंदाजपत्रकात म.न.पा. प्रशासकीय इमारतीत स्त्रियासाठी स्वतंत्र प्रसाधनगृह बांधणेसाठी तरतूद करण्यात यावी. तसेच औरंगाबाद शहरातील महानगरपालिका वाचनालयाची संपूर्ण पहाणी करून आवश्यकते नुरुप सर्वकष विचार करण्यात येईल.

**ठराव क्र. ८८** : प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या इ.स. १९८९-९० च्या सुधारित आणि इ.स. १९९०-९१ च्या मूळ अंदाजपत्रक आणि तद्‌गभूत निर्दिष्ट मूळ व सुधारित तरतूदीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगिता नंतर सभा समाप्त झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले"

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## सोमवार दिनांक १६/०४/१९९० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत

**सोमवार दिनांक १६ एप्रिल, १९९० रोजी सकाळी ११.०० वाजता विशेष सर्वसाधारण सभेस मा. महापौर श्री. मोरेश्वर सावे, यांच्या अध्यक्षतेखाली सुरुवात झाली. सभेमध्ये खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) मा. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग
२) मा. श्री. यादव अशोक सायन्ना
३) मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
४) मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
५) मा. श्री. अजीजुल्ला बेग वाहेद बेग
६) मा. श्री. पंडागळे रतनकुमार
७) मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
८) मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ
९) मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन
१०) मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
११) मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव
१२) मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण
१३) मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी
१४) मा. श्री. मुजीब आलमशा खान
१५) मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१६) मा. श्री. जावेद हसन खान कासिम खान
१७) मा. श्री. तकी हसनखाँन कासिमखाँन
१८) मा. श्री. स. अ. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दन
१९) मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
२०) मा. श्री. ओक जयवंत केशव
२१) मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग
२२) मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
२३) मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ.हमीद खान
२४) श्रीमती दलाल लता श्रिनिवास
२५) मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२६) मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२७) मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन
२८) मा. श्री. छापरवाल रमेश नारायण
२९) मा. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
३०) मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
३१) मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल
३२) मा. श्री. म. इस्माईल अ. करीम
३३) मा. श्री. फैय्याजखान अहमदखान
३४) मा. श्री. मिर्झा अलिम बेग कलिम बेग

३५) मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद
३६) मा. श्री. स. हुसेन स. अहमद
३७) मा. श्री. मगर शंकर जिजाराम
३८) मा. श्री. मानकापे नामदेव शामराव
३९) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
४०) मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
४१) मा. श्री. अलफखाँन हुसेनखाँन
४२) मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास
४३) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
४४) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव
४५) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४६) मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव
४७) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
४८) मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन
४९) मा. श्री. गोडसे आनंद जगदिश
५०) मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार
५१) मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
५२) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम
५३) मा. श्री. गाडे गंगाधर सुखदेव
५४) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
५५) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५६) मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल
५७) मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान

सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने झाली.

**विषय क्र. ८९** : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) व सभा कामकाज नियमावलीचे नियम ५९ अन्वये स्थायी समितीचे ६ सभासदांची निवड करणे.

**संवाद** :

**मा. महापौर** : स्थायी समिती सहा सदस्यांनी सन १९९०-९१ या वर्षासाठीची नव्याने निवड करणेसाठी आतापर्यंत एकूण १९ सदस्यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केलेली आहेत. पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्रे परत द्यावयाची असतील त्यांच्यासाठी १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. तसेच निवडणूकी संबंधीच्या काही महत्वाच्या सूचना आपल्या सर्वांच्या माहितीस्तव सांगण्यात येतील. कृपया सर्व सदस्यांनी याची नोंद घ्यावी. आतापर्यंत १९ सदस्यांनी नामनिर्देशन पत्र भरलेली असून प्रत्यक्षात फक्त ६ सदस्यांनी निवड करावयाची आहे. त्याप्रमाणे निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होईल. असे सांगून सदस्यांची नांवे वाचून दाखविली.

**श्री. इकबालसिंग गिल** : मा. महापौर नामनिर्देशन पत्र परत घेण्यासाठी अजून १० मिनिटांचा अवधी वाढवून देण्याचे करावे.

**मा. महापौर** : स. सदस्यांच्या सूचनेप्रमाणे पुन्हा १० मिनिटांचा कालावधी वाढवून देण्यात येतो. मतपत्रिकेवरील सूचना वाचून दाखविली.

**मा. अजिजुल्ला बेग** : छाननी अधिकारी आणि मतदान अधिकारी कोण आहेत त्यांची नांवे जाहीर करण्यात यावीत.

**मा. महापौर** : नामनिर्देशन फॉर्म परत घेण्याची वेळ संपलेली असून संबंधित अधिकाऱ्यांनी किती सदस्यांनी नामनिर्देशन फॉर्म परत घेतले आहेत याची माहिती पुरवावी. (त्याप्रमाणे मतदान अधिकाऱ्यांनी मा. महापौरांच्या सूचनेनुसार नामनिर्देशन फॉर्म परत घेतलेल्या सदस्यांची नांवे वाचून दाखविण्यात आली.)

१९ उमेदवारांनी स्थायी समिती सदस्यांसाठी नामनिर्देशन पत्रे दाखल केली असून पैकी ११ उमेदवारांनी आपली उमेदवारी परत घेतली आहे. आता केवळ ८ उमेदवारांत निवडणूक होणे बाकी आहे. ती येणे प्रमाणे.

१) श्री. एकबालसिंग प्रितमसिंग गील
२) श्री. किशोर थोरात
३) श्री. प्रकाश जावळे
४) श्री. फैय्याज खाँ अहमद खाँ
५) श्री. म. इस्माईल अ. करीम
६) श्री. केशव सोनवणे
७) श्री. गजानन बारवाल
८) श्री. प्रभाकर विधाते

उमेदवारी अर्ज परत घेतलेल्या स. सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

१) श्रीमती लता दलाल
२) श्री. अजितकुमार शेळके
३) श्री. मिर्झा अलिम बेग
४) श्री. मोहसिन अहमद
५) श्री. अन्वर बेग मिर्झा
६) श्री. अशोक सायन्ना
७) श्री. एस. बी. वाघमारे
८) श्री. अब्दुल रशीद खान (मामू)
९) श्री. मुजीब अलमशा खान
१०) श्री. मधुकर शिंदे
११) श्री. मोतीराम घडामोडे

या निवडणूकी प्रक्रियेसाठी छाननी अधिकारी श्री. एम. ए. खडके आणि व्ही. व्ही. जावरे तर मतदान अधिकारी म्हणून श्री. अब्दुल हसन आणि बिपीन वाहुळ यांची तर मतपेटीजवळ मतदान अधिकारी म्हणून श्री. गणेश जाधव नेमणूक करण्यात आली आहे.

मतपेटी जवळील मतदान अधिकारी श्री. गणेश जाधव या मतपेटी सर्वांसमोर रिकामी असल्याचे निदर्शनास आणून दिले सर्वप्रथम वॉर्ड क्र. ३९ चे स. सदस्य श्री. पि. बी. पैठणकर यांचे विनंतीनुसार सर्व स. सदस्यांचे अनुमतीने त्यांचे नाव पुकारण्यात आल्यानंतर त्यांनी मतदान केले. वार्ड क्र. ५ चे सदस्य श्री. रतनकुमार पंडागळे मतदान प्रक्रियेत भाग घेतला नाही. वार्ड क्र. १० सदस्यांनी मतदान केले परंतु वार्ड क्र. ११ चे सदस्य श्री. मोतीराम घडामोडे "हजर असूनही मतदानामध्ये भाग घ्यावयाचा नाही" असे स्पष्ट सांगितले वार्ड क्र. १२ आणि १३ चे सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र. १४ चे सदस्य श्री. बंडू प्रधान गैर हजर होते. वार्ड क्र. १५ आणि १६ चे सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वार्ड क्र. १७ चे सदस्य श्री. तकी हसन खान यांनी मतदान प्रक्रियेत भाग घेतला नाही. वार्ड क्र.

१८ ते २३ सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र. २४ च्या सदस्या सो. लता दलाल उपस्थित राहूनही मतदान पक्रियेत भाग घेतला नाही. वार्ड क्र. २५ ते ४३ चे सदस्यांनी मतदान भाग घेतला तर वार्ड क्र. ४४ चे सदस्य श्री. किशोर थोरात यांनी मतदान प्रक्रियेत भाग घेतला नाही आणि वार्ड क्र. ४ ते ६० चे सदस्यांनी मतदान नियमित केले. येणेप्रमाणे एकूण ६० सदस्यांपैकी ५३ सदस्यांनी मतदानात भाग घेतला.

**मा. महापौर** : निवडणूक प्रक्रिया ठीक १.३० वा. संपणार आहे. ज्या सदस्यांनी मतदान केले नाही त्यांनी निर्दिष्ट वेळेपूर्वीच्या मतदान करून आपला हक्क बजवावा.

ठीक १.३० वाजता मतदान प्रक्रिया संपली. त्यानंतर मतदान पेटी सिलबंद करण्यात येऊन मा. महापौर यांनी सदरची मतपेटी छाननी अधिकाऱ्यांचे उपस्थितीत उघडण्याचे आज्ञापन केले. तत्पूर्वी उभय बाजच्या एकेए प्रतिनिधीस मतमोजणी प्रक्रिया पाहणीसाठी पाचारण करण्यात आले. त्याप्रमाणे श्री. प्रदिप जैस्वाल आणि अजिजुल्ला बेग यांच्या समोर मतपेटी उघडण्यात येऊन छाननी अधिकाऱ्यांनी मतपत्रिका तपासून मा. महापौरांच्या सर्व मतपत्रिका वर स्वाक्षऱ्या घेतल्या आणि नंतर मतपत्रिका मोजनी प्रक्रियेला सुरुवात झाली.

छाननी आणि अंतिम मतमोजणीनंतर निम्ननिर्दीष्ट केल्याप्रमाणे स. सदस्य निवडणूक आल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

## ***<u>पडलेली मते</u>***

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. एकबालसिंग गिल | - | ५४ |
| २) | श्री. फैय्याजखान अहमदखान | - | ६६ |
| ३) | श्री. गजानन बारवाल | - | ४६ |
| ४) | श्री. म. इस्माईल अ. करिम | - | ४८ |
| ५) | श्री. प्रभाकर विधाते | - | ५२ |
| ६) | श्री. केशव सोनवणे | - | ५३ |
| ७) | श्री. किशोर थोरात | - | ०० |
| ८) | श्री. प्रकाश जावळे | - | ०० |

निवडून आलेल्या सदस्यांचे मा. महापौरांनी पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले. राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.